म. ग्रं सं ठाणें.
विषय इतिहास
सं. क्र. ३९८१

# महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास

REFBK-0004468

शं. दा. पेंडसे

स्वकमत

# महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास

(Cultural History of Maharastra)

१२६८

लेखक

शंकर दामोदर पेंडसे

REFBK-0004468

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा
पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥

ज्ञानेश्वर १८-९१७

नवभारत ग्रंथमाला कार्यालय

शके १८५३ ] नागपूर. [ इ. स. १९३१

मुद्रक—गणेश काशिनाथ गोखले, सेक्रेटरी श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार पेठ, पुणें नं. २

प्रकाशक—श्री. वेंकटेश शामराव बलकुंदी, बी. ए.
व्यवस्थापक, नवभारत ग्रंथमाला, कॉंग्रेस नगर, नागपूर

नवभारत ग्रंथमाला.

२

# महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास

# नवभारत ग्रंथमालेचीं

## लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें.

### १. राज्यशास्त्र.

**लेखक, श्री. नरसिंह चिंतामण केळकर.**

श्री. तात्यासाहेब केळकरांनी स्वतः होऊन हौसेने हें पुस्तक लिहावयास घेतलें आहे. अगोदर विषय राजकारणाचा. त्यांतून आज तीन तपें राजकारणांत मुरलेल्या महाराष्ट्राच्या पुढाऱ्याने व साहित्याचार्यांने स्वयंस्फूर्तीने तो लिहावयास घेतला आहे; हा योगायोग महाराष्ट्र वाङ्मयांत केवळ अपूर्व आहे असेंच कोणीही म्हणेल.

### २. शेक्सपियर व तत्कालीन इंग्रजी रंगभूमि.

**लेखक, प्रो. गणेश हरि केळकर**, एम्. ए. ( केंब्रिज ).

इंग्रजी नाट्यवाङ्मयाच्या उदयाचें व शेक्सपियरच्या नाट्य-कृतींचें सोप्या भाषेंत फारच सुंदर वर्णन ग्रंथकारांनी केलें आहे. शेक्सपियरचें चरित्रही मनोवेधक रीतीने या ग्रंथांत गोवण्यांत आलें आहे.

### ३. अस्पृश्यांचा प्रश्न.

**लेखक, श्री. विठ्ठल रामजी शिंदे.**

अस्पृश्यांचा प्रश्न हा आपल्या राष्ट्राला व विशेषतः हिंदु-समाजाला किती जिव्हाळ्याचा होऊन बसला आहे हें कोणास वर्णन करून सांगण्याची जरूरी नाही. अस्पृश्या-द्धाराच्या कार्याचे प्रणेते श्री. शिंदे हेच खुद्द या विषयो-वर ग्रंथ लिहीत आहेत. तेव्हा तो ग्रंथ किती उद्बोधक व कर्तव्य-जागृति करणारा होईल हें सांगणें नकोच.

# अनुक्रमणिका.


| प्रकरण. | पान. |
|---|---|
| १ लें—विषयप्रवेश | १–१५ |
| २ रें—ऋग्मंत्रकाल | १६–३३ |
| ३ रें—ब्राह्मणकाल | ३४–५४ |
| ४ थें—सूत्रकाल | ५५–८६ |
| ५ वें—स्मृतिकाल | ८७–११७ |
| ६ वें—महाराष्ट्रांतील जुन्या राजवटी | ११८–१३८ |
| ७ वें—ज्ञानेश्वर | १३९–१५८ |
| ८ वें—एकनाथ आणि तुकाराम | १५९–१७२ |
| ९ वें—समर्थ रामदास | १७३–१९१ |
| १० वें—उपसंहार | १९२–१९८ |

# आधारभूत ग्रंथ.

( १ ) ऋक्संहिता ( २ ) दशोपनिषदें ( ३ ) भगवद्गीता.
( ४ ) मनुस्मृति (५) याज्ञवल्क्यस्मृति (६) महाभारताचा उपसंहार.
( ७ ) मध्ययुगीन भारत तीनखंड ( ८ ) प्राचीन महाराष्ट्र. आदि आणि शातवाहन पर्व ( डॉ. केतकर ).
( ९ ) Ancient India ( R. C. Dutt ).
( १० ) Some Contributions of South India to Indian Culture.
(११) श्री. वैद्य यांचे निबंध व भाषणें.
(१२) ज्ञानेश्वरी (१३) एकनाथी रामायण (१४) एकनाथी भागवत.
(१५) यथार्थदीपिका ( १६ ) गाथापंचक ( इंदिरा प्रेस )
(१७) मुसलमानी रियासत ( १८ ) मराठी रियासत.
(१९) ऐतिहासिक प्रस्तावना ( २० ) राधामाधवविलासचंपू.
(२१) हिंदुलग्नसंस्था ( २२ ) गीतारहस्य.
(२३) Early History of the Deccan ( डॉ. भांडारकर ).
(२४) Caste system ( बाबू गंगाप्रसाद ).
(२५) ज्ञानेश्वरचरित्र (२६) एकनाथचरित्र ( रा. पांगारकर ).
(२७) दासबोध (२८) समर्थांची कविता (२९) ज्ञानेश्वरांची प्रभावळ.
(३०) History of the Maratha people.
(किंकेड आणि पारसनीस )

५-१-६ .
२५.१०.३१

# प्रास्ताविक.

प्रस्तुत पुस्तकाचा कांही भाग असा आहे कीं, तो महाराष्ट्राला जसा लागू आहे तसाच हिंदुस्थानांतील इतर प्रांतांनाही लागू आहे. पण कांही भाग असा आहे कीं तो फक्त महाराष्ट्रालाच लागू पडेल. म्हणून पुस्तकाला "महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास" असें मर्यादित नांव दिलें आहे. हिंदुस्थानचा सांस्कृतिक इतिहास लिहावयाचा म्हणजे सर्व देशी भाषांचा व त्यांतील वाङ्मयाचा अभ्यास केला पाहिजे.

श्रुतिस्मृतींवरून त्या त्या काळची संस्कृति काय होती तें पाहिलें आहे. पण त्याबरोबर एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, श्रुतिस्मृतींत सांगितल्या-प्रमाणें तंतोतंत सर्व लोकांचें आचरण त्या त्या काळीं असेलच असें नाही. परंतु समाजांतील पुढारी लोकांचे आचारविचार त्यावरून कळून येतात. सर्व समाजांत सर्व काळीं कनिष्ठ आचारविचारांचे लोक असतातच पण राष्ट्रांतील आचारविचारांची त्या त्या वेळीं जी कमालीची प्रगति झालेली असते तिच्यावरून त्या त्या वेळच्या संस्कृतीचें स्वरूप ठरवावें लागतें.

प्रस्तुत पुस्तकाच्या मर्यादित जागेंत या विषयाची सामान्य कल्पनाच देणें शक्य होतें. या विषयाचें विस्तृत विवेचन ज्ञानवृद्धांनी करावयाचें आहे.

पुस्तकाचें हस्तलिखित वाचून प्रो. मिराशी व प्रो. बनहट्टी यांनीं ज्या बहुमूल्य सूचना केल्या त्याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे. पुस्तक प्रकाशित करण्यांत या मालेच्या प्रकाशकांचें अनेक रीतींनी साहाय्य झालें असल्यामुळें त्यांचेही आभार मानणें अवश्य आहे. मुद्रक रा. गोखले यांनी छापण्याचें काम त्वरित व चांगलें करून दिलें याबद्दल त्यांचेही आभार मानिले पाहिजेत.

आधारभूत ग्रंथांची यादी सोबत जोडली आहे. त्यांच्या कर्त्यांचा मी ऋणी आहें. शेवटीं, महाराष्ट्राच्या दैवी संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करणाऱ्या ऋषि-मुनींच्या व साधुसंतांच्या चरणीं, त्यांचेंच ऋण काढून लिहिलेलें हें पुस्तक, तें ऋण अंशतः फिटावें म्हणून नम्रपणें अर्पण करितों.

नागपूर
श्रावणी-पौर्णिमा १८५३.

शं. दा. पेंडसे

## खुलासा

याज्ञवल्क्य-स्मृतीच्या या पुस्तकांत वापरलेल्या प्रतींत कित्येक प्रकरणांचे व श्लोकांचे आंकडे बरोबर नाहीत असें आढळून आल्यामुळें पुढील खुलासा केला आहे.

पान १०२ वरील ११२ वा श्लोक १२२ वा आहे. पान १०८ वरील ३-१ हा श्लोक ३-५२ वा आहे. व "यदुच्यते..." हा श्लोक ३-५६ वा आहे. १०९ पानावरील ३-७३ हा श्लोक ३-७२ वा आहे. ११३ व्या पानावरील श्लोक व ११७ पानावरील २१४ वा श्लोक नवव्या दानप्रकरणांतील आहेत. ८८ पानावरील पहिल्या श्लोकांत 'अनुतिष्ठन्हि मानवः' असें पाहिजे. बुद्ध शब्दाऐवजीं कांहीं ठिकाणीं बौद्ध शब्द पडला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

ॐ

# महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास.

## प्रकरण पहिलें

## विषयप्रवेश.

**ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।**
**अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ॥**
**अधीत्य विधिवद्वेदान्पुत्रांश्चोत्पाद्य धर्मतः ।**
**इष्ट्वा च शक्तितो यज्ञैर्मनो मोक्षे निवेशयेत् ॥**

मनुस्मृति ६–३६, ३७.

मनुष्याने जन्म घेतला कीं त्याला देव ऋषि व पितर या तिघांचें ऋण फेडावयाचें असतें अशी पुरातन कालापासून भारतीय आर्यांची समजूत आहे. “ जायमानो वै ब्राह्मणः त्रिभिर्ऋणवान् जायते । यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः स्वाध्यायेन ऋषिभ्यः ” या तैत्तिरीय संहितेतील वाक्यांत ही समजूत व्यक्त झाली आहे व या श्रुतिवाक्याच्या आधारानेच भगवान् मनूनें वरील दोन श्लोकांत सांगितलेला नियम केला आहे. आपल्याला जन्म देणाऱ्या व आपलें पालनपोषण करणाऱ्या पितरांचें ऋण तर प्रत्येक मनुष्याला असतेंच पण हें केवळ कौटुंबिक ऋण झालें. एवढेंच ऋण फेडून मनुष्य अनृणी होत नाही. या कौटुंबिक ऋणाशिवाय त्याला राष्ट्रीय ऋणही फेडावयाचें असतें व हें राष्ट्रीय ऋण म्हणजेच देवांचें व ऋषींचें ऋण होय. देव आणि ऋषि हे सगळ्या राष्ट्राचे असतात व त्यांनी राष्ट्रावर परंपरेने जे उपकार केलेले असतात ते फेडणें, हें राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य असतें,ही राष्ट्रीय भावना वरील नियमांत चांगल्या रीतीने व्यक्त झालेली आहे.

आतां ऋषि कोण ? त्यांनी राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीवर काय उपकार केलेले असतात ? त्यांच्या ऋणाचें स्वरूप काय ? व तें कसें फेडावयाचें असतें याही प्रश्नांचा विचार केला पाहिजे. राष्ट्रांतील लोकांच्या कल्याणाची सदैव चिंता वाहणाऱ्या ज्या अत्यंत थोर अशा विचारी व वंदनीय

व्यक्ति राष्ट्रांत निर्माण होतात त्यांनाच ऋषि असें म्हणतात. राष्ट्राचें कल्याण व्हावें म्हणून हे तपश्चर्या करितात; पूर्वीचा इतिहास व वर्तमानकालीन परिस्थिति यांचें नीट अवलोकन करून व मनुष्यजातीच्या श्रेष्ठ साध्याचा विचार करून हें साध्य साधण्याचीं साधनें व मार्ग अमुक अमुक आहेत असें वेळोवेळीं ते राष्ट्राला बजावीत असतात; आपल्या तपःसामर्थ्यानें, तेजानें व त्यागानें राष्ट्राकडून त्या साधनांचें अवलंबन करवितात व अशा रीतीनें राष्ट्राचा अधःपात न होतां तें सदैव उन्नतीच्या मार्गानेंच जाईल अशी काळजी घेतात म्हणून राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्ती त्यांची ऋणी असते; आणि हें ऋण कसें फेडावयाचें असतें? " अधीत्य विधिवद् वेदान् "— अध्ययन करून हें ऋण फेडावयाचें असतें. अनेक शतकांच्या दीर्घ तपस्येनंतर, खोल विचारानंतर मनुष्यजातीचें अंतिम साध्य काय असावें, या साध्याचीं साधनें कोणतीं यासंबंधीचे अनुभवसिद्ध सिद्धांत ऋषींनी ज्या ग्रंथांत सांगितले आहेत त्या ग्रंथाचें अध्ययन करून व ते सिद्धांत स्वतःच्या आचरणांत आणूनच हें ऋण फेडतां येणें शक्य आहे. देवांच्या उद्देशानें यज्ञ करीत, सर्व आयुष्य त्यागमय करून, जीं दिव्य ध्येयें संपादन करण्याचा उपदेश ऋषींनी केला व जीं दिव्य ध्येयें पुढें ठेवून ऋषींच्या उपदेशाप्रमाणें आपल्या पितरांनी शतकानुशतकें, यज्ञ आणि त्याग करीत आपलीं जीवितें व्यतीत केलीं त्या दिव्य ध्येयांचें, व आपल्या पितरांच्या यज्ञमय आयुष्याचें ज्ञान, ऋषींच्या ग्रंथांचें अध्ययन केल्याशिवाय कसें होणार व हें ज्ञान झालें नाहीं तर आपल्या जन्मदात्या पितरांची कार्यपरंपरा आपल्याला पुढें कशी चालवितां येणार? ऋषींच्या ध्येयांचें ज्ञान, अध्ययन करून प्राप्त केलें नाहीं तर देवाकरितां दिव्य यज्ञ कसा करावा हेंही समजत नाही व पितरांची परंपरा पुढें कशी चालवावी याचेंही ज्ञान प्राप्त होत नाही. धर्मतः प्रजोत्पादन करून पितरांचें ऋण फेडावयाचें असतें पण केवळ पशूसारखें लेंढार विऊन हें ऋण फिटत नसतें. ही जी प्रजा निर्माण करावयाची असते ती पितरांची दिव्य परंपरा पुढें चालविण्याकरितां असते आणि ही परंपरा काय आहे तें अध्ययन करून ऋषिऋण फेडल्याशिवाय कळत नाही. ज्या राष्ट्रांतील व्यक्ति, अध्ययनपूर्वक ऋषिप्रणीत दिव्य ध्येयें व त्यांचे मार्ग समजून घेऊन ऋषींच्या ऋणांतून

मुक्त होत नाहीत, ज्या राष्ट्रांतील व्यक्तींना आपल्या पितरांचें पराक्रम माहीत नाहीत, व देवाकरितां यज्ञ कसे करावे लागतात हेंही समजत नाहीं त्या हतभागी व्यक्ति व त्यांनी भरलेलें हतभागी राष्ट्र पतित झालें, मनूने वर म्हटल्याप्रमाणें त्याचा अधःपात झाला तर त्यांत आश्चर्य कसलें ?

राष्ट्रांतील ऋषींचे, पुरोगामी विद्वानांचे विचार, त्यांनी ठरविलेलीं ध्येयें व त्यांचे मार्ग आणि त्यांना अनुसरून राष्ट्रांत झालेला आचार यांनीच राष्ट्राची संस्कृति बनत असते. ही संस्कृति जिवंत राहावी म्हणून तिचें ज्ञान राष्ट्रांतील ऋषि, लोकांना एकसारखें करून देत असतात. अशा तऱ्हेच्या श्रेष्ठ ऋषींची थोर परंपरा आपल्या महाराष्ट्रांत भृगु–अगस्तीपासून तों ज्ञानेश्वर–रामदासांपर्यंत अखंड चालत आलेली आहे. महाराष्ट्रीय तरुणांनी या थोर ऋषींच्या ग्रंथांचें अध्ययन करून, त्यांतील विचार आत्मसात् केले पाहिजेत, आपली पितृपरंपरा समजून घेतली पाहिजे व त्या परंपरेला साजेल असा आपला जीवनक्रम आखला पाहिजे. प्रचलित शिक्षणपद्धतीचा उद्देशच नवी आणि परकीय संस्कृति राष्ट्रावर लादण्याचा असल्यामुळें, या ऋषींच्या थोर विचारांपासून राष्ट्रांतील तरुणांना वंचित ठेवण्यांत येत आहे. त्यामुळें तरुणांना आपली परंपरा काय आहे ? कोणतीं कार्यें अपूर्ण ठेवून आपल्या पितरांनी या जगाचा त्याग केला आहे ? याचेंच मुळीं ज्ञान होत नाही त्यामुळें परंपरेला साजतील अशीं कृत्येंही त्यांच्याकडून होत नाहीत. उलट या परंपरेविषयीं अज्ञानमूलक तुच्छता मात्र जेथें जेथें दृष्टीस पडते. ध्येयशून्य शिक्षण घ्यावें, पोटाकरितां गुलामगिरी करावी व अकालीं कांहीही न करतां मरून जावें अशा रीतीचा शोचनीय आयुष्यक्रम तरुणांना त्यामुळें पत्करावा लागत आहे. ऋषींचें ऋण न फेडण्याचा हा परिणाम आहे. हें ऋण अंशतः फेडण्याचा एक अगदी नम्र प्रयत्न महाराष्ट्रीय तरुणांकरितां या पुस्तकांत करण्याचा विचार आहे.

महाराष्ट्राचा जो सांस्कृतिक इतिहास आपणास पहावयाचा आहे तो अर्वाचीन ज्ञात महाराष्ट्राचा होय. कारण खुद्द महाराष्ट्र हें नांवच अर्वाचीन आहे. प्राचीन महाराष्ट्राचा इतिहास उपलब्ध नाहीं. डॉ. केतकर तो संशोधीत आहेत. महाराष्ट्र हें नाव केव्हापासून आढळतें यासंबंधानें रा. वैद्य यांचें म्हणणें असें आहे कीं, " इ.स.च्या पांचव्या शतकाच्या पूर्वीं या देश

नामाचा उल्लेख सापडत नाही. महाराष्ट्री या भाषानामाचा उल्लेख मात्र बराच जुना आहे. इ. स. ६० मध्यें हाल राजानें ‘ सप्तशती ’ हा ग्रंथ महाराष्ट्री भाषेंत लिहिला. त्याच्यापूर्वी होऊन गेलेल्या वररुचीने जें प्राकृत व्याकरण केलें त्यांत ‘ महाराष्ट्री ’ या प्राकृताचा उल्लेख आहे. पण ‘ महाराष्ट्र ’ असें देशाचें नांव इ. स. च्या पांचव्या शतकांतील वराहमिहिरच्या ग्रंथांत सापडतें असें डॉ. ग्रिअर्सन म्हणतात.” “ महाराष्ट्र या शब्दाला अंकित लेखांचा पुरावा शोधितां सातव्या शतकापूर्वीचा नाही. हें नांव प्रथम आपणास सत्याश्रय पुलकेशीच्या इ. स. ६११ सालच्या बदामीच्या अंकित लेखांत सांपडतें. त्यांत त्याने तीन महाराष्ट्रकें जिंकल्याचें लिहिलें आहे. तीन महाराष्ट्रकें कोणतीं तें आजपर्यंत कोणी स्पष्ट केलें नाही. महाराष्ट्र या शब्दाची आपणास व्यापक कल्पना आहे तशीच पुलकेशीच्या मनांत असावी. त्याच्या तीन महाराष्ट्रांत विदर्भाचा अंतर्भाव होत असावा.” असें डॉ. केतकर लिहितात. महाभारतांतील देशांच्या यादींत विदर्भ, रूपवाहिक, अश्मक, पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अपरान्त व कौकण इत्यादि देशांचा उल्लेख आहे. खिस्ती शतकापूर्वीच्या तिसऱ्या शतकांतील अशोकाच्या शिलालेखांत राष्ट्रिक, पेतनिक आणि अपरान्त या तीन देशांचीं नांवें आढळतात. उदाहरणार्थ, अशोकाच्या पांचव्या शासनांत खालील उल्लेख आहे. “ ते सवपासंडेषु व्यापता धम्माधिष्ठानाय......धम्मयुतस्यच योणकंबोजगंधारानं रिस्टिकपेतेणिकानं ये वा पि अजे अपरांता भतमयेसु व...सुखाय धंमयुतानं अपरिगोधाय व्यापता ते ” अर्थः—हे सर्व भिन्न मतवादीमध्यें धर्मप्रसार करण्याकरितां गुंतले आहेत. धर्मयुक्ताच्याशिवाय यवन, कांबोज, गांधार यांच्या आणि राष्ट्रिक आणि पैठणकांच्या; याशिवाय जे अपरांतनिवासीच्या ( म्हणजे कोकणस्थांच्या ) भृत्यवर्गामध्यें सुखासाठीं, धर्मयुक्तांच्या अपरिबाधेसाठीं व्यापृत आहेत ” ( शातवाहनपर्व पान १०, ११ ) पेरिप्लसमध्यें देश, आणि उत्तर व दक्षिण कोकण यांना आर्यस्थान असें म्हटलें आहे व त्यांत शूर्पारक ( सोपारें ) प्रतिष्ठान ( पैठण ) व तगर हीं शहरें आहेत असें लिहिलें आहे. वरील सर्व गोष्टींचा समन्वय करून, “ महाराष्ट्र देशाची व्याप्ति बहुतेक हल्लींप्रमाणेंच खिस्ती सनाच्या पूर्वींपासून असावी. प्रारंभीं म्हणजे इ. स. पूर्वी पांचव्या किंवा चौथ्या

शतकांत विदर्भ, अश्मक, पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अपरान्त, कोंकण अशीं निराळीं नावें होतीं. अशोककालीं राष्ट्रिक हें नाव पुढें सरसावलें व ख्रिस्ती सनापूर्वी सर्वांचा महाराष्ट्र या नांवाखालीं समावेश होऊं लागला" असा रा. वैद्यांनीं निष्कर्ष काढला आहे. महाराष्ट्री हें भाषेचें नांव ख्रि.श. पूर्वी प्रचारांत होतें कीं नाहीं याविषयींही कित्येकांनी शंका प्रदर्शित केली आहे. तथापि जरी तें प्रचारांत असलें तरी महाराष्ट्र या देशाचें नांव त्यावेळीं प्रचारांत असल्याचा पुरावा अद्याप मिळालेला नाहीं हें वर सांगितलेंच आहे. "महाराष्ट्र नांव प्रथम दण्डकारण्यातील लोकांनी घेतलें असावें व तेथून हा शब्द पूर्वेकडे पसरत व लोकप्रिय होत चालला. महाराष्ट्र या शब्दाची आवड नागपुरास सीताबर्डीवर शके १००८ मध्यें उत्पन्न झाली होती असें स्पष्ट दिसून येतें. नागपूरच्या म्यूझिअममध्यें सीताबर्डीवरून नेलेला एक खोदलेला स्तंभ आहे त्या लेखावरून असें दिसतें कीं, नागपूर प्रांतावर एका महासामंताचें राज्य होतें. तो महासामंत आपणास " महाराष्ट्र कूट" वंशांतला म्हणवून घेई. तो चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा मांडलिक होता. प्रस्तुत सामंताला आपल्या कुळाला 'महा' हें उपपद लावण्यांत 'महाराष्ट्र' या शब्दाशीं आपल्या कुलाचा आणि आपल्या सत्तेखालीं असलेल्या प्रदेशाचा संबंध जोडण्याची इच्छा असावी. दंडकारण्यानें महाराष्ट्र हें नांव घेतल्यामुळें, दंडकारण्य हें नांवही लोकप्रिय झालें. कारण त्या नावाची व्याप्ति वाढत वाढत चांद्यापर्यंत आली. चांद्याजवळ बस्तर संस्थानांत दंतेश्वर येथें दिक्पालदेवाचा लेख इ. स. १७०२ मधला आहे. त्यांत दंडकारण्य व महाराष्ट्र हीं एकच धरून व महाराष्ट्राची हद्द चांद्यापर्यंत धरून 'दंडकारण्यनिकट बस्तरदेशे' असे शब्द वापरले आहेत." या सर्व गोष्टींवरून डॉ. केतकर यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं,

( १ ) महाराष्ट्राचे मुख्यतः तीन विभाग आहेतः ( १ ) विदर्भ, ( २ ) अपरांत व ( ३ ) दंडकारण्य. या सर्वांत विदर्भ जुना आहे. दंडकारण्यास हळूहळू महाराष्ट्र हें नांव लागू लागलें आणि त्यास सुरवात ७व्या शतकांत कानडी मुलुखांत झाली. महाराष्ट्र हें नांव हळुहळू नागपूरपर्यंत पसरविण्याचा प्रयत्न अकराव्या शतकांतच झाला." विदर्भ आणि कुंतल म्हणजे कृष्णेच्या उगमाच्या दक्षिणेकडील देश मिळून महाराष्ट्र होतो असें डॉ. स्टेन कुन्हौ

यांनींही प्रतिपादन केल्याचें रा. वैद्य लिहितात. पुलकेशी राजा ' महाराष्ट्रांत ' राज्य करीत होता व तो मराठा होता असें ह्युएन्त्संगानेही लिहिलें आहे. यावरून असें दिसतें कीं पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र इत्यादि लहान लहान राष्ट्रें एकत्र होऊन महाराष्ट्र बनलें असावें व या राष्ट्रांत रहाणारे जे राष्ट्रिक, ज्यांचा अशोकाच्या शिलालेखांत उल्लेख आहे तेच हल्लींच्या मराठ्यांचे पूर्वज असावे. इ. स. १०३० मध्यें अल्बेरुणीनें लिहिलेल्या आपल्या ग्रंथांत " नेमावरच्या दक्षिणेस ' मराठ ' देश लागतो आणि मग कोंकण लागतें त्याची राजधानी टाना समुद्रकिनाऱ्यावर आहे " असें लिहिलें आहे. राज शेखर यानें ( इ. स. ९१०-९४० ) आपल्या काव्यमीमांसा ग्रंथांत महाराष्ट्र हें नांव देऊन शिवाय माहिष्मक, अश्मक, विदर्भ, कुंतल, क्रथकैशिक, शूर्पार, नासिक्य, कुंकण इत्यादि तदंतर्गत प्रांतांचा पुनः स्वतंत्र उल्लेख केला आहे. या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा कीं या सर्व लहान लहान प्रांतांचा ' महाराष्ट्र ' या नांवाने उल्लेख इ. स. च्या पूर्वींच होत असणें जरी संभवनीय असलें तरी तसा उल्लेख केल्याचा स्पष्ट पुरावा प्रथम इ. स. च्या पांचव्या शतकांतील वराहमिहिरच्या ग्रंथांत व सातव्या शतकांतील शिलालेखांत सांपडतो. हे सर्व प्रदेश पोटांत घेऊन जें महाराष्ट्र बनलें आहे त्याची व्याप्ति, पूर्वेस नागपूर-भंडाऱ्यापासून पश्चिमेस सुरतेच्या खालपर्यंत जाऊन नंतर अरबी समुद्राच्या कांठाकांटाने गोकर्णापर्यंत दक्षिणेला उतरून तेथून पुन्हा सरळ नागपूरभंडाऱ्यापर्यंत रेघ मारिली असतां जो त्रिकोणाकृति प्रदेश तयार होतो, त्या प्रदेशावर आहे व या प्रदेशांत राहात आलेल्या लोकांचा सांस्कृतिक इतिहास आपणांस पहावयाचा आहे.

' महाराष्ट्र ' शब्दाची व्याप्ति किती तें आपण पाहिलें. आतां संस्कृति शब्दानें कोणती कल्पना व्यक्त होते तें पाहिलें पाहिजे. संस्कृति शब्द आपण अलिकडे नवीन बनविला आहे. Civilization, Culture इत्यादि इंग्रजी शब्दांनीं व्यक्त होणारी कल्पना संस्कृति शब्दांत आहे. हिंदीमध्यें या इंग्रजी शब्दांचें ' सभ्यता ' असें भाषांतर करितात. सुसंस्कृत समाजाच्या जीवनांत अंतर्भूत होणाऱ्या सर्व गोष्टींना ' संस्कृति ' असें म्हणतां येईल. संस्कृति शब्दाचा मुळांतच चांगला अर्थ आहे; कारण विचारपूर्वक संस्कार दिले गेलेले आचारविचारच संस्कृतींत अंतर्भूत होऊं शकतात; तथापि

उत्तम संस्कृति, हीन संस्कृति असें म्हणण्याचीही पद्धति आहे. हीनसंस्कृतीला कै० राजवाडे यांनीं 'विकृति' असा शब्द जाणूनबुजून योजिला आहे. आपल्या धर्मांत आपल्या आचारविचारांचाही समावेश होत असल्यामुळें 'सांस्कृतिक'च्या जागीं 'धार्मिक' म्हटलें असतें तरीही चाललें असतें. पण संस्कृति शब्द आतां रूढ झाल्यामुळें व चांगला अर्थवाहकही असल्यामुळें तोच वापरला आहे. संस्कृति शब्दांतच चांगलेपणा गर्भित आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे, मनुष्याच्या अंतःकरणावर सुसंस्कार करून, त्याची मलिनता व विकारवशता कमी करून, त्याच्यांतील पशुत्व काढून टाकून, त्याला माणुसकी देऊन, हळुहळू देवत्वाकडे नेणारे जे आचारविचार त्याना संस्कृति असें म्हणतां येईल. एखादा मनुष्य कितपत सुसंस्कृत किंवा सभ्य आहे हें जसें त्याच्या आचार-विचारांवरून समजतें त्याप्रमाणें राष्ट्रीय आचारविचारांवरून राष्ट्रीय संस्कृति कळून येते. तात्पर्य, राष्ट्रीय भावना, राष्ट्रीय ध्येयें व हीं साधतील अशा धोरणानें केलेली आचारांची व्यवस्था यांनी राष्ट्रीय संस्कृति बनते व त्यांच्या श्रेष्ठ कनिष्ठतेवर संस्कृतीचें श्रेष्ठकनिष्ठत्व अवलंबून असतें.

हा प्रामुख्यानें सांस्कृतिक इतिहास असल्यामुळें, यांत राजकीय घडामोडींचें वर्णन येणार नाहीं. कै० राजवाड्यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे हा राष्ट्राचा आत्मिक किंवा मानसिक इतिहास आहे. राष्ट्रीय मनाचा, विचारांचा, ध्येयांचा विकास किंवा संकोच कसा झाला व त्याचा परिणाम त्याच्या धोरणावर कितपत झाला हें या इतिहासांत प्रामुख्यानें पाहावयाचें आहे. राष्ट्रांतील कर्त्या पुरुषांच्या कृत्यामागें जे हेतू असतात त्यांची छाननी आत्मिक इतिहास करीत असतो तर या हेतूला अनुसरून ते वर्षामध्यें इतके इतके वेळां वागले अशी जंत्री देण्याचें काम भौतिक इतिहास करितो. तेव्हां महाराष्ट्रांत इतकीं इतकीं राजघराणीं झालीं, त्यांच्या इतक्या पिढ्या झाल्या, त्यांतील अमुक राजानें अमुक लढाया जिंकल्या, अमक्या वर्षींच्या लढाईत त्याचा जय किंवा पराजय झाला अशा तऱ्हेची हकीकत सांगण्याचें काम या इतिहासाचें नाहीं. शिवाय नुसत्या भौतिक इतिहासानें राष्ट्राचा इतिहास पूर्णही होत नाही. नुसत्या भौतिक इतिहासावरून काढलेलीं अनुमानें पुष्कळ वेळां चुकीचीं असतात. कारण राष्ट्रीय कृत्यांचा

बरे वाईटपणा त्यांच्या केवळ बाह्य स्वरूपावरून ठरत नसून त्याच्यामागें असलेल्या हेतूवरून ठरत असतो. हे हेतु कितपत सुसंस्कृत होते हें जों-पर्यंत पाहिलें जात नाहीं तोंपर्यंत भौतिक इतिहासाची विचिकित्सा नीट करितां येत नाही.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास शोधावयाचा म्हणजे महाराष्ट्रांतील लोकांच्या विचारआचारांचें परीक्षण करणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें हे लोक महाराष्ट्रांत केव्हां आले, येतांना कोणते आचार विचार घेऊन आले तेंही पाहिलें पाहिजे व हें पाहूं लागलें म्हणजे महाराष्ट्राच्या वसाहतकालाचा प्रश्न समोर उभा राहतो. दक्षिणच्या इतिहासावर प्रथम प्रकाश पाडण्याचें श्रेय ऋषिवर्य भांडारकर यांस आहे. तेव्हां याबाबतींत प्रथम त्यांच्याच मताचा उल्लेख करणें अवश्य आहे. महाराष्ट्राचा किंवा त्यांतील निरनिराळ्या प्रांतांचा उल्लेख पाणिनीने केला नाही--

Panini must have flourished in the beginning of the seventh century before the Christian era;if not earlier still... and now to our point, the Indian Aryans had thus no knowledge of southern India previous to the seventh century before Christ. About that time however,they must have begun to penetrate still further......and first settled in Vidarbha or Berar; but in the course of some time they cross the Vindhya and settled in दंडकारण्य. Before B. C. 350 they had become familiar with the whole country down to Tanjore and Madura ( History of Deccan 141 ).

पाणिनीने ज्याअर्थी दंडकारण्यांतील प्रदेशांचा उल्लेख केला नाही त्याअर्थी पाणिनीच्या काळापर्यंत दक्षिणेकडील देशांचें ज्ञान आर्यांना नव्हतें. त्याच सुमाराला दंडकारण्याच्या वसाहतीला सुरवात झाली व कात्यायन आणि पतंजली यांच्या ग्रंथांत दक्षिणेकडील देशांचे उल्लेख ज्या अर्थी सापडतात त्याअर्थी इ. स. पूर्वी ३५०च्या सुमाराला ही वसाहत पुरी झाली असावी. विदर्भाची वसाहत आधीं झाली. तेथें भोज नांवाचे राजे राज्य करीत असत. या भोजांचे ज्याप्रमाणें महाभोज झाले त्याप्रमाणें राष्ट्रिकांचे महाराष्ट्रिक होऊन त्यांतूनच हल्लींचे मराठे निघाले असावे असा

डॉ. भांडारकर यांचा तर्क आहे व रा. वैद्य यांनाही तो मान्य आहे. कै. राजवाडे यांनी शकपूर्व १००० पासून शकपूर्व ५०० पर्यंत महाराष्ट्राची वसाहत होत होती असें प्रतिपादिलें आहे. डॉ. केतकर यांचें म्हणणें असें आहे कीं, या कालांत वसाहती करण्याकरितां उत्तरेकडून लोक दक्षिणेंत येत होते हें खरें, पण त्यांनीच प्रथमतः महाराष्ट्राची वसाहत केली ही गोष्ट मात्र खरी नाही. महाराष्ट्रांत आर्यांची वसाहत वेदकालाच्याहीपूर्वी झालेली आहे असा सिद्धांत त्यांनी आपल्या प्राचीन इतिहासांत मांडला आहे. कारण ह्या वसाहतवाल्यांचे पुढारी अगस्ति ऋषी होते असें पुराणांत सांगितलें आहे. व या अगस्ति ऋषींनी केलेलीं सूक्तें ऋग्वेद–संहितेंत समाविष्ट केलेलीं आहेत. डॉक्टरसाहेबांचीं प्रमाणें विचारणीय आहेत यांत शंका नाहीं पण पाणिनीनें आपल्या व्याकरणांत इतर अनेक देशांचा उल्लेख केला असून दक्षिणेकडील देशांचा मात्र उल्लेख केला नाहीं याचें कांहींतरी सयुक्तिक कारण डॉक्टरसाहेबांनी दाखवावयास पाहिजे होतें. पुराणांची रचना अर्वाचीन असली तरी त्यांतील गोष्टी वेदांहूनही प्राचीन असण्याचा संभव असल्यामुळें पुराणांतील अगस्ति ऋषि हा सूक्त-कार अगस्तीहूनही प्राचीन असण्याचा संभव आहे व त्यामुळें ऋक्संहिता-कालापूर्वींच महाराष्ट्राची वसाहत झाली होती असें त्यांचें म्हणणें आहे.

वसाहत करावयास जाणारे लोक नेहमींच निर्मनुष्य प्रदेशांत जातात असें नाही. ते जातात तेथें त्यांच्यापूर्वी राहाण्यास गेलेलेही लोक असतात. उत्तरेकडे आर्य आले तेंही असेच एका संघामागून दुसरा संघ असे आले. ऋग्वेदमंत्रांच्या रचनेपूर्वीं हजारों वर्षें हिंदुस्थानांत आर्य लोकांची वसाहत झाली होती व दक्षिणेकडील आर्यांची वसाहत जरी उत्तरेकडील वसाहतीनंतर झाली असली तरी ती सुद्धां ऋग्वेदमंत्रांच्या पूर्वीं हजारों वर्षें झालेली आहे असें म्हणण्यांत डॉक्टरसाहेबांकडून अतिशयोक्ति होत आहे असें वाटतें.आधींच ऋग्वेदमंत्रांचा काळ आतिशय प्राचीन आहे. इ.स. पूर्व १४००ते१००००वर्षेंपर्यंत तो झोके खात असतो व त्याच्याही पूर्वीं हजारों वर्षें दक्षिणेकडील आर्यांची वसाहत होऊन गेली हें डॉक्टरसाहेबांचें म्हणणें जरी पटण्यासारखें नसलें तरी दक्षिणचा इतिहास जितका अर्वाचीन समजतात तितका तो अर्वाचीन नाही हें म्हणणें मात्र कोणालाही पटेल. कारण ऐतरेय-

ब्राह्मणांत विदर्भांचा उल्लेख आहे.ब्राह्मणग्रंथाची रचना होण्यापूर्वी विदर्भ हा यज्ञभूमि म्हणून प्रसिद्ध होता. तेव्हां तेथील वसाहत बरीच प्राचीन असली पाहिजे हें उघड आहे. तसेंच रामावताराच्या पूर्वीच्या परशुरामानें कोंकण वसविलें व अगस्ति ऋषींनी दंण्डकारण्याची वसाहत केली त्यापूर्वी एकदां भृगूंनीही तें वसविलें होतें असें रामायणांतील कथेवरून दिसतें. त्यावरून पश्चिमेकडील महाराष्ट्राचा संबंध भृगूशीं व पूर्वेकडील महाराष्ट्राचा संबंध अगस्तीशीं लावितां येईल हेंही खरें. कारण विदर्भराजकन्या लोपामुद्रा ही अगस्तीची पत्नी होती. पण परशुराम व राम हे ऋग्वेदमंत्रकालापूर्वी झाले कीं नंतर झाले एवढ्या बाबतींत मतभेदाला जागा राहील.

अपरान्त व विदर्भ यांची वसाहत रामावताराच्या पूर्वीच झाली होती. त्यांच्या मधील दंण्डकारण्याची वसाहत अगस्ति ऋषींना पुनः कां करावी लागली याची मनोरंजक हकीकत रामायणांत दिलेली आहे. ज्या महाराष्ट्राला, धार्मिक संकल्पांत आपण अजूनही 'दंडकारण्ये देशे' असें म्हणतों त्याची पुनः वसाहत कां व कशी झाली हें सांगणारी एवढी एकच प्राचीन कथा शिल्लक असल्यामुळें ती समग्रच येथें देतों. रामायणांतील अरण्यकांडांत पुढील श्लोक आहेतः—

**दण्डकेन परित्यक्तः स्वयं देशो महात्मना ।**
**भार्गवस्य तु शापेन निर्मनुष्योऽमृगोऽभवत् ॥ १४ ॥**
**योजनानां सहस्रेषु विन्ध्यपादप्रदक्षिणम् ।**
**नातिवर्षति पर्जन्यः नच वाति सुखोऽनिलः ॥ १५ ॥**
**कस्याचित्त्वथ कालस्य दैवयोगादहं नृप ।**
**वाराणसीं परित्यज्य इह प्राप्तोऽस्मि मानद ॥ १६ ॥**

एकनाथांनी आपल्या भावार्थ रामायणांत या कथेचा विस्तार पुढीलप्रमाणें केला आहेः—

**मग अगस्ति म्हणे श्रीरामासी । दंडक राजा या प्रदेशीं ।**
**अतिगर्विष्ठ अहर्निशीं । राज्यमदेशीं उन्मत्त ॥ ६३ ॥**
**पारधी करितां दंडकासी । भृगुवंशीचा च्यवन ऋषी ।**
**अपमानिला अतिशयेंसी । तेणें त्यासी शापिलें ॥ ६४ ॥**

शाप दिधला कोपेसीं । भस्म होय स्वराज्येसी ।
ऐसें बोलतांचि ऋषी । स्वदेशेसी भस्म झाला ॥ ६५ ॥
विंध्याद्रि दाक्षिण भागेसीं । जंव पाविजे सेतुबंधासी ।
तंव दंडकारण्य नाम यासी । ऋषीशापेसी भस्म जाले ॥६६॥
राजा भस्म जाला ससैन्य । भस्म जाले मनुष्यगण ।
भस्म जाले वृक्ष तृण । पशु पक्षी पूर्ण भस्म जाले ॥ ६७ ॥
भस्म जालीं सरिता तडाग । भस्म जाले मृगपन्नग ।
भस्म जालें तद्देशी जग । दुर्धर राग ऋषीचा ॥ ६८ ॥
भार्गवाच्या शापभयेंसी । पर्जन्य वर्षेना तया देशीं ।
प्रकाशेना सूर्य शशी । अहर्निशीं अंधकार ॥ ७० ॥
ऐसेनि अंधकारेसी । लोटल्या वर्षेनवर्षी ।
पुढती वस्ती झाली कैसी । श्रीराम ऋषीसी पूसत ॥ ७१ ॥
खुंटली शशिसूर्यांची गति । विंध्याद्रि ऊर्ध्वपंथीं वाढला ।
राहिले स्वाहा स्वधाकार । राहिले स्वधर्म कर्माचार ।
राहिले जपतप विचार । रविचंद्र नुगवती ॥ ७५ ॥
देव सांगती अगस्तीसी । त्यजोनियां वाराणसीसी ।
नमावया विंध्याद्रीसी । शीघ्र दक्षिणें तुम्ही जावें ॥ ८९ ॥
थोर होईल पुण्य ऋषी । देवपितर पावती तृप्तीसी ।
ब्राह्मण चालविती स्वधर्मासी । हें तुजपासी सामर्थ्य ॥८१॥
पुढती न करी उत्थान । तैसा विंध्याद्रि नेमून ।
संस्थापावया देवब्राह्मण । दक्षिणे गमन तुवां कीजे ॥ ८३ ॥
ऐकोनि देवांचें वचन । म्यां जाणोनि नारदाचें मन ।
वसवावया दंडकारण्य । माझें आगमन दक्षिणेसी ॥ ८४ ॥
मजसवें येवोनिया ऋषी । जाहले दंडकारण्यवासी ।
कोणी राजा नाहीं या देशीं। म्हणोनि राक्षसीं व्यापिलें॥१०३
तुझें जालिया आगमन । राक्षस निर्दाळिसी संपूर्ण ।
येथोनि आतां वस्ती जाण। वन पावन श्रीरामें ॥ १०५ ॥

रामायणाच्या उत्तरकांडांत हीच कथा जरा वेगळ्या रीतीनें सांगितली आहे. इक्ष्वाकु राजाला शंभर पुत्र झाले त्यांत दंडक नावाचा एक मुलगा

होता. त्याला विंध्याद्रीजवळ राज्य दिलें होतें. तेथें भृगु–कुलोत्पन्न शुक्राचार्याला गुरू करून त्यानें राज्यकारभार चालविला. पुढें:—

कोणे एके काळीं दंडक जाण। पारधी निघाला मृग लक्षोन।
तंव भार्गव कन्या देखिली जाण। वनविहरण करीतसे ॥

भावार्थ रामायण उत्तरकांड अ. ६२–५२

ती लावण्याची पुतळी। कीं स्वर्गीची देवांगना सजली।
उपमेलागीं भूमंडळीं। दुसरी नाही तिजसारखी ॥ ५३ ॥
ऐसी सुंदर सुकुमार। अनंत गुण गंभीर।
हंसगती चालतां चरणीं भ्रमर। परिवेष्टित भोंवतीं ॥ ५४ ॥
ऐसें तें दैत्यगुरूचें कन्यारत्न। देखोनि दंडका चेतला मदन।
म्हणे तीसि तूं कोणाची कोण। काय कारणें वनीं हिंडसी॥५५
माझा मदनें जातो प्राण। अवो माझें करी वरण।
येरी म्हणे राजा मी पितया अधीन। स्वतंत्रपण मज नाही॥५६
ऐकोनि तियेचें वचन। मंदबुद्धि दंडक जाण।
बळें देवोनि आलिंगन। संभोगून सोडिली ॥ ५९ ॥
तंव झाला मध्याह्नकाळ। शुक्रें शिष्याचा घेउनी मेळ।
क्षुधार्थी होवोनि वनफळें प्रबळ। भक्षावया येता झाला ॥६१
मार्गी रुदन करिता कन्येसी। देखता झाला देवऋषी।
म्हणे तूं कोणे गांजिलीसी। कां शोक करिसी सांग मज ॥६२
येरीनें सांगतां वृत्तांत। शुक्रें ऐकोनि क्रोधें उचंबळत।
म्हणे दुष्टात्म्यानें करोनि अकृत। निजकन्येसी गांजिलें ॥
शुक्र शाप ते काळीं दारुण। देता जाला दंडका जाण।
सप्त दिवसां सहराज्य आपण। निजसैन्येसीं भस्मेल ॥६४॥
हें जें दंडकारण्य। धुई दाटोन होईल दहन।
पर्जन्य येथें न पडे जाण। बहुकाळ अवर्षणें जन पीडती ॥

वरील कथेवरून इतकें स्पष्ट होतें कीं, अगस्ति ऋषींनीं या अरण्यांत केलेली वसाहत हीं कांहीं पहिलीच वसाहत नव्हे. तत्पूर्वी भृगू कुलांतील लोकांनी ही वसाहत केली होती. परशुराम हा भृगु कुलांतलिच

आहे. भडोचला भृगुकच्छ असें म्हणतात. त्यावरून आर्य लोकांचा एक संघ विंध्याद्रीच्या पश्चिमेकडून खालीं येऊन त्यानें कोंकण बसविलें व त्यांतील कांही लोक पश्चिमेकडून पूर्वेकडे दंडकारण्य वसवीत चालले होते असें दिसतें. विंध्याद्रीच्या पूर्वेकडून खालीं आलेल्या लोकांनी विदर्भांची वसाहत केली व त्यांपैकीं कांहीं लोक पूर्वेकडून पश्चिमेकडे दंडकारण्य वसवीत चालले होते. शिवाय गंगायमुनांच्या प्रदेशांतून कांही क्षत्रिय नवीं राज्यें स्थापण्याकरितां येतच होते. इक्ष्वाकु राजाचा मुलगा दंडक हा अशापैकींच एक होता. पूर्वेकडून तो दंडकारण्यांत शिरला. त्याचें व तेथील भृगु-कुलोत्पन्न असे पूर्वींचे वसाहतवाले यांचे जमलें नाहीं असें दिसतें. त्याने च्यवन ऋषीचा अपमान केला व एका कुमारिकेवर अत्याचार केला; पुढें या अरण्यांत वणवे लागले. दुष्काळही पडला; त्यामुळें येथील वसाहत उठून गेली. तेव्हां नंतर कांहीं काळाने अगास्ति आणि इतर ब्राह्मण मंडळी वाराणसी क्षेत्राकडून आली व त्यांनी या प्रांताची पुनः वसाहत केली. अगास्ति ऋषी वसाहती वसवीत आणि आपल्या यज्ञ प्रधान संस्कृतीचा प्रसार करीत खालीं दक्षिणेकडे समुद्रापर्यंत गेले असावे. स्वाहास्वधे बरोबर त्यावेळीं लिंगपूजाही प्रचारांत हाती असें दिसतें. कारण अगास्ति ऋषि वाराणसीहून निघाले, तेथें ही पूजा लोक करीतच असत पण अगास्ति ऋषींना काशीचा विरह जाणवूं नये म्हणून सेतुबंध रामेश्वरलाही शंकरानें आत्मलिंग स्थापून वास केला होता असें रामायणावरून दिसतें.

**काशीविरहमापन्नो मा भैस्त्वं कलशोद्भव ।**
**भवदर्थे करिष्यामि आवासं पूर्वसागेर ॥** युद्धकांड ७५·२

असें वाराणसी सोडताना शंकरानें अगस्तीला वचन दिलें होतें.

महाराष्ट्राच्या वसाहत कालासंबंधीं आधुनिकांचीं व पौराणिकांचीं काय मतें आहेत तें आतापर्यंत पाहिलें. आतां हे लोक कोण होते तें पाहिले म्हणजे कोणती संस्कृति घेऊन ते महाराष्ट्रांत आले तें कळून येईल. विंध्याद्रीच्या पश्चिमेकडून आलेले भृगु किंवा पूर्वेकडून आलेले अगास्ति-प्रमुख वसाहतवाले हे सर्व आर्य होते. उत्तरहिंन्दुस्थानांतील गंगायमुनाच्या काठची वसाहत पुरी झाल्यावर त्या प्रदेशांतून आर्य लोक महाराष्ट्राकडे वसाहत

करण्यास संभवशः अनेक शतकें येत होते व ही वसाहत शकपूर्व २-३ शतकेंपर्यंत चालू होती. काशी, प्रयाग, इत्यादि स्थानांना क्षेत्रत्व येण्याचें कारणही हेंच असलें पाहिजे. दक्षिणेंतील वसाहतवाल्यांचे पूर्वज या प्रदेशांतून इकडे आल्यामुळें, या मूळच्या ठिकाणांबद्दल पूज्यभाव व हीं ठिकाणें पहाण्याची उत्सुकता त्यांच्या वंशजांत सहजच उत्पन्न झाली.

दंडकारण्यांतील वसाहत आर्यांची होती असा दक्षिणेकडील लोकांचाही पूर्वीपासून समज आहे असें प्रसिद्ध मद्रासी इतिहासज्ञ रा. अय्यंगार यांनीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे:—

The ter.n दंडकारण्य in this reference is explained by the old commentator as a Nadu or devision of country in Arya-Nadu, thus confirming the statement in शरभंगजातक that दंडक was a Bhoja kingdom with capital कुंभवती. This means clearly that the forest of दंडक was according to the political divisions of those days included in the territory of the Aryas as distinct from the Tamils.

Contiributions of south India to Indian culture. Page 35.

दंडकारण्य हा आर्यांचा प्रदेश होता हा जसा दक्षिणेकडील लोकांचा यथार्थ समज होता त्याप्रमाणें या प्रदेशांतील लोकांच्या भाषेलाही ते आर्यभातु म्हणजे आर्यांची भाषा असें म्हणत असत. महाराष्ट्राची वसाहत करणारे लोक आर्य होते असें म्हटलें म्हणजे त्यांची संस्कृति वैदिक होती हें निराळें सांगावयास नको.

महाराष्ट्रांत आरंभीं वसाहत करणारे लोक आर्य वंशाचे होते व त्यांची संस्कृति वैदिक होती, आर्य होती हें अडीच हजार वर्षांपूर्वीच्या कालासंबंधानें जितकें यथार्थत्वानें म्हणता येईल तितकें आजच्या काळासंबंधाने म्हणतां यावयाचें नाहीं ही गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे. आर्य लोक जसजसे दक्षिणेकडे जाऊं लागले तसतसे वंशाच्या व भाषेच्या दृष्टीनें द्राविडी संस्कृतीशीं मिसळत चालले. महाराष्ट्रांत आल्यानंतर आर्यांचें वंशशुद्धत्व नाहींसें झालें, महाराष्ट्राच्या खालीं गेल्यानंतर त्यांनी आपलीं भाषाही गमाविली आणि त्यांची वैदिक संस्कृति जरी दक्षिणेकडील द्राविडी लोकांनी उचलली तरी तिच्या आजच्या स्वरूपांत द्राविडी संस्कृतीचा अंश

असलाच पाहिजे. आर्य संस्कृतीचा प्रसार दक्षिणेंत होण्यापूर्वी तेथें जी संस्कृति नांदत होती तिचा इतिहास उपलब्ध नसल्यामुळें, या मूळच्या संस्कृतीचे परिणाम आर्य संस्कृतीवर किती व कसे झाले हें समजण्याचें साधन नाही, कारण आर्यांच्या दक्षिणेकडील आगमनानंतरच दक्षिणच्या इतिहासाला सुरवात होते असें श्री. अयंगार यांनी लिहिलें आहे. महाराष्ट्रांत आर्य जास्त असल्यामुळें त्यांची भाषा टिकली. दक्षिणेकडे जे आर्य गेले त्यानीं ते थोडे असल्यामुळें द्राविडी भाषा उचलल्या. द्राविडी देशांतील ब्राह्मण हे मूळचे आर्यच असावे. त्यानीं व्यवहाराकरितां द्राविडी भाषा उचलल्या तरी आपली मूळची संस्कृत भाषा सोडली नाही व सोवळ्याओवळ्याच्या कडक निर्बंधांनी आपली वंशशुद्धीही फारशी बिघडू दिली नाही. यामुळें वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन करणारे सर्व आचार्य या द्राविड देशांतच पुढें निर्माण झाले. तथापि सामान्यतः महाराष्ट्रांत काय किंवा दक्षिणेकडे काय जे आर्य आले त्यांनी द्राविडी लोकांशीं शरीरसंबंध केले यामुळें तत्कालीन आर्यांच्या महाराष्ट्रांतलि व दक्षिणेकडील वंशजांत द्राविड रक्ताचें मिश्रण झालें आहे. आर्यांच्या नाकाचें व डोक्याचें प्रमाण महाराष्ट्रांत कांही अपवाद सोडले तर दिसत नाही. आर्य आणि द्रविड यांची संस्कृति आतां एकच झाली असल्यामुळें व महाराष्ट्रांत या दोन्ही वंशाचें मिश्रण झालें असल्यामुळें, प्रस्तुत सांस्कृतिक इतिहास, वंशाच्या अपेक्षेने न लिहितां देशाच्या–महाराष्ट्राच्या–अपेक्षेनें लिहावयाचा आहे.

## प्रकरण दुसरें

# ऋग्मंत्रकाल.

ऐतरेय ब्राह्मणांत विदर्भाचा उल्लेख आहे. अगस्ति ऋषि हा विदर्भ राजाचा जामात होता, ऋग्वेद मंत्रांचें संहितीकरण ब्राह्मणकालीं किंवा त्यानंतर लवकरच झालें आहे व अगस्तीच्या नांवाचीं सूक्तें ऋग्वेदांत आहेत वगैरे पुराव्यावरून ऋग्वेद मंत्रकालापूर्वीं हजारों वर्षें जरी नाहीं तरी निदान मंत्र कालाच्या वेळीं किंवा त्याहून थोडा काळ पूर्वीं महाराष्ट्राच्या वसाहतीला आर्यांनी सुरवात केली होती व त्यांची संस्कृति वैदिक होती हें मागील प्रकरणांत पाहिल्यानंतर आतां वैदिक संस्कृतीचें स्वरूप थोडक्यांत पहाणें अवश्य आहे. कारण महाराष्ट्राची अर्वाचीन संस्कृति श्रुति व स्मृतींवरच उभारलेली आहे.

वेदांना श्रुति म्हणण्याचें कारण, प्राचीन कालीं लेखनकलेच्या अभावीं, वेदांचें अध्ययन, गुरूने सांगावें व शिष्यांनी ऐकून ते वेद पाठ करावे अशा रीतीने होत असे. त्यामुळें पूर्वीं विद्याग्रहण हें डोळ्यांच्या साहाय्याने न होतां कानांच्या साहाय्याने होत असे. "आत्मा वा अरे श्रोतव्यः, मन्तव्यः, निदिध्यासितव्य," या उपनिषद-वाक्यांतही श्रवणच आरंभीं सांगितलें आहे व अलिकडील वेदान्तग्रंथांतही श्रवण, मनन, निदिध्यासन अशीच परंपरा पूर्वींच्या प्रघाताला अनुसरून सांगितलेली असते.

श्रुतिकालांत तयार झालेलें वाङ्मय अफाट आहे. तें सर्व आज उपलब्ध नाही. कित्येक शाखांचें वाङ्मय नाहींसें झालें आहे ही खेदाची गोष्ट होय. ऋक्, यजुः, साम आणि अथर्व, असे वेदांचे चार विभाग आहेत. अथर्व वेदाचा समावेश वेदत्रयीमध्यें मागाहून झालेला आहे. अथर्व वेदांत विशेषतः जारण मारणाला उपयोगी पडणारे मंत्र आहेत व कित्येक संशोधक म्हणतात त्याप्रमाणें या वेदांत द्रविड व आर्यलोकांच्या फार प्राचीन समजुती संग्रहीत केल्या असल्या तरी या वेदाची भाषा अर्वाचीन दिसते. ऋग्वेद व सामवेद यांत फारसा भेद नाही. यज्ञाच्या वेळेस गाऊन म्हणण्याकरितां, ऋग्वेदांतून जी सूक्तें वेगळीं काढली त्यांनाच सामवेद म्हणतात. या चार वेदांशीं

संबद्ध असणारे ऐतरेय, तैत्तिरीय, शतपथ, जैमिनी, कौषितकी, गोपथ, तांड्य व तलवकार हे ब्राह्मणग्रंथ आहेत. या ब्राह्मणग्रंथांमध्येंच, ईश उपनिषदाचा अपवाद सोडला तर बाकीच्या केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडुक्य तैत्तिरीय, छांदोग्य व बृहदारण्यक या उपनिषदांचा समावेश केला आहे. मंत्र म्हणजे संहिता व ब्राह्मणग्रंथ यांनाच प्रामुख्याने वेद म्हणतात. या शिवाय या वेदांचीं सहा अंगें आहेत. वेदाध्ययनाला व यज्ञाला तीं उपयुक्त असतात. " शिक्षा, कल्पो, व्याकरणम्, निरुक्तं छंदो ज्योतिषम् " अशीं तीं सहा अंगें आहेत. वेद ऐकून व पाठ करून त्यांची परंपरा जिवंत ठेवीत असल्यामुळें, ते चांगल्या रीतीने म्हटले जाऊन नेहमीं शुद्ध राहतील, म्हणणाऱ्यांच्या उच्चारदोषामुळें त्यांत अपपाठ शिरणार नाहीत अशी काळजी घ्यावी लागे. त्याकरितांच " शिक्षा " निर्माण झाल्या, व त्यांत वेद कसा म्हणावा याच्या सूचना वेदपाठकांना दिल्या गेल्या. चांगले वेदपाठक कोणते व पाठकाधम कोण तें त्यांत सांगितलें आहे. " यथा सौराष्ट्रिका नारी तकँ इत्यभिधीयते " सौराष्ट्र देशांतील स्त्री ताक विकावयास निघाली म्हणजे ताक शब्दाच्या शेवटीं जसा सानुनासिक उच्चार करिते तसा रंगांचा प्रयोग करावा. अशा रीतीने कित्येक ठिकाणीं उदाहरणें देऊन हा विषय शिक्षेंत दिलेला आहे. कल्पसूत्रांत श्रौत, गृह्य, धर्म व शुल्व सूत्रांचा समावेश होतो; यज्ञांची माहिती श्रौतसूत्रांत आहे. सोळा संस्कारांची पंचमहायज्ञांची व श्राद्धादिकांची माहिती गृह्यसूत्रांत दिली आहे. धर्मसूत्रांत चार वर्णांच्या कर्तव्यांची माहिती असून त्यांच्यावरच पुढील स्मृतिग्रंथांची उभारणी झाली आहे. शुल्वसूत्रांत यज्ञाला लागणाऱ्या वेदी, अग्निकुंडे वगैरेंची रचना कशी करावी हें सांगितलें आहे. भूमितीशास्त्राचे कांही सिद्धांत यांत सांपडतात. व्याकरण म्हणजे पाणिनीची अष्टाध्यायी. हेंही वेदाचें एक अंग मानिलें गेलें आहे. निरुक्त ग्रंथांत वेदांतील निरनिराळ्या शब्दांची व्युत्पत्ति दिली असून ही व्युत्पत्ति कशी करावी, भाषेंत बदल कसे व कोणकोणते होतात त्यांचें वर्गीकरण दिलें आहे. भाषाशास्त्रावरील जगांतील हा अत्यंत प्राचीन ग्रंथ होय व त्याचें महत्त्व आधुनिक भाषाशास्त्रज्ञ फार मानितात. Philology भाषाशास्त्र, हें संस्कृत भाषेचा शोध

पाश्चात्यांना लागल्यानंतर त्यांनी अलिकडे निर्माण केलें आहे व त्यांत जगांतील प्राचीन भाषांचा तौलनिक अभ्यास करून, भाषेच्या बदलाचे नियम व कारणें सांगून, जगाचा प्राचीन इतिहास काय असावा याचीही अनुमानें काढलेलीं असतात. या शास्त्राचा उगम शेकडों वर्षांपूर्वी निरुक्तांत झालेला पाहून या भाषाशास्त्रज्ञांनी मोठें कौतुक व्यक्त केलें आहे. वर सांगितलेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायी या व्याकरण ग्रंथाचीही, जगांतील व्याकरणशास्त्रावरील अत्युत्तम ग्रंथ म्हणून जगांतील पंडित प्रशंसा करीत असतात. छंद हा पिंगलानें केला असून त्यांत वैदिक ऋचांच्या वृत्तांची माहिती दिलेली आहे. नंतरच्या संस्कृत वाङ्मयांत आढळणाऱ्या बहुतेक वृत्तांचीं लक्षणेंही यांत दिलीं आहेत. आधीं वृत्तांचें नांव व मग त्याचे गण सांगितलेले असतात. उदाहरणार्थ शिखरिणी वृत्त पहा:—" शिखरिणी य्मौ न्सौ भ्लौग्ऋतुरुद्राः" असें लक्षण छंदांत दिलें आहे. ज्योतिष हा ग्रंथ लगधानें केला असून त्यांत यज्ञोपयोगी ज्योतिषाची माहिती दिली आहे.

या सर्व श्रुतिग्रथांतच नव्हे तर जगाच्या सर्व वाङ्मयांत अत्यंत प्राचीन ग्रंथ, ऋग्वेदसंहिता हा होय. इतका जुना ग्रंथ आपल्या वाङ्मयांत आहे याबद्दल आपल्याला नेहमीं सकारण अभिमान वाटला पाहिजे व अशा-तऱ्हेची दिव्य संपत्ति ज्या लोकांनी शेंकडों वर्षे मोठ्या परिश्रमाने जतन करून आपणांपर्यंत आणून पोंचविली त्यांचें आपण नेहमीं कृतज्ञ असलें पाहिजे. आर्यांची प्राचीन संस्कृति कळण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. संहिता म्हणजे एके ठिकाणीं बांधलेला ग्रंथ. या ग्रंथांतील सूक्तें निरनिराळ्या ऋषींनी निरनिराळ्या काळीं केलीं आहेत. तीं बहुधा त्या त्या कुलांत परंपरेने पाठ केलीं जात असावीं असा तर्क आहे. नंतर या सर्व सूक्तांचें एकत्रीकरण—संहितीकरण—करून त्या संहितेचीं १० मंडलें करण्यांत आलीं, पैकीं पहिलें आणि शेवटचें हीं दोन मंडलें संहितेंत मागून अंतर्भूत केलीं असावींत असें विद्वानांचें मत आहे. ऋषींनी त्या त्या मंडलांतील सूक्तें पाहिलीं, असें म्हणतात. वेद अपौरुषेय म्हणजे पुरुषकृत नाहीत अशी जुनी समजूत असल्यामुळे सूक्तें रचिलीं असें न म्हणतां त्या ऋषीने तीं सूक्तें पाहिलीं, त्याला त्या सूक्ताचें स्फुरण झालें असें म्हणण्याची जुनी

पद्धति आहे. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, वसिष्ठ, कण्व, अंगिरस वगैरे ऋषि प्रमुख मंत्रद्रष्टे आहेत.

ऋग्वेदमंत्रकालीं आर्यांची उत्तरेकडील वसाहत सुरूच होती. किंबहुना आर्यांची उत्तर हिंदुस्थानांतील वसाहत अत्यंत प्राचीन असून ऋग्वेदमंत्र घेऊन आलेले आर्य नंतर आलेले आहेत असें डॉ. केतकरांचें म्हणणें आहे. हे लोक वसाहती करीत चालले असल्यामुळें नवीन प्रदेश जिंकून किंवा शोधून तेथें वसाहती करणाऱ्या लोकांच्या अंगीं जे धाडस, उत्साह, निरलसता, ऐश्वर्यप्रियता इत्यादि गुण दृष्टीस पडतात त्या सर्वांचें प्रतिबिंब ऋग्वेदमंत्रांत पडलेलें आहे. उपनिषदांतील वैराग्याचे विचार अजून त्यांना अज्ञात आहेत, त्यांचीं दैवतें, त्यांच्या प्रार्थना, त्यांच्या आकांक्षा सर्वच उत्साहसंपन्न आहेत. आकाश आणि पृथ्वी, उषा आणि सूर्य, इंद्र आणि वरुण, आप आणि अग्नि या त्यांच्या देवता आहेत. निसर्गामध्यें जें जें तेजस्वी, पराक्रमी व सुंदर दिसेल त्याला त्याला त्यांनीं आपलें उपास्य दैवत बनविलें आहे. जसे उपासक असतात, त्यांच्या जशा मनोवृत्ति असतात, तशींच त्यांचीं उपास्य दैवतें असतात. वैदिक आर्यांना तेजाची, पराक्रमाची, सौंदर्याची, ऐश्वर्याची आवड असल्यामुळें, त्यानीं तशाच देवतांची उपासना केली. जगांतले कित्येक धर्म मृत मनुष्यांच्या किंवा रोगांच्या भीतीमुळें जन्माला आले. वैदिक धर्माची गोष्ट तशी नाही. त्याच्या भोंवतीं तेजाचें, पराक्रमाचें वलय दिसत आहे. ऋग्वेदकालीं तो जगांतील सुखांना विटलेला दिसत नाही. “विश्वमार्यंकुर्वन्” सर्व विश्वाला आर्यसंस्कृतीची दीक्षा देत, आपली यज्ञसंस्था घेऊन, सर्व जगभर वसाहती करीत जाण्याची त्यांच्यांत अजून धमक आहे व म्हणून अगस्तीसारखे ऋषि सर्व दक्षिण पादाक्रांत करीत समुद्र ओलांडून शेजारच्या बेटांवरही यज्ञकुंड बांधून स्वाहास्वधेचा घोष करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगताना त्या काळांत दिसत आहेत.

ऋग्वेदांतील उषःसूक्तें अत्यंत सुंदर आहेत. तत्कालीन आर्यांमध्यें सौंदर्याभिरुचि किती वाढली होती याची या काव्यमय सूक्तांवरून नीट कल्पना येते. आर्यांचें मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत होतें असें लो. टिळकांचें मत आहे. तेथें उषःकाल दोन दोन महिने टिकत असल्या-

मुळें उषेची स्तुति आर्यांनी केली असावी. आर्यांचें मूळ स्थान कोणी बाल्टिक प्रदेशांत तर कोणी मध्य आशियांत, तर कोणी उत्तर ध्रुवाकडे तर कोणी हिंदुस्थानांतच मानितात. आपल्याला महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास पाहावयाचा असल्यामुळें, उत्तर हिंदुस्थानांत आर्य बाहेरून आले कीं, ते तेथेंच पहिल्यापासून होते व बाहेरून आले असल्यास कोठून आले या कधींही न सुटणाऱ्या प्रश्नाशीं आपल्याला कांही कर्तव्य नाहीं. हीं उषःसूक्तें सर्व दृष्टींनी किती सूचक व सुंदर आहेत याचा नमुना म्हणून कांही मंत्र देतों:—

**उषा उच्छन्ती समिधाने अग्ना उद्यन्त्सूर्य उर्विया ज्योतिरश्रेत् ।**
**देवो नो अत्र सवितान्वर्थं प्रासावीद्द्विपत्प्रचतुष्पदित्यै ॥ १ ॥**

अर्थः—ही तेजस्वी उषा, अग्नि प्रज्वलित केला जात आहे व सूर्य उगवण्याच्या बेतांत आहे अशा वेळेला प्रकाशित होत आहे. भगवान् सवित्याने सर्व मनुष्यांनी व पशूंनी कार्यप्रवृत्त व्हावें म्हणून तिला पुढें पाठविली आहे.

**अमिनती दैव्यानि व्रतानि प्रमिनती मनुष्या युगानि ।**
**ईयुषीणाम् उपमा शश्वतीनाम् आयतीनां प्रथमोषा व्यद्यौत्॥२॥**

अर्थः—देवानें घालून दिलेले नियम न मोडतां, मनुष्यांचीं आयुष्यें, मोजीत, आजपर्यंत येऊन गेलेल्या उषांमधील शेवटची व यानंतर येणाऱ्या उषांमधील ही पहिली उषा विशेषच प्रकाशमान होत आहे.

**एषा दिवो दुहिता प्रत्यदर्शि ज्योतिर्वसाना समना पुरस्तात् ।**
**ऋतस्य पन्थामन्वेति साधु प्रजानतीव न दिशोमिनाति ॥ ३ ॥**

अर्थः—ही स्वर्गीय कन्या, तेजस्वी वस्त्र परिधान करून पूर्वेकडे प्रकट झाली आहे. न्याय्य मार्गानें ती जात आहे. सर्व दिशांची माहिती असल्यामुळे ती मार्ग चुकत नाही.

**एवेदेषा पुरुतमा दृशेकं नाजामिं न परिवृणक्ति जामिम् ।**
**अरेपसा तन्वा शाशदाना नार्भादीषते न महो विभाति ॥ ४ ॥**

अर्थः—पाहण्याला ती अत्यंत भव्य आहे. स्वकीय किंवा परकीय कोणालाही ती पाहण्याचा प्रतिबंध करीत नाहीं. आपल्या निर्दोष शरीराने

ही उषा लहान किंवा मोठा कोणीही असला तरी त्याला सारखाच प्रकाशित करते.

**अभ्रातेव पुंस एति प्रतीची गर्तारुगिव सनये धनानाम् ।**
**जायेव पत्य उशती सुवासा उषा हस्रेव निरिणीते अप्सः ॥५॥**

अर्थः—बंधु नसलेली एखादी स्त्री रथावर बसून द्रव्य मिळविण्याकरितां एखाद्या पुरुषाकडे जशी परत जावी तशी ही उषा दिसत आहे किंवा सुंदर वस्त्र परिधान केलेली पत्नी जशी आपल्या पतीपुढें सौंदर्य प्रकट करिते त्याप्रमाणें ही स्मितमुखी उषा आपलें सौंदर्य प्रकट करीत आहे.

**आसां पूर्वासां अहसु स्वसॄणामपरा पूर्वामभ्येति पश्चात् ।**
**ताः प्रत्नवन्नव्यसीर्नूनमस्मेरेवदुच्छंतु सुदिना उषासः ॥ ६ ॥**

अर्थः—आतापर्यंत गेलेल्या बहिणींच्या मागून प्रत्येक दिवशीं दुसरी उषा जात आहे. पूर्वीप्रमाणेंच यानंतरच्या उषाही मंगलकारक दिवसाच्या प्रारंभीं, आमच्याकरितां संपत्तीसह प्रकाशमान होवोत.

**अवेयमश्वैद्युवतिः पुरस्ताद्युङ्क्ते गवामरुणानामनीकम् ।**
**विनूनमुच्छादसति प्रकेतुः गृहंगृहमुपतिष्ठाते अग्निः ॥ ७ ॥**

अर्थः--ही तरुणी पूर्वेकडे चमकूं लागली आहे. तिनें आपल्या रथाला ( किरणरूपी ) तांबडे घोडे जोडले आहेत. ती चमकत पुढें येईल आणि प्रत्येक घरांत अग्नि प्रदीप्त केला जाईल.

**अस्तोढ्वं स्तोम्या ब्रह्मणामेवीवृधध्वमुशतीरुषासः**
**युष्माकं देवीरवसा सनेम सहस्रिणं च शतिनं च वाजम् ॥८॥**

मंडल १ सूक्त १२४

अर्थः--हे स्तवनीय उषांनो, आमच्या स्तुतीनें तुम्हीं प्रसन्न व्हा. आमच्यावर कृपा करून आमची संपत्ति तुम्ही वाढविली आहे. हे देवींनो, तुमच्या कृपेने, शेंकड्यानी हजारानी मोजतां येण्यासारखी संपत्ति आम्हाला मिळूं द्या.

उषःकालच्या भव्य व शांत देखाव्याचें वर्णन करून व उषादेवतेची स्तुति करून शेवटीं द्रव्याची मागणी या सूक्तांत केली आहे. त्यावरून सृष्टि-

सौंदर्याची व वैभवाची आवड तत्कालीन लोकांना कशी होती तें दिसून येतें. सूर्योदयाचींही अशींच सुंदर वर्णनें सौरसूक्तांत अनेक ठिकाणीं आढळतातः--

**चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः।**
**आप्राद्यावापृथिवी अंतरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च॥**

अर्थः--देवांचें हें तेजस्वी प्रतीक उदय पावलें. अग्नि, मित्र व वरुण यांचा हा डोळाच आहे. सर्व चराचराचा आत्मा असा जो सूर्य त्यानें स्वर्ग, पृथ्वी व आकाश व्यापून टाकिलें आहे.

**सूर्यो देवीमुषसं रोचमानां मर्यो न योषामभ्येति पश्चात्॥२**

मं. १ सूक्त ११५

अर्थः--एखादा तरुण मनुष्य ज्याप्रमाणें तरुणीच्या मागें जातो त्याप्रमाणें हा सूर्य अत्यंत आकर्षक अशा उषेच्या मागें जात आहे.

**ह्वयाम्यग्निं प्रथमं स्वस्तये ह्वयामि मित्रावरुणाविहावसे।**
**ह्वयामि रात्रीं जगतो निवेशनीं ह्वयामि देवं सवितारमूतये॥१॥**

अर्थः—आमच्या कल्याणाकरितां व साहाय्याकरितां अग्नि आणि मित्रावरुण, त्याचप्रमाणें जगाला शांति देणारी रात्र व सविता यांना मी विनंतिकरितों.

**आकृष्णेन रजसा वर्तमानः निवेशयन्नमृतं मर्त्यंच।**
**हिरण्ययेन सविता रथेन देवो याति भुवनानि पश्यन्॥ २॥**

अर्थः—धुरकट अशा मार्गानें पुढें सरत, देव व मानव याना त्यांच्या कामाला लावीत, भगवान् सविता आपल्या सोनेरी रथांतून, सर्व विश्व पहात येत आहे.

**याति देवः प्रवता यात्युद्वता याति शुभ्राभ्यां रजतो हरिभ्यां।**
**आदेवो याति सविता परावतः अपविश्वा दुरिता बाधमानः॥३॥**

ऋ. १-३५

अर्थः—दोन शुभ्र घोड्यांच्या साहाय्यानें उंचसखल मार्ग आक्रमीत, भगवान् सविता सर्व विघ्नें नाहींशीं करीत दूर अंतरावरून येत आहे.

वृत्रासुराला मारणाऱ्या पराक्रमी इंद्राची, लोक न्याय्यमार्गानें जात आहेत कीं नाहीत हें पहाणाऱ्या वरुणाची, द्यावापृथिवीची आणि इतर सर्व देवतांची

प्रार्थना आपल्याला उत्कृष्ट संतति व संपत्ति मिळावी म्हणून त्यांनी केलेली आहे. प्रत्येक दिवसाचें आगमन आपल्या कल्याणाकरितां व्हावें म्हणून " उषोभद्रेभिरागहि दिवश्चित् रोचनादधि " हे उषे, प्रकाशमान अशा स्वर्गातून आमच्याकरितां कल्याणें घेऊन येत जा " अशी त्यांनी उषेची प्रार्थना केली आहे. सोमपान त्यांना अत्यंत प्रिय असल्यामुळें, सोमाला देवता बनवून कितीतरी सूक्तांनी, त्यांनी त्याचें पुनः पुनः स्तवन केलें आहे. " अपाम सोमं अमृता अभूम " सोमपान करावें व अमर व्हावें अशी त्यांची मनीषा असे. त्यांच्या सर्व प्रार्थनांचा सारांश खालील मंत्रांत आहे:-

**भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।**
**स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिः व्यशेम देवहितं यदायुः ॥**

ऋ. १–६–१६

आम्ही कानांनी कल्याणकारण गोष्टी ऐकूं. डोळ्यांनीं कल्याण-कारक गोष्टी पाहूं व सुदृढ अंगांनीं प्रार्थना करीत देवांनी मनुष्याला दिलेल्या शंभर वर्षांच्या आयुष्याचा उपभोग घेऊं अशी तत्कालीन लोकांची आकांक्षा असे. " पश्येम शरदः शतम् जीवेम शरदः शतम् " ही भावना निरनिराळ्या वेदांतून अनेक ठिकाणीं व्यक्त झाली आहे. वर दिलेला " भद्र कर्णेभिः शृणुयाम देवाः" हा ऋग्वेदसंहितेंतील मंत्र पुढें इतका लोकप्रिय झालेला दिसतो कीं, वैराग्याचे व तत्त्वज्ञानाचे विचार सांगणाऱ्या प्रश्न, मुंड व मांडुक्य या उपनिषदांच्या आरंभीं म्हण-ण्याची शांति म्हणून या मंत्राचा उपयोग केलेला आहे. स्वतः अत्यंत परा-क्रमी व कर्तृत्वसंपन्न असल्यामुळें आजूबाजूची सर्व सृष्टि त्यांना गोड व अनुकूल दिसत असे.

**मधुवाता ऋतायते मधु क्षरंति सिंधवः । माध्वीर्नः संत्वोपधीः॥**
**मधुनक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः । मधुद्यौरस्तुनः पिता ॥**
**मधुमान्नो वनस्पतिर्मधुमां अस्तुसूर्यः । माध्वीर्गावो भवंतु नः ॥**

अर्थ—वारे सुखदायक अशा रीतीने वहात आहेत. अमृततुल्य उद-काने भरलेल्या नद्या शांतपणें आपला मार्ग आक्रमीत आहेत. त्यांपासून आम्हाला गुणकारी औषधी मिळोत. रात्री, उषःकाल व पृथ्वीवरील सर्व

वातावरण शांत आहे. आकाशही आम्हाला अनुकूल असावें. सूर्यानें आपल्या आरोग्यकारक किरणांनी सर्व वनस्पति सत्त्वसंपन्न कराव्या, व आमच्या गाईंनी अमृततुल्य दुध द्यावें.

जगांतील वैभवांची इच्छा कोणाला नसते? पण तें मिळविण्याकरितां अविरत उद्योग आणि साहसें करावीं लागतात. "साहसे श्रीः प्रतिवसति" ही म्हण कोणाला माहीत नाही? साहस करण्याला निर्भयता अंगीं लागते ती तत्कालीन लोकांमध्यें होती "यथा सूर्यश्च चंद्रश्च न बिभीतो नरिष्यतः एवा मे प्राण मा बिभेः" ज्याप्रमाणें सूर्य व चंद्र कोणालाही न भितां आपलें कार्य करीत असतात त्याप्रमाणें माझ्या प्राणांनीही भिऊं नये अशी प्रार्थना ते करीत असत. साहसाबरोबर उद्योगाची योग्यताही ते जाणून होते. "न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः" ऋ. ४।३३।११ जो स्वतः कष्टत नाहीं त्याला देव साहाय्य करीत नाहीत हें त्यांना पूर्णपणें माहीत असल्यामुळें, उद्योगाच्या व साहसाच्या बळावर त्यांनी ऐहिक ऐश्वर्य मिळविलें यांत काय नवल?

ऐहिक जगाविषयीं त्यांच्या आकांक्षा ज्या स्वरूपाच्या होत्या तशाच त्यांच्या पारलौकिक आकांक्षाही होत्या. ज्या ठिकाणीं मृत्यु नाही, जेथें दुःखें नाहीत अशा वैभवशाली स्वर्गांत जाऊन, अमृतपान करून अमर होण्याची त्यांची इच्छा असे. खालीं केलेली सोमाची प्रार्थना पाहा:—

**यत्रज्योतिरजस्रं यस्मिँल्लोके स्वर्हितं।**
**तस्मिन्मांधेहि पवमानामृते लोकेऽक्षित। इंद्रायेंदो परिस्रव॥१॥**
**यत्रराजा वैवस्वतो यत्रवरोधनं दिवः।**
**यत्रामूर्यह्वतीरापः तत्रमाममृतं कृधि। इंद्रायेंदो परिस्रव॥२॥**
**यत्रानुकामं चरणं त्रिनाके त्रिदिवे दिवः।**
**लोका यत्र ज्योतिष्मंतस्तत्रमामृतं कृधि। इंद्रायेंदो परिस्रव॥३॥**
**यत्रानंदाश्च मोदाश्च मुदः प्रमुद आसते।**
**कामस्य यत्राप्ताः कामाः तत्र मां अमृतं कृधि।**
**इंद्रायेंदो परिस्रव॥४॥**

ऋ. ७–५–२७

अर्थः—हे सोमा ! ज्या ठिकाणीं सदैव प्रकाश आहे अशा अमर आणि अक्षय्य स्वर्ग लोकांत मला स्थान दे. हे सोमा ! इंद्राकरितां वहा. जेथें यमराजा आहे, जेथें स्वर्गाचें संरक्षण आहे व जेथें मोठाल्या नद्या वहात आहेत तेथें नेऊन मला अमर कर. जेथें स्वेच्छेनें हिंडतां येतें, जेथें सर्व लोक तेजस्वी आहेत अशा आकाशाच्या वर असलेल्या तिसऱ्या स्वर्ग लोकांत नेऊन मला अमर कर. जेथें सर्व इच्छा तृप्त होतात आणि जेथें आनंदी आनंद आहे अशा ठिकाणीं मला अमर कर. हे सोमा, इंद्राकरितां वहा. ”

अशा तऱ्हेच्या पारलौकिक इच्छा धरून ते देवतांची स्तुति करीत व इंद्रादि देवतांच्या उद्देशानें सोमाचें हवन करीत. यज्ञ ही संस्था आर्यांत फार प्राचीन काळापासून असावी. अश्वमेध यज्ञाचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. यजुर्वेदांत त्याचें फारच प्रस्थ आहे. त्यावरून यज्ञयागादिकांचा विस्तार पुढें जितका झाला तितका कदाचित् ऋग्वेदकालीं झालेला नसेल पण प्रत्येकाच्या घरीं अग्निहोत्र असून नित्य व नैमित्तिक यज्ञक्रिया करण्याचा प्रघात वैदित आर्यांत फार प्राचीन आहे. वैदिककालीं मूर्तिपूजा नव्हती. इंद्रादि देवतांच्या उद्देशानें अग्नींत हवन करणें हाच पूजेचा प्रकार त्या वेळीं अस्तित्वांत होता. ‘ स्वर्गकामो यजेत ’, ज्याला स्वर्ग मिळवायाचा असेल त्यानें यज्ञ करावा अशी वेदाज्ञा आहे. ‘ यज्ञसंस्था ’ ही वैदिक आर्यांचें वैशिष्ट्य आहे. ही यज्ञसंस्था पुढें करूनच ते वसाहती करीत गेले. जेथें त्यांनी यज्ञ केला तो प्रदेश त्यांचा झाला असें ते समजत. या यज्ञाकरितांच ज्योतिषशास्त्र निर्माण झालें व यज्ञाकरितांच भूमितिशास्त्र अस्तित्वांत आलें. पुढें पुढें हे यज्ञ फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागले. चारी वेदांच्या लोकांना त्यांत कामें देण्यांत आलीं व यज्ञ म्हणजे एक मोठी जत्रा असें त्याला स्वरूप आलें. या यज्ञांत निर्जीव द्रव्याप्रमाणें पशूंचेंही हवन करीत. अश्वमेध व राजसूय हे क्षत्रियांचे प्रमुख यज्ञ आहेत. त्यामुळें यज्ञसंस्था मूळची क्षत्रियांची असावी, ब्राह्मणांची नसावी असा कित्येकांचा तर्क आहे.

**समाजस्थितिः**—वेदकालीं जातिव्यवस्था तर नव्हतीच पण पुढें अस्तित्वांत आलेली वर्णसंस्थाही अगदीं आरंभीं नव्हती असें कित्येकांचें म्हणणें आहे.

**ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् बाहूराजन्यः कृतः।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रोऽजायत॥**

अ. ८-४-१९

असा चार वर्णांचा स्पष्ट उल्लेख ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत आहे. तथापि

**तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानिजज्ञिरे।**
**छंदांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत॥**

अ. ८-४-१८

असा ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद यांचाही उल्लेख त्या सूक्तांत असल्या-मुळें, या वेदांची रचना झाल्यानंतर हें सूक्त रचलें गेलें असावें. अर्थात् या सूक्तांत उल्लेखिलेले चार वर्ण बऱ्याच कालानंतर अस्तित्वांत आले आहेत. वेदांमध्यें वर्ण शब्द शरीराच्या वर्णाचा वाचक आहे व तो आर्य व अनार्य यांच्यासंबंधांत वापरला आहे. ब्राह्मण शब्द सूक्तांची रचना कर-णारांना, देवतांची स्तुति करणारांना लावला आहे आणि क्षत्रिय शब्द शक्तिमान् अशा अर्थी देवांना लावला आहे, हें खरें. तथापि पुढें अस्ति-त्वांत आलेल्या वर्णसंस्थेचीं बीजें वेदांत आढळतात यांत शंका नाही. वर्ण विभाग स्पष्ट झाला नव्हता एवढेंच फार तर म्हणतां येईल. वेदांतील ऋषि शेतीभाती करितात, गुरेंढोरें बाळगतात, लढाया करितात व संतति, संपत्ति देण्याबद्दल देवतांची प्रार्थना करितात. पण त्यांच्यापैकीं कित्येक सूक्तकर्ते आहेत व त्यांना मोठाले राजे यज्ञप्रसंगीं बोलावीत असत यावरून क्षत्रिय व त्यांचे पुरोहित असा भेद पडत चालला होता असें स्पष्ट दिसतें. सुदास राजाचे वसिष्ठ आणि विश्वामित्र हे पुरोहित होते हें प्रसिद्धच आहे. पण त्यांतही विश्वामित्र क्षत्रिय असून त्यानें ब्रह्मकर्म स्वीकारलें होतें अशी पुराण-प्रसिद्धि आहे. त्यावरून वर्णव्यवस्था गुणकर्मांवरून, वेदांच्या काळीं बनत होती. बनली नव्हती असें दिसतें. जातिसंस्था तर नव्हतीच.

स्त्रियांचें समाजांतील स्थानः—वेदकालीं स्त्रियांचें गृहांतील व समाजां-तील स्थान वरिष्ठ प्रतीचें असावें असें दिसतें. घरांतील अग्निहोत्र चाल-विण्याला पत्नी आवश्यक असते व असे. यज्ञामध्यें यजमानाबरोबर यज-मानपत्नीही व्रतस्थ होऊन बसे. एवढेंच नव्हे तर वेदांतील कित्येक सूक्तें

स्त्रियांनी केलीं आहेत. विश्ववारा नांवाच्या स्त्रीने पांचव्या मंडलांतील २८ वें सूक्त केलें आहे. घोषेने १० व्या मंडलांतील ३९ वें व ४० वें सूक्त केलें आहे. सूर्या, जुहू, वाक्, इंद्राणी, श्रद्धा, शची, सार्पराज्ञी, रोमशा, लोपामुद्रा, शश्वती, इत्यादि अनेक स्त्रियांचीं सूत्रें ऋग्वेदांत आहेत. त्यावरून पुरुषाप्रमाणेंच त्यांचाही बौद्धिक विकास होईल अशी काळजी घेत असत असें दिसतें. अत्यंत प्राचीनकाळीं स्त्रियांचेंही मौंजीबंधन करून त्यांना शिकवीत असें स्मृतींतही म्हटलें आहे. उपनिषदांमध्येंही गार्गी, मैत्रेयी, वाचक्नवी, अरुंधती, सुलभा, सुवर्चसा इत्यादि विद्वान् स्त्रिया आढळतात. पुरुष हा स्त्रीवांचून पूर्ण नाही "अथ यदैव जायां विंदतेऽथ प्रजायते तर्हि सर्वो भवति" जेव्हां विवाह करून प्रजा निर्माण करतो तेव्हां तो पूर्ण होतो असें वाजसनेय ब्राह्मणांत सांगितलें आहे. पत्नी ही पुरुषाची अर्धांगी आहे ही कल्पना "अर्धो वा एष आत्मनः यत्पत्नी" या तैत्तिरीय संहितेतील (६-१८) वाक्यांत ग्रथित झाली आहे. वर उध्दृत केलेल्या उषःसूक्तांत "जायेव पत्ये उशती सुवासाः" असा उल्लेख आला आहे त्यावरून स्त्रिया सुंदर वस्त्रें नेसत असें दिसतें. तशीं वस्त्रें तयार करण्याइतकी कलाकौशल्याचीही प्रगति त्याकाळीं झाली होती हेंही त्यावरून उघडच दिसतें. स्त्रियांना सोन्याचे दागिने घालण्याची हौस त्यावेळीं होती. केशकलापाची आकर्षक रचना करणाऱ्या स्त्रियांचाही उल्लेख आहे. सामगायनामध्यें ऋषींची त्या साथही करीत असत व वाद्यें वाजविण्यांतही त्या कुशल असत. आणि इतकें असून त्यांची वागणूक अत्यंत विनीत असे. विश्ववारेनें पांचव्या मंडलांतील २८ व्या सूक्तांत पतिपत्नींचे परस्पर संबंध चांगले रहावे म्हणून अग्नीची प्रार्थना केली आहे.

**विवाहसंस्थाः**—आतांप्रमाणेंच पूर्वींही पिता आपल्या मुलीला चांगला पति मिळावा म्हणून योग्य काळजी घेत असे. तथापि, पतीची निवड करण्यांत वधूलाही थोडी संधि देण्यांत येत असावी असें खालील मंत्रावरून दिसतें:—

**कियती योषामर्यतो वधूयोः परिप्रीता पन्यसा वार्येण ।**
**भद्रावधूर्भवति यत्सुपेशाः स्वयं सा मित्रं वनुते जनेचित् ॥**

अष्टक ७–७–१७

अर्थः—पुष्कळ वधू, त्यांना वरण्याची इच्छा करणाऱ्या वराच्या संपत्तीलाच भुलतात. तथापि सुंदर आणि सुस्वभावी मुली त्यांना प्रिय असलेल्या वरालाच वरतात.

बालविवाहांची स्मृतिकालीं पडलेली चाल श्रुतिकालीं नव्हती, हें वरील मंत्रावरूनच दिसतें. कारण पतीची निवड करणारी वधू मोठी असली पाहिजे व तसा उल्लेख खालील मंत्रांतही केला आहे:—

**उदीर्ष्वातो विश्वावसो नमसेळा महेत्वा**
**अन्यामिच्छप्रफर्व्यां संजायां पत्यासृज ॥**

अष्टक ८–३–२४

अर्थः—हे विश्वावसो ! येथून तूं ऊठ. आम्ही नम्रतापूर्वक तुझी पूजा करितों. जिचें शरीर विकसित झालें आहे अशा दुसऱ्या वधूकडे जाऊन पतीशीं तिला संयुक्त कर.

विवाहकालीं वधूला उद्देशून देवांना ज्या प्रार्थना करण्यांत येत त्यावरून विवाहोत्तर वधूचें तिच्या गृहांत कोणतें मानाचें स्थान असे त्याची कल्पना येईल:—

**प्रत्वा मुंचामि वरुणस्य पाशाद्येनत्वा बध्नात्सविता सुशेवः ।**
**ऋतस्य योनौ सुकृतस्य लोकेऽरिष्टांत्वा सहपत्या दधामि ॥**

अर्थः—सुंदर सवित्याने, ज्या वरुणकृत, वधूने पालन करण्याच्या न्याय्य नियमांनी तुला जखडली होती त्या नियमांपासून तुला मी मुक्त करितों व सत्याचें आणि सत्कृत्यांचें निवासस्थान असणाऱ्या जागीं पतीसहित तुला ठेवितों.

**प्रेतो मुंचामिनामुतः सुबद्धाममुतस्करं ।**
**यथेयमिंद्रमीढ्वः सुपुत्रा सुभगा सति ॥**

अर्थः—मी ह्या वधूला पित्याच्या गृहापासून मुक्त केली असली तरी पतीच्या गृहापासून मुक्त न करितां तेथें बद्ध करून ठेवितों. हे इंद्रा ! ही भाग्यसंपन्न होऊं दे व तिला चांगले पुत्र होऊं देत.

**पूषात्वेतो नयतु हस्तगृह्याश्विना त्वा प्रवहतां रथेन ।**
**गृहान्गच्छ गृहपत्नी यथासो वशिनीत्वं विदथमावदासि ॥**

अर्थः——पूषा तुला हातांनी सासरीं घेऊन जावो, अश्विनीकुमार तुला रथांतून पोंचवोत, आपल्या पतीच्या घरीं जा व त्या घराची स्वामिनी होऊन, तेथें आपला अधिकार चालव.

**इहप्रियं प्रजया ते समृध्यताम् अस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि ।**
**एनापत्या तन्वं संसृजस्वाधाजिव्रीविदथमावदाथः ॥**

अर्थः——तुला प्रजा होऊन मंगल प्राप्त होवो. ह्या घरांतील कृत्यें तूं काळजीपूर्वक कर. पतीशीं एक जीव हो. आणि वृद्धपणा येईपर्यंत घरांत अधिकार चालव.

**इहैवस्तं मा वियौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतं ।**
**क्रीळन्तौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वेगृहे ॥**

अर्थः——हे पतिपत्नींनो, तुम्ही बरोबर येथें रहा. तुमचा कधींही वियोग न होवो. संपूर्ण आयुष्याचा, आपल्या गृहांत मुलानातवांशीं खेळत व आनंद करीत तुम्ही उपभोग घ्या.

**आनः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसायसमनक्त्वर्यमा ।**
**अदुर्मंगलीः पतिलोकमाविश शं नो भवद्विपदे शं चतुष्पदे ॥**

अर्थः—प्रजापति आम्हांला प्रजा देवो आणि अर्यमा वृद्धपणापर्यंत आमचें रक्षण करो. हे वधू! मंगलकारक चिन्हांसहित पतीच्या घरांत प्रवेश कर आणि तेथें असणाऱ्या आमच्या मनुष्यांना व पशूंना सुखकारक हो.

**अघोर चक्षुरपतिघ्न्येधिशिवापशुभ्यः सुमनाः सुवर्चाः ।**
**वीरसूर्देवकामास्योना शंनो भवद्विपदेशं चतुष्पदे ॥**

अर्थः——तुझे डोळे शांत असूं दे. नेहमीं आनंदी व सुंदर रहा. पतीच्या सुखाला जप आणि पशूंचें चांगलें पालन कर. पराक्रमी पुत्रांना जन्म दे. देवाच्या ठिकाणीं भक्ति ठेव आणि घरांतील सेवकांचें आणि पशूंचें संगोपन कर.

**इमांत्वमिंद्रमीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ।**
**दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि ॥**

अर्थः—हे इंद्रा, या वधूला भाग्यशाली कर आणि चांगले पुत्र दे. हिला दहा पुत्र दे म्हणजे तिच्या पतिसहित घरांत अकरा पुरुष होतील.

**सम्राज्ञी श्वशुरेभव सम्राज्ञी श्वश्र्वांभव ।**
**ननांदरि सम्राज्ञी भव सम्राज्ञी अधिदेवृषु ॥**

अर्थः—सासू, सासरा, दीर आणि नणंदा यांच्या मनावर तुझा अधिकार चालू दे.

**समंजंतु विश्वेदेवाः समापो हृदयानिनौ ।**
**संमातरिश्वा संधाता समुदेष्ट्री दधातु नौ ॥**

ऋ. १०-२५

अर्थः—सर्व देव आमचीं हृदयें एक करोत. मातरिश्वा, धाता आणि वाक्‌देवता आम्हांला एक करोत.

या सूक्तावरून आर्यांच्या प्राचीन विवाहसंस्थेवर चांगलाच प्रकाश पडतो व ४–५ हजार वर्षांपूर्वीच्या आर्यांचीं विवाहविषयक ध्येयें काय होतीं तें कळून येतें. मुली लग्नापूर्वी मोठ्या असत व त्यांना वराची निवड करण्याचीही मर्यादित मोकळीक असे. तथापि लग्न होईपर्यंत वरुणाच्या पाशांनी त्या बद्ध असत. वरुण ही देवता, लोक नीतीच्या मार्गानें जात आहेत कीं नाहीत हें पाहणारी आहे. तेव्हां विवाहापूर्वी वधूला नीतिनियमानें वागावें लागे व विवाह झाल्यावर पतिगृहाशीं ती बांधलेली असे. त्यावरून विवाहपूर्व व विवाहोत्तर कडक नीतिनियम स्त्रियांनी पाळावे अशी अपेक्षा दिसते. त्याचप्रमाणें लग्नापूर्वी जर ती पित्याच्या घरांत बद्ध असे तर विवाहानंतर ती पतीच्या घरीं सुबद्ध म्हणजे विशिष्ट नियमांनी बांधलेली असे. तथापि घरांतील नोकरचाकरांवर घरांत आल्याबरोबर तिचा अधिकार चालू होई. एवढेंच नव्हे तर सासू, सासरा, दीर, नणंदा यांच्यावरही कर्तृत्ववान् पतीची पत्नी या नात्याने तिचा अधिकार असे. तिने घरांतील सेवकवर्गाला व तसेंच गाई, बैलांना चांगल्या रीतीने वागवावें. पतीची व गृहकृत्यांची काळजी घ्यावी व तिला दहा तरी वीर पुत्र व्हावे अशी अपेक्षा वरील सूत्रांत व्यक्त झाली आहे.

राजे लोकांत आणि श्रीमंत लोकांत बहुपत्नीकत्वाची चाल असे. त्यामुळें घरांत साहजिक भांडणें होत व सवतीमत्सर उत्पन्न होऊन एक-मेकांना शिव्याशाप देण्यापर्यंत पाळी येई. मुलगा नसल्यास मुलीच्या मुला-कडे आजाची संपत्ति जात असे. दत्तकाचीही चाल त्या वेळीं असावी. मृत मनुष्यांना जाळण्याची किंवा पुरण्याचीही चाल होती. पतीबरोबर पत्नी चितेवर निजल्याचा उल्लेख आहे त्यावरून सतीची चालही त्या वेळीं असावी असें वाटतें. एका सूक्तांत पतीबरोबर चितेवर निजलेल्या पत्नीला उठवून तिला पुनः लग्न करण्यास सांगितलें आहेः—

**उदीर्ष्व नार्यभिजीवलोकं गतासुमेतमुपशेष एहि ।**
**हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्जनित्वमभिसंबभूथ ॥**

मं. १०–१८

अर्थः—हे स्त्रिये, उठ. ज्याचें आयुष्य नष्ट झालें त्याच्या जवळ तूं निजली आहेस. तेथून उठून या सजीव माणसाच्या लोकांत परत ये व तुझ्याशीं लग्न करून तुझा हात धरूं इच्छिणाऱ्याची तूं पत्नी हो. (हाच मत्र अथर्व वेदां-तही आला आहे).

हा पुनर्विवाह तिच्या दिराशीं होत असे असें 'को वां शयुत्रा विधवेव देवरं मर्यं न योषा कृणुते सधस्थ आ' या ऋचेवरून दिसतें. दिधिषु शब्दाचे दोन अर्थ सायणाचार्यांनी दिले आहेत. ऋग्वेद भाष्यांत दिधिषोः म्हणजे गर्भस्य निधातुः असा अर्थ त्यांनी दिला असून, यजुर्वेदाच्या भाष्यांत दिधिषोः म्हणजे पुनर्विवाहेच्छोः असा अर्थ दिला आहे. त्याचप्रमाणें 'परपूर्वा' 'पौनर्भव' वगैरे शब्दांवरून प्राचीनकाळीं पुनर्विवाहाची चाल होती असें एका पक्षाचें म्हणणें आहे. दिधिषु शब्दाचे दोन अर्थ सायणाचार्यांनी दिलेले आहेत, त्यांतील वर दिलेला पहिला अर्थ स्वीकारून "हिंदुलग्नसंस्था" या पुस्तकाचे कर्ते रा. निमकर यांनी वरील पुनर्विवाह-प्रतिपादक ऋग्वेद मत्राच्या अर्थाविषयीं, आपला मतभेद प्रकट केला आहे. या पुनर्विवाहाचा विधि कोठेंही सांगितला नसल्यामुळें, वरील मंत्रांत पुन-र्विवाहाचा उल्लेख नसून नियोगाचा उल्लेख असावा. पति मृत झाला तर निपुत्रिक स्त्रीनें दिराकडून प्रजा उत्पन्न करावी अशी प्राचीन चाल होती

व तिचे अवशेष भारतकालापर्यंत दिसतात. अथर्ववेदांत पुनर्विवाहाचा उल्लेख आहे:—

**या पूर्वपतिं वित्वाथान्यं विंदते परं।**
**पंचौदनं च तावजं ददातो न वियोषतः॥**

९–५–२७

पुनर्विवाहित पत्नीला पतीचा वियोग होऊं नये व वैधव्य येऊं नये म्हणून कांहीं दानें वरील मंत्रांत सांगितलीं आहेत. खालील मंत्रांतही तसा स्पष्ट उल्लेख आहे:—समानलोको भवति पुनर्भवाऽपरः पतिः॥ ९–५–२८॥ या मंत्रांवरून विधवेचें दुसरें लग्न होत होतें हें जरी स्पष्ट दिसत असलें तरी तें वरिष्ठ समाजांत होत नसावें असें निमकरांचें म्हणणे आहे. वंशहानि होऊं नये म्हणून पूर्वी नियोगविधीने प्रजोत्पादन करण्याची मोकळीक दिली होती. त्याकरितां दिराचीच योजना केलेली असे. पण त्यांच्यांत पति-पत्नी-संबंध या नियोग विधीने स्थापित होऊं शकत नाही. कारण नियोगानेही एक किंवा दोनच पुत्र निर्माण करावे अशी मर्यादा सांगितली आहे. शिवाय " नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित्। न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः " ( मनुस्मृति ९–६५ ) विवाहमंत्रांत नियोग किंवा पुनर्विवाहाचा विधि कोठेंच सांगितला नाही असें या श्लोकांत म्हटलें असल्यामुळें नियोगाचा व पुनर्विवाहाचा बादरायण संबंध जोडून पूर्वी पुनर्विवाह होते असें म्हणण्यांत तात्पर्य नाही असा निमकरांचा युक्तिवाद आहे.

अविवाहित स्त्रियांचाही उल्लेख क्वचित् आढळतो; विवाहित पण वैवाहिक नीति न पाळणाऱ्या स्त्रीचाही उल्लेख सापडतो. ऋग्वेद संहितेंत यम–यमी या बहीणभावांच्या संवादाचें एक सूक्त आहे. त्यांत यमी आपल्या भावाला आपला पति हो असें म्हणत आहे. परंतु असें करणें पाप आहे असें यम म्हणत आहे. यावरून अगदीं प्राचीन काळीं बंधुभगिनी-मध्येंही विवाह करण्याची चाल असावी असा कित्येकांचा तर्क आहे. जुगार खेळण्याची प्रवृत्तीही त्या वेळीं होती व त्यामुळें जुगाऱ्याचा, त्याचे नातलग तिरस्कार करीत व त्याच्या पत्नीची दुर्दशा होई.

वसाहती करून स्थायिक झालेले लोक शेती करीत असत. आमचे नांगर चांगले चालू द्या, पिकें चांगलीं येऊं द्या अशा रीतीच्या प्रार्थना अनेक ठिकाणीं आहेत. जे स्थायी नव्हते त्यांनी पूषन् देवतेला प्रवासांत संरक्षण करण्याविषयीं प्रार्थना केल्या आहेत. गुरें रानांत चारून परत घरीं आणण्याचेही उल्लेख आहेत. लोक शेती करीत असल्यामुळें कांही लोक सावकारी करीत असत असेंही कित्येक उल्लेखावरून दिसतें. नावांच्या साहाय्याने नदींतून लोक प्रवास करीत.

यव आणि गहूं लोक पिकवीत असावे. व्रीही म्हणजे तांदुळांचा उल्लेख संहितेंत नाही. कारण पंजाबांत तांदूळ होत नाही. लोक विशेषतः मांसाहारी असत. नापित आणि सुतारांचाही उल्लेख आहे. सोनें, लोखंड आणि इतर धातूंचा लोक उपयोग करीत असत. सोनार आणि लोहारांचे उल्लेख आहेत. सोनेरी शिरस्त्राणें आणि पोलादी चिलखतांचा उल्लेख आहे. गाड्या, रथ, तरवारी, आणि दागिने लोक वापरीत असत व मोठाले वाडे बांधून राहत. लढाई व प्रवासाकरितां घोडे तर लागतच पण गाई, बकरे, मेंढ्या व कुत्रे इत्यादि प्राणीही ते बाळगीत.

राज्यव्यवस्थाः—ऋग्वेदकालीं लहान लहान गणराज्यें असावीं व तीं लोकांनी प्रातिनिधिक पद्धतीवर चालविलीं असावीं असें ऋक् संहितेंत बहुपाय्य म्हणजे अनेकांनी संरक्षण करण्याच्या 'स्वराज्या'चा उल्लेख आहे त्यावरून दिसतें. या गणराज्यांच्या परस्परांत लढायाही होत असत. तसेंच आर्यांचे संघ वरचेवर वसाहत करण्याकरितां हिंदुस्थानांत येत. अगदीं आरंभीं जे आले त्यांना येथील मूळच्या आर्येतर लोकांशीं लढावें लागलें पण मागून जे आले त्यांना येथें त्यांच्या पूर्वी वसाहती करून राहिलेल्या आर्यांशीच लढावें लागलें. ऋग्वेद संहितेंत दाशराज्ञयुद्धाचीं वर्णनें आहेत. सुदास व दिवोदास हे एका पक्षाला होते व हें युद्ध बरींच वर्षें चाललें होतें. त्या वेळी सुदास—दिवोदासांनी वसिष्ठ विश्वामित्रादि येथील पूर्वीच्या उपाध्याय वर्गाला आपल्याकडे करून घेतलें असावें. युद्धांत आम्हाला जय मिळावा अशा अर्थाच्या प्रार्थना अनेक आहेत व त्याकरितां आम्हांला वीर प्रजा दे अशी मागणीही अनेक ठिकाणीं आहे.

## प्रकरण तिसरें

# ब्राह्मणकाल.

ऋग्मंत्रांची रचना आर्य पंजाबांत असताना झाली. त्यानंतर वसाहती करीत करीत आर्यांनी गंगायमुनांचा सर्व दुआब व्यापून टाकिला व पूर्वींची लहान लहान राज्यें जाऊन त्या ठिकाणीं मोठालीं राज्यें आलीं. कुरु, पांचाल, कोसल, विदेह, विदर्भ इत्यादि प्रदेश व्यापून तेथें आर्यांनीं मोठीं राज्यें स्थापिलीं व "साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यं आधिपत्यमयं समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुप आंतादा-परार्धात् पृथिव्यैसमुद्रपर्यंताया एकराळिति" ऐ. ब्र. ८–१५ अशा तऱ्हेच्या समुद्रापर्यंत पृथिवी व्यापणाऱ्या साम्राज्यांच्या आणि इतर राज्यांच्या गर्जना ब्राह्मणग्रंथांतून ऐकूं येऊं लागल्या. तिन्ही वेदांच्या मागून तयार झालेलें परंतु ऋग्वेदांत समाविष्ट केलेलें जें पुरुषसूक्त आहे त्यांत विराट् राज्याची-वैराज्याची कल्पना वर्णिलेली आहे असें कै. राजवाडे यांनी दाखविलें आहे. तात्पर्य, आर्यांचा दिवसेंदिवस उत्कर्ष झाला, मोठालीं राज्यें स्थापून ते वैभवशाली बनले त्याबरोबर त्यांच्या धार्मिक विधींचें व धार्मिक ग्रंथांचें स्वरूपही बदललें. पूर्वीचा साधेपणा जाऊन आतां थाटमाट आला. ऋग्वेद-मंत्रांतील साधी लेखनशैली जाऊन त्याठिकाणीं ब्राह्मणग्रंथांतील भरघोस लेखनशैली आली व पूर्वींचे साधे यज्ञ जाऊन मोठ्या प्रमाणावर सर्वांनी मिळून करण्याचे मोठाले यज्ञ अस्तित्वांत आले. आणि ब्राह्मणग्रंथांतून त्यांचीं वर्णनें येऊं लागलीं. या ब्राह्मणग्रंथपैकीं ऐतरेय आणि कौशीतकी ब्राह्मण हीं ऋग्वेदाचीं आहेत. तैत्तिरीय ब्राह्मण कृष्णयजुर्वेदाचें असून शत-पथ ब्राह्मण शुक्लयजुर्वेदाचें आहे. तांड्य, षड्विंश व मंत्र हीं ब्राह्मणें साम-वेदाचीं असून गोपथ ब्राह्मण अथर्ववेदाचें आहे.

ऋग्वेद मंत्रकालापूर्वीं जसें दाशराज्ञ युद्ध झालें तसें ब्राह्मणकालाच्या सुमाराला कुरु–पांचालांचें मोठें युद्ध झालें. कुरु आणि पांचाल हे संघ पंजाबांतून आले कीं, हिमालयापलीकडून आले यासंबंधीं अनेक मतें आहेत. ऐतरेय ब्राह्मणांत कुरु हे हिमालयापलीकडे राहत होते असें म्हटलें आहे. व त्यांच्यांतील आणि पांचालांतील बहुपतित्वाच्या चालीवरून हे दोन्ही

संघ हिमालयापलिकडूनच आले असावेत असें कित्येकांचें म्हणणें आहे. या दोन राज्यांत जी मोठी लढाई झाली तिचेंच वर्णन इतर बराच भाग मिसळून महाभारतांत केलें आहे. कुरूंचें राज्य हल्लींच्या दिल्लीजवळ, पांचालांचें हल्लींच्या कनौजजवळ, कोसलांचें औधमध्यें, विदेहांचें बिहार-मध्यें व काशीचें राज्य प्रयागजवळ अशीं हीं राज्यें वसलीं होतीं.

या वैभवशाली राज्यांतून यज्ञ मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यामुळें या यज्ञांचें व्यवस्थित शास्त्र बनवून ते पार पाडण्याचें काम ब्राह्मणवर्गाकडे आलें. राजे व त्यांचे नातलग क्षत्रिय बनले व राज्यें जिंकणें व चालविणें हें त्यांचें काम झालें आणि बाकीची प्रजा—जिला विश् असें म्हणत ती वैश्य झाली. अशा रीतीने ब्राह्मणकालीं वर्णभेद ऋग्वेद—कालापेक्षां जास्त स्पष्ट झाले. तथापि त्यांना अजून जातींचें स्वरूप आलें नव्हतें. गुणकर्मा-वरूनच वर्ण ठरवीत. छांदोग्योपनिषदांतील सत्यकाम—जाबालाच्या कथे-वरून हीच गोष्ट स्पष्ट होते. सत्यकामाला आश्रमांत जाऊन विद्याध्ययन करण्याची जेव्हां इच्छा झाली तेव्हां त्यानें आपल्या आईला गोत्र विचारलें तेव्हां ती म्हणाली:—नाहमेतद्वेद तात यद्गोत्रस्त्वमसि बव्हहं चरन्ती परिचारिणी यौवने त्वामलभे साहमेतन्नवेद यद्गोत्रस्त्वमसि, जबाला तु नामा हमसि सत्यकामो नाम त्वमसि ससत्यकाम एव जाबालो ब्रुवीथाः इति ॥ ४—४ ॥

"बाळा, तुझें गोत्र कोणतें तें मला माहीत नाहीं. सेवाकर्म करीत फिरत असतां, माझ्या तरुणपणीं तूं मला प्राप्त झाला आहेस. म्हणून मला तुझें गोत्र माहीत नाही. जबाला हें माझें नांव आहे व तुझें सत्यकाम आहे. तेव्हां तूं 'जबालेचा मुलगा सत्यकाम आहें' असें सांग. त्याप्रमाणें तो गौतमाकडे गेला व त्याला त्याने सर्व खरी खरी हकीगत सांगितली. तेव्हां गौतम म्हणाला, "नैतदब्राह्मणो विवक्तुमर्हति" ब्राह्मण असल्याशिवाय तूं हें सत्य सांगितलें नाहीस असें म्हणून त्यानें त्याचें उपनयन केलें व विद्याध्ययन करविलें.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व अनार्यांचा चौथा शूद्र असें चातुर्वर्ण्य ब्राह्मण-कालीं जसें स्पष्ट अस्तित्वांत आलेलें दिसतें त्याचप्रमाणें ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी अशी चार आश्रमांची व्यवस्था झालेली दिसते.

मुलाचें उपनयन करून गुरुगृहीं त्याला विद्यादान केलें जात असे, असें वरील सत्यकाम-जाबालाच्या आणि इतर उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. कुरु, पांचाल, काशी, विदेह इत्यादि ठिकाणचे राजे यज्ञ करीत व तेथें विद्वान् मंडळींना आमंत्रण देत. त्या ठिकाणीं सर्व विषयांची चर्चा होत असे. त्याशिवाय हल्लींच्या विद्यापीठांच्या स्वरूपाच्या परिषदा असत व तेथे विद्यार्थी अध्ययनाकरितां जात. बृहदारण्यकांत श्वेतकेतु हा अध्ययनाकरितां पांचालांच्या परिषदेला गेला असें वर्णन आहेः अध्ययन समाप्त झाल्यानंतर हे विद्यार्थी आपल्या घरीं परत येत, विवाह करीत, गृहस्थाश्रम स्वीकारीत व अग्निहोत्र घेऊन, आहुति देऊन, अतिथींचा सत्कार करीत, आपल्या आश्रमाला व वर्णाला उचित असें वागून आपला जीवनक्रम सार्थकीं लावीत. वर्णसंस्थेचें आणि आश्रमसंस्थेचें वर्णन पुढें सविस्तर करण्यांत येईल पण येथें येवढें सांगणें अवश्य आहे कीं या दोन संस्थांच्या योगानें ब्राह्मणकालीं भारतवर्ष उत्कर्षाच्या परमसीमेला जाऊन पोचला होता. ब्राह्मण-क्षत्रियांची व राष्ट्रीय ऐश्वर्याची परंपरा अशीच पुढें चालावी म्हणून त्या वेळचे लोक प्रार्थना करीत असतः—

**“ आब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामस्मिन्राष्ट्रे राजन्य इषव्यः शूरो महारथो जायताम् । दोग्ध्री धेनुर्वोढाऽनड्वानाशुः सप्तिः पुरंधिर्योषा जिष्णू रथेष्ठाः । सभेयो युवा । अस्य यजमानस्य वीरो जायताम् । निकामे निकामे नः पर्जन्योवर्षतु । फलिन्यो न ओषधयः पच्यन्ताम् । योगक्षेमोनः कल्पताम् ॥ ”**

शुक्लयजुर्वेद २२–२२

“हे परमात्मन्। या राष्ट्रांत ब्राह्मणवर्ग तेजस्वी व विद्वान् होवो. क्षत्रिय अचुक बाण मारणारा, शूर आणि महारथी होवो ! गाई पुष्कळ दूध देणाऱ्या, बैल बळकट, घोडे चपळ, स्त्रिया पतिनिष्ठ, योद्धे जयिष्णु, व तरुण लोक सभा जिंकणारे होवोत. या यजमानाला वीरपुत्र होवो. पाऊस भरपूर पडो, शेतें उत्तम पिकोत आणि आमचा योगक्षेम चांगला चालो. ” वैभवशाली राष्ट्राचें सुंदर चित्र या प्रार्थनेंत काढण्यांत आलें आहे. सोनें, चांदी, रत्नें यांनी राजांचे खजिने भरलेले असत. गाई, घोडे, उंट, हत्ती व रथ मुबलक असत. यज्ञामध्यें सुवर्णाचीच दक्षिणा देण्यांत येई. व्रीहि, यव, तिल, माष

गोधूम, मसुर, नीवार, श्यामाक इत्यादि धान्यें भरपूर पिकत. लोक मांसाहारही करीत. शतपथ ब्राह्मणांत गोमांस खावें किंवा नाही याची चर्चा करून ब्राह्मणांनी तें खाऊं नये असें ठरविलें आहे. तथापि तें चांगलें असेल तर मी तें खाईन असे याज्ञवल्क्याचे उद्गार आहेत. लोकांनी मोठालीं नगरें वसविलीं होतीं. त्यांना सभोवार कोट असत. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या मुलांचें शिक्षण गुरुगृहीं एकत्र होई आणि चार वर्णांमध्यें अजून मोठाले तट उभारले गेले नव्हते. स्त्रियांचें पूर्वीचें स्थान समाजांत अजून कायम होतें. भर सभेंत याज्ञवल्क्याला प्रश्न विचारून पूर्वपक्ष करणाऱ्या वाचक्नवीसारख्या स्त्रिया तेव्हां असत. त्यांना वडिलार्जित संपत्तीचा वाटाही मिळत असावा. बालविवाह प्रचारांत आले नव्हते. पुनर्विवाहाला मोकळीक होती. आणि हिमालयापलीकडून आलेल्या कांही कुटुंबांत बहुपतित्वाची चाल असली तरी खुद्द आर्यावर्तांत ती नव्हती. जवळच्या नातेवाइकांत विवाह करण्याचा शतपथ ब्राह्मणांत प्रतिबंध केला आहे. पुढें हे नियम जास्त कडक केले गेले.

याच काळांत यज्ञांचें पूर्वीचें साधें स्वरूप जाऊन मोठें व भानगडीचें स्वरूप आलें व त्याचें वेगळें शास्त्रच बनलें हें वर सांगितलेंच. कित्येक यज्ञसत्रें एक एक वर्ष चाललेलीं असत. या यज्ञांत पशूंची हत्या बेसुमार होई. अश्वमेध यज्ञांत घोडे, बैल, गाई, बकरे, हरणें इत्यादि १८० पशू मारावयास सांगितले आहेत. यज्ञाचे सर्व प्रकार एकहजाराहून जास्त भरतील असें म्हणतात. तथापि हविःसंस्था, सोमसंस्था, आणि पाकसंस्था या त्यांत प्रमुख आहेत. हविःसंस्थेचे अग्न्याधेय, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, आग्रायण, चातुर्मास्य, निरूढ पशुबंध व सौत्रामणि हे सात प्रकार आहेत. सोमसंस्थेचे अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ्य, शोडशिन्, वाजपेय, अतिरात्र व आप्तोर्याम असे सात प्रकार आहेत. आणि पाकसंस्थेचे पर्वन्, श्रावणी, अश्वयुगी, आग्रहायणी, अष्टका, चैत्री आणि मासिक श्राद्ध हे सात प्रकार आहेत. हे गृह्याग्नीच्या साहाय्यानेंच करावयाचे असतात.

पण कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला म्हणजे तिचा विनाशकाळ जवळ आला असें समजतात त्याप्रमाणें यज्ञांच्या अतिरेकानें लोकांचीं मनें विटून यज्ञसंस्था शेवटीं आपलें महत्त्व गमावून बसली. एक एक वर्ष यज्ञ

करणें, त्यांत निरनिराळ्या देवतांना उद्देशून शेकडों पशूंचें बलिदान करणें यापासून आपलें खरोखरीच हित होतें काय ? यज्ञापासून स्वर्ग कसा मिळतो ? तो स्वर्ग आहे याला प्रमाण काय ? तो स्वर्ग असेल तर त्याचें स्वरूप काय आहे ? तो मिळाला म्हणजे मनुष्याचें परम कल्याण साधलें असें होतें काय ? अशा तऱ्हेचे विचार तत्कालीन समाजांत सुरू झाले. मेल्यानंतर स्वर्ग मिळतो हे खरें पण मेल्यानंतर जीव शिल्लक रहातो काय ? या जीवाचें स्वरूप काय आहे ? याला सुखदुःखोपभोग कसे मिळतात ? हा जन्माला कसा येतो ? त्याला जन्माला घालणारा कोणी आहे काय ? हें सर्व विश्व कसें निर्माण झालें ? त्याला निर्माण करणारा कोणी आहे काय ? असल्यास त्याचें स्वरूप काय असावें ? हे प्रश्न समाजांतील विद्वान् लोकांच्या मनांत उत्पन्न झाले. तत्कालीन ऋषींनी आयुष्येचीं आयुष्यें या प्रश्नांचा विचार करण्यांत घालविलीं. व या प्रश्नांना त्यांनी जीं उत्तरें शोधून काढिलीं त्यांनाच ' उपनिषदांतील तत्त्वज्ञान ' असें म्हणतात. ऐहिक ऐश्वर्य त्यांना परिपूर्ण मिळालें होतें. पण त्यामुळें उन्मत्त न होतां त्यांनी आपल्या दृष्टि अंतर्मुख केल्या व सुखदुःखांचा उगम कोठून आहे ? जीव, जगत्, जगदीश्वर यांचें स्वरूप काय आहे ? व मनुष्याचें अंतिम साध्य काय असावें या प्रश्नांचीं उत्तरें शोधून काढून, निर्भयपणें व आत्मविश्वासानें उपनिषदांच्या द्वारा लोकांपुढें मांडून, त्यांनीं जगांतील अद्वितीय तत्त्वज्ञान जन्माला आणलें.

## उपनिषदांतील तत्त्वज्ञान.

ईश्वर एक आहे कीं अनेक आहेत ? जग उत्पन्न होण्यापूर्वी काय होतें ? जग कोणी उत्पन्न केलें ? अशा प्रश्नांचीं उत्तरें शोधण्याचा प्रयत्न व प्रारंभ ऋग्वेदकालींच झालेला दिसतो. " एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्नियमंमातरिश्वानमाहुः " एकाच देवाला ब्राह्मण अग्नि, यम, मातरिश्वा अशीं नावें देतात असें ऋग्वेदांतील सौरसूक्तांत सांगितलें आहे. पण यापेक्षांही खोल विचार ऋग्वेदसंहितेतील नासदीय सूक्तांत केला आहे. जगांतील तत्त्वज्ञांनी या सूक्ताचा अत्यंत गौरव व कौतुक केलें असल्यामुळें, व सृष्टीचें मूळ

शोधण्याचा जगांतील पहिलाच प्रयत्न या दृष्टीने, पुढील सर्व तत्त्वज्ञानाला पितृस्थानीं असणारें हें सूक्त उतरून घेतों:—

**नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासीद्रजो नो व्योमा परोयत् ।**
**किमावरीवः कुह कस्य शर्मन् । अम्भः किमासीत् गहनं गभीरम् ॥**

१ त्या वेळीं म्हणजे जगाच्या पूर्वी असत् नव्हतें व सत्‌ही नव्हतें. वातावरण नव्हतें. व त्या पलीकडील आकाशही नव्हतें. अशा स्थितींत कोणी कोणाला कोठें व कोणाच्या सुखासाठीं आवरण घातलें म्हणावें ! खोल आणि गंभीर पाणी तरी त्यावेळीं होतें काय ?

**न मृत्युरासीदमृतं न तर्हि न रात्र्या अन्ह आसीत्प्रकेतः ।**
**आनीदवातं स्वधया तदेकं तस्माद्धान्यन्नपरः किंचनास ॥**

२ तेव्हां नाशवंत सृष्टि नव्हती म्हणून अविनाशी पदार्थही नव्हता. रात्रदिवस यांचा भेद कळण्यासही कांहीं साधन नव्हतें ( सूर्यच नव्हता ). जें काय होतें तें एकटें एकच आपल्या शक्तीनें वायूशिवाय श्वासोच्छ्वास करीत होतें. त्याशिवाय किंवा त्यापलीकडे दुसरें कांहीही नव्हतें.

**तम आसीत्तमसागूढमग्रे प्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ।**
**तुच्छेनाभ्वपिहितं यदासीत् तपसस्तन्महिना जायतैकम् ॥**

३ अंधकार होता आणि आरंभीं हें सर्व अंधकारानें व्यापलेलें भेदाभेद रहित पाणी होतें. किंवा जें सर्व व्यापी ब्रह्म फोल मायेने आच्छादिलें होतें, तें मूळ एक ब्रह्मच तपाच्या महिम्याने पुढें प्रकट झालें होतें.

**कामस्तदग्रे समवर्तताधि मनसो रेतः प्रथमं यदासीत् ।**
**सतो बंधु असति निरविंदन् हृदि प्रतीष्या कवयो मनीषा ॥**

४ याच्या मनाचें जें बीज प्रथमतः निघालें हाच आरंभीं काम म्हणजे सृष्टि निर्माण करण्याची प्रवृत्ति झाली. हाच मूळ परब्रह्मांत सताचा म्हणजे विनाशी दृश्य सृष्टीचा पहिला संबंध होय असें ज्ञात्यानीं अंतःकरणांत विचार करून बुद्धीने निश्चित केलें आहे.

**तिरश्चीनो विततो रश्मिरेषाम् अधःस्विदासीदुपरिस्विदासीत् ।**
**रेतोधा आसन्महिमान आसन् स्वधा अवस्तात् प्रयतिः परस्तात् ॥**

५ हा रश्मि म्हणजे धागा किंवा किरण यांच्यांत आडवा पसरला. आणि खालीं होता म्हटलें तर वरही होता. यांच्यांतले कांही बीजप्रद झाले व मोठेही झाले. त्यांचीच स्वशक्ति अलिकडे व प्रभाव पलीकडे व्यापून राहिला.

**को अद्धा वेद कइह प्रवोचत् कुत आजाता कुतइयं विसृष्टिः ।**
**अर्वाक् देवा अस्य विसर्जनेन अथ को वेद यत आबभूव ॥**

६ सताचा पसारा कोठून आला हें विस्तारानें येथें कोण सांगणार ? कोणाला हें निश्चयात्मक माहीत आहे ? देवही या सृष्टीच्या पसाऱ्यानंतरचे. मग ती जेथून निघाली तें कोण जाणणार ?

**इयं विसृष्टिर्यत आबभूव यदि वादधे यदिवान ।**
**योऽस्याध्यक्षः परमे व्योमन् सो अंग वेद यदि वानवेद ॥**

७ सताचा हा पसारा जेथून झाला किंवा तो निर्मिला गेला अगर न गेला तें परम आकाशांत असणारा या जगाचा जो अध्यक्ष तो जाणीत असेल किंवा नसेलही.

तात्पर्य सत् आणि असत्, रात्र आणि दिवस, विनाशी आणि अविनाशी हे सर्व सापेक्ष शब्द आहेत. जेव्हां असत् असें कांहीच नव्हतें तेव्हां सत् होतें असें तरी कसें म्हणावें ? म्हणून, सृष्टीच्या पूर्वी जें कांही तत्त्व होतें तें अनिर्वाच्य आहे, तें शब्दाने व्यक्त करण्यासारखें नाही. तसें करूं लागलें तर द्वैताची भाषा वापरावी लागते व त्याने यथार्थ ज्ञान होत नाही म्हणून, जें एकटें एकच वायूशिवाय श्वासोछ्वास करीत होतें तें मूलतत्त्व शब्दाने सांगण्यासारखें नसून प्रत्यक्ष अनुभवगम्य, स्वसंवेद्य असें आहे असा सूक्ताचा मथितार्थ दिसतो. व पुढील उपनिषदांतूनही हेच विचार " नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुधा श्रुतेन " (मुंडक ३-३) या शब्दांत सांगितले आहेत.

या ब्रह्मविद्येला मुंडकोपनिषदांत परा विद्या असें म्हटलें आहे. बाकीच्या विद्या या अपरा विद्या होत. शौनक आंगिरसाकडे जाऊन जेव्हां विचारूं लागला कीं, " कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति " कोणती एक गोष्ट जाणली असतां सर्व जाणल्यासारखें होईल ? तेव्हां त्याने उत्तर दिलें. " द्वे विद्येवेदितव्ये इतिहस्मयत् ब्रह्मविदो वदन्ति परा चैवापराच. "

ब्रह्मवेत्ते परा आणि अपरा अशा दोन विद्या जाणाव्या असें म्हणतात. " तत्र अपरा—ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदः । शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदो ज्योतिषमिति । अथ परा यया तदक्षरमधिगम्यते "

ऋग्वेदादि चार वेद आणि सहा अंगे यांत अपराविद्या सांगितली असून ज्या विद्येने अक्षराचें म्हणजे अविनाशी तत्त्वाचें ज्ञान होतें ती पराविद्या उपनिषदांत सांगितली आहे. हीं उपनिषदें वाढत वाढत १०८ पर्यंत गेलीं आहेत व त्यांत अकबराच्या काळीं केलेलें " अल्लोपनिषद् " हीं आहे. पण मूळ मुख्य उपनिषदें १०–१२ असून त्यांवर अनेक आचार्यांनी भाष्यें केलीं आहेत. ऐतरेय आणि कौषीतकी हीं उपनिषदें ऋग्वेदाचीं आहेत. छांदोग्य व केन सामवेदाचीं आहेत. ईश व बृहदारण्यक शुक्लयजुर्वेदाचीं आहेत. तैत्तिरीय कृष्णयजुर्वेदाचें आहे. कठही त्याच वेदाचें आहे असें म्हणतात. मुंडक आणि प्रश्नोपनिषद् अथर्व वेदाचीं आहेत.

ईशोपनिषद् हें संहितांतर्गत असल्यामुळें, त्याला पहिलें स्थान देण्यांत आलें आहे. हें उपनिषद् उघडल्यावरोवर त्याच्या आरंभाची शांति खालील मंत्राने केलेली दृष्टीस पडतेः—

**पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**
**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

हा मंत्र बृहदारण्यकाच्या पांचव्या अध्यायांत आला असून त्यांत एक मोठा सिद्धांत सांगितला आहे तो असा कीं, परमात्मा परिपूर्ण आहे व हें विश्वही परिपूर्ण आहे कारण पूर्ण अशा परब्रह्म तत्त्वापासून पूर्ण असेंच कार्य उत्पन्न झालें पाहिजे. जी अपूर्णता कारणांत नाही ती कार्यांत येणें शक्य नाही म्हणून पूर्णाची पूर्णता प्रयत्नांनी अभिव्यक्त केली म्हणजे मूळ परब्रह्म तत्त्व तेवढेंच शिल्लक उरतें. कार्य कारणरूप बनतें व जीवाला मूळ कारणाची, ईश्वराची प्राप्ति होते. प्रयत्न केला असतां जीवाला पूर्णता येणें शक्य आहे हा आशादायी सिद्धांत यांत सांगितला असून इतर उपनिषदांतही हाच सिद्धांत निरनिराळ्या शब्दांनी कसा सांगितला आहे तें आतां पाहूं.

यज्ञयागादि कर्मासंबंधीं एक प्रकारचा तिटकारा उत्पन्न झाला असावा असें मुंडकांतील खालील मंत्रावरून दिसतेंः——

**प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः। अष्टादशोक्तं अवरं येषुकर्म।**
**एतच्छ्रेयो येऽभिनंदन्ति मूढाः। जरामृत्युं ते पुनरेवापि यान्ति॥**
२–७

सोळा ऋत्विज आणि यजमान व यजमानपत्नी अशा १८ जणांनी केले जाणारे हे यज्ञ फुटक्या नावेसारखे आहेत. हे यज्ञच श्रेयःसाधक आहेत म्हणून ज्यांना आनंद होतो ते मूर्ख लोक पुनः पुनः म्हातारे होतात व मृत्यू पावतात.

**इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः।**
**नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वा इमं लोकं हीनतरं वा विशन्ति॥**

श्रौतस्मार्त कर्मापेक्षां दुसरें कांहीही श्रेष्ठ नाही असें समजणारे मूर्ख लोक स्वर्गाला जाऊन पुनः या किंवा यापेक्षाही हीन लोकाला जातात.

**परीक्ष्य लोकान्कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन**
**तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्**

म्हणून कर्मानें प्राप्त करून घेतलेले लोक अस्थिर असतात हें लक्षांत घेऊन ब्राह्मणाने विरक्त व्हावें. कारण कर्मानें, जें कोणींही केलें नाही तें ब्रह्म मिळविणें शक्य नाही. पण मुंडकोपनिषदांत केलेल्या या उपदेशापेक्षां निराळ्या तऱ्हेचा उपदेश ईशोपनिषदांत केला आहे. त्यांतले पहिलेच दोन मंत्र असे आहेतः—

**ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्।**
**तेन त्यक्तेन भुंजीथाः मागृधः कस्यचिद्धनम्॥१ १॥**
**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः।**
**एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥१–२॥**

जगांतील प्रत्येक वस्तु परमेश्वराने व्यापिली आहे. तेव्हा आसक्तीचा त्याग करून किंवा त्या वस्तू ईश्वराला अर्पण करून त्यांचा उपभोग घ्या. कोणा-च्याही धनाचा लोभ करूं नका. या जगांत कर्में करीतच शंभर वर्षें जग-ण्याची इच्छा करावी. यापेक्षां तुला दुसरा मार्ग नाही व या योगानें कर्मांच्या ठिकाणीं मनुष्य लिप्त होत नाही. ईश्वरार्पणपूर्वक सर्व कर्में कर-ण्याचा भक्तिमार्गात पुढें जो उपदेश झाला त्याचें येथें स्पष्ट बीज दिसत

आहे. कर्में बंधक होणार नाहीत अशा रीतीने पण केलीं पाहिजेत असा या मंत्रांत उपदेश केला आहे व तो महत्त्वाचा आहे. सर्वच उपनिषदें निवृत्तीचा उपदेश करणारीं नाहीत हें यावरून उघड दिसतें.

केनोपनिषदांत मन, प्राण, वाणी, डोळे, कान यांना आपापलीं कामें करण्याची प्रेरणा किंवा शक्ति कोणापासून मिळते असा प्रथम प्रश्न विचारून त्याला असें उत्तर दिलें आहे कीं, या मनाचें मन, प्राणाचाही प्राण असा जो परमात्मा आहे त्याच्यामुळें ही इंद्रियें आपआपलीं कामें करूं शकतात. त्या परमात्म्याला जे जाणतात ते "प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति" ते मृत्यूनंतर अमर होतात. तो परमात्मा वाणीचा विषय होऊं शकत नाही परंतु त्या परमात्म्यामुळें वाणीला बोलण्याचें सामर्थ्य आलें आहे. अशा रीतीचें जें परब्रह्म आहे "तदेव ब्रह्म त्वं विद्धि" तें तूं जाण. तें ब्रह्म भिन्नत्वानें जाणतां येत नसल्यामुळें जो त्याला मीं *जाणलें असें म्हणतो त्याला तें समजलेलें नसतें " यस्यामतं तस्य* मतं मतं यस्य न वेद सः। अविज्ञातं विजानताम् विज्ञातमविजानताम् ॥ २–३ ॥ असें तें ब्रह्म आहे. हें परब्रह्म सर्वत्र भरलें आहे असें जें जाणतील " भूतेषु भूतेषु विचित्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥२–५॥ ते मृत्यूनंतर अमर होतील असा या उपनिषदाचा उपदेश व आश्वासन आहे.

सर्व उपनिषदांत कठोपनिषदाची रचना फार सुबोध व व्यवस्थित आहे. नचिकेता आणि यम यांच्या संवादाने ह्या तत्त्वज्ञानाला आरंभ झाला असून वेदान्ताचीं सर्व तत्त्वें सोप्या भाषेंत व्यवस्थित रीतीनें या उपनिषदांत सांगितलेलीं आढळतात. या उपनिषदांतले कित्येक मंत्र भगवद्गीतेंत जसेच्या तसेच घेतलेले आहे. मृत्यूनंतर जीवन आहे कीं नाही ? हा प्रश्न फार प्राचीन कालापासून विचारी मनुष्यांना गुंगवीत आला आहे. कारण जीव नित्य आहे कीं अनित्य आहे, मृत्यूनंतर त्याला अस्तित्व आहे कीं नाही हें समजल्याशिवाय या आयुष्यांतील धोरण ठरविणें अशक्य आहे आणि या प्रश्नाचें उत्तर जसें मिळेल त्याप्रमाणें हें धोरण ठरविलें जाईल. मृत्यूनंतर जीवाला अस्तित्व नाही. देहाशिवाय आत्मा नाही व देह जळाला म्हणजे सर्व कांही संपलें असें मानणाऱ्या लोकांचें तत्त्वज्ञान फार निराळें होतें. " भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः " असें एकदां मनाने घेतलें

म्हणजे येन केन प्रकारेण द्रव्य संपादून अथवा "ऋणं कृत्वा, घृतं पिबेत्" अशी प्रवृत्ति होणें अगदी साहजिक आहे. याच्या उलट आत्मा किंवा जीव नित्य आहे, हा देह नाहीसा झाला म्हणून जीव नाहीसा होत नाही, तेव्हां केवळ या जन्माकडेच बघून आचारांचें धोरण ठरविणें इष्ट होणार नाही, तर चिरंतन असणाऱ्या जीवाचें कल्याण होईल अशाच रीतीने आयुष्याला वळण लावलें पाहिजे अशी विचारी मनुष्यांची स्वाभाविक प्रवृत्ति होते. वैदिक संस्कृतीची हीच प्रवृत्ति आहे व या प्रवृत्तीच्या मुळाशी उपनिषदांतील तत्त्वज्ञान आहे.

नचिकेत्याच्या पित्यानें एका यज्ञांत म्हाताऱ्या गाई ब्राह्मणांना दिल्यामुळें, नचिकेताला वाईट वाटलें व बापानें आपल्याला देऊन, दानांतील वैगुण्य भरून काढावें म्हणून 'बाबा, तुम्ही मला कोणाला देणार आहांत' असा त्याने प्रश्न केला. बापानें रागावून, तुला मृत्यूला देणार आहें असें सांगितलें. तेव्हां तो यमाकडे गेला. यम घरीं नसल्यामुळें त्याला त्रिरात्र उपोषण घडलें म्हणून यमाने त्याला तीन वर मागावयास सांगितलें. त्यांपैकीं पहिल्या वराने त्याने 'बापाचा राग शांत होवो' असें मागणें मागितलें. दुसऱ्या वराने अग्निविद्या समजून घेतली व तिसऱ्या वराने, प्राचीन काळापासून मनुष्य-जातीला पडलेलें कोडें सोडविण्याची विनंति केली.

**येयं प्रेते विचिकित्सा मनुष्ये अस्तीत्येके नायमस्तीति चैके ।**
**एतद्विद्यामनुशिष्टस्त्वयाहं वराणामेष वरस्तृतीयः ॥**

मृत्यूनंतर जीव असतो असें कोणी म्हणतात, कोणी नसतो असें म्हण-तात तेव्हां यांपैकीं खरें काय हें तुझ्या कृपेने मला समजलें पाहिजे. हाच माझा तिसरा वर आहे असें जेव्हां नचिकेत्याने सांगितलें तेव्हा त्याची परीक्षा पहाण्याकरितां त्याला यमाने अनेक आमिषें दाखविलीं. दुसऱ्याही अडचणी दाखविल्या; या बाबतींत प्रत्यक्ष देवांनीही पूर्वी विचार केला आहे व ही कळण्याला कठिण अशी अत्यंत सूक्ष्म गोष्ट आहे. तेव्हां तूं दुसरा वर माग असें जेव्हां यम म्हणाला तेव्हां हा प्रश्न सोडविणारा तुझ्यासारखा वक्ता दुसरा कोणी मिळणार नसल्यामुळें याच प्रश्नाचें उत्तर तूं दे असें नचिकेत्याने सांगितलें. यम म्हणालाः—

**शतायुषः पुत्रपौत्रान्वृणीष्व बहून्पशून्हस्तिहिरण्यमश्वान् ।**
**भूमेर्महदायतनं वृणीष्व स्वयंच जीव शरदो यावदिच्छसि ।**
**येयेकामा दुर्लभा मर्त्यलोके सर्वान्कामांश्छंदतः प्रार्थयस्व ।**
**इमा रामाः सरथाः सतूर्याः न हीदृशा लंभनीया मनुष्यैः**
**आभिर्मत्प्रत्ताभिर्परिचारयस्व नचिकेतो मरणं मानुप्राक्षीः ॥**

शेंकडो वर्षांचें आयुष्य, हत्ती, घोडे, सोनें काय वाटेल तें माग. मृत्युलोकांत न मिळणाऱ्या गोष्टीही वाटेल तर माग. या मनुष्यांना कधीही न मिळणाऱ्या सुंदर स्त्रिया तुला मी देतों यांच्यासह मजा कर पण मृत्यूनंतर जीवाला अस्तित्व आहे कीं नाहीं हा प्रश्न विचारूं नको. नचिकेता या अमिषाला बळी पडला नाहीं. त्यानें सांगितलें कीं:—

**श्वोभावा मर्त्यस्य यदंतकैतत्सर्वेन्द्रियाणां जरयंति तेजः ।**
**अपि सर्वं जीवितमल्पमेव तवैव वाहास्तव नृत्यगीते ॥**

सर्व इंद्रियांचें तेज नाहींसें करून उद्यां नष्ट होणाऱ्या या भोगांची मला गरज नाही. ते तुझे तुलाच लखलाभ होवोत. मला माझ्या प्रश्नाचें उत्तर पाहिजे—

**योऽयंवरो गूढ मनुप्रविष्टो नान्यं तस्मान्नचिकेता वृणीते ॥**

या वराशिवाय नचिकेता दुसरें कांहींही घेणार नाही—त्याची ही निष्ठा पाहिल्यावर यमाने त्याच्या प्रश्नाचें जें उत्तर दिलें तें वैदिक तत्त्वज्ञानांत महत्त्वाचें आहे.

**सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपांसि सर्वाणि च यद्वदान्ति ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण ब्रमीम्योमित्येतत् ॥**

जिच्याकरितां ऋषि तपश्चर्या करितात, ब्रह्मचर्यानें राहतात व सर्व वेद जी एकच गोष्ट सांगतात ती संक्षेपाने तुला मी सांगतों. तिचें नांव ॐ असें आहे. यालाच अविनाशी ब्रह्म असें म्हणतात. "एतत् हि एवाक्षरं ब्रह्म" याला शरीर नसलें तरी हें शरीरांत राहातें "अशरीरं शरीरेषु अनवस्थेषु अवस्थितम्" शरीरें अनित्य असलों तरी हें नित्य आहे:—

**न जायते म्रियते वा विपश्चित् नायं कुतश्चित् न बभूव कश्चित्**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणः न हन्यते हन्यमाने शरीरे ॥**

**हन्ताचेन्मन्यते हंतुं हतश्चेन्मन्यते हतम्।**
**उभौ तो न विजानीतो नायं हन्ति न हन्यते॥**

याला जन्म नाही, याला मरण नाही, याला कोणीही ठार मारूं शकत नाही. शरीर छिन्न भिन्न केलें म्हणून हा आत्मा छिन्न भिन्न होत नाहीं मारणारा जरी मी याला मारिलें असें म्हणेल किंवा मरणारा मी मेलों असें म्हणेल तरी त्या दोघांनाही कांही कळत नाही. हेच दोन मंत्र अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळें भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत थोड्या फरकानें घेण्यांत आले आहेत.

सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं एकच परमात्मा वास करीत असून, ज्याप्रमाणें एकच अग्नि प्रत्येक ठिकाणीं वेगळ्या वेगळ्या आकाराचा दिसतो त्याप्रमाणें प्रत्येक शरीरांत हा भिन्न झाल्यासारखा दिसतो. हा अर्थ खालील मंत्रांत सांगितला आहे:—

**अग्निर्यथैको भुवनं प्रविष्टो रूपं रूपं प्रतिरूपो बभूव।**
**एकस्तथा सर्वभूतांतरात्मा रूपं रूपं प्रतिरूपो बभूव॥**

स्वतःच्या शरीरांत असणारा हा परमात्मा जे पाहतील, त्याचें ज्ञान करून घेतील "तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीराः तेषां शांतिः शाश्वती नेतरेषाम्" त्यांनाच शाश्वत शांति मिळेल. इतरांना मिळणार नाही. आणि खरेंच आहे. आपल्या शरीरांत प्रत्यक्ष परमात्मा वास करीत आहे आणि तो अमर आहे. आपल्याला जन्ममरण आहे, सुखदुःखें आहेत या आपल्या सर्व केवळ कल्पनाच असून वस्तुतः आपण अमर आहोंत असें ज्ञान ज्याला होईल त्याला अखंड शांति, अखंड आनंद प्राप्त व्हावा हें अगदीं साहजिक आहे. मनुष्याने आपलें हें अद्वितीय स्वरूप समजून घ्यावें म्हणूनच उपनिषदांची प्रवृत्ति आहे.

मग असें असून आपल्या या हृदयस्थ परमात्म्याचें ज्ञान लोक कां करून घेत नाहीत?

**परांचि खानि व्यतृणत्स्वयंभूः तस्मात् पराङ् पश्यति नांतरात्मन्।**
**कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षत् आवृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन्॥**

याचें कारण असें आहे कीं, मनुष्याच्या इंद्रियांच्या प्रवृत्ति बहिर्मुख असल्यामुळें मनुष्य कधीं अंतर्मुख होण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. अगदी क्वचित् एखादा धैर्यवान् पुरुष आपल्या इंद्रियांवर सत्ता चालवून व नेत्र अंतर्मुख करून प्रत्यगात्म्याचें दर्शन घेतो. तेव्हां बाह्य इंद्रियांवर सत्ता चालवून चित्त स्थिर केल्याशिवाय परमात्म्याचें दर्शन होणार नाही.

**तां योगमिति मन्यन्ते स्थिरामिन्द्रियधारणाम् ॥**

॥ क० ६–११ ॥

इंद्रियांना स्थिर करणें यालाच योग म्हणतात. "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" अशीच योगाची व्याख्या योगशास्त्रांतही दिली आहे. ज्ञानप्राप्तीचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांपैकीं ' योग ' हें साधन उपनिषत्कालींही ज्ञात होतें किंबहुना या साधनाचा आश्रय करूनच ऋषींनी उपनिषदांतील जीवशिव-विषयक सिद्धांत शोधून काढले आहेत.

**तं दुर्दर्शं गूढमनुप्रविष्टं गुहाहितं गव्हरेष्ठं पुराणम् ।**
**अध्यात्मयोगाधिगमेन देवं मत्वा धीरो हर्षशोकौ जहाति ॥**

त्या ज्ञात होण्याला अत्यंत कठीण अशा पुराण परमात्म्याचें, अध्यात्म-योगाने म्हणजे ( विषयेभ्यः प्रतिसंहृत्य चेतसः आत्मनि समाधानम्—शंकरा-राचार्य भाष्य ) विषयांपासून चित्त परावृत्त करून व अंतर्मुख होऊन, ज्ञान करून घेतलें म्हणजे तो धीर पुरुष सुखदुःखातीत होतो.

आणि अशा तऱ्हेने परमात्म्याचें ज्ञान करून घेऊन अखंड आनंद मिळविणें प्रत्येक मनुष्याच्या हातांत आहे हें आत्मस्वातंत्र्याचें अत्यंत सुंदर तत्त्व या उपनिषदांत सांगितलें आहे.रथाचें सुंदर रूपक घेऊन उपनिषत्कार म्हणतातः—

**यस्तुविज्ञानवान्भवति युक्तेन मनसा सदा ।**
**तस्येंद्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥**

जो चित्त स्थिर करितो त्याचीं इंद्रियें, कुशल सारथ्याच्या अंकित जसे घोडे राहतात, त्याप्रमाणें अंकित राहतात. आपलें हित कशांत आहे, अहित कशांत आहे याचा पूर्ण विचार करून मनुष्याने हिताचा मार्ग निश्च-याने पत्करला पाहिजे. कारणः—

**श्रेयश्च प्रेयश्च मनुष्यमेतः तौ संपरीत्य विविनक्ति धीरः।**
**श्रेयो हि धीरो अभिप्रेयसो वृणीते प्रेयो मंदो योगक्षेमात् वृणीते॥**

चिरंतन शांति आणि क्षुद्र विषयसुखें मनुष्यापुढें उभी असतात. त्यापैकीं विचारी मनुष्य तात्कालिक सुख देणाऱ्या विषयांचा त्याग करून ज्याच्या योगानें अखंड आनंद मिळेल त्या श्रेयस्कर मार्गाचें अवलंबन करितो. मूर्ख मनुष्य क्षुद्र विषयांचा स्वीकार करितो. तेव्हां आपलें बरें-वाईट करण्याला मनुष्य पूर्ण स्वतंत्र असल्यामुळें, हे मनुष्यहो! "उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत" (कठ. ३-१४) उठा, जागे व्हा व आम्ही तुमच्याकरितां आणलेल्या अखंड आनंदाच्या व तो प्राप्त करून देणाऱ्या ज्ञानाच्या वरांचा स्वीकार करा असा अत्यंत उत्साहदायक संदेश या उपनिषदांत सांगितला आहे. परमात्मा एक आहे. प्रत्येक शरीरांत परमात्माच आहे. तो अणोरणीयान् महतो महीयान्, अशब्द, अस्पर्श, अरूप असा आहे, योगानें चित्तवृत्ति अंतर्मुख करून त्याचें ज्ञान करून घेईल त्याला अमृतत्व प्राप्त होईल. या सर्व गोष्टी व्यवस्थित व सोप्या रीतीनें या उपनिषदांत सांगितल्या असल्यामुळें, सर्व उपनिषदांत हें उपनिषद श्रेष्ठ आहे असें ह्मणण्यास हरकत नाही.

प्रश्नोपनिषदांत सुकेशा, शैब्य वगैरे मंडळी पिप्पलाद ऋषीकडे जाऊन त्याला या प्रजा कोठून आल्या? हा प्राण कोठून आला असे प्रश्न विचारीत आहेत व ऋषि त्यांना उत्तरें देत आहे असें वर्णन आहे. ऐतरेयांत सृष्टीची उत्पत्ति सांगितली आहे. छांदोग्योपनिषदांत "सर्वं खल्विदं ब्रह्म" असा सिद्धांत केला आहे. यांत रैक्कानें जानश्रुतीला विद्यादान केल्याची जी कथा आहे तीवरून भरपूर दक्षिणा मिळाली असतां शूद्रालासुद्धां शिकवीत असत असें दिसतें. कारण प्रथम जानश्रुतिराजा सातशें गाई, एक कंठा व रथ ऋषीला देण्याकरितां घेऊन गेला तेव्हां त्याला शूद्र असें संबोधून हें तूं परत घेऊन जा असें ऋषीनें सांगितलें; पण जेव्हां पुनः एक हजार गाई, कंठा, रथ, गांवें व त्याबरोबर एक स्त्री ऋषीची पत्नी करण्याकरितां म्हणून राजा घेऊन गेला तेव्हां संतुष्ट होऊन ऋषीनें त्याला विद्यादान केलें. आतां त्याला ज्याअर्थी विद्यादान केलें त्याअर्थी तो शूद्र नसला पाहिजे असें समजून तेथील शूद्र शब्दाचा अर्थ बदलण्याची खटपट भाष्यकारांनी व

सूत्रकारांनीही केली आहे पण ती समाधानकारक वाटत नाही. चांगलीं कृत्यें करणारे लोक चांगल्या गतीला जातात ही कल्पना " रमणीय चरणा ...रमणीयां योनिमापद्येरन् " या वाक्यांत व वाईट कर्मे करणारे लोक वाईट गतीला जातात ही कल्पना " कपूयचरणाः कपूयां योनिमापद्यरेन् " ( ५-१०-७ ) या वाक्यांत सांगितली आहे. " सदेव सोम्येदमग्र आसीत् एकमेवाद्वितीयम् " सृष्ट्युत्पत्तीच्या पूर्वी एकमेव अद्वितीय असें सत् ब्रह्मच होतें; " यथा सोम्यैकेन मृत्पिंडेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्याद्वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येवसत्यम् " ज्याप्रमाणें मातीचा गोळा जाणला कीं, त्यापासून केलेलीं नानातऱ्हेचीं भांडीं जाणल्यासारखीच होतात; कारण या निरनिराळ्या नांवांना आणि आकारांना मातीच्या गोळ्यावांचून स्वतंत्र अस्तित्व नसतें त्याप्रमाणें हें ' सत् ' जाणलें म्हणजे त्याचें कार्यही जाणल्यासारखेंच आहे. कारण या सतावांचून त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही असा अनेक दृष्टांत देऊन ६-१ मध्यें युक्तिवाद केला आहे. सातव्या अध्यायाच्या आरंभालाच नारद सनत्कुमाराकडे येऊन आपण कोणकोणत्या विद्या शिकलों आहोंत तें सांगत आहे. त्यावरून उपनिषत्कालीं कोणकोणत्या विद्येच्या शाखा असत तें लक्षांत येतें:--" ऋग्वेदं भगवोऽध्येमि यजुर्वेदं सामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पंचमं वेदानां वेदं पित्र्यं राशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्यां सर्पदेवजनविद्याम् एतद्भगवोऽध्येमि ( ७-१-२). चार वेद, इतिहासपुराण हा पांचवा वेद, श्राद्धाचें शास्त्र, गणित, उत्पातज्ञान ( दैव ), कालशास्त्र, तर्कशास्त्र-( वाक्योवाक्यम् ), नीतिशास्त्र ( एकायनम् ), देवविद्या म्हणजे निरुक्ति, शास्त्र, शिक्षादिषडंगें, भूतविद्या, क्षत्रियाची धनुर्वेदादि विद्या, ज्योतिष-आणि गारुड्याची विद्या मला येते असें नारदाने सांगितलें आहे. इतिहासपुराण या पांचव्या वेदाचा उल्लेख आहे. त्यावरून भारतपुराण प्राथमिक अवस्थेत त्या वेळीं अस्तित्वांत आलें असावें, कारण भारतावर तीन संस्करणें होऊन व भर पडून आतां आहे त्या स्थितींत तें इ. स. पूर्व २५० च्या सुमाराला आलें असें रा. वैद्यांचें मत आहे. " क्षीणे

पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति" ही कल्पना "अमुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते" पुण्य संपलें कीं, स्वर्ग सोडावा लागतो (८–१–६) या वाक्यांत सांगितली आहे. या मर्त्य शरीरांत आत्म्याचा निवास आहे. ही कल्पना "मर्त्यं वा इदं शरीरं...अमृतस्य अशरीरस्य आत्मनः अधिष्ठानम् (८–१२–१) हें मर्त्य शरीर ज्याला शरीर नाही व जो अमर आहे अशा आत्म्याचें अधिष्ठान आहे' या वाक्यांत स्पष्टपणें प्रकट केली आहे. म्हणजे शरीर जरी विनाशी असलें तरी त्यांत निवास करणारा आत्मा अशरीरी व अविनाशी आहे. शरीर नष्ट झालें तरी तो नष्ट होत नाही हा कठोपनिषदांतला सिद्धांतच येथेंही विवक्षित आहे.

तैत्तिरीय उपनिषदांत "सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म" असें आत्म्याचें स्वरूप सांगून त्यापासून सृष्ट्युत्पत्ति कोणत्या क्रमाने झाली त्याचें वर्णन केलें आहे. त्यावरून सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं प्राचीन लोकांच्या कल्पना कळून येतात. "तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः आकाशाद्वायुः। वायोरग्निः। अग्नेरापः। अद्भ्यः पृथिवी। पृथिव्या ओषधयः। ओषधीभ्योऽन्नम्। अन्नात्पुरुषः" (२–१) आत्म्यापासून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथिवी, पृथिवीपासून वनस्पती, वनस्पतीपासून अन्न आणि अन्नापासून मनुष्य अशा क्रमानें ही सर्व सृष्टि निर्माण झाली आहे. ब्रह्म हें मनाचा किंवा वाणीचा विषय होण्यासारखें नाही असें "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह। आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन। या मंत्रांत सांगून ब्रह्मानंद ज्याला मिळाला त्याची भीति नाहीशी होते असा अनुभव वर्णिला आहे. भृगुवल्लींत "यतो वा इमानि भूतानि जायन्ते। येन जातानि जीवंति। यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति। तद्विजिज्ञासस्व। तद्ब्रह्मेति" "ज्यापासून हीं सर्व भूतें निर्माण होतात, ज्याच्यामुळें जगतात आणि शेवटीं ज्याच्यांत प्रवेश करितात तें ब्रह्म आहे. तें जाणण्याची इच्छा कर" असें वरुणाने आपला मुलगा जो भृगु त्याला उपदेश केला आहे. ब्रह्मानंद वल्लीमध्यें ब्रह्मानंद किती मोठा आहे तें वर्णिलें आहे.

एखादा सत्प्रवृत्त व बलिष्ठ तरुण मनुष्य असावा व सर्व पृथ्वीचें स्वामित्व त्याला प्राप्त झालेलें असावें. अशा पुरुषाचा जो आनंद तो सर्व-

श्रेष्ठ मानुष आनंद होय. मानवी आनंद याच्यापलीकडे जाऊं शकत नाही. असे शंभर आनंद मनुष्य गंधर्वांचा एक आनंद होतो. हे शंभर आनंद म्हणजे देव गंधर्वांचा एक आनंद होतो. यांच्या शंभरपट पितृलोकनिवासीचा आनंद आहे. याच्या शंभरपट आनंद स्मार्त कर्मांनी ज्याला स्वर्गप्राप्ति झाली आहे त्याचा आहे. त्याच्या शंभरपट आनंद श्रौत कर्मांनी ज्याला स्वर्गप्राप्ति झाली आहे त्याचा आहे. त्याच्या शंभरपट आनंद देवांचा आहे. देवांच्या शंभरपट आनंद इंद्राचा; इंद्राच्या शंभरपट बृहस्पतीचा, बृहस्पतीच्या शंभरपट प्रजापतीचा व प्रजापतीच्या शंभरपट ब्रह्मानंद आहे (२–८) अशा तऱ्हेचें ब्रह्म जाणून घ्या असा या उपनिषदाचा उपदेश आहे. मांडूक्योपनिषदांत ब्रह्म व ॐकार यांचें ऐक्य दाखविलें आहे. बृहदारण्यक हें उपनिषद सर्वांत मोठें असून त्यांत अनेक गोष्टींचा उहापोह, अनेक वादविवाद, अनेक उपासना सांगितल्या आहेत. " अहं ब्रह्मास्मि " हें महावाक्य याच उपनिषदांत आहे. सृष्ट्युत्पत्तीच्या पूर्वी ब्रह्मच होतें. " ब्रह्म वा इदमग्र आसीत् " " तस्मात्तत्सर्वमभवत् " व त्यापासून सर्व झालें असें १–४–१० मध्यें सांगितलें आहे. " सवा अयमात्मा ब्रह्म " असें जीव शिवांचें ऐक्य सांगून " यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं जिघ्रति " जेथें द्वैत असतें तेथें एक एकाला जाणतो पण जेथें " एकी भवति न पश्यतीत्याहुः" ( ४–४–२ ) पण जेथें एकत्व असतें तेथें कोण कोणाला पहाणार ? असा युक्तिवाद केला आहे. " यः एवं वेद अहं ब्रह्मास्मीति स इदं सर्वं भवति " मी ब्रह्म आहे असें जो जाणतो तो हें सर्व होतो. म्हणून जो "अन्यां देवतामुपास्ते अन्योऽसौऽन्योहमस्मीति न स वेद यथा पशुरेवं स देवानाम् " ( १–४–१० ) देवतेची आपल्यापेक्षां वेगळ्या रीतीने उपासना करितो त्याला खरें ज्ञान झालें नाही. तो देवांचा पशूच आहे असा द्वैताचा निषेध केला आहे. " यथाग्नेः क्षुद्राविस्फुलिंगा व्युच्चरन्ति एवमेवास्मादात्मनः सर्वे प्राणाः सर्वे लोकाः सर्वे देवाः सर्वाणि भूतानि व्युच्चरन्ति " अग्नीपासून जशा ठिणग्या निघतात त्याप्रमाणें या आत्म्यापासून सर्व प्राण, लोक, देव, व भूतें जन्म पावतात व " एतस्य वा अक्षरस्य प्रशासने गार्गि सूर्याचंद्रमसौ विधृतौ तिष्ठतः" या आत्म्याच्याच सत्तेने सूर्यचंद्र अंतराळीं राहून आपआपलीं कामें करतात असें आत्म्याचें

सामर्थ्य वर्णिलें आहे. याज्ञवल्क्य–मैत्रेयीच्या सर्व प्रसिद्ध संवादांतही "न वारे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति" असें आत्म्याचें महत्त्व सांगितलें आहे. मधु ब्राह्मणांत "इयं पृथिवी सर्वेषां भूतानां मधु अस्यै पृथिव्यै सर्वाणि भूतानि मधु (२–५–१) ही पृथिवी इतर भूतांशीं गोड आहे व इतर भूतें पृथिवीशीं गोडीने वागतात; अशा रीतीने या सृष्टींत संवाद व परस्परानुकूलता आहे असें सांगितलें आहे.

असा जो परमात्मा तो प्राप्त करून घेणें ही कांही सोपी गोष्ट नाही. चित्तवृत्तींचा निरोध करण्याचें सामर्थ्य ज्याच्या ठिकाणीं असेल त्यालाच ही गोष्ट शक्य आहे. आणि जगांत जिंकण्याला अत्यंत कठीण अशी जर कोणती गोष्ट असेल तर चित्त ही आहे.

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥**

(गीता ६–३४)

मन अत्यंत चंचल, दांडगें, बलिष्ठ व वळविण्यास अत्यंत कठीण आहे. त्याचा निग्रह करणें वायूचा निग्रह करण्याइतकेंच कठीण आहे असें अर्जुनाने श्रीकृष्णाला सांगितलें आहे. अशा मनावर सत्ता चालविणें, त्याला आपल्या अंकित करणें ही वाटेल त्याला साधण्यासारखी गोष्ट नाही म्हणून मुंडकोपनिषदांत म्हटलें आहे कीं, "नायमात्मा बलहीनेन लभ्यः" दुर्बल मनुष्याला आत्मप्राप्ति होत नाही. मग हा आत्मा कोणत्या उपायांनी मिळेल? मुंडकोपनिषदाचें उत्तर असें आहेः—

**सत्येन लभ्यस्तपसाह्येष आत्मा सम्यक्ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ।**
**अन्तः शरीरे ज्योतिर्मयो हि शुभ्रः यं पश्यन्ति यतयः क्षीणदोषाः**
॥ ३–५ ॥

**सत्यमेव जयति नानृतं सत्येन पंथा विततो देवयानः ।**
**येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम्**
॥ ३–६ ॥

जगांत नेहमी सत्याचाच जय होतो. असत्याचा होत नाही. देवाकडे जाण्याचा मार्ग सत्याने परिपूर्ण आहे. ज्या ठिकाणीं सत्याचें तें सर्वश्रेष्ठ निधान आहे, सत् हेंच ज्याचें स्वरूप आहे अशा त्या परब्रह्माकडे या सत्याच्या मार्गाने ऋषि जात असतात. तेव्हां या आत्मप्राप्तीकरितां सत्याची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें ब्रह्मचर्याची, तपश्चर्येची, मनोजयाचीही आहे. या तपश्चर्येने चित्त शुद्ध झालें, त्याचे सर्व दोष नाहीसे झाले म्हणजे परमात्म्याची प्राप्ति होते आणि " भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यंते सर्व संशयाः" हृदयातील सर्व कोडीं सुटतात, सर्व संशय नाहीसे होतात व मनुष्य प्रसन्न आणि शांत होतो. त्याचे सर्व काम तृप्त होतात. तो अमर होतो. अशा तऱ्हेने ज्यांनी ब्रह्मज्ञान संपादन केलें आहे त्यामध्यें मुंडकोपनिषदाप्रमाणें, खालील प्रकारचे ब्रह्मवेत्ते सर्व श्रेष्ठ होतः—

**आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् एष ब्रह्मविदाम् वरिष्ठः ॥३-४॥**

आत्मसुखामध्यें जे रमलेले आहेत आणि असें असूनही जे क्रियावान आहेत ते ब्रह्मवेत्ते सर्वश्रेष्ठ होत. यज्ञकांडाविरुद्ध मुंडकोपनिषदांत अनेक उल्लेख असले तरी ब्रह्मवेत्त्याने निष्क्रिय राहावें असें या उपनिषदाचें मत दिसत नाही हें यावरून स्पष्ट दिसत आहे.

उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचें स्वरूप अशा तऱ्हेचें आहे. यज्ञयागादि कर्मकांडाने मनुष्याचें चिरंतन कल्याण साधणारें नाही. त्याकरितां आत्मज्ञान करून घेऊन आत्मप्राप्तीही करून घेतली पाहिजे व त्याकरितां चित्ताचा निरोध करून त्याचे दोष कमी करीत सत्याचा मार्ग आक्रमिला पाहिजे. या मार्गाने मनुष्य गेला म्हणजे त्याची उन्नति होत जाते व आत्मप्राप्ति होऊन तो खरा सुखी व आनंदी होतो. हा या तत्त्वज्ञानाचा सारांश आहे. मानवी जीविताचीं कोडीं या तत्त्वज्ञानाने सोडविलीं असून मनुष्याचें अंतिम ध्येयही निश्चित केलें आहे. या तत्त्वज्ञानाने आजपर्यंत कोट्यवधि लोकांना समाधान दिलें आहे. जर्मन पंडित शौपेनहार म्हणतोः—

" From every sentence, deep, original and sublime thoughts arise and the whole is pervaded by a high and holy and earnest spirit. Indian air surrounds us and original thoughts of kindred spirit. In the whole world there is

no study except that of originals so beneficial and so elevating as that of the Oupnekhat. It has been the solace of my life; it will be the solace of my death.

" उपनिषदांतील प्रत्येक वाक्यापासून गंभीर, नाविन्यपूर्ण व उदात्त विचार निर्माण होतात. उच्च, पवित्र आणि कळकळीच्या भावनांनी हीं उपनिषदें परिपूर्ण आहेत. तीं वाचूं लागलें म्हणजे हिंदी वातावरण आणि तशाच तऱ्हेचे मूलग्राही विचार आपल्या भोंवतीं जमा होतात. सर्व जगांत उपनिषदांच्या अभ्यासाइतका कल्याणकारक आणि मनुष्याला उन्नत करणारा दुसरा कोणताही अभ्यास नाहीं. सर्व आयुष्यभर त्यानें मला समाधान दिलें आहे व मरतानांही तो मला समाधान देईल. "

शौपेनहारला उपनिषदांचें लॅटिन भाषांतर मिळालें होतें व तें वाचून व अभ्यास करून त्याने वरील उद्गार काढले आहेत. त्याच्यासारख्या परस्थ मनुष्याची जर ही स्थिति तर उपनिषदें ही ज्यांची वडिलार्जित संपत्ति आहे, तीं मूळ ज्या भाषेंत रचिलीं गेलीं त्याच भाषेंत तीं ज्यांना वाचावयास व अभ्यासावयास मिळतात, त्यांच्या मनांत या संपूर्ण मनुष्य जातीचें कल्याण करणाऱ्या व तिला समाधान देणाऱ्या वाङ्मयाबद्दल किती आदर असला पाहिजे व असेल तें सांगावयास पाहिजे असें नाही. ही आपली थोर पैतृक संपत्ति आपण जतन केली पाहिजे, आदरिली पाहिजे व अभ्यासिली पाहिजे. वेदांचा आरंभींचा मंत्रभाग त्यांतील साधेपणामुळें, जितका महत्त्वाचा आहे तितकाच हा वेदाच्या अन्ताचा उपनिषद् भाग त्यांतील विचारांच्या गंभीरतेमुळें महत्त्वाचा आहे व या भागावरच महाराष्ट्रांतील साधुसंतांचे सर्व ग्रंथ आधारलेले असल्यामुळें महाराष्ट्रीयांना तर तो फारच महत्त्वाचा वाटला पाहिजे. येथें मंत्र आणि ब्राह्मण यांनी बनणाऱ्या वेदांचें विवेचन संपलें. असें थोर वाङ्मय ज्यांनी निर्माण केलें त्या थोर ऋषींना " नमः परम ऋषिभ्यः नमः परम ऋषिभ्यः" या मुंडकोपनिषदांतील वाक्याने वंदन करून हें प्रकरण संपवूं.

अ. ग्रं. सं.

## प्रकरण चौथें

# सूत्रकाल

उपनिषत्कालपर्यंत आर्यांनी सर्व उत्तर आणि बहुतेक दक्षिण व्यापिली. त्यांचे व्याप, व्यवहार वाढले; धार्मिक आचारविचारांची वाढ झाली; तेव्हां या सर्व गोष्टी थोडक्यांत एके ठिकाणीं सांगितलेल्या असाव्या असें वाटूं लागलें. ब्राह्मणग्रंथांच्या पाल्हाळिक व अव्यवस्थितपणाचा लोकांना कंटाळा आला म्हणून सूत्रवाङ्मय निर्माण झालें. सर्व गोष्टी थोडक्यांत सांगितल्यामुळें विद्यार्थ्यांना त्या पाठ करणेंही सोपें झालें. पण हें थोडक्यांत आणणेंही पुढें इतक्या कसोशीने होऊं लागले कीं नुसतीं सूत्रें वाचून कांहींच समजेनासें झालें. "अर्धमात्रालाघवेन पुत्रोत्सवं मन्यंते वैयाकरणाः" अर्धी मात्रा जर वाचवितां आली तर व्याकरणशास्त्रज्ञाला पुत्रोत्सवाचा आनंद होतो अशी म्हण पडली. श्रौतसूत्रें, गृह्यसूत्रें आणि धर्मसूत्रें यांना कल्पसूत्रें म्हणतात. याशिवाय व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदान्त इत्यादि शास्त्रीय आणि तात्त्विक विषयांवर सूत्रें झालीं तीं वेगळींच. श्रौतसूत्रें प्रत्येक वेदाचीं वेगळीं आहेत. यांत यज्ञ कसे करावे याची थोडक्यांत माहिती दिलेली असते. आश्वलायन आणि सांख्यायन अशीं दोन सूत्रें ऋग्वेदाचीं आहेत. मासक, लाट्यायन आणि द्राह्यायण अशीं तीन सामवेदाचीं आहेत. बौधायन, भारद्वाज, आपस्तंभ आणि हिरण्यकेशी हीं कृष्णयजुर्वेदाचीं आहेत आणि कात्यायन श्रौतसूत्र हें शुक्लयजुर्वेदाचें आहे.

यांपैकीं आपस्तंब श्रौतसूत्र दक्षिणेंत झालें आहे याबद्दल वाद नाही. पण बौधायनही दक्षिणेंत झालें असावें असें डॉ. बुल्हर यांचें मत आहे. याशिवाय हिरण्यकेशी श्रौतसूत्रही दक्षिणेंतच झालें असावें. कारण ही शाखा उत्तरेकडे विशेष आढळत नसून दक्षिणेंतच आढळते असें डॉ. केतकर म्हणतात. बौधायनाचाही प्रसार दक्षिणेंतच आहे. याच्यापूर्वीं गेलें म्हणजे ब्राह्मणग्रंथांत सोमाच्या ऐवजी विदर्भांत कोणते प्रतिनिधी वापरीत याविषयीं चर्चा आढळते. आणि यापूर्वीं ऋक्‌मंत्र कालाकडे गेलें तर त्यांत महाराष्ट्राची वसाहत करणारे अगस्ति ऋषि यांची किंवा त्यांच्या वंशजांचीं सूक्तें आहेत. यावरून महाराष्ट्राची वसाहत किती प्राचीन आहे याची कल्पना येते.

कृष्ण यजुर्वेदाची बहुतेक श्रौतसूत्रें दक्षिणेंत झालेलीं दिसतात. आपस्तंब इ. स. पूर्व पांचव्या शतकांतील आहे.

धर्मसूत्रांमध्यें नागरिकांची कर्तव्यें काय तें सांगितलें आहे व याच धर्मसूत्रांवर पुढील स्मृति आधारलेल्या आहेत. वसिष्ठधर्मसूत्र हें ऋग्वेदाचें, गौतमधर्मसूत्र हें सामवेदाचें आणि बौधायन व आपस्तंबधर्मसूत्रें हीं कृष्ण यजुर्वेदाचीं आहेत. मनुस्मृतीला आधारभूत असलेलें मानवधर्म-सूत्र अजून उपलब्ध झालेलें नाही.

गृह्यसूत्रांत सात पाकसंस्था, पंचमहायज्ञ आणि उपनयनविवाहादि सोळा संस्कार यांची माहिती दिलेली आहे. सांख्यायन आणि आश्वलायन गृह्यसूत्रें ऋग्वेदाचीं आहेत. पारस्कर गृह्यसूत्र शुक्लयजुर्वेदाचें, व गोभिलगृह्यसूत्र सामवेदाचें आहे. तात्पर्य, प्रत्येक वेदाला श्रौत, धर्म व गृह्यसूत्रें आहेत. मात्र त्यांपैकीं बरींच आज उपलब्ध नाहीत.

या सर्व वाङ्मयावरून तत्कालीन राज्यपद्धति व लोकांच्या चालीरीति चांगल्या कळून येतात. निरनिराळ्या धर्मसूत्रकारांनी राजांचीं कर्तव्यें काय, त्यांनी न्याय कसा द्यावा याविषयीं स्पष्ट नियम केले आहेत. नगराच्या मध्यभागीं राजवाडा असावा, त्याची रचना व तेथील व्यवस्था विशिष्ट तऱ्हेची असावी, राजाने प्रजेचें चोरांपासून व इतर उपद्रवांपासून संरक्षण करावें. त्याने पुरोहित नेमावा. जे लोक धर्मसूत्रांत सांगितल्याप्रमाणें आपलीं कर्तव्यें करणार नाहीत त्यांना शिक्षा कराव्या. फळें येत असलेलीं झाडें तोडूं नयेत. लागवडीला जमीन आणावयाची असल्यासच तोडावीं. वजना-मापांवर लक्ष ठेवावें. दुसऱ्याची संपत्ति बळजबरीने घेऊं नये. त्यांच्या प्राप्तीचा ई राजाने घ्यावा. अत्यंत योग्य लोकच न्यायाधीश नेमावे. खोट्या साक्षी देणाऱ्यांना शिक्षा कराव्या असे सविस्तर नियम राजाकरितां केलेले आहेत. अपराधी लोकांना त्यांच्या वर्णाप्रमाणें कमीजास्त शिक्षा सांगत. ब्राह्मणांना कमी शिक्षा करण्याकडे प्रवृत्ति असे. ब्राह्मणाला वधाची शिक्षा नसे. ब्राह्मणाने जर पंचमहापातकांपैकी एखादें पातक केलें तर त्याच्या कपाळावर डागून त्याला सीमापार करीत. याच्या उलट शूद्राने एखाद्या ब्राह्मणाचा वध केल्यास त्याला वधाची शिक्षा होई व त्याची सर्व संपत्ति जप्त करीत. त्रैवर्णिकानी शूद्र स्त्रीशीं व्यभिचार केल्यास त्यांना हद्द-

पारीची शिक्षा होई. याच्या उलट शूद्राने त्रैवर्णिक स्त्रीशीं व्याभिचार केल्यास त्याला वधाची शिक्षा होई. त्याने त्रैवर्णिकांपैकीं एखाद्या चांगल्या मनुष्याची निंदा केली तर त्याची जीभ काटीत व त्याने वेद ऐकले तर " त्रपुजतुभ्यां श्रोत्रे पूरणीये " त्याच्या कानांत लाख किंवा शिसें ओतण्याची शिक्षा असे. चोरीलाही वधाची शिक्षा असे. आततायी मनुष्यापासून स्वतःचें संरक्षण वाटेल त्या उपायांनी करण्याचा प्रत्येकाला अधिकार असे. मग तो आततायी वेदसंपन्न ब्राह्मण जरी असला तरी स्वतःच्या संरक्षणार्थ त्याचा वधही करण्यास मोकळीक असे. शेती आणि व्यापार हे महत्त्वाचे धंदे असल्यामुळें यासंबंधी अपराधांना कडक शिक्षा करीत. आत्महत्येचा प्रयत्न शिक्षार्ह असे. तसेंच भूमि लागवडीला आणणें, गुरें पाळणें, दुसऱ्याच्या जागेंतून जाण्याचा अधिकार असणें वगैरेविषयींही नियम केलेले आहेत. जिचा पति वारला आहे व जिला संतति नाही तिनें दिराकडून दोन मुलगे नियोगविधीने निर्माण करावे अशी मोकळीक गौतमाने दिली आहे. औरस, क्षेत्रज ( नियोगविधीने झालेला ), दत्तक, मानलेला, गुप्तपणें झालेला व टाकून दिलेला इतक्या प्रकारच्या पुत्रांना वडिलार्जित संपत्तीमध्यें वांटा मागतां येत असे.

आतांपर्यंत चार वर्णच अस्तित्वांत होते. पण या कालांत जातींची उत्पत्ति झालेली दिसते. हल्लींच्या जातींचें स्वरूप त्या वेळीं त्यांना नसलें तरी भिन्न भिन्न वर्णापासून उत्पन्न झालेल्या प्रजेला निरनिराळीं नांवें धर्मसूत्रग्रंथांत दिलेलीं आढळतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना त्यांच्या खालच्या वर्णांतील स्त्रीपासून झालेल्या प्रजेला अनुक्रमें अंबष्ठ, उग्र, निषाद असें म्हणत. क्षत्रियापासून ब्राह्मण स्त्रीला झालेल्या प्रजेला सूत असें म्हणत. ब्राह्मणापासून शूद्र स्त्रीला झालेल्या प्रजेस पारशव असें म्हणत. पण या सर्व संकरज जाति आहेत. धंद्यामुळें जाति अजून पडलेल्या नव्हत्या. त्या यानंतरच्या काळांत पडल्या.

संहिता आणि उपनिषत्कालाप्रमाणें, या कालांत विद्वान् स्त्रियांचीं नांवें ऐकूं येत नाहींत तथापि समाजामध्यें त्यांना अजून मान असावा असें दिसतें. वेदाचा कांहीं भाग किंवा वेदांगें जो शिकवितो त्याला उपाध्याय म्हणतात. या उपाध्यायापेक्षां सर्व वेद शिकविणारा आचार्य दहापटीने श्रेष्ठ आहे. या

आचार्यापेक्षां पिता शंभरपटीने श्रेष्ठ आहे आणि पित्यापेक्षां माता हजारपटीने श्रेष्ठ आहे ही जुनी भावना अजून कायम होती. बहुपत्नीकत्व प्रचारांत होतें पण त्याच्यावर नियंत्रण होतें. " धार्मिक कृत्यांत सहभागी होण्याला ज्याची पत्नी उद्युक्त व समर्थ आहे त्याने दुसरी पत्नी करूं नये असा आपस्तंबाने स्पष्ट नियम केला आहे. नवरा वेडा असेल, नपुंसक असेल, किंवा त्याला बहिष्कृत केलें असेल अथवा तो मृत्यु पावेल तर स्त्रियांना दुसरें लग्न करण्याची मोकळीक त्या काळीं होती. याच्या उलट जी पत्नी वंध्या असेल तिला दहा वर्षांनी, जिला नुसत्या मुलीच होत असतील तिला बारा वर्षांनी, जिचीं मुलें वाचत नसतील तिला पंधरा वर्षांनी व जी भांडखोर असेल तिला तात्काल टाकून द्यावी अशी अनुज्ञा बौधायनाने दिली आहे. म्हणजे त्याने दुसरें लग्न करावें एवढाच याचा अर्थ असावा. मात्र निष्कारण जो पत्नीला टाकून देईल त्याला आपस्तंबाने सांगितलेलें प्रायश्चित्त लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ज्याने निष्कारण आपल्या पत्नीला टाकली असेल त्याने गाढवाचें कातडें, त्याचे केस आंतल्या बाजूला करून, पांघरावें व सात घरें, आपण केलेल्या अन्यायाचा उच्चार करून भिक्षा मागावी व अशा रीतीने सहा महिने काढावे ( आ. १-१०-२८. ) अशी ती शिक्षा आहे. तेव्हां पतिपत्नींचीं कर्तव्यें सांगतांना स्त्री आणि पुरुष असा पक्षपात धर्मसूत्रांनी केलेला दिसत नाही असें वरील नियमावरून म्हणण्यास हरकत नाही.

कित्येक धर्मसूत्रकारांनी विवाहाचे ब्राह्म, दैव, आर्ष, गांधर्व, क्षात्र आणि मानुष असे सहा प्रकार दिले आहेत. तर कित्येकांनी प्राजापत्य व पैशाच असे आणखी दोन प्रकार सांगितले आहेत. ब्राह्मविवाहांत पिता योग्य वराला किंवा विद्यार्थ्याला कन्यादान करितो. दैवविवाहांत यज्ञ चालला असतां पिता पुरोहिताला सालंकृत कन्यादान करितो. आर्षविवाहांत गाय किंवा बैल घेऊन मग पिता कन्यादान करितो. गांधर्वविवाहांत प्रियकर आपल्या प्रियकरिणीला घेऊन जातो. क्षात्र किंवा राक्षस विवाहांत वर वधूला, आवश्यक तेव्हां तिच्या नातेवाइकांना ठार मारून, बलाने घेऊन जातो. मानुष-विवाहांत वर वधूला तिच्या बापापासून विकत घेतो. या सहा विवाह प्रकारांपैकीं पहिले तीन म्हणजे, ब्राह्म, दैव आणि

आर्ष हे प्रकार तेवढे चांगले आहेत असें आपस्तंबाचें म्हणणें आहे. सगोत्रांत आणि सप्रवरांत विवाहाचा निषेध असे. बालविवाह या कालीं हळूहळू प्रचारांत येऊं लागले होते असें दिसतें. कारण "कन्या ऋतुमती होईल या भीतीने तिचें लहानपणींच लग्न करून टाकावें" असें वसिष्ठ-धर्मसूत्रांत सांगितलें आहे. मात्र लग्न झाल्यावर पण गर्भाधान होण्यापूर्वी जर तिचा पति वारला तर तिला पुनर्विवाह करण्यास धर्मशास्त्राची मोकळीक असे. पुनर्विवाहावर अशा रीतीनें हळूहळू नियंत्रण पडल्याचें दिसतें.

ब्राह्मण मुलाचें उपनयन त्याच्या वयाच्या ८ ते १६ वर्षांपर्यंत, क्षत्रियाच्या मुलाचें ११ ते २२ पर्यंत व वैश्याच्या मुलाचें १२ ते २४ पर्यंत होत असे. हीं मुलें गुरुगृहीं १२, २४, ३६ किंवा ४८ वर्षेपर्यंत राहात व एक, दोन, तीन किंवा चार वेद शिकत. शेजारच्या गांवांत मधुकरी मागून ते आपला निर्वाह करीत व व्रतस्थ राहात. या ब्रह्मचर्याश्रमाचें विशेष वर्णन स्मृतिकाल या प्रकरणांत करूं. अध्ययन संपलें म्हणजे त्याला स्नातक म्हणत. विवाह झाला म्हणजे त्याचा गृहस्थाश्रमांत प्रवेश होई व त्याला अग्निहोत्र पाळावें लागे. यापुढील वानप्रस्थ व संन्यास हे जे दोन आश्रम त्या आश्रमांत गृहस्थाश्रम न स्वीकारितांही एकदम जातां येत असे. वानप्रस्थाश्रमांत अग्निहोत्र कायम असे. संन्यासाश्रमांत अग्निहोत्राची आवश्यकता नसे.

गृहस्थाला एकंदर ४०-४२ प्रकारचीं कर्में करावीं लागत. पैकीं तांदूळ, दूध, तूप, मांस यांचें हवन करून केले जाणारे श्रौतसूत्रोक्त सात हविर्यज्ञ व सोमाचें हवन करून केले जाणारे सात सोमयज्ञ मागें सांगितलेच आहेत. सोमयज्ञ प्रचारांतून बहुतेक गेले आहेत. हविर्यज्ञ मात्र बरेचसे अग्निहोत्री करीत असतात. याशिवाय गृह्यसूत्रांतील सात पाकयज्ञही मागें सांगितले आहेत. त्यांपैकी अष्टका हें हिंवाळ्यांत कृष्णपक्षांतील अष्टमीला करण्याचें कर्म आहे. पर्व हें पौर्णिमेला व शुद्ध द्वितीयेला करीत असत. श्राद्ध पितरांच्या उद्देशाने केलें जातें. श्रावणी, श्रावण महिन्यांतील पौर्णिमेला करितात. अग्रहायनी मार्गशीर्षाच्या पौर्णिमेला करितात. त्याचप्रमाणें चैत्री आणि अश्वयुजी हीं चैत्र व अश्विन महिन्याच्या पौर्णिमेला करावयाचीं आहेत. यांपैकीं श्राद्ध व श्रावणी शिल्लक आहेत. इतर पौर्णिमांपैकी अश्विनी पौर्णि-

मेला कोजागिरी करितात. हिलाच नव्याची पौर्णिमा असेंही म्हणतात. बाकीचे यज्ञ प्रचारांतून गेले आहेत. तथापि महाराष्ट्रांतील अग्निहोत्री अनुकूलतेप्रमाणें हे पाकयज्ञ करीत असतांना अद्यापीही आढळतात.

या एकवीस यज्ञाशिवाय रोजचे पंचमहायज्ञही प्रत्येकाला करावयाचे असतात. हे देव, पितर, मनुष्य, भूत आणि ब्रह्म यांच्या उद्देशाने, पाणी देऊन, भाताचें हवन करून आणि जेवण घालून करितात. रोजचें वैश्वदेव कर्म यांपैकीच आहे. अध्ययन आणि अध्यापन करून ब्रह्मयज्ञ करावयाचा असतो व त्याकरितां ज्याने त्याने आपआपल्या शाखेची संहिता, ब्राह्मण व इतर वेदांगें यांपैकी कांहीना कांही भाग तरी वाचावा लागतो. हें कार्य झालें म्हणजे ऋषितर्पण करितात. हा ब्रह्मयज्ञाचाच एक भाग आहे. हे ऋषि ब्रह्मयज्ञ करणारा ज्या शाखेचा असेल त्या व इतर शाखांचेही कांही असतात. कल्पना येण्याकरितां ऋग्वेद्यांचें ऋषितर्पण येथें देतों:—

**"शतर्चिनस्तृप्यन्तु । माध्यमास्तृप्यन्तु । गृत्समदस्तृप्यतु । भरद्वाजस्तृप्यतु । वसिष्ठस्तृप्यतु । प्रगाथास्तृप्यन्तु । पावमान्यस्तृप्यन्तु । क्षुद्रसूक्ताः स्तृप्यन्तु । महासूक्तास्तृप्यन्तु । सुमन्तुजैमिनिवैशंपायनपैलसूत्रभाष्यभारतमहाभारत धर्माचार्याः तृप्यंतु । जानंतिबाहवि गार्ग्यगौतमशाकल्यबाभ्रव्यमांडव्यमांडूकेयाः तृप्यंतु । गार्गीवाचक्नवी तृप्यताम् । वडवा प्रातीथेयी तृप्यतु । सुलभामैत्रेयी तृप्यताम् । कहोळं तर्पयामि । कौषितकं तर्पयामि । महाकौषितकं तर्पयामि । पैग्यं तर्पयामि । महापैग्यं तर्पयामि । सुयज्ञं तर्पयामि । सांख्यायनं तर्पयामि । ऐतरेयं तर्पयामि । महैतरेयं तर्पयामि । शाकलं त० । बाष्कलं त० । सुजातवक्रं त० । औदवाहिं त० । महौदवाहिं त० । सौजामिं त० । शौनकं तर्पयामि । आश्वलायनं तर्पयामि । ये चान्ये आचार्यास्ते सर्वे तृप्यंतु ॥"**

भारताचें महाभारत झाल्यानंतर कोणातरी कल्पक गृहस्थाने हें ऋषितर्पण तयार केलें आहे ही गोष्ट उघड आहे तथापि आज दोन हजार वर्षें प्रचारांत आहे ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे. या ऋषितर्पणाच्या

मुळाशीं कृतज्ञतेची कल्पना आहे. ज्या ऋषींनी आपल्याला एवढें ज्ञान दिलें व आपल्या कल्याणाचे मार्ग सांगितले त्यांची निदान प्रत्यहीं आठवण तरी करून त्यांना तृप्तीकरितां पाणी देण्याइतकी कृतज्ञता आमच्या पूर्वजांत होती. दुर्दैवाने आज ऋषींचीं नांवेही आम्ही विसरून गेलों आहोत. वरील यादीमध्यें वेदकालापासून महाभारतकालापर्यंत जे विद्वान् स्त्रीपुरुष होऊन गेले त्यांचा उल्लेख आहे व त्यांत गार्गी, वाचक्नवी, सुलभा, आणि मैत्रेयी यांनाही स्थान मिळालें आहे.

अशा तऱ्हेचे २६ यज्ञ व या शिवाय १६ संस्कार प्रत्येक मनुष्याला करावे लागत. या संस्कारांना प्रारंभ गर्भाधानापासून होई व अंत मृत्यूनंतर होई. 'गर्भाधान' हा पहिला संस्कार झाल्यावर पुत्र व्हावा म्हणून 'पुंसवन' संस्कार करावयाचा असतो. नंतर त्या गर्भाच्या संरक्षणाकरितां 'अनवलोभन' करतात. त्यानंतर पतीने, गर्भिणी पत्नीचा, चौथ्या किंवा सातव्या महिन्यांत, केसांचा भांग काढावयाचा असतो. या संस्काराला 'सीमन्तोन्नयन' असें म्हणतात. नंतर मुलाचा जन्म झाला म्हणजे 'जातकरण,' 'नामकरण' चांगली बुद्धि त्याला मिळावी म्हणून 'मेधाजनन' व आयुष्य पुष्कळ मिळावें म्हणून 'आयुष्य' हे संस्कार करावयाचे असतात. तें मूल जरा मोठें झालें म्हणजे 'अन्नप्राशना'चा संस्कार करितात. त्यानंतर शेंडी राखण्याच्या वेळीं 'चूडाकरण' हा संस्कार करितात. नंतर बऱ्याच वर्षांनी वाढलेले केस कापण्याकरितां 'गोदान कर्म" किंवा "केशान्त" हा संस्कार करितात. हा संस्कार १६ व्या किंवा १८ व्या वर्षी करावयाचा असतो. तत्पूर्वी त्याचा 'उपनयन' संस्कार होतो. अध्ययन संपण्याच्यावेळीं स्नान केलें म्हणजे तो 'स्नातक' होतो. मग 'विवाह' संस्कार झाल्यावर तो मरेपर्यंत 'अग्निहोत्र' घेऊन यजनयाजनादि कर्में करितो. "जरामर्यं वा एतत्सत्रं यदग्निहोत्रं" अशी श्रुति आहे. तो मृत्यु पावल्यानंतर याच जन्मभर पाळलेल्या अग्नीने त्याचा शेवटचा संस्कार उरकतात. व्यासपुराणांत निष्क्रमण, कर्णवेध, वगैरे आणखी संस्कार दिले आहेत. या संस्कारांपैकी उपनयन, विवाह अन्त्यसंस्कार हेच आतां प्रचारांत आहेत. क्वचित् गर्भाधान संस्कारही करितात. प्रत्येक वेदाच्या गृह्यसूत्रांत या संस्कारांची वर्णनें असतात. सोळासंस्कार कोणते

-याबद्दल बराच मतभेद दृष्टीस पडतो. त्यावेळीं विवाहाच्या बाबतींत मुलगा मुलीच्या बापाजवळ मागणी घालीत असे. हल्ली त्याच्या उलट प्रकार आहे. मुलीचा बाप मुलाच्या बापाकडे जातो. लग्न ठरलें तर दोन्ही घरीं होम होत व वधूला होमाजवळ बसविली जाई. इकडे सौभाग्यवती स्त्रिया मुलाला घेऊन मुलीकडे येत व लग्नानंतर सप्तपदी लाजाहोम वगैरे प्रकार हल्लीप्रमाणेंच होत. मंगलाष्टकें म्हणण्याचा व अंतरपाट धरण्याचा प्रकार नवीन शिरलेला दिसतो. होम झाल्यानंतर ध्रुवाचा तारा, सप्तर्षि व अरुंधती हीं वर वधूला दाखवी. पारस्कर आणि सांख्यायन यांनी, लग्न झाल्यावर वधूवरांनी वर्ष सहा महिने, बारा दिवस किंवा निदान तीन दिवस ब्रह्मचर्य व्रताने रहावें म्हणून सांगितलें आहे. मुलीचा विवाह बहुधा तिच्या प्रौढपणीं होत असे हें यावरून उघडच दिसतें.

येथपर्यंत श्रौत, गृह्य व धर्मसूत्रें मिळून जीं कल्पसूत्रें होतात त्यांचे विषय काय व त्यावरून तत्कालीन संस्कृति कशी होती हें पाहिलें. हीं कल्पसूत्रें ब्राह्मणांनंतर झालीं. हीं ऋषींनी केलेलीं आहेत. याच्या उलट पूर्वीचे वेद ऋषींनी केले नसून पाहिलेले आहेत. हीं कल्पसूत्रें बौद्धाच्या पूर्वी व नंतर कांही काल होत होतीं. यांच्या कर्त्यांपैकीं बौधायन हा इ. स. पूर्व सहाव्या शतकांत झाला. सूत्रग्रंथांपैकीं बौद्धापूर्वी झालेले ग्रंथ म्हणजे इ. स. पूर्व आठव्या शतकांत पाणिनीने व्याकरणावर रचिलेला सूत्रात्मक ग्रंथ अष्टाध्यायी हा होय. याच सुमाराला कपिलाचें सांख्यतत्त्वज्ञान जन्माला आलें. बुद्धाची पूर्वतयारी याने करून ठेविली. हा ईश्वर न मानणारा होता. यज्ञयागादि साधनें मनुष्याच्या उन्नतीला उपयोगीं पडणारी नसून त्याकरितां ज्ञानाची व चित्तैकाग्रतेची आवश्यकता आहे असें त्याचें मत होतें. तथापि बुद्धाप्रमाणें याने आपला स्वतंत्र धर्मपंथ काढला नाही. त्याने रचिलेलीं सूत्रें हल्लीं उपलब्ध नाहीत व त्याच्या नावावर हल्लीं जीं सूत्रें आहेत तीं त्याचीं नव्हेत असें विद्वानांचें मत आहे. कपिल हा सत्कार्यवादी आहे. कार्य अगदीं नवें निर्माण होत नाही. तें कारणांत कोणत्यातरी रूपाने अस्तित्वांत असतें असें जें मत त्याला सत्कार्यवाद म्हणतात. अर्थात् "सर्वं शून्यं" हा बुद्धाचा सिद्धांत कपिलानें प्रतिपादिला नव्हता. कार्याला कारण ज्याअर्थी आवश्यक आहे त्याअर्थी या त्रिगुणात्मक जड जगाचें

त्रिगुणात्मक व जड असेंच कांहींतरी कारण असलें पाहिजे असें ठरवून या कारणाला त्याने ‘ प्रकृति ’ हें नांव दिलें. व ह्या प्रकृतींतील तीन गुण जेव्हां साम्यावस्थेंत असतात तेव्हां सृष्टीचा प्रलय झालेला असतो. या गुणांत कमीजास्तपणा उत्पन्न झाला कीं, सृष्ट्युत्पत्ति होऊं लागते. प्रकृति जड असली तरी तिचा हा स्वभाव आहे. प्रकृतीशिवाय पुरुष किंवा आत्मा वेगळा आहे व हे आत्मे अनंत आहेत. अशा रीतीने पुरुष व प्रकृति हीं दोन तत्त्वें मानल्यावर प्रकृतीपासून बुद्धि, अहंकार व त्याच्यापासून पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें, मन आणि स्थूल व सूक्ष्म पंचमहाभूतें निर्माण झालीं असें त्याने ठरविलें आहे. पुरुष हा निर्गुण, उदासीन व अकर्ता आहे परंतु अज्ञानामुळें प्रकृतीशीं तो आपला संबंध मानीत असल्यामुळें त्याला सुखदुःखांचें भोक्तृत्व आहे. प्रकृति ही कर्त्री असून पुरुषाच्या भोगाकरितां हा सृष्टीचा पसारा निर्माण करीत असते. या प्रकृतीचा व आपला कांही संबंध नाही असें ज्ञान पुरुषाला झालें म्हणजे तो मुक्त होतो. हें ज्ञान झालें नाही तर त्याला जन्ममरणाच्या चक्रांत फिरावें लागतें. मनुष्याला स्थूल, सूक्ष्म व कारण अशीं तीन शरीरें असतात व हें सूक्ष्म शरीर वासनांसहित पुढल्या जन्मांतील देहांत प्रवेश करितें. उपनिषदांचा पुनर्जन्माचा सिद्धांत कपिलाला मान्य होता. न्याय म्हणजे तर्कशास्त्र याच सुमाराला झालें. यांनी अनुमानप्रमाणाची शास्त्रशुद्ध रचना केली. यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें, जीवात्मे जरी भिन्न असले तरी परमात्मा एक असून सृष्टीचा कर्ता आहे. याच्या उलट कणादाच्या वैशेषिक मतांत अणु हाच सर्व सृष्टीचें मूल कारण मानला असून तो अविभाज्य आहे. ह्या अणूपासून द्यणुक वगैरे क्रमाने सृष्टि कशी उत्पन्न होते याचें वर्णन कणादानें आपल्या ग्रंथांत केलें आहे.

## बौद्धकालीन धार्मिक क्रांति

वर सांगितलेले निरनिराळ्या विषयांवरील सूत्रग्रंथ होत असतांना वैदिक संस्कृतीवरील एका मोठ्या संकटाची पूर्वतयारी वैदिक समाजांत चालली होती. आर्यांच्या संस्कृतीपेक्षां अत्यंत कनिष्ठ संस्कृति असलेला जो फार मोठा वर्ग, शूद्र नांवाचा चौथा वर्ण निर्माण करून त्रैवर्णिकांनी आपल्यांत

घतला त्याची संख्या आधींच फार मोठी होती व ती वाढत चालली होती. आर्यांच्या अनेक शतकांच्या संसर्गानें ते पुष्कळच सुधारले होते व त्यांच्या आकांक्षा वाढल्या होत्या. या आकांक्षा पुरविण्याची काळजी त्रैवर्णिकांनी पाहिजे तितकी घेतली नाही. वेदांचें अध्ययन व यज्ञयाग करण्याची मोकळीक त्रैवर्णिकांनाच असे. शूद्रांना नसे. त्यांनी नुसता वेद ऐकला तर त्याला किती कडक शिक्षा असे हें मागें सांगितलेंच आहे. अशा स्थितींत एकीकडे शूद्रांचा फार मोठा वर्ग असंतुष्ट असतांना खुद्द त्रैवर्णिकांची स्थितीही फारशी समाधानकारक नव्हती. गुणकर्मांवरून वर्ण ठरविण्याची पूर्वीची पद्धति जाऊन वर्णांना हळूहळू जातींचें स्वरूप येऊं लागलें होतें. त्यामुळें खुद्द ब्राह्मण वर्णांत शूद्रसम ब्राह्मण पुष्कळ निर्माण होऊं लागले होते. जे ब्राह्मण वेदाध्ययनही करीत नाहीत ते शूद्रसम होत असें वसिष्ठ-धर्मसूत्रांत सांगितलें आहे. लाकडाचा हत्ती ज्याप्रमाणें नांवाचाच हत्ती असतो त्याप्रमाणें वेदाध्ययन न केलेला ब्राह्मण नांवाचाच ब्राह्मण असतो असेंही त्यानें म्हटलें आहे. क्षत्रिय–वैश्यांतही असेंच शैथिल्य उत्पन्न झालें होतें. याचा दोष सर्वस्वी त्रैवर्णिकांवर नव्हता. कारण एकंदर कर्मकांड एवढें वाढलें होतें व त्याचे विधि इतके क्लिष्ट व दगदगीचे झाले होते कीं, सात हविर्यज्ञ, सात सोमयज्ञ, सात पाकयज्ञ हीं कर्में करण्यांतच सर्व आयुष्य घालविण्याची वेळ आली होती. या सर्वांतला मोठा दोष म्हणजे या बाह्य आचारांकडेच सर्व लक्ष लागल्यामुळें, सर्व धर्म या यज्ञयागांच्या कर्मकांडांतच अडकून पडला व मनुष्याच्या मनाकडे, त्यामुळें अगदी दुर्लक्ष झालें. उपनिषदांचें तत्त्वज्ञान यामुळेंच निघालें व या तत्त्वज्ञानाचा ज्यांनी अभ्यास केला त्यांना यज्ञयाग निरर्थक वाटूं लागले. याच्या उलट जे कर्मकांडाचे अभिमानी होते ते उपनिषदांना गौण ठरवूं लागले. सर्व वेद हा क्रियेकरितां आहे अशी त्यांची समजूत होती. त्यामुळें जेथें कांही विधि, कांही क्रिया सांगितली नसेल तो भाग क्रियापर भागाचें अंग समजला जावा व अशा रीतीनें त्याला मुख्य न समजतां गौण समजावें असा त्यांचा आग्रह असे. "आम्नायस्य क्रियार्थत्वात् आनर्थक्यं अतदर्थानाम्" या जैमिनीच्या पूर्वमीमांसेंतील ( १–२–१ ) सूत्रांत हाच अर्थ सांगितला आहे. "चोदना लक्षणोऽर्थो

धर्मः " ही त्यांची व्याख्या असे. कांहीतरी विधि, कांहीतरी करण्याविषयीं प्रेरणा ज्याच्या योगाने मिळते तो धर्म अशी त्यांची ठाम समजूत असल्या-मुळें, नुसता आत्मानात्मविचार करणाऱ्या उपनिषदांनाही ते गौण समजत. अशा रीतीने चातुर्वर्ण्यांतर्गत समाजांत यज्ञयागांच्या अतिरेकाचा कंटाळा येऊन एक प्रकारची अव्यवस्था, असमाधान उत्पन्न झालें होतें; शूद्र वर्ग तर त्यांना त्रैवर्णिकांचे अधिकार नसल्यामुळें अत्यंत असंतुष्ट झाला होता आणि अशा रीतीने क्रांतीची पूर्वतयारी आर्यांच्या चातुर्वर्ण्यांत जोराने चालली होती.

या क्रांतीचें स्वरूप आणि तिचीं कारणें याविषयींचें विवेचन इतिहास-संशोधक राजवाडे यांनी "राधामाधव विलास चंपू"च्या प्रस्तावनेंत केलें आहे; तें महत्त्वाचें असल्यामुळें त्याचा सारांश येथें देणें उचित होईल. पाणिनीच्या कालीं, म्हणजे इ. स. च्या आठ शतकें पूर्वी चातुर्वर्ण्याची स्थिति काय होती हें पाणिनीच्याच ग्रंथाच्या आधारें राजवाडे यांनी सांगि-तलें आहे. ब्राह्मण म्हटला म्हणजे त्याला देहांत शिक्षा नसे. त्याला श्रेष्ठ समजून सर्व लोक वंदन करीत. पण सर्वच ब्राह्मण विद्वान् किंवा अग्नि-कर्मरत नसत. अशा ब्राह्मणांना "ब्राह्मणजातीय" असें म्हणत. कित्येक ब्राह्मण लढवय्ये बनले होते. त्यांना "ब्राह्मणकीय" व त्यांच्या प्रांताला "ब्राह्मणक" असें म्हणत. पाणिनीकालीं वंश दोन प्रकारांनी प्रचलित होई. एक पित्याच्या नांवावरून व दुसरा आईच्या नांवावरून. पैकीं पहिली पद्धति प्रशस्त समजली जात असे. ब्राह्मण आपल्या गोत्रप्रवरांना फार जपत. क्षत्रिय त्रिकर्माधिकारी असून त्यांच्या पुरोहिताचें जें गोत्र तेंच त्यांचें असे. लढणें हा एकच धंदा ते करीत. मृत्यूला ते कधीही भीत नसत म्हणून त्यांना "नाभिः" असें म्हणत. त्यांच्याशिवाय इतरही कित्येक लढाऊ संघ असत. वैश्यासंबंधीं पाणिनीने कांहीं लिहिलें नाहीं. तथापि यांनाही उपनयनादि सर्व संस्कार असून यांचें शिक्षण गुरुकुलांत होत असे. पाणिनीला दोन प्रकारचे शूद्र माहीत होते. एक अनिरवसित शूद्र व दुसरा निरवसित शूद्र. यापैकीं पहिल्यांना त्रैवर्णिकांनी अंशतः आपल्या समाजांत घेतलें होतें. सुतार, लोहार, धोबी, कोष्टी हे

यांपैकीं होत. समाजाला त्यांची आवश्यकता असे. दुसऱ्या प्रकारचे शूद्र म्हणजे चंडाल, निषाद इत्यादि. यांना समाजांत घेतलें नव्हतें. त्यांना अस्पृश्यही मानीत. पाणिनीकालीं स्त्रिया विवाह करीत किंवा क्वचित् करीतही नसत. लग्नापूर्वीं मुलें झाल्यास चालत. फक्त त्यांना कानीन असें म्हणत. अर्थात् मुलींचीं लग्नें त्यांच्या प्रौढपणी होत. पहिला नवरा वारल्यास किंवा इतर कांही कारणांनी पतित्वाला अयोग्य ठरल्यास पुनर्विवाहाला मोकळीक असे. देशांत बहुपत्नीकत्वाची जशी चाल होती त्याचप्रमाणें क्वचित् बहुपतित्वाचीही चाल असावी असें 'द्वैमित्रिः' म्हणजे दोन मित्रांचा मुलगा या शब्दावरून दिसतें. शूद्र वर्णांतील स्त्रीला इतर वर्ण भार्या करीत हें 'शूद्राभार्यः' या रूपावरून दिसतें. याच्या उलट ब्राह्मण स्त्रीला क्षत्रिय, वैश्य भार्या करीत असें 'ब्राह्मणीभार्यः' या रूपावरून दिसतें. परंतु या इतर वर्गांतील पत्नींना पतीच्याबरोबर यज्ञकर्मांतील अधिकार नसे. क्षेत्र, गाई इत्यादिकांवर स्त्रियांचें स्वतंत्र स्वामित्व असूं शके. कारण कांही कुलांत जसा पति प्रधान असे त्याप्रमाणें कांही कुलांत पत्नीही प्रधान असे. परतु अशा स्त्रीच्या अपत्याची निंदा होत असे. त्या वेळीं जशा चवचाल स्त्रिया होत्या तशा वार-स्त्रियाही होत्या. कित्येक स्त्रिया अध्यापकाचें काम करीत. तथापि ब्राह्मण स्त्रियांची विशेषतः प्रसिद्धि स्वयंपाक करण्याबद्दल असे. क्षत्रिय स्त्रियांना थोडाफार पडदा असावा. आर्यकृति व ब्राह्मणकृतेयी या शब्दांवरून कित्येक अनार्य व अब्राह्मण स्त्रीपुरुषांना आर्य करून घेण्याची चाल पाणिनीकालापूर्वीं अस्तित्वांत असावी. चार वर्णांमध्यें परस्पर शरीरसंबंध होत असे, असें पाणिनीवरून दिसतें. परंतु त्याने त्यांच्यापासून होणाऱ्या प्रजेचा संकरजाति म्हणून उल्लेख केलेला नाही. त्याअर्थी ही जाति स्वतंत्रपणें त्या वेळीं अस्तित्वांत आलेली नसावी. पाणिनीच्या पूर्वी ब्राह्मणापासून शूद्रीला झालेल्या संततीला निंद्यच नव्हे तर गौणही समजत नसत. पूर्ण ब्राह्मण समजत. पाणिनीच्या कालीं असे शरीरसंबंध गौण समजले जात. पाणिनीकालीन समाजाचे भाषेच्या दृष्टीने दोन भाग होते. त्रैवर्णिक लोक संस्कृत बोलत आणि शूद्र अशुद्ध व अस्पष्ट संस्कृत बोलत. याप्रमाणें पाणिनीकालीं त्रैवर्णिक गुण्यागोविंदाने नांदत असून शूद्र वर्ण, आर्य भाषा व आर्यसंस्कृति हळूहळू शिकत होता

असें दिसतें. परंतु पाणिनीकालीन अभिवंदनाचे प्रकार आणि कात्यायन व पतंजलीकालीन परस्परांना अभिवंदन करण्याचे प्रकारांची तुलना केली तर असें दिसतें कीं पाणिनीकालीं शूद्र जात तेवढी ब्राह्मणांच्या दृष्टीने कमी लेखली जात असे. कात्यायनकालीं शूद्रांना व त्यांच्याबरोबर चारही वर्णांच्या स्त्रियांना आणि क्षत्रिय व वैश्य यांतील कांही व्यक्तींना ब्राह्मण कमी लेखूं लागले. आणि पतंजलीच्या कालीं तर ब्राह्मणांपैकीही कांही लोक ब्राह्मणांच्या मर्जीतून उतरले. याचें कारण चातुर्वर्ण्यातील बऱ्याचशा लोकांनी पाणिनी आणि कात्यायन यांच्यामध्यें उत्पन्न झालेल्या बौद्ध, जैन इत्यादि वैदिकेतर धर्मांचा स्वीकार केला हें होय. पाणिनीकालीं बौद्ध, जैन वगैरे लोक अस्तित्वांत नसल्यामुळें त्यांच्या प्रत्यभिवादनासंबंधाने त्याने कांहीही उल्लेख केलेला नाही. परंतु नंतर बौद्ध, जैनादि सनातन धर्माची असूया करणारे लोक उत्पन्न झाल्यामुळें अशा असूयकांना प्रत्यभिवादन करूं नये असें पतंजलीने सांगितलें आहे. चातुर्वर्ण्यातील लोकांनी वैदिक धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारला याचें मुख्यतः कारण राजवाड्यांच्या मतें त्रैवर्णिक आणि शूद्र यांचे जे अनिर्बंध शरीरसंबंध आरंभीं झाले, त्यांच्या-पासून उत्पन्न झालेली संकरज प्रजा हें आहे. त्रैवर्णिकांनी शूद्रांना आपल्या वर्णसंस्थेंत स्थान दिल्यामुळें दोघांचेंही आरंभीं हित झालें. जोपर्यंत शूद्रांना हें स्थान मिळालें नव्हतें तोपर्यंत ते चोऱ्या करीत, आश्रम लुटीत, गाई मारीत आणि आर्य स्त्रियांशीं असभ्यतेने वागत. अशा स्थितींत या सुधारणाक्षम अनार्यांचा वर्णसंस्थेंत समावेश करून घेण्याची युक्ति आर्यांना सुचली व तिला कल्पनेबाहेर यश आलें. चोऱ्या बंद झाल्या, असभ्यवर्तन नाहीसें झालें व शूद्रांनी सर्व दास-कर्म आटोपल्यामुळें स्वास्थ्य व फुरसत मुबलक मिळून वैश्यांना व्यापारधंद्याकडे, क्षत्रियांना देश संर-क्षणाकडे आणि ब्राह्मणांना विद्यावृद्धीकडे लक्ष देण्यास सांपडून राष्ट्राची चोहोंकडून भरभराट झाली. पण याबरोबर पुढील हानीचीं बीजें याच वेळीं रोविलीं गेलीं. त्रैवर्णिक आणि शूद्र यांच्यांतील दूरीभाव आतां नाहीसा झाला. वरिष्ठ वर्णांच्या संसर्गाने शूद्रही सुधारत चालला आणि वैश्य स्त्रीपुरुषांचे शूद्रस्त्रीपुरुषांशी चोरटे शरीरसंबंध सुरू झाले. कृषि, पाशु-पाल्य व व्यापार करणाऱ्या वैश्याला हाताखालीं बरेच शूद्र ठेवावे लागत.

त्यामुळें अशा संबंधांना संधी मिळे. कालान्तराने या असद्व्यवहाराचा फैलाव क्षत्रियांत व ब्राह्मणांतही पसरला; कारण क्षत्रिय व ब्राह्मण यांच्या घरीं शूद्रिणी कामधंद्याला असत. हा प्रकार तिन्ही वर्गांत रूढ झालेला पाहून तत्कालीन सच्छील ब्राह्मणांनी त्रैवर्णिकांना शूद्रस्त्रियांशीं विवाह करण्याची परवानगी दिली. ह्या शूद्रस्त्रीसमागमापासून त्रैवर्णिकांच्या रक्तांत, वर्णांत व स्वभावांत फार मोठा फरक पडला; व शुक्र आणि कृष्ण अशा दोन वर्णांचे लोक चातुवर्ण्यामध्यें निर्माण झाले. शुक्लवर्ण लोक कृष्णवर्णीयांची शूद्रोत्पन्न म्हणून थट्टा करीत. उलट कृष्णवर्ण लोक ब्राह्मणधर्माची, यज्ञांची, श्राद्धांची, वेदांची निंदा करीत. पुढें पुढें ह्या स्पर्धेचें द्वेषामध्यें रूपांतर होऊन कृष्णवर्ण लोकांनी उपनयनादि क्रिया करण्याचें सोडून दिलें आणि ह्या लोकांची सावित्रीपतनापर्यंत प्रगति झाल्यावर ह्यांच्यापैकीं नट नामक व्रात्य क्षत्रियांत जिन व शक नामक व्रात्य क्षत्रियांत गौतम बुद्ध ऊर्फ शाक्यमुनि यांनी स्वतंत्र अशा वेदबाह्य मतांची स्थापना करून शुद्ध चातुर्वर्णिकांचा बीमोड करण्याचा उद्योग आरंभिला. त्यांनी वेद, चातुर्वर्ण्य, वैदिक आणि संस्कृत भाषा व श्राद्धकर्मे झुगारून देऊन अहिंसेचा आणि संन्यासाचा मार्ग लोकांना उपदेशिला. स्याद्वाद, बहिःशून्यवाद वगैरे नवे नवे सिद्धांत काढून औपनिषद ज्ञानाला मागें टाकण्याचा प्रयत्न केला. महानंदी शैशुनाग या क्षत्रियाला शूद्र स्त्रीपासून झालेला जो महापद्मनंद तो सम्राट झाला आणि त्याने शुद्ध क्षत्रियांचा संहार केला. याप्रमाणें त्रैवर्णिकांच्या हातची राजकीय सत्ताही नाहींशी झाली. ब्राह्मणांच्या विरुद्ध तर सर्व जग उठल्यासारखें झालें, खुद्द ब्राह्मणांपैकी कित्येक बुद्ध भिक्षु झाले. घरामध्यें शूद्र सेवक, शूद्रस्त्रिया व शूद्रोत्पन्न ब्राह्मण पोरें यांच्या संख्याबाहुल्याने त्रैवर्णिकांच्या गृहपत्न्यांचे आचार व भाषा प्राकृत झाल्या. चातुवर्ण्यांत शूद्राला घेतल्यापासून व शूद्रस्त्रियांशी विवाह करून तज्जन्य प्रजा त्रैवर्णिक मानल्यापासून ही सर्व अनवस्था व क्रांति ओढवली आहे हें ओळखून ब्राह्मणांनी चातुवर्ण्यांत राहिलेले शूद्र व शूद्रस्त्रिया यांच्याशी घडणारे संबंध नियमित करण्याचा उपक्रम केला. आणि मनु व इतर सर्व स्मृतिकार यांनी त्रैवर्णिकाने कोणच्याही स्थितींत शूद्रास्त्रीशीं विवाह करूं नये असा नियम केला. पण या नियमाचें एकदम पालन होणें शक्य

नव्हतें. कारण शूद्रस्त्रियांशी विवाह करून घरांत भोगास व कामकाजास हक्काच्या व मायेच्या मोलकरणी पैदा करण्याची संवय शतकेंच्या शतकें त्रैवर्णिकांना लागली होती. म्हणून धर्मज्ञांनीं दुसरा नियम असा केला कीं त्रैवर्णिकांची शूद्रस्त्रीजन्य अपत्यें पूर्वीप्रमाणे पितृसवर्ण न समजतां मातृ-सवर्ण समजावीं. चातुर्वर्ण्यांतील संकरज जाति याच नियमामुळें पुढें अस्तित्वांत आल्या.

अशा रीतीने गौतमबुद्धाच्यावेळीं झालेली क्रांति ही केवळ धर्मक्रांति नव्हे किंवा मतक्रांति नव्हे ही सर्वव्यापी भयंकर सामाजिक क्रांति होती. या प्रचंड क्रांतीने वैदिक समाजाचे पाये उखडून चातुवर्णिक समाज सुल-टाचा उलटा होऊन गेला. त्यांतच महापद्मनंद हा शूद्र सम्राट् सत् क्षत्रि-यांचा केवळ संहार करण्यास उद्युक्त झाला. अशा अधार्मिक अराजक व असत्य राज्यांत राहण्यांत तात्पर्य नाही असें उत्कटत्वाने ज्यांच्या प्रत्ययास आलें, अशा नर्मदोत्तर प्रदेशांतील अनेक चातुर्वर्णिकांनी दक्षिणारण्यांत वसाहती करण्याच्या निमित्ताने देशांतर केलें. महरट्ट ऊर्फ महाराष्ट्रिक लोक याच वेळेला महाराष्ट्रांत आलेले आहेत असें राजवाड्यांचें मत आहे. अशोकाच्या शिलालेखांत उल्लेख असलेले राष्ट्रिक आणि हे महाराष्ट्रिक एक नसून राष्ट्रिक हे कुरुपांचालांतून आलेले तर महाराष्ट्रिक हे मगधांतून आलेले असावे; व शेवटी राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक या सर्वांचा समावेश एका महाराष्ट्रिकांतच होऊन हल्लींच्या मराठ्यांचे पूर्वज बनले असा राजवाड्यांनीं सिद्धांत केला आहे. याच्या उलट महाराष्ट्रांतील राष्ट्रिकच महाभोजाप्रमाणें आपणांस महाराष्ट्रिक म्हणवून घेवूं लागले असे डॉ. भांडा-रकरांचें मत मागें दिलेंच आहे. तें कसेंही असलें तरी मराठ्यांमधील चातुर्वर्ण्याचा अभिमान लक्षांत घेतां ते उत्तरेकडून दक्षिणेंत कां आले याचें राजवाडे यांनी दिलेलें कारण सयुक्तिक दिसतें. या मराठ्यांनी दंडकारण्यांत वसाहत केली. तत्पूर्वी दंडकारण्य ओसाड होतें असें मानण्याचें मात्र कांहीच कारण नाही.

ही प्रचंड क्रांति घडवून आणणाऱ्या बुद्धाला पुढें दशावतारांतील एक स्थान मिळालें यावरून त्या व्यक्तीचें व त्याच्या उपदेशाचें सर्व लोकांना कांही काल तरी अत्यंत महत्त्व वाटलें यांत शंका नाही. खुद्द महाराष्ट्रांतील

लोकांनी हा धर्म जरी स्वीकारिला नव्हता तरी बौद्ध यतींबद्दल महाराष्ट्रांतील राजांना व लोकांना आदर वाटत असे. बौद्ध धर्माचे प्रचारक महाराष्ट्रांत सोपारें, पैठण वगैरे प्रांतात आले होते. महाराष्ट्रांतील डोंगरांतून शेकडों ठिकाणीं बौद्ध यतींना पावसाळ्यांत रहाण्याकरितां कोरलेलीं लेणीं अद्यापीही अस्तित्वांत आहेत. या लेण्यांचा व त्यांतील श्रमणांचा खर्च चालण्याकरितां अनेक राजांनी व श्रीमंत लोकांनी इनामें दिलीं आहेत. आणि पुढें हा धर्म हिंदुस्थानांतून जरी लुप्त झाला तरी त्याने वैदिक संस्कृतीवर कायमचे परिणाम केले. यज्ञसंस्था तर त्याने जवळ जवळ उत्सन्न केली. तेव्हां या धर्माचें स्वरूप व या धर्मस्थापकाचें चरित्र थोडक्यांत पाहिलें पाहिजे.

बुद्धाचा जन्म शाक्यकुलांत, रोहिणी नदीच्या तीरीं कपिलवस्तु नावाच्या राजधानीजवळ इ. स. पूर्वी ५५० मध्यें झाला. त्याचा बाप शुद्धोदन हा त्या लहानशा राज्याचा राजा होता. त्याला बरेच दिवस पुत्र नव्हता. बरेच वर्षांनी त्याची मोठी राणी गरोदर राहिली व बाळंतपणाकरितां पित्याकडे जात असतांना वाटेंतच बुद्धाचा जन्म झाला. तेव्हां त्यांना परत कपिलवस्तूला आणण्यांत आलें. वयाच्या अठराव्या वर्षी, कोलीची राजकन्या यशोधरा इच्याशीं त्याचें लग्न झालें. असें म्हणतात कीं तो अतीशय अशक्त होता व क्षत्रियोचित असें युद्धाचें शिक्षण त्याने घेतलें नव्हतें. तरीही या शास्त्रांत तो कुशल असे असें त्याच्या चरित्रकारांनी लिहिलें आहे. लग्नानंतर दहा वर्षांनी त्याने गृहत्याग केला. तत्पूर्वी थोडाच काल त्याला पुत्र झाल्याची वार्ता सेवकांनी त्याला कळविली होती. एका रात्रीं पत्नी आणि त्याचें नूतन अपत्य झोपेंत असतांना त्यांना तो सोडून गेला. सत्याच्या शोधाकरितां संपत्ति, सत्ता आणि संसार यांच्यावर त्याने पाणी सोडलें व सध्याच्या बुद्धगयेजवळील अरण्यांत त्याने सहा वर्षें तपश्चर्या केली. पण कडक व्रतें आचरून मनाची तळमळ जात नाही असें जेव्हां त्याला आढळून आलें तेव्हां त्याने तपश्चर्या करण्याचें सोडून दिलें. नंतर एकदां तो ध्यानस्थ बसला असतां सत्य काय तें त्याला एकदम समजलें व त्याचे सर्व संशय नाहीसे झाले. आत्मोन्नति आणि भूतदया या दोनच गोष्टी मनुष्याच्या आयुष्यांत प्रमुख आहेत असा त्याने सिद्धांत केला व तेथून तो काशीस आला. तेथें त्याने आपला

पाहिला उपदेश केला. एका बाजूला विषयासक्ति आणि दुसऱ्या बाजूला तपश्चर्येने देह कष्टविणें यांमधून आत्मोन्नतीचा मार्ग गेला आहे असें त्याने तेथील लोकांना सांगितलें आणि चार आर्य सत्यांचा व अष्टविध साधनांचा उपदेश केला. दुःख, समुदय ( दुःखाचीं कारणें ), निरोध ( दुःखाचा विनाश ) व त्याचे मार्ग अशीं हीं चार सत्यें असून, निर्दोष अशी श्रद्धा, ध्येयें, विचार व उच्चार, सद्वर्तन, यत्नपूर्वकता, सावधानता व ध्यान हीं दुःखनाशाचीं आठ साधनें आहेत. काशींत आल्यापासून पांच महिन्यांच्या आंत त्याचे साठ शिष्य झाले व त्यांना त्याने आपल्या उपदेशाचा सर्वत्र प्रसार करण्याकरितां पाठविलें. आरंभीं स्त्रियांना यतिसंघांत घेण्याच्या विरुद्ध बुद्ध होता पण त्याची सावत्र आई व पत्नी यांनी फारच आग्रह केल्यामळें स्त्रियांना संघांत येण्याची त्याने परवानगी दिली. प्रत्येक शिष्याने आपली बुद्धावर, सत्यावर व संघावर श्रद्धा आहे कीं नाही याचा आपल्याशीं विचार करावा असें बुद्धाने त्याचा शिष्य आनंद यास सांगितलें तेव्हांपासून बुद्ध, धर्म व संघ ही त्रयी अस्तित्वांत आली. अशा रीतीने ४५ वर्षेपर्यंत आपल्या शिकवणीचा प्रचार करीत तो हिंडला. एके दिवशीं पावा नांवाच्या गांवीं चंद नांवाच्या लोहाराने त्याला जेवावयास बोलाविलें व पोळीभात आणि डुकराचें मांस खाऊं घातलें. त्याने हगवण लागून वयाच्या ८० व्या वर्षी बुद्ध निर्वाणपदीं लीन झाला. मरण्यापूर्वी चंदाला दोष देऊं नका, त्याने केलें तें सद्बुद्धीनेच केलें असें त्याने आपल्या शिष्यांना सांगितलें. यावरून त्याचें थोरपण व्यक्त होतें.

"वासना या सर्व दुःखाच्या मुळाशीं आहेत. वासनांमुळेंच पुनर्जन्म घ्यावा लागतो ह्मणून वासना नाहीशा करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे म्हणजे तो सुखी होईल" हें बुद्धाच्या उपदेशाचें सार आहे. बुद्धाने आत्मा मानिला नाही पण पुनर्जन्म मानला आहे. मनुष्याचें कर्म नाहीसें होत नाही. तें पुढील जन्मांत जातें असें त्याचें म्हणणें आहे. पुनर्जन्माशिवाय तेहतीस देवता, ब्रह्म वगैरे गोष्टीही जरा निराळें स्वरूप देऊन त्याने वैदिक धर्मांतून घेतल्या होत्या. वेद, यज्ञयाग आणि चातुर्वर्ण्य हें मात्र त्याला मान्य नव्हतें. तथापि विद्वान् व सच्छील ब्राह्मणांना तो मान देत असे,

मनुष्याची योग्यता जन्मावरून न ठरवितां गुणावरून ठरवावी एवढेंच त्याचें म्हणणें होतें.

बुद्धाचा धर्म त्याच्या नीत्युपदेशाकरितांच प्रसिद्ध आहे. जीवहत्या करूं नका, चोरी करूं नका, खोटें बोलूं नका, दारू पिऊं नका, व्यभिचार करूं नका, रात्रीं भलत्या वेळीं जेऊं नका, सुगंधी द्रव्यें वापरूं नका, जमीनीवर बिछाना घालून निजा, गाणें, संगीत, नाटकें वर्ज करा आणि सोनें चांदी वापरूं नका अशा त्याच्या सुत्तनिपात्तांत दहा आज्ञा आहेत. त्याचप्रमाणें आईबाप आणि मुलें, शिक्षक आणि विद्यार्थी, पति आणि पत्नी, स्नेही आणि स्नेही, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य यांचीं परस्पराविषयीं काय कर्तव्यें आहेत तेंही त्याने व्यवस्थित रीतीने सिगालवादसुत्तांत सांगितलें आहे. आईबापानी मुलांना दुर्गुणांपासून परावृत्त करावें, त्यांना सद्गुणी बनवावें, विद्या शिकवावी, त्यांचीं लग्नें करून द्यावीं व वडिलार्जित संपत्ती द्यावी. मुलांनी आईबापांना पाळावें. गृहविषयक कर्तव्यें पार पाडावीं, संपत्तीचें रक्षण करावें, वडिलांच्या नावाला साजेल असेंच वागावें आणि ते मृत झाल्यावर त्यांचें स्मरण राखावें. पतीने पत्नीला सन्मानपूर्वक व सदयतेनें वागवावें. व्यभिचार करूं नये. पत्नीचा लोकांकडूनही सन्मान होईल अशी काळजी घ्यावी आणि तिला दागिने व वस्त्रें द्यावीं. पत्नीने घरांतील व्यवस्था चांगली ठेवावी. पतीचे नातलग व मित्र यांचें आदरातिथ्य करावें. पवित्र रहावें, खर्च बेताने करावा, गृहकृत्यांत दक्ष असावें. अशा तऱ्हेच्या उपदेशाने बौद्धग्रंथ भरलेले आहेत. या सर्व गोष्टी बुद्धानें वैदिक धर्मांतूनच घेतल्या होत्या. फक्त त्यांना त्यानें प्राधान्य दिलें. द्वेषाला प्रेमानें जिंका असा त्याचा उपदेश असे.

बौद्ध भिक्षूची दीक्षा घेण्याला आठ वर्षांच्या वरच्या वयाची आवश्यकता असे. दीक्षा घेतल्यानंतर वर सांगितलेल्या दहा आज्ञा मी पाळीन अशी त्याला शपथ घ्यावी लागे. भिक्षुणींनी भिक्षूंच्या देखरेखीखालीं राहिलें पाहिजे, एकटें राहतां कामा नये व भिक्षु जरी रागें भरला तरी त्यांनी त्याला रागावूं नये अशी आज्ञा असे. बुद्धाच्या निर्वाणानंतर शंभर वर्षांनी भरलेल्या सभेंत वरील दहा आज्ञांतील कडकपणा नाहीसा करण्यांत आला व भिक्षूला सोनेंचांदी घेण्याला हरकत नसावी अशी

मोकळीक मिळविण्यांत आली. हे बदल सर्वांना मान्य झाले नाहीत त्यामुळें उत्तरेकडचे व दक्षिणेकडचे असे दोन भेद बौद्धानुयायांत पडले. स्वतः बुद्धाला जरी तत्त्वज्ञान आवडत नसे तरी त्याच्या निरात्मवादाचें समर्थन करण्याकरितां त्याच्या शिष्यांनी तत्त्वज्ञान निर्माण केलें त्यांतही सौत्रांतिक, वैभाषिक, योगाचार आणि माध्यमिक असे चार पंथ झाले. नंतर हीनयान व महायान असा आणखी एक विभाग अशोककाली बौद्धधर्मीयांत पडला. बुद्धाच्या निर्याणानंतर २००वर्षांनी सम्राट् अशोकाने या धर्माचा स्वीकार केल्यामुळें त्याला फार महत्त्व आलें व त्याने सर्वत्र प्रचारक पाठवून सर्व आशियाखंडांत त्याचा प्रसार केला.

जैन धर्माचा उदयही बौद्ध धर्माबरोबरच झाला व बौद्ध धर्म हिंदुस्थानातून नाहीसा झाला असला तरी जैन धर्म उत्तरेंत, दक्षिण महाराष्ट्रांत व कर्नाटकांत अद्यापि विद्यमान आहे. जैन धर्म ही बौद्ध धर्माची शाखा आहे कीं हा स्वतंत्र धर्म आहे याबद्दल विद्वानांत मतभेद आहे. जैन धर्माच्या आचारविचारांत फारसा फरक नसल्यामुळें तो बौद्ध धर्मांतूनच निघाला असावा असा कित्येकांचा तर्क आहे. या धर्माचा संस्थापक महावीर असून तो कुंडग्राम येथें जन्मला. त्याच्या बापाचें नांव सिद्धार्थ. बौद्धांप्रमाणेंच जैन हे अहिंसेचे व संन्यासाचे पुरस्कर्ते आहेत. ते वेद मानीत नाहीत व स्याद्वादी म्हणजे संशयवादी आहेत. ते कर्म व पुनर्जन्म मानतात. बौद्ध लोक बुद्धापूर्वी २४ बुद्ध होऊन गेले असे मानतात तर जैनांचे २५ तीर्थंकर आहेत. यांचे धर्मग्रंथ इ. स. नंतर पांचव्या शतकांत रचले गेले. दिगंबर आणि श्वेतांबर असे जैन धर्मांत दोन पंथ आहेत. असें सांगतात कीं, महावीरानंतर दुसऱ्या शतकांत मगधांत दुष्काळ पडल्यामुळें, भद्रबाहु नांवाचा जैन साधु आपल्या अनुयायांसहित मगधांतून निघून कर्नाटकांत आला. कांही काळाने हे लोक परत मगधांत आले पण तोंपर्यंत धार्मिक आचारांत बदल झाला होता. मगधांतील जैन साधूंनी शुभ्रवस्त्रें परिधान करणें सुरू केलें होतें तर कर्नाटकांतील जैन साधू पूर्वीप्रमाणेंच नग्न होते. त्यामुळें श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ झाले.

बुद्धाने ज्या नीतितत्त्वांचा उल्लेख केला तीं सर्व समाजाच्या सुस्थितीकरितां अत्यंत उपयुक्त आहेत व तींही वैदिक धर्मांतूनच घेतलीं आहेत

तेव्हां त्याबद्दल बुद्धाला कोणीही दोष देणार नाही. उलट लोकांच्या भाषेत चांगल्या रीतीने तीं समजून दिल्याबद्दल त्याची स्तुतीच केली पाहिजे. यज्ञयागांचा त्यानें निषेध केला याबद्दलही त्याला बोल लावण्यांत कांही अर्थ नाही कारण यज्ञयागादि आचारांचें बंड इतकें बेफाम माजलें होतें कीं, त्याना आळा घालणारा असा कोणीतरी त्यावेळीं पाहिजेच होता. त्याने " सर्वं दुःखं " जगांत सर्व दुःख आहे असा सिद्धांत केला त्याबद्दलही त्याला दोष देतां येणार नाही. कारण सुख किंवा दुःख हें एखाद्या गोष्टीकडे पहाण्याच्या दृष्टीवर, प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर, शरीरप्रकृतीवर व अनुभवावर अवलंबून आहे. कित्येक भाग्यवान असे असतात कीं त्याना जगांतील दुःखांचा, अडचणींचा अनुभवच आलेला नसतो. त्यामुळें दुसऱ्यांचीं दुःखें व अडचणी समजण्यालाही ते नालायक बनलेले असतात व एक प्रकारचा माज त्यांना आलेला असतो. कित्येक दुर्दैवी असे असतात कीं, त्यांना जन्मापासून दुःखांचा अनुभव आलेला असतो. ज्या गोष्टी अगदी सुरळीत सहज पार पडाव्या त्यांच्यामध्येंही शेंकडो अडचणी उत्पन्न होतात. कित्येकांना पोटाला पुरून पिढ्यान् पिढ्यांनाही पुरेल असा पैसा मिळत असतो तर कित्येकांना दुसऱ्या वेळेचेही भ्रांत असते. कित्येकांची वृत्ति सुखदुःखातीत असल्यामुळें ते नेहमीच समाधानी असतात तर कित्येकांना मिळालेलीं सुखेंही भोगण्याचें नशिबांत नसतें. अशा स्थितींत कोणी जग आनंदमय आहे असें म्हटलें व कोणी दुःखमय आहे असें म्हटलें तर त्यांत आश्चर्य नाही. ज्याची आकांक्षाच कमी त्याला दुःखही कमी. ज्याच्या आकांक्षेला अंत नाही त्याच्या असमाधानालाही पार नाही. राष्ट्र वैभवांत असतें तेव्हां सर्वत्र आनंदाचे व सुखाचे उद्गार ऐकूं येतात. राष्ट्राला दुर्दशा आली कीं सर्वत्र दुःखाचे उसासे ऐकूं येतात हीच गोष्ट व्यक्तीच्या स्थितीचीही आहे. तेव्हां एखाद्याला विपरीत अनुभव आले व " सुख पहातां जवापाडें आणि दुःख पर्वताएवढें असे उद्गार त्याने काढले तर त्यांत त्याचा काय दोष ? आणि कांही स्थितप्रज्ञ किंवा दुसरा कांही मार्ग नसल्यामुळें असेल त्याच्यांतच कसेंबसें समाधान मानणारे लोक सोडून दिले तर सर्वसामान्य लोकांचा काय अनुभव असतो ? त्यांच्या इच्छापैकीं किती इच्छा पुऱ्या होतात ? बहुधा अपुऱ्या इच्छांतच त्यांना मरावें लागतें ना ? अशा लोकांनी जग दुःखमय

आहे असें म्हटलें तर त्यांत त्यांचा काय दोष ? जे आर्य मोकळ्या हिंदुस्थानांत वाटेल तेथें वसाहती करीत आनंदवाद गात होते तेच पुढें दुःखवादाचें रडें रडले ना ? व्यक्तीच्या आयुष्यांत जसे सुखदुःखाचे प्रसंग असतात तसे राष्ट्राच्याही असतात. तेव्हां बुद्धाला जग दुःखमय आहे असा अनुभव आला असेल व तसें तो म्हणाला असेल तर त्यांत दोष कांहीच नाही. ' सर्वंदुःखं ' या सूत्राप्रमाणें त्याच्या ' सर्वं क्षणिकं ' या सिद्धान्ताबद्दलही त्याला दोष देतां येत नाही. शरीर आणि जगांतील सर्व नामरूपात्मक वस्तु या नाशिवंत आहेत असा प्रत्येकाचा अनुभव असतांना, तो अनुभव कोणी बोलून दाखविला तर त्यांत बिघडलें कोठे ? तत्त्वज्ञान नेहमी जें खरें असेल तें सांगतें. मग त्यामुळें व्यवहारांत गळ्यापर्यंत रुतलेल्या लोकांच्या मनाला धक्का बसला तरी त्याची त्याला पर्वा नसते किंबहुना अशा लोकांना धक्का देऊन त्यांचे डोळे उघडणें हेंच त्याचें ध्येय असतें. त्यामुळें हें शरीर व जग नाशिवंत आहे ही गोष्ट उपनिषद्कालापासून आतांपर्यंत सर्व ऋषि आणि साधुसंत यांनी सांगितली आहे. त्यांचें सांगणें कितीही कटु वाटलें तरी जोपर्यंत तें सत्य व अनुभवसिद्ध आहे तोपर्यंत त्याविरुद्ध ओरड करण्यांत कांहीएक मतलब नाही. पण ही अनित्यता कोणत्या तरी नित्य वस्तूच्या अपेक्षेने उत्पन्न झालेली असते ही गोष्ट नेहमीच लक्षांत ठेविली पाहिजे. नित्य, चिरंतन, अविनाशी अशी एखादी वस्तु नसेल तर अनित्य या म्हणण्यालाही अर्थ रहात नाही आणि बुद्धाची जी घोडचूक झाली ती येथेंच झाली. ' सर्वं दुःखं ' ' सर्वं क्षणिकं ' या सिद्धान्ताबरोबरच त्याने ' सर्वं शून्यं ' असा सिद्धांत केला व निरात्मवादाचा उपदेश केला. त्यायोगाने त्याचें सर्व तत्त्वज्ञान निराधार झालें, ध्येयशून्य झालें. हें शरीर व जग, हा पिंड व हें ब्रह्मांड अनित्य असेल, या जगांत दुःखें असतील पण अनित्यतेच्या व दुःखाच्या देखाव्यामागें नित्य व सच्चिदानंदात्मक असें तत्त्व, असें ' आनंदब्रह्म ' आहे व त्याची प्राप्ती करून घेऊन मनुष्यही अनित्यतेपासून व दुःखापासून कायमचा सुटून आनंदस्वरूप होऊं शकतो हें उपनिषदांचें आशावादी तत्त्वज्ञान कोणीकडे आणि बुद्धाचा शून्यवाद कोणीकडे ? या शून्यवादाची एक घोडचूक केल्यामुळें, अहिंसा आणि संन्यास या दोन तत्त्वांच्या अतिरेकाच्या आणखी दोन घोडचुका

त्याला कराव्या लागल्या. खरें पाहिलें तर हीं दोन्ही तत्त्वें अत्यंत सुंदर आहेत. वैदिक संस्कृतीनेही त्यांचा उपदेश केला आहे."मा हिंस्यात् सर्वा भूतानि" हिंसा करूं नका असें श्रुतींतच सांगितलें आहे. स्मृतीमध्येंही अशीं वचनें आहेत. संन्यास तर फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे असें उपनिषदांत सांगितलें आहे. " पूर्वे विद्वांसः......भिक्षाचर्यं-चरंति " प्राचीन विद्वान् सर्व संसार सोडून भीक मागत होते. असा उल्लेख उपनिषदांत आहे. पण भीक मागणारा हा मनुष्य विद्वान् पाहिजे हें जसें या वाक्यांत गर्भित आहे त्याचप्रमाणें " यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत् " जेव्हां वैराग्य उत्पन्न होईल तेव्हांच त्याच दिवशीं संन्यास घ्यावा, या वाक्यांत वैराग्य हेंही संन्यासाला आवश्यक आहे असें गर्भित आहे. आणि असे विरक्त विद्वान् आजही निरनिराळ्या मिषानें भीक मागत फिरत नाहीत काय ? आणि समाजही त्यांच्या विद्वत्तेचा लाभ घेऊन त्यांना भीक घालीत नाही काय ? उलट बुद्धाने काय केलें ? आठ वर्षांच्या वरील कोणत्याही व्यक्तीला संन्यास देण्याची त्याची तयारी असे. या आठ वर्षांच्या मुलाला संन्यास घेण्याची स्फूर्ति विद्वत्तेमुळें आली असें म्हणतां येईल काय ? शिवाय तो पुरुषांनाच संन्यास देऊन थांबला नाही. बायकांनाही संन्यास देऊन भिक्षु आणि भिक्षुणींचे संघ त्याने तयार केले. आणि या ज्ञान-शून्य व वैराग्यशून्य भिक्षुभिक्षुणींनी त्या संघांत आणि विहारांतच आपले संसार थाटून पतित गृहस्थाश्रमाला सुरवात केली. संन्यासाच्या तत्त्वाचा विवेकशून्य अतिरेक केल्याचा हा परिणाम होणें अपरिहार्य होतें. अहिंसेच्या अतिरेकाचें राष्ट्रांत दुर्बलपणा उत्पन्न होण्यांत पर्यवसान झालें. याच्या उलट वैदिक संस्कृतीने या दोन्ही तत्त्वांचें थोरपण मान्य करून त्यांचा विवेकपूर्वक उपयोग करण्यास सांगितलें. हिंसकाच्या बाबतींत अहिंसा पाळणें म्हणजेच अहिंसेची हिंसा करण्यासारखें आहे हें ओळखून आततायीच्या बाबतींत आणि क्षत्रियांच्या कर्तव्यक्षेत्रांत या अहिंसेला फिरकूं दिलें नाही. संन्यासाला तर फारच निर्बंध घातले. चारही वर्णांत फक्त ब्राह्मणालाच आणि तोही म्हातारपणीच फक्त संन्यास घेण्याची मोक-ळीक ठेवली. शिवाय विद्वत्ता व धगधगीत वैराग्य या अटी होत्याच. जग नश्वर आहे हा सिद्धांत वैदिक धर्मालाही मान्य होता पण त्याचा उपयोग

त्याने अगदी वेगळ्या रीतीने केला आहे. जग नश्वर आहे म्हणून ध्येयनिष्ठ बना, खाणें आणि प्रजोत्पादन करणें या पशूच्या व्यवहारांतच समाधान मानू नका असें वैदिक धर्म सांगतो. न्याय्य असें युद्ध प्राप्त झालें असतां जीव घेण्यास व देण्यास कचरूं नका कारण केव्हांतरी आपल्याला मरायचेंच आहे. आणि शरीर गेलें तरी आपण मरत नाहीं असें त्याने क्षत्रियांना सांगितलें. " सर्वं शून्यं " म्हणणाऱ्या बुद्धाला हें सांगतां आलें नाही. त्यामुळें त्याने अहिंसेचा आणि संन्यासाचा अतिरेक केला. या तत्त्वांचें नियमन करणारें चातुर्वण्यही झुगारून दिलें आणि चातुर्वण्याचा उपदेश करणारे वेदही तो मानीनासा झाला. बुद्धाचा हेतु स्वतः वर जाण्याचा व लोकांनाही वर नेण्याचा होता पण अनात्मवादामुळें " विवेकभ्रष्टानाम् भवति विनिपातः शतमुखः " अशी शेवटीं त्याच्या पंथाची स्थिति झाली. बुद्ध निरात्मवादी नव्हता असें आतां कांहीजण प्रतिपादीत आहेत. पण वस्तुस्थिति जर अशी असती तर वेद व चातुर्वर्ण्य झुगारून देण्याचें बुद्धाला कांहीच प्रयोजन नव्हतें.

वेद आणि तत्प्रतिपादित चातुर्वण्य झुगारून दिल्यामुळें बुद्धाला परंपरा तोडावी लागली व मागचे लोक मूर्ख व मी शहाणा असें स्वरूप नकळत त्याच्या उपदेशाला आलें. वेद आणि चातुर्वण्यसंस्था यांना हजारों वर्षांचा इतिहास होता. अनेक अनुभव घेत, अडचणी पडतील त्याप्रमाणें मार्ग काढीत ही चातुर्वण्याची संस्था अस्तित्वांत आली होती. वेदांचें अध्ययन करून व ते मुखोद्गत ठेवून शेंकडों वर्षें परंपरेने एका पिढीने दुसऱ्या पिढीला देत देत ते बुद्धकालापर्यंत पोंचले होते. त्यातील ऋषि व त्यांच्या प्रार्थना यांचें आर्यांना महत्त्व होतें. पण बुद्धाला त्याचें काय होय ! तो स्वतः वैदिक आर्य नव्हता. शक होता. निदान त्याचे पूर्वज तरी शक होते. तेव्हां वेद आणि चातुर्वण्य लाथाडून टाकण्यांत " बापासि बाप न म्हणे " असा प्रकार होत आहे असें कदाचित् त्याला वाटलें नसेल. तसें पाहिलें तर वैदिक धर्मांत राहूनही त्याला पाहिजे त्या सुधारणा करितां आल्या नसत्या असें नाहीं. पूर्वीच्या लोकांना आवश्यक वाटले तसे नियम त्यानी केलें. आजच्या परिस्थितीला असे नियम पाहिजेत असें त्याला म्हणतां आलें असतें. वैदिक धर्मांत राहूनच उपनिषत्कारांनी " प्लवाह्येते

अदृढा यज्ञरूपा:" अशी टीका यज्ञावर केली नाही काय ? मनुष्याची खरी आत्मोन्नति होईल असे मार्ग सांगितले नाहीत काय ? बराच काळ झाला म्हणजे सामाजिक आचारविचारांचें सिंहावलोकन करण्याची वेळ नेहमीच येते व निरुपयोगी झालेले आचार किंवा अनिष्ट वाटणाऱ्या चाली टाकून देऊन नवीन व उपयुक्त आचारांना मान्यता द्यावी लागते व ही गोष्ट पूर्वींच्या गोष्टींना शिव्या न देतांही करितां येते; पण असें करण्याला मनुष्याच्या मनांत वाडवडिलांबद्दल आदर असावा लागतो. बुद्धाला असा आदर दाखविण्याचें कारण नसलें तरी इतरांना हा आदर वाटत होता. म्हणून बुद्धाने वेद आणि चातुर्वर्ण्यविरोधी असें आपलें अनात्मवादाचें, अहिंसेचें व संन्यासाचें तत्त्वज्ञान प्रतिपादन करावयास सुरवात केल्याबरोबर त्याच्या विरोधाला सुरवात झाली, व अशोकाच्या कालीं या धर्माची जरी भरभराट झाली तरी इ. स. पूर्व ६०० ते इ. स. ४०० पर्यंत एक हजार वर्षें वैदिक आणि बौद्ध धर्मांतील हा लढा चालून शेवटीं बापासि बाप न म्हणणाऱ्या बौद्ध धर्माची हिंदुस्थानातून उचलबांगडी करण्यांत आली. बौद्धांनी बुद्धाच्या अवशेषांवर मंदिरें बांधून त्यांत बुद्धाच्या मूर्ति बसविल्या तर वैदिक देवतांना नवीन स्वरूप देऊन वैदिक लोकांनीही आपलीं मंदीरें स्थापलीं व वेदकालीं नसलेली मूर्तिपूजा सुरू झाली. पूर्वी शूद्रांकडे वरिष्ठ लोकांचें लक्ष नसे पण आतां हे शूद्र बौद्धधर्म स्वीकारतात असें दिसल्यामुळें त्यांना व त्रैवर्णिकांतील स्त्रीपुरुषांनाही सुलभतेने धर्मज्ञान व्हावें म्हणून पुराणग्रंथ निर्माण करण्यात आले व परमार्थाचा मार्ग सर्वांना मोकळा केला. वर्णधर्म, आश्रमधर्म व राजधर्म व्यवस्थितपणें व संकलित रीतीने सांगण्याकरितां स्मृति अस्तित्वांत आल्या. पतंजलीने योगसूत्रें रचून सांख्यांमधील ईश्वराची उणीव भरून काढली. कारण सांख्य ईश्वर मानीत नसत. पतंजलीने सांख्यांचें तत्वज्ञान घेतलें, ईश्वर मानला व चित्त स्थिर करून आत्मसाक्षात्कार होण्याकरितां आणि इंद्रियांवर स्वामित्व मिळविण्याकरितां अष्टांग योग सांगितला. यज्ञप्रधान धर्माचा पुरस्कार करणारीं जैमिनीचीं पूर्वमीमांसासूत्रें बुद्धाच्या पूर्वी किंवा नंतर लवकरच केलीं गेलीं. शबर-

स्वामींनी त्याच्यावर भाष्य केलें व वेद अपौरुषेय आहेत असें सांगितलें.

"अथातो धर्म जिज्ञासा" या सूत्राने पूर्वमीमांसेला आरंभ झाला असून "चोदनेति क्रियायाः प्रवर्तकं वचनं तस्य ज्ञानमुपदेशः" (जै. सू. १-१-५) या सूत्रांत कर्मप्रधान धर्माचें ज्ञान करून देणारें जें वेदवाक्य तोच उपदेश होय असें सांगितलें आहे. वेद हे कर्मप्रधान असल्यामुळें तद्भूतानां क्रियार्थेन समाम्नायः" (जै. सू. १-१-२५) या सूत्रांत श्रुतिवाक्यांत असलेल्या पदांचा क्रियावाचक पदार्शीं समन्वय करावा असाही जैमिनीने नियम केला आहे. यज्ञविधीसंबंधाने अनेक तऱ्हेची माहिती देऊन कांही यज्ञांत पृथ्वीचें दान राजाला करतां येतें कीं नाही, असा प्रश्न उपस्थित करून राजाला पृथ्वीचें दान करतां येत नाही कारण तिच्यावर त्याचें स्वामित्व नाही असा निर्णय दिला आहे. मीमांसेची तर्कपद्धति व्यवहारनिर्णयाला उपयोगी पडणारी आहे, असें अनेक विद्वानांचें मत आहे. पूर्वमीमांसेमध्यें जगाच्या आदिकारणाचें विवेचन मुळीच नसल्यामुळें उपनिषदांतील विचारसरणीचा परामर्ष घेणारीं बादरायणाचीं उत्तरमीमांसासूत्रें यानंतर लवकरच अस्तित्वांत आलीं. या सूत्रांचे चार अध्याय असून प्रत्येक अध्यायाचे चार पाद आहेत. या सूत्रामध्यें सांख्य, नैयायिक आणि बौद्ध यांच्या तत्त्वज्ञानाचें खंडन करण्यांत आलें आहे व उपनिषदांतील वाक्यांचा समन्वय करून दाखविला आहे.

बुद्धानंतर इ. स. पूर्वी ४ थ्या शतकांत ग्रीक राजा सेल्यूकस याचा वकील मेगॅस्थेनिस चंद्रगुप्ताच्या दरबारीं येऊन राहिला होता. त्याने त्या वेळच्या राजांची, राज्यकारभाराची आणि लोकस्थितीची जी माहिती दिली आहे त्यावरून त्या राज्यकारभाराचे नियम आणि व्यवस्था हीं फार चांगलीं होतीं असें दिसतें. उद्योग धंद्याची, लोकांच्या आरोग्याची आणि रस्त्यांची त्यावेळेस चांगली काळजी घेतली जात असे. जमिनींची मोजणी करण्यांत येऊन, कालव्यांची व्यवस्था करून, जमिनीवरील कर गोळा करीत असत. राजांचें जें वर्णन त्याने केलें आहे त्यावरून त्यांना ऐषआरामाची चटक लागली होती आणि पूर्वजांइतकें शौर्य त्यांच्यामध्यें राहिलें नव्हतें असें दिसतें. राजा कोठेंही असला आणि कोठेंही गेला तरी रथामध्यें, हत्तीवरती, दरबारांत असतांना किंवा शिकारीला गेला असतांना त्याच्याभोंवती नेहमी

नायकांचा घोळका असे. युद्धविषयक कायदे फार उदार होते. ज्यांनी शस्त्र खालीं ठेविलें, किंवा जे हात जोडून दयेची याचना करीत आहेत, किंवा जे पळून चालले आहेत अशा लोकांचा वध करूं नये अशी आपस्तंबाची आज्ञा आहे. मेगॅस्थेनिस म्हणतो कीं इतर देशांत युद्धें सुरू असतांना शेतांची खराबी केली जाते. पण हिंदुस्थानांत अशा वेळीही शेती आणि शेतकरी यांना कोणी धक्का लावीत नाही. चंद्रगुप्ताच्या काळीं लोक सुखाने रहात असून त्यांच्या चालीरीति अगदीं साध्या होत्या. लोक प्रामाणिक असल्यामुळें न्यायालयांत ते क्वचितच जात. चोऱ्या फार क्वचित् होत. गुरुकुलें शहराच्याजवळ दाट झाडीमध्यें असत. तेथील विद्यार्थी अत्यंत साधेपणानें रहात आणि हरिणाजिनावर निजत. ते मांस भक्षण करीत नसत व ब्रह्मचर्य पाळीत. यावरून ब्रह्मचर्याश्रम यावेळीही कायम होता असें दिसतें. चार वर्णांचा उल्लेख मेगॅस्थेनिसने केला असून ब्राह्मण श्रेष्ठ समजले जात असें तो लिहितो. राजे लोक अडचणीच्या वेळीं त्यांची सल्ला घेत. कोशावर त्यांनाच नेमीत; आणि न्यायदान करण्याचें कामही त्यांच्याकडे असे. यज्ञयाग तेच चालवीत आणि त्रैवर्णिकांच्या मुलांना शिक्षणही तेच देत. शेतकरी त्यांना वर्षभविष्य विचारीत. क्षत्रियांसंबंधीं मेगॅस्थेनिसने थोडी माहिती दिली आहे. क्षत्रिय हे संघटित आणि युद्धाकरितां तयार असत पण शांततेच्या काळांत चैन करीत. वैश्यांना आणि शूद्रांना युद्धांचा कांहींच त्रास नसल्यामुळें ते आपआपलीं कामें निर्वेधपणें करीत असत.

भारताचें महाभारत याच कालामध्यें झालें. ज्याने ब्रह्मसूत्रें रचिलीं त्याच बादरायण व्यासाने महाभारतांतील हल्लींची गीताही रचली असें लो० टिळकांचें म्हणणें आहे. कारण गीता आणि सूत्रें परस्परांचा उल्लेख करतात. गीता हा ग्रंथ महाराष्ट्रीयांच्या अत्यंत आवडीचा आहे. ज्ञानेश्वरीपासून गीतारहस्यापर्यंत मराठींत या ग्रंथावर अनेक टीका व भाष्यें झाली आहेत. म्हणून या ग्रंथांत प्रतिपादिलेल्या विषयाची माहिती देणें येथें अवश्य आहे.

कौरव-पांडव युद्धाचे प्रसंगीं श्रीकृष्णाने गीतेचा उपदेश अर्जुनाला केला असून युद्धें चांगलीं कीं वाईट या प्रश्नाचा प्रथमतःच निर्णय केला आहे.

युद्ध करणें पाप आहे आणि त्यांतून युद्धामध्यें स्वजनांची हत्या करणें हें तर महापाप आहे. युद्धामध्यें जी मनुष्यहानि होते त्यामुळें कुलधर्म आणि जातिधर्म हे नष्ट होऊन स्त्रिया भ्रष्ट होतात, आणि त्यामुळें शेवटीं वर्णसंकर होतो. तेव्हां युद्धाचें हें पापकर्म करण्यापेक्षां प्रतिकार न करतां रणामध्यें शत्रूच्या हातून मरणें किंवा युद्ध सोडून भिक्षा मागणें हें जास्त चांगलें असा पूर्वपक्ष करून “ कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ” असा प्रश्न अर्जुनाने विचारला. याला श्रीकृष्णाने दिलेलें उत्तर असें आहे कीं, देह हा अन्तवन्त आहे तेव्हां धर्म्ययुद्धांत त्याचा वध केल्यामुळें पाप लागत नाही आणि देहांतील आत्मा हा कधींच मरत नाही. युद्ध करणें हाच तुझा धर्म आहे आणि युद्ध केलेंस म्हणून नव्हे तर उलट युद्ध केलें नाहीस म्हणून मात्र तुला पाप लागेल. अधर्म्य युद्ध हें अर्थातच चांगलें नव्हे. पण “ धर्म्याद्धि युद्धात् श्रेयोन्यत् क्षत्रियस्य न विद्यते । ” धर्म्य युद्ध करण्यापेक्षां क्षत्रियाला श्रेयस्कर अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही असा सिद्धांत श्रीकृष्णाने केला आहे. गीतेचें दुसरें वैशिष्टय म्हणजे चातुर्वण्याला व तत्प्राप्त कर्माला तिने दिलेलें प्राधान्य हें होय. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे समाजाच्या धारणपोषणाला अत्यंत आवश्यक असून वर्ण-धर्माप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्तव्यकर्में त्यांनी केलींच पाहिजेत असा गीतेचा कटाक्ष आहे. आणि “ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ”— आपआपलीं वर्णधर्मप्राप्त कर्में केल्यामुळेंच मनुष्याला मोक्ष मिळतो असा तिचा सिद्धांत आहे. गीतेचें तिसरें वैशिष्टय म्हणजे संन्यास व कर्मयोग यांचा तिने केलेला समन्वय हें होय. कर्म हें कोणालाच सुटत नाही आणि समाज धारणाकरितां तें करणें हें आवश्यक असल्यामुळें तें कोणी सोडूंही नये. मात्र त्या कर्माच्या ठिकाणीं आसक्ति कोणी ठेवूं नये. अशा रीतीनें बुद्धींत संन्यास व कृतींत कर्मयोग असा दोघांचा समन्वय करून “ सांख्य-योगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ” असा तिने सिद्धान्त केला आहे. गीतेचें चौथें वैशिष्टय म्हणजे तिने केलेला योगाचा उपदेश होय. बुद्धि शुद्ध व सम करण्याकरितां योगाची कास धरावी व त्या शास्त्रांत सांगित-लेले नियम पाळावे म्हणजे बुद्धीचें चांचल्य नाहींसें होऊन “ किंकर्म

किमकर्मेति " असा संशयही येत नाही. गीतेचें पांचवें वैशिष्ट्य म्हणजे समता हें होय. मोक्षाचे दरवाजे गीतेने सर्वांनाच खुले करून दिले आहेत. तत्त्वज्ञान मूळ उपनिषदांत सांगितलें. उपनिषदें मूळ वेदामध्यें आहेत. आणि वेदांचा अधिकार तर स्त्रीशूद्रांना नाही. वैश्यही शूद्रसम झाल्यामुळें वैदिक तत्त्वज्ञान त्यांनाही कळत नाही. अशा स्थितींत गीतेने या सर्वांची सोय लावली आणि " स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः तेपि यांति परां गतिम् " असें आश्वासन दिलें. गीतेचें सहावें आणि सर्वांत महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे गीतेंतील भक्तियोग हें होय. सर्वांना आचरण्याला सुलभ असें भक्ति हें मुक्तीचें साधन आहे. ज्ञानयोग किंवा पातंजलयोग हें सर्वांनाच आचरितां येण्यासारखे नसल्यामुळें बहुजनसमाजाचें समाधान होईल व त्यांचें आयुष्य शुद्धतर करील अशा रीतीच्या एखाद्या सुलभ साधनाची आवश्यकता गीतेच्या काळीं उत्पन्न झाली होती. वैदिक धर्मामधील ही उणीव भक्तिमार्गाचा उपदेश करून गीतेने भरून काढली. खरें पाहिलें तर प्राचीन वैदिक प्रार्थनांमध्यें वैदिक ऋषींचा भक्तिभावच आढळून येतो. आणि या दृष्टीने भक्तिमार्ग हा अत्यंत प्राचीन आहे असें म्हणण्यास हर-कत नाही. पण वेदांतील प्रार्थनांची अगणि यज्ञयागादि कर्मांची बेमालूम सांगड मध्यन्तरीं घातली गेल्यामुळें हा साधा भक्तियोग कांही काल लुप्त झाला असावा. वैदिक देवतांचें पौराणिक देवतांत रूपान्तर झाल्यानन्तर यज्ञयागविरहित अशा भक्तीचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें. मात्र या भक्तीशीं चातुर्वण्यप्राप्त स्मार्त कर्मांची सांगड घालण्यांत आली व अशा रीतीने महाराष्ट्रांत गाजलेला भागवत धर्म अस्तित्वांत आला. परमेश्वर म्हणजे सर्व उत्कृष्ट गोष्टींचा समुच्चय, आहे. सर्व सद्गुणांचें, सर्व सामर्थ्यांचें, सर्व वैभवांचें आश्रयस्थान अशा परमेश्वराची उपासना करून, मनन आणि निदिध्यासन करून आणि वर्ण-धर्मप्राप्त सर्व कर्में त्यालाच अर्पण करून मनुष्याने त्याची प्राप्ति करून घ्यावी असा या भक्तियोगाचा संदेश आहे. या भक्तियोगाने स्त्री, शूद्र, वैश्यच काय परंतु एका काळीं अत्यंत पापी आणि दुराचारी असलेल्या लोकांचाही उद्धार होतो असें श्रीकृष्णाचें सांगणें आहे.

ही गीता ज्यांत आहे, तो महाभारत ग्रंथ प्रचंड असून त्याची १८

पर्वें व १ लाख श्लोक आहेत. या महाभारतावर मराठी कवींनी ग्रंथरचना करून त्यांतील थोर पुरुषांच्या चरित्रांचा परिचय महाराष्ट्रीयांना करून दिला आहे. मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांचीं महाभारतें प्रसिद्ध आहेत. हा महाभारत ग्रंथ कोणी आणि केव्हां केला यासंबंधाने बरेच मतभेद आहेत. पुराणांतील प्रत्यक्ष रचना जरी अर्वाचीन असली तरी त्यांतील कथा वेदांच्या काळच्या किंवा वेदपूर्वकालीनही आहेत असें डॉ. केतकरांचें मत जर खरें ठरेल तर महाभारतांतील गीतेंत सांगितलेला भक्तियोग वेदकालाइतकाच प्राचीन ठरेल. हल्लींचा महाभारत ग्रंथ तीन संस्करणें होऊन इ. स. पूर्व २५० ते २०० पर्यंत बनला आहे असें रा. वैद्य यांचें मत आहे. प्रत्यक्ष भारतीयुद्ध इ. स. पूर्व ३००० च्या सुमाराला झालें व तेव्हां व्यासांनीं प्रथम या युद्धाचा जय नांवाचा लहानसा इतिहास लिहिला. "नारायणं नमस्कृत्य नरंचैव नरोत्तमम् । नत्वा सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत्" या भारताच्या आरंभींच्या श्लोकांत 'जय' इतिहासाचा स्पष्ट उल्लेख आहे. व्यास हे भारती युद्धाच्या समकालीन होते. या जय नांवाच्या इतिहासाला वैशंपायनाने पुढे वाढवून भारताचें स्वरूप दिलें व नंतर सौतीने त्याला हल्लींच्या महाभारताचें स्वरूप देऊन त्याचीं अठरा पर्वें केलीं. सौतीला माहिती फार होती व त्याने हा ग्रंथ जरी वाढविला असला तरी त्यांत व्यवहार, राजधर्म, व तत्त्वज्ञान यांसंबंधाने व्यासांनी मूळ भारतांत केलेलें वर्णन व त्याचें उदात्त स्वरूप या महाभारतांही कायम आहे. सौतीने मूळ भारताचें महाभारत बनविण्याला त्या वेळची परिस्थिति कारण झाली. त्या वेळीं बौद्धांच्या आणि जैनांच्या धर्ममतांचा अशोकाच्या साहाय्याने सर्वत्र विजय होत चालला होता. वेदांविषयीं पूज्य बुद्धि नष्ट होत चालली होती. प्राचीन पुरुषांना आपल्यांत ओढण्याची धडपड बौद्ध व जैन करीत होते. हेतु असा कीं, आमचे धर्म फार प्राचीन आहेत असें दिसावें. बुद्धापूर्वीं २४ बुद्ध होऊन गेले ही कृतीही एवढ्याचकरितां निघाली होती. वेदांतील इंद्रादि देव बुद्धाच्या चरणावर लोळतात असें बौद्ध व जैन ग्रंथकार लिहूं लागले होते. चातुर्वर्ण्य, चार आश्रम यांच्याविरुद्ध चळवळ चालू होती, व परमेश्वर नाही, आत्मा नाही असा उपदेश ते करीत होते हें मागें सांगितलेंच आहे. याच्या उलट खुद्द वैदिक धर्मांत पांचरात्र, शैव,

शाक्त, गाणपत्य असे अनेक उपासनापंथ निघून त्यांच्यांत वैषम्य उत्पन्न झालें होतें. या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर तोडगा म्हणून सौतीने हा प्रचंड ग्रंथ रचिला. त्यांत त्याने निरनिराळ्या उपासनापंथांतील वैषम्य कमी करण्याचा प्रयत्न केला. प्रचलित कथांचा संग्रह करून लोकांना त्यांच्या पूर्वजांची माहिती करून दिली. तसेंच राजनीति, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, ज्योतिष इत्यादि शास्त्रांची माहिती एके ठिकाणीं आणली. थोर लोकांच्या चरित्रांचे आदर्श लोकांपुढें ठेविले. युधिष्ठिर, भीम, अर्जुन, कर्ण, द्रोण व वयोवृद्ध भीष्म यांचीं चरित्रें धीरोदात्त आहेत. मनुष्यानें धर्म सोडतां कामा नये. धर्माने सर्व कांही प्राप्त होतें. धर्म सोडला तर सर्व कांही नष्ट होतें असा व्यासांचा उपदेश आहे.

**ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष नच कश्चिच्छृणोति माम् ।**
**धर्मादर्थश्च कामश्च सधर्मः किंन सेव्यते ।**

मी हात वर करून व ओरडून सांगत आहें कीं, धर्मामुळें अर्थकामांची प्राप्ति होते, पण माझें कोणी ऐकतच नाही असें व्यास म्हणत आहेत. यामुळें भारताची योग्यता एवढी मोठी झाली आहे कीं त्याला ‘ पांचवा वेद ’ असें म्हणतात व भारतांत इतक्या गोष्टींचें विवेचन आहे कीं, यांत जें नाही तें इतरत्र कोठेंही नाही अशी प्रतिज्ञा भारताच्या आरंभींच केली आहे. हल्लींचीं गृह्यसूत्रें, वेदान्तसूत्रें, मनुस्मृति, न्याय, सांख्य, मीमांसा यांवरील ग्रंथ महाभारतानंतरचे आहेत असे रा. वैद्य यांचें मत आहे. हल्लींच्या महाभारताचा कर्ता बादरायण व्यास हें टिळकांचें मत वैद्यांना मान्य नाही. भारतीयुद्ध हें सद्वासना व असद्वासना यांमध्यें चाललेल्या युद्धावरील रूपक आहे. खरें भारतीय युद्ध झालेंच नाही असें कित्येक म्हणतात, तर रमेशचंद्र दत्तासारखे विद्वान् युद्ध झालें होतें पण महाभारतांत वर्णन केलेल्या व्यक्ति काल्पनिक आहेत असें म्हणतात. या दोन्ही मतांचें रा. वैद्य यांनीं खंडन केलें आहे.

महाभारतांतील प्रत्येक व्यक्ति वैशिष्ट्यपूर्ण आहे. भगवान् श्रीकृष्ण ही त्यांतील सर्व दृष्टींनी परिपूर्ण व्यक्ति आहे. शारीरिक, मानसिक व बौद्धिक दृष्ट्या त्यांचा पूर्ण विकास झालेला असल्यामुळें त्यांना ईश्वरी अवतार समजू

लागले. शारीरिक शक्तीने अनेक मल्लांना लोळविण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं होतें. मानसिक दृष्ट्या पाहिलें तर त्यांची त्यागी वृत्ति एवढी मोठी होती कीं, जगाचें साम्राज्य संपादण्याची ताकद असूनही तशी त्यांनी कधींच इच्छा केली नाहीं आणि बौद्धिक सामर्थ्य एवढें मोठें की, भगवद्गीते-सारखें जगद्वंद्य तत्त्वज्ञान त्यानीं अर्जुनाला उपदेशिलें. सज्जनांचें संरक्षण व दुष्टांना शासन करून धर्माचें परित्राण करण्याकरितांच या विभूतीचा जन्म होता. पांडवांच्या सहाय्याने हें कार्य पूर्ण करून या थोर पुरुषाने आपला अवतार संपविला.

महाभारतामध्यें रामायणाची कथा आहे. पण हल्लींचें रामायण हें महाभारतानंतर एक शतकाने झालें आहे. भारतांत ज्याप्रमाणें श्रीकृष्ण ही प्रधान व्यक्ति आहे, त्याप्रमाणें रामायणांत राम ही प्रधान व्यक्ति आहे. रामायणांतील सर्वच व्यक्ति आपआपल्या चांगल्या वाईट गुणांत परिपूर्ण आहेत. स्वतः श्रीराम हे सुदास दिवोदास ह्या ऋग्वेद संहितेंतील दाशराज्ञ युद्धांत गाजलेल्या वीरांचे वंशज होते. नीतिमत्ता त्यांच्या ठिकाणीं पूर्णा-वस्थेला गेली होती. ते एकवचनी, एकबाणी व एकपत्नीव्रत पाळणारे होते. "रामो द्विर्नाभिसंधत्ते रामो द्विर्नाभिभाषते" अशी त्यांची प्रतिज्ञा असे. पितृभक्ति एवढी कीं पित्याचा शब्द खरा करण्याकरितां राज्यही तृण-वत् मानून १४ वर्षांचा वनवास पत्करला. पत्नीवर प्रेम इतकें अपरंपार कीं, रावणाने तिला हरण करून नेल्यावर 'हा सीते' असा शोक करीत वृक्षवेलींनाच कवटाळूं लागले. धैर्य एवढें मोठें कीं अनेक संकटें आलीं तरी कधीं डगमगले नाहीत. प्रयत्न एवढा दांडगा कीं त्याच्या बळावर दक्षिणेंत प्रचंड लोकसाहाय्य मिळवून, राजे अनुकूल करून घेऊन त्रिभु-वनाला भारी झालेल्या रावणाला चीत केला. पण त्याच्या राज्याचा अभि-लाष न करितां तें बिभीषणाला परत दिलें. प्रजानुरंजन करण्यांत तत्परता एवढी कीं, लोकांत सीतेबद्दल अपवाद आहेत असें कळतांच तिचा त्याग करण्यासही मागेंपुढे पाहिलें नाही. मात्र या जगांत जगावयाचें असेल तर १०० टक्के धर्मपालन करणें शक्य नाही हें दाखविण्याकरितांच कीं काय, महाभारतांत ज्याप्रमाणें धर्माला एकदां "नरो वा कुंजरो वा" असें द्यर्थी बोलावयास लावून त्याचा आंगठा गळून पडल्याचें दाखविलें आहे, त्या-

प्रमाणे राजकारणाकरितां केलेल्या वालीवधाचें गालबोट रामचंद्रालाहीं लाविलें आहे.

प्रभु रामचंद्र जसे आदर्श पुरुष त्याप्रमाणें सीतामाई या आदर्श पत्नी व आदर्श स्त्री आहेत. यौवराज्ञीपद मिळण्याचें बाजूलाच राहून पतीबरोबर १४ वर्षें वनवास भोगण्याचें कपाळीं आलें तरी तो वनवास तिने आनंदाने पत्करिला. लक्ष्मण हा तर बंधुप्रेमाचा पुतळाच आहे. असें बंधुप्रेम जगांत दिसणें अत्यंत कठीण आहे. रामाची व सीतेची सेवा करीत १४ वर्षें त्याने ब्रह्मचर्यपूर्वक तपश्चर्या केली त्यामुळें त्याचें सामर्थ्य वाढल्याचें रामायणांत दाखविलें आहे. राम कांचनमृगाला मारावयास गेला असतां मारीचाने मरतां मरतां "लक्ष्मणा मेलों" अशी कपटाने आरोळी ठोकली तरी लक्ष्मण गेला नाही म्हणून सीतेने त्याच्यावर भयंकर आरोपही केले पण त्याने तिचा उलट अपमान केला नाहीं व दागिने ओळखण्याचा जेव्हा प्रसंग आला तेव्हा मी फक्त सीतेच्या पायातले दागिने ओळखूं शकेन कारण तिच्या पायाशिवाय इतर अवयवांकडे मी पाहिलें नाही असें तो म्हणाला. भरतही असाच त्यागी आहे. चालून आलेलें राज्य न पत्करितां सिंहासनावर रामाच्या पादुका स्थापून त्याने कारभार चालविला. मारुतीराय ही ब्रह्मचर्याची व सेवाधर्माची प्रतिमा आहे. ब्रह्मचर्याने बलिष्ठच नव्हे तर मनुष्य अमरही होऊं शकतो असें वज्रदेही मारुतिरायांच्या चरित्राच्या द्वारें वाल्मीकीला सांगावयाचें आहे. रामायणांतील खलपुरुष रावण हाही पूर्ण दुष्ट पण शूर दाखविला आहे. रामाने त्याला मारून सीता सोडविली व देवांना बंदींतून मुक्त केलें म्हणून त्याची कथा एकनाथ, रामदास व मोरोपंत या कवींनी गायिली आहे. हल्लीच्या रामायणापूर्वी भारताच्या अगोदर एखादें रामायण असावें. त्यांत भर घालून भारताप्रमाणेच प्रस्तुतचें रामायण बनविलें आहे. त्यामुळें विशिष्ट कालची लोकस्थिति कळण्याच्या दृष्टीने मात्र हीं दोन्ही पुराणें फारशीं उपयोगी नाहीत. कारण त्यांत भिन्न भिन्न काळांतील परिस्थितीचें प्रतिबिंब पडलें असण्याचा संभव आहे.

## प्रकरण पांचवें

# स्मृतिकाल

महाभारतानंतर लवकरच मनुस्मृति झाली. इ. स. पूर्वी किंवा नंतर एक दोन शतकांत मानवधर्मसूत्रावरून ती तयार करण्यांत आली. रा. वैद्य यांच्यामतें ती शकपूर्व पहिल्या शतकांतली आहे. तिच्यावरून तत्कालीन लोकांचे आचारविचार चांगले कळून येण्यासारखे आहेत. सर्व वर्णांचे धर्म आम्हाला सांगा म्हणून ऋषींनी मनूला विनंति केल्यावरून ( १–२ ) मनूनें हे धर्म सांगितले आहेत. आरंभीं ही सृष्टि परमेश्वराने कशी निर्माण केली तें सांगून नंतर, " लोकानां तु विवृध्द्यर्थं मुखबाहूरुपादतः । ब्राह्मणं क्षत्रियं वैश्यं शूद्रंच निरवर्तयत् " ( १–३१ ) ईश्वराने आपलें तोंड, हात, मांड्या व पाय यांपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र निर्माण केले अशी कल्पना केली आहे. ती अर्थात्च बरोबर नाही. ऋग्वेदांतील मंत्राचें हें चुकीचें भाषांतर आहे. " ब्राह्मणोऽस्यमुखमासीत् " ब्राह्मण हें विराट पुरुषाचें मुख आहे. क्षत्रिय हात आहेत. वैश्य मांड्या आहेत असा पहिल्या तीन चरणांचा अर्थ सरळ केला म्हणजे " पद्भ्यां शूद्रोऽजायत " या चौथ्या चरणाचाही अर्थ त्याच अनुरोधाने केला पाहिजे. कारण यापूर्वीच्या मंत्रांतील प्रश्न " मुखं किमस्यासीत् कौ बाहू का ऊरू-पादाउच्येते " या विराटपुरुषाचें मुख, बाहु, मांड्या व पाय कोणते होते असा आहे. पण चातुर्वर्ण्य बनविलें ही कल्पना पुढें नष्ट होऊन चातुर्वर्ण्य पृथ्वीच्या उत्पत्तीबरोबर आपोआप उत्पन्न झालें ही कल्पना लोकांत रूढ झाली व तिचेंच प्रतिबिंब मनूच्या वरील श्लोकांत पडलें आहे. या वर्णांच्या व्यवस्थेचें हें शास्त्र ब्रह्मदेवाने मनूला दिलें; मनूने मरीचि, भृगु इत्यादि शिष्यांना शिकविलें व भृगूने हें ऋषींना सांगितलें. याच भृगुकुलांतील लोकांनी फार प्राचीन काळीं कोंकणची वसाहत केली. भार्गव रामाचें मंदिर चिपळूणजवळ अद्यापि आहे. तेव्हां भार्गव कुळांतील लोकांचे आचार मानवधर्मसूत्राप्रमाणें किंवा मनुस्मृतीप्रमाणें असावेत असा तर्क करण्यास हरकत नाही. मनुस्मृतीच्या फार पूर्वी मानवधर्मशास्त्र झालें. त्या शास्त्राची परंपरा मनुस्मृतींत सांगितली आहे. अर्थात् हल्लीची मनुस्मृति होण्याच्या

पुष्कळ पूर्वीं म्हणजे मानवधर्मसूत्रें झालीं त्याकाळीं हिमालय व विंध्य यांमधील प्रदेशालाच आर्यावर्त म्हणत. ब्रह्मावर्त, मध्यदेश व आर्यावर्त यांच्या मर्यादे-संबंधाच्या व्याख्या मानवधर्मसूत्रांतून जशाच्या तशा हल्लींच्या मनुस्मृतींत घेतल्या असाव्या. कारण ही मनुस्मृति झाली त्या काळीं वैदिक धर्म आर्यावर्तांतून बाहेर पडून त्याने सर्व दक्षिण व्यापिली होती. तेथील लोक धर्मसूत्रांप्रमाणें किंवा आपआपल्या शाखांच्या धर्मसूत्राप्रमाणें वागत असावे. मनुस्मृतीच्याकाळीं पूर्वीचा केवळ श्रौत धर्म, श्रौत व स्मार्त झाला. "श्रुतिस्मृत्युदितं धर्मं अनुतिष्ठन्ति मानवाः । इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुत्तमं सुखं (२–९)असें मनूने म्हटलें आहे त्यावरून या धर्मांत पुराणांचा समावेश होऊन "श्रुतिस्मृतिपुराणोक्त" धर्म अजून बनला नव्हता असें दिसतें. त्याचप्रमाणें प्रत्येक कालाला अनुरूप असे वेगवेगळे धर्म असतात किंवा धर्मांत बदल करावे लागतात हें तत्त्वही मनूला माहीत होतें असें "अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरेऽपरे । अन्ये कलियुगे नृणां युगऱ्हासानुरूपतः" ( १–८५ ) या श्लोकावरून दिसतें. "वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः" (२–१२) वेद, स्मृति, सज्जनांचा आचार आणि आपल्या सदसद्विवेक बुद्धीला योग्य वाटणारी गोष्ट हीं धर्माचीं चार लक्षणें मनूने सांगितलीं आहेत. पहिल्या अध्यायांत प्रत्येक वर्णाचें कर्तव्य काय त्याचा निर्देश केला आहे. अध्यापन, अध्ययन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह हीं ब्राह्मणकर्में आहेत ( १–८८ ) प्रजांचें रक्षण, दान, यजन, अध्ययन, आणि विषयांच्या ठिकाणी अनासक्ति हीं क्षत्रियकर्में आहेत ( १–८९ ). पशूंचें रक्षण, दान, यजन, अध्ययन, वाणिज्य आणि सावकारी हीं वैश्यकर्में आहेत ( १–९० ) व या सर्व वर्णांची सेवा करणें एवढें एकच कर्म शूद्राचें आहे. ( १–९१ ). या सर्व वर्णांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ असून ब्रह्मवेत्ता सर्वांत श्रेष्ठ आहे.

गृह्यसूत्रांत पूर्वी सांगितलेले संस्कारच मनूने सांगितले आहेत. पण सर्व सांगितलेले दिसत नाहीत. उपनयनाच्या पूर्वी गर्भाधान, जातकर्म, नामधेय, निष्क्रमण, अन्नप्राशन, चूडाकर्म, इतक्या संस्कारांचा उल्लेख मनूने केला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्या मुलांचें क्रमानें ८, ११ व १२ व्या वर्षी उपनयन करावें. व त्यानी गुरुगृहीं राहून अध्ययन करावें. ब्रह्मचर्यावर

मनूचा फार कटाक्ष आहे. " इंद्रियाणां तु सर्वेषां यद्येकं क्षरतीन्द्रियम्। तेनास्य क्षरति प्रज्ञा। ( २–९९ ) सर्व इंद्रियांपैकीं एक इंद्रिय जरी विषयप्रवण झालें तरी बुद्धीचा नाश होतो असें तो म्हणतो. अग्नींत विशिष्ट द्रव्यांचा होम करून जे यज्ञ केले जातात त्यांच्यापेक्षां नुसत्या जपाचें जास्त महत्त्व आहे अशी समजूत मनुकालीं रूढ होत असावी. जपाला जपयज्ञ असें नांव देऊन तो इतर दर्शपूर्णमासादि यज्ञापेक्षां श्रेष्ठ आहे ( २–८५ ) असें मनूने प्रतिपादिलें आहे. वडीलमाणसांना लहानांनी मान द्यावा.

**अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः।**
**चत्वारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्यायशोबलम्॥**

२–१२१

वृद्धांची जे सेवा करितात व त्याना वंदन करितात त्यांचें आयुष्य, ज्ञान यश व सामर्थ्य वाढतें. यानंतर कोणकोणाचा कसा सन्मान करावा, हें सांगतांना मनु म्हणतो 'सोत्र मानार्हः शूद्रोपि दशमीं गतः' ( २–१३७ ) नव्वद वर्षांपलीकडे गेलेल्या शूद्राचाही त्रैवर्णिकांनी सन्मान करावा. रस्त्यांतून जातांना रथांतून जाणाऱ्या लोकांना, नव्वद वर्षांवरील वृद्धांना, रोग्यांना, भारवाह्यांना, स्त्रियांना, स्नातक तरुणांना व राजाला वाट द्यावी. ( २१३८ ) आई सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे ( २–१४५ ) विद्वान् तरुण वृद्धालाही पित्यासारखा आहे ( २–१५० ) ब्राह्मणाला ज्ञानाने श्रेष्ठत्व येतें, क्षत्रियाला शौर्याने श्रेष्ठत्व येतें, वैश्यांना धनधान्याच्या समृद्धीने व शूद्रांना जन्मतःच श्रेष्ठत्व असतें ( २–१५५ ) असें मनूने सांगितलें आहे. केवळ केस पिकल्यामुळें वडीलपण येत नाहीं तर जो तरुण विद्वान् असतो तो खरोखर वडील समजला पाहिजे ( २–१५६ ). अविद्वान् ब्राह्मण लाकडी हत्तीसारखा निरुपयोगी आहे ( १५७ ). म्हणून त्याने वेदाध्ययन केलें पाहिजे ( १६६ ). नाही तर ब्राह्मणाला तत्काल शूद्रत्व येतें (१६८). ब्रह्मचाऱ्याने रोज स्नान करून देव, ऋषि व पितर यांचें तर्पण करून पूजा करावी आणि अग्नीला समिधा द्याव्या ( १७६ ). असें मनू सांगतो. त्यावरून मूर्तिपूजा त्या वेळीं अस्तित्वांत आली असावी. ब्रह्मचाऱ्याने मद्य, मांस, पुष्पमाला, स्त्रिया, अभ्यंगस्नान, डोळ्यांत अंजन,

मस्तकावर छत्र, काम, क्रोध, लोभ, नृत्य, गीत, वाद्य, द्यूत हें सर्व वर्ज्य करावें व नेहमी एकटें निजावें. गुरूच्या घरीं मधुकरी मागूं नये. गुरूची निंदा होत असेल तेथें बसूं नये. माता, पिता व गुरु यांची सेवा करावी. गुरूप्रमाणेंच गुरुस्त्रियांनाही मान द्यावा. विद्या कोणाकडूनही घ्यावी कारण ब्रह्मज्ञान शूद्राकडून व स्त्रीरत्न दुष्कुलांतूनही घेतलें तरी चालतें. (२३८) ३६, १८, किंवा ९ वर्षें गुरुगृहीं राहून वेदाध्ययन संपलें म्हणजे गुरूला यथाशक्ति दक्षिणा देऊन ब्रह्मचाऱ्याने गृहस्थाश्रमी व्हावें. समान वर्णाच्या सुलक्षण कन्येशीं विवाह करावा. कामतृप्तीकरितां विवाह करणारांना आप-आपल्या खालच्या वर्णांच्या कन्याहि भार्या, करितां येतात. परंतु ब्राह्मण व क्षत्रिय यांनी वाटेल तें झालें तरी शूद्र स्त्रीशीं लग्न करूं नये. कारण त्यामुळें शूद्रत्व प्राप्त होतें. मागें सांगितलेल्या आठही विवाहांचा उल्लेख मनूने केला असून त्यांपैकीं पहिले चार प्रशस्त मानिले आहेत. गृहस्थाने पंच-महायज्ञ व पूर्वी सांगितलेले यज्ञ करावे असें मनूने सांगितलें आहे. पण या यज्ञाबद्दल लोकांत फारशी आस्था राहिली होती असें दिसत नाही. पुन-र्विवाहाचा मनूने निषेध केला आहे. तथापि त्याच्या वेळीं पुनर्विवाह बंद झाले होते असें दिसत नाही. कारण पुनर्विवाहित पतीचा व पौनर्भव पुत्रांचा उल्लेख मनुस्मृतींत आहे. बालविधवांना मात्र पुढील श्लोकाने पुनर्विवाहाची मोकळीक दिली आहे. "साचेदक्षतयोनिः स्यात् गतप्रत्यागतापिवा। पौनर्भवेन भर्त्रा सा पुनः संस्कारमर्हति ॥ ९–१७६

मनुस्मृतीमध्यें स्त्रियांच्याविषयीं परस्पर विरुद्ध भासणारे असे उद्गार काढलेले आढळतात. " नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः। सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुंजते ॥ (९–१४) असें स्त्रियांच्याबद्दल मनूचें मत असल्यामुळें स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये असें त्याने प्रतिपादिलें आहे. " पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥ "–लहानपणीं पित्याने, तारुण्यांत पतीने आणि वृद्ध-पणांत पुत्रांनी स्त्रीचें रक्षण करावें असें तो म्हणतो (९–३). अशा रीतीने त्यांच्या संरक्षणाची काळजी घेऊन " पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभि-र्देवरैस्तथा। पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥ " पिता, बंधु, पति आणि दीर यांनी त्यांना पूज्य समजावें व वस्त्रालंकारांनी भूषवावें

कारण " यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" ज्या ठिकाणीं स्त्रियांचा सन्मान केला जातो तेथें देवता प्रसन्न होतात. ( ३–५५, ५६ ). " संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच। यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ " असें सुखी कुटुंबाचें चित्र मनूने काढलें आहे. सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम हा सर्वांत श्रेष्ठ आहे, कारण बाकीचे तीनही आश्रम याच आश्रमावर अवलंबून असतात. म्हणून ह्या आश्रमांतील कर्तव्यें गृहस्थानें चांगल्या रीतीने पार पाडावीं ( ३–७८, ७९ ). केस पिकून अंगाला वळ्या पडल्या म्हणजे गृहस्थाने वानप्रस्थाश्रम घ्यावा आणि नंतर संन्यास घेऊन ब्रह्मचिंतन करावें. पण संन्यास हा फक्त ब्राह्मणांनाच विहित आहे असें मनूचें मत दिसतें ( ६–९७ ).

राजधर्म सांगतांना मनूने दंडाचें महत्त्व वर्णिलें आहे. " नित्यमुद्यत दण्डस्य कृत्स्नमुद्विजते जगत् । तस्मात्सर्वाणि भूतानि दण्डेनैव प्रसाधयेत् ॥ ( ७–१०३ ) " "वकवत् चिंतयेदर्थान् सिंहवच्च पराक्रमेत् । वृकवच्चावलुम्पेत शशवच्च विनिष्पतेत् ॥" ( ७–१०६ ) असा राजांना उपदेश करून " क्षत्रियस्य परो धर्मः प्रजानामेव पालनम् " असें त्यांना बजावलें आहे. लोकांना न्याय देतांना "अदण्ड्यान् दण्डयन् राजा दण्ड्यां श्चैवाप्यदण्डयन् । अयशोमहदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥" ही गोष्ट लक्षांत ठेवून न्याय द्यावा असें त्याने सांगितलें आहे ( ८–१२८ ). शूद्रवर्गाचें कुल कांही पिढ्यानंतर ब्राह्मण होऊं शकतें ही गोष्ट " शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् " या श्लोकांत (१०–६५) सांगितली आहे. ब्राह्मण कुलही कांही पिढ्यांनंतर आचारभ्रष्टतेमुळें शूद्र होतें हेंही येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. मनूच्या काळीं सर्व लोक मांसाहार करीत असें दिसतें. ब्रह्मदेवाने भक्ष्य व भक्षक प्राण्यास निर्मिलें असल्यामुळें मांसाहार करण्यांत दोष नाहीं तथापि यज्ञांगभूत मांस खाणें हेंच प्रशस्त आहे. केवळ शरीरपुष्ट्यर्थ पशूस मारून खाणें हें राक्षसी कर्म आहे. श्राद्धांत व मधुपर्कांत जो पुरुष मांस भक्षण करीत नाही त्याला एकवीस वेळां पशूचा जन्म मिळतो असेंही मनू म्हणतो ( ५–३५ ).

मनूनंतर पुष्कळच स्मृतिकार झाले. पद्मपुराणांत ३६ स्मृतिकार सांगितले असून याज्ञवल्क्याने वीस स्मृतिकार सांगितले आहेत. या सर्व स्मृतींत

याज्ञवल्क्य स्मृति महत्त्वाची असून ती इ. स. नंतर चौथ्या किंवा पांचव्या शतकांत लिहिली गेली असें विद्वानांचें मत आहे. अठरा पुराणांच्या रचनेलाही याच काळापासून सुरवात झाली. तथापि या सर्व स्मृतींत आणि पुराणांत महाराष्ट्राच्या दृष्टीने याज्ञवल्क्यस्मृतीचें सविस्तर अवलोकन केलें पाहिजे. महाराष्ट्र हा पूर्वीपासून आतांपर्यंत याज्ञवल्क्य स्मृति आणि ती-वरील मिताक्षरा टीका यांचा अनुयायी असल्यामुळें यांच्या अवलोकनाने महाराष्ट्राच्या आचारविचारांवर चांगलाच प्रकाश पडणार आहे.

या स्मृतीच्या पहिल्या श्लोकांत वर्णांचे आणि आश्रमांचे धर्म ऋषींनी याज्ञवल्क्याला विचारिले आहेत. वर्णाश्रम आणि त्यांचे धर्म यांबद्दल हजारों वर्षे होऊन गेलीं तरीसुद्धां लोकांच्या मनांत एवढी जिज्ञासा आणि एवढा आदर कां असावा याचा आपल्याला विचार केला पाहिजे. संहिता-काल, ब्राह्मणकाल, सूत्रकाल यांनी विभागलेला हजारों वर्षांचा इतिहास जरी पाहिला तरी त्यामध्यें वर्णाश्रमधर्माचा हा आदर कमी न होतां उलट वाढत चाललेला आपल्या दृष्टीस पडतो. यावरून वर्णाश्रमधर्माची ही संस्था अत्यंत उपयुक्त आहे अशी अनुभवाने लोकांची खात्री झालेली दिसते. तेव्हां या संस्थेची घटना कशी होत गेली तें येथें थोडक्यांत पाहूं. अगदी आरंभीं चार वर्णांचा विभाग अस्तित्वांत नसावा असें वाटतें. शांतिपर्वांतील भृगु-भारद्वाज संवादांत खालील श्लोक आले आहेत.

**न विशेषोस्ति वर्णानाम् सर्वं ब्राह्ममिदं जगत् ।**
**ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मणा वर्णतां गतम् ॥**
**कामभोगप्रियास्तीक्ष्णाः क्रोधनाःप्रियसाहसाः ।**
**त्यक्तस्वधर्मारक्तांगास्ते द्विजाः क्षत्रतां गताः ॥**
**गोभ्यो वृत्तिं समास्थाय पीताकृष्योपजीविनः ।**
**स्वधर्मान्नानुतिष्ठन्ति ते द्विजा वैश्यतां गताः ॥**
**हिंसानृतप्रियालुब्धाः सर्वकर्मोपजीविनः ।**
**कृष्णाःशौचपरिभ्रष्टास्ते द्विजाः शूद्रतां गताः ॥**

ब्रह्मदेवाने वर्णविशेषरहित असें हें जग उत्पन्न केलें. तेव्हां सर्वच ब्राह्मण होते. त्यांत कर्मांमुळें वर्णभेद आला. ज्यांना भोग आवडत असत व

संताप तत्काल उत्पन्न होत असे, धाडसाचीं कामें करण्याची ज्यांना आवड असे, आणि ज्यांचा वर्ण तांबूस होता ते लोक क्षत्रिय झाले. वैदिक आचार न पाळतां गुरें ढोरें बाळगून शेतीवर उपजीविका करणारे पीत वर्णाचे जे लोक होते ते वैश्य झाले. हिंसा करणें, खोटें बोलणें ह्या गोष्टी ज्यांना प्रिय असत व सेवा करून जे उपजीविका करीत असत असे कृष्णवर्णाचे लोक शूद्र झाले. या इतिहासावरून असें दिसतें कीं, एकाच वर्णाने सर्व कार्य भागत नसल्यामुळें बाकीचे वर्ण निर्माण करण्यांत आले. सामाजिक धर्म सर्वच लोक जेव्हां आदराने पालन करतात तेव्हां क्षत्रिय वर्णाची आवश्यकता नसते. पण असें बहुधा घडत नाही. धर्म जीं नियंत्रणें घालतो तीं पाळण्याची तयारी सर्वत्र सारखीच दिसून येत नाही. किंबहुना ही नियंत्रणें झुगारून देण्याकडेच बऱ्याचशा लोकांची प्रवृत्ति असते. 'धृ—धारणे' या धातूपासून धर्म शब्द साधला आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे लोकांच्या आचारविचारांना नियंत्रण घालून त्यांना इष्ट तें वळण लावणें हें धर्माचें कर्तव्य आहे असे उघड दिसतें. लोकांचा अध:पात होऊं नये अशी काळजी धर्म नेहमी घेतो. फुकट जाणाऱ्या नदीच्या पाण्याला बांध घालून व मग कालवे, पाट इत्यादि साधनांनी ते पाणी इच्छित स्थळीं नेऊन त्यापासून ज्याप्रमाणें उत्तम शेती तयार करतात त्याप्रमाणें मनुष्याच्या मोकाट सुटलेल्या मनोवृत्तींचे नियमन करून व त्यांना योग्य मार्गाला लावून मनुष्याला श्रेयस् आणि प्रेयस् साधून देणें हें धर्माचें कार्य असतें. मनुष्यामध्यें प्रारंभी भौतिक ऐश्वर्याची इच्छा असल्यामुळें 'बळी तो कान पिळी' या तत्त्वाचा स्वीकार करूनही तें मिळविण्याचा तो प्रयत्न करतो. पण त्यामुळें आपला अध:पात होतो असें जेव्हां त्याच्या लक्षांत येतें तेव्हां ऐहिक सुखांचा उपभोग सर्वांनाच जास्त काळ मिळावा अशा हेतूने "अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रह:" इत्यादि धार्मिक नियमांनी तो आपलें नियमन करून घेतो. या नियमाप्रमाणें आपल्या वृत्तींचा संयम करणें हें धार्मिक मनुष्याचें कर्तव्य आहे. पण हें कर्तव्य स्वत: पालन न करून आणि इतरांनाही न करूं देऊन दंडेलीने वागणारे जे लोक असतात त्यांचा प्रतिकार कसा करावा असा प्रश्न जेव्हां उत्पन्न झाला तेव्हांच क्षत्रिय वर्णाची आवश्यकता उत्पन्न झाली. ईश्वराला न मानणाऱ्या व सत्तेच्या आणि सप-

त्तीच्या बळावर धर्माला व धार्मिक लोकांना पायाखालीं तुडविणाऱ्या दुर्जनांचा प्रतिकार करूं नये, त्यांच्या अत्याचारांना सज्जन लोक बळी पडले तरीही चालतील अशी शिकवण इतर धर्मांनीं केली आहे. दुर्जनांचा प्रतिकार करण्यांत अहिंसा धर्माला बाध येतो ही समजूत या शिकवणीच्या मुळाशीं आहे. याच्या उलट दुर्जनाची हिंसा वाचविली तर सज्जनाची हिंसा होऊं दिल्याचें पाप माथीं येतें हें लक्षांत घेऊन जे नियम दुर्जन इतरांच्या बाबतींत पाळीत नाहीत ते नियम त्याच्या बाबतींत इतरांनी पाळण्याची जरूरी नाही व सज्जनाची हिंसा वाचवितांना, दुर्जनाची हिंसा झाली तरी त्यांत कांही पातक नाही एवढेंच नव्हे तर असा प्रतिकार करणें धर्म्य आहे असा निर्णय देऊन उत्पथगामी दुर्जनांचें शासन करण्याकरितां क्षत्रियांची बलशाली संस्था आमच्या धर्माने अस्तित्वांत आणली. प्रतिकारक्षम अशा लढाऊ लोकांनीं क्षत्रियांचा हा पेशा उचलला. शमप्रधान लोकांनी प्रजेमध्यें आध्यात्मिक व आधिभौतिक ध्येयें जागृत ठेवण्याचें अध्ययन-अध्यापनाचें काम पत्करलें. योग्य मोबदला घेऊन क्रय विक्रय करणारा वैश्यांचा वर्ग सुधारलेल्या समाजांत नेहमींच अस्तित्वांत येतो त्याप्रमाणें तो येथेंही आला. आणि अशा रीतीने ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन वर्ण सुप्रतिष्ठित झाले. या तीन वर्णांनीं येथील रानटी जातींना आपल्या वर्ण संस्थेंत स्थान देऊन शूद्रांचा चौथा वर्ण निर्माण केला. व अशा रीतीने हें चातुर्वर्ण्य अस्तित्वांत आलें.एकाच समाजांतील भिन्न भिन्न वृत्तींच्या माणसांचा उपयोग करून घेऊन 'गुणकर्मविभागशः' चातुर्वर्ण्याची रचना केली गेली. राजवाड्यांनी या चातुर्वर्ण्याच्या उत्पत्तीची मीमांसा निराळ्या रीतीने केली आहे. ते म्हणतातः "ऋग्वेदकालाच्या अगदीं पहिल्या थराच्याही पलीकडील काळांत ब्राह्मण हे एकच पात्र होतें. मूलतः ब्राह्मणाचा वर्ण शुक्लभास्वर, मनोरचना देवधार्मिक आणि हव्यास आत्मनात्मविचाराचा. ह्या ब्राह्मण नांवाच्या आर्यलोकांना पामीरच्या पठारावर वर्णाने लाल अशा दुसऱ्या एका लोकांची गांठ पडली. हे रक्तवर्ण लोक शौर्याने सिंहासारखे क्रौर्याने लांडग्यासारखे, कजाखीनें कुक्कुटाप्रमाणें, सोशिकपणाने कुत्र्यासारखे असून डोक्याचे किंचित् मंद असत. या मंद डोक्याच्या रक्तवर्ण लोकांवर तीव्र डोक्याच्या शुक्लवर्ण ब्राह्मणांनी, बेमालूम छाप बसविली

आणि वेदवाङ्मयांत गाजणारें ब्रह्मक्षत्रनामक द्वंद्व निर्माण केलें. तीव्र डोकें व कणखर मनगटें यांच्या बलिष्ठ सामर्थ्यापुढें सर्व शत्रु नामोहम होऊन ब्रह्मक्षत्राचा सर्वत्र विजय झाला...या द्वंद्वाची पुढें एका तिसऱ्या पीतवर्ण टोळीशीं गांठ पडली. ह्या टोळींतले लोक कृषि, पाशुपाल्य व वाणिज्य करण्यांत कुशल असत. या टोळीला ब्रह्मक्षत्रांनी विश हें नांव ठेविलें. या पीतवर्ण विशांस सामील करून घेऊन ब्रह्मक्षत्रांनी वेदप्रसिद्ध त्रैवर्ण्य पैदा केलें. या त्रैवर्णिकांची पुढें कृष्णवर्ण अशा शूद्र नामक अर्धरानटी लोकांशीं गांठ पडली. त्यांना माणसाळून आपलें दास्य करण्याचें काम देऊन त्रैवर्णिकांनी ही चातुर्वर्ण्य नामक त्रिखंड गाजलेली समाज संस्था निर्माण केली" (रा. मा. वि. चंपू. प्रस्तावना पान १४०-४१). पण कांही समाज मुळापासूनच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र वर्णाचे होते असें मानणें विकासवादाच्या दृष्टीने सुसंगत होणार नाही. त्यापेक्षां एकाच समाजांत अनुभवाप्रमाणें व आवश्यकतेप्रमाणें वर्णसंस्था उत्पन्न झाली व प्रवृत्ती आणि गुणकर्माप्रमाणे ज्या वर्णाचा स्वीकार केला ते त्या वर्णाचे झाले असें मानणें जास्त सयुक्तिक आहे. जग हें त्रिगुणात्मक असल्यामुळें कोणत्याही एका समाजांत केवळ एकाच प्रवृत्तीचे लोक प्रथमपासूनच निर्माण होणें शक्य नाही. प्रत्येक समाजांत सर्व तऱ्हेचे व प्रवृत्तीचे लोक होतात व त्यांच्या प्रवृत्तींचा भिन्न भिन्न कामीं समाज उपयोग करून घेतो. ब्राह्मण जाति घेतली तरी तींत सगळेच त्या प्रवृत्तीचे लोक कोठे आढळतात व ते जातीने ब्राह्मण असले तरी निरनिराळ्या वर्णांचीं कामें करतात. अशी स्थिति असल्यामुळेंच जातिसंस्था अस्तित्वांत येण्यापूर्वीं निरनिराळ्या वर्णांत विवाह होत असत. त्याची यादी राजवाडे यांनीच पुढीलप्रमाणें दिली आहे.

| | पिता | | माता | | अपत्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | शंतनु (क्षत्रिय) | × | गंगा (अनामक वर्णीय) | = | भीष्म (क्षत्रिय) |
| २ | पाराशर (ब्राह्मण) | × | मत्स्यगंधा (धीवरी) | = | कृष्णद्वैपायन (ब्राह्मण) |
| ३ | शंतनु (क्षत्रिय) | × | मत्स्यगंधा (धीवरीशूद्र) | = | विचित्रवीर्य (क्षत्रिय) |
| ४ | विश्वामित्र (क्षत्रिय) | × | मेनका (अप्सरा) | = | शकुंतला (क्षत्रिय) |
| ५ | ययाति (क्षत्रिय) | × | देवयानि (ब्राह्मण) | = | यदु (क्षत्रिय) |

६ ययाति (क्षत्रिय) शर्मिष्ठा (आसुरी) = द्रुह्यु (क्षत्रिय)
७ जरत्कारू (ब्राह्मण) × जरत्कारी (नागवंशी) = आस्तिक (ब्राह्मण)
(रा. मा. वि. चंपू १४६)

ही यादी आणखीही वाढविण्यासारखी आहे. "शावाश्व ऋषीला रथविती राजकन्या दिली होती. भृगुपुत्र च्यवन ऋषीचा विवाह सूर्यवंशी शर्याति राजकन्या सुकन्या हिच्याशीं झाला होता. गाधिराजाने त्याची कन्या सत्यवती हिला भृगुवंशीय ऋचिक ऋषीस दिलें होतें. हिच्याच पोटीं जमदग्नि जन्मास आला. अगस्ति ऋषीची पत्नी लोपामुद्रा ही विदर्भ राजकन्या होती. अंगदेशचा राजा लोमपाद याने विभांडकपुत्र ऋष्यशृंग यास स्वकन्या शांता दिली होती. परशुरामास जन्म देणारी जमदग्निभार्या रेणुका ही प्रसेनजित् राजाची मुलगी होती." (हिंदु लग्नसंस्था ६४) हीं फार प्रसिद्ध अशा मोठ्या लोकांचीं उदाहरणें झालीं. मग सर्वसामान्य लोकांत असे विवाह पुष्कळच होत असले पाहिजेत असें अनुमान काढण्यास कांहीच हरकत नाही. आणि समानशील किंवा समानप्रवृत्ती असल्याशिवाय हे विवाह होणें शक्य नाही. "ब्राह्मण श्वेतवर्णी, क्षत्रिय रक्तवर्णी, वैश्यपीतवर्णी व शूद्र कृष्णवर्णी असे ब्रह्मदेवाने निर्माण केले" ही कल्पना भारतांत सांगितल्यावर तिच्यावर अशी शंका घेतली आहे कीं "ब्राह्मणादि वर्णांत जो परस्पर भेद आहे त्यास कारण जर श्वेतादि वर्ण असतील तर मग सर्वच वर्ण संकीर्ण आहेत. कारण प्रत्येक वर्णांत निरनिराळ्या वर्णांचे लोक आहेत. तेव्हां रंगावरून वर्णभेद कसा होतो ? याचें उत्तर म्हणून भृगूनें वर उध्दृत केलेले श्लोक सांगितले असून शेवटीं "इत्येते कर्मभिर्व्यस्ताद्विजा वर्णान्तरं गताः" कर्म भिन्न झाल्यामुळें एकच द्विज जातीचे लोक भिन्न भिन्न वर्णांचे झाले असा निर्णय दिला. त्रैवर्णिकांना वेदाध्ययनादि सर्व अधिकार आहेत. यावरून वरील श्लोकांतील शुभ्र, ताम्र, पीत, कृष्ण इत्यादि वर्ण हे सत्त्वरजतमोगुणांचे निदर्शक असून एकाच समाजांतून हे तीनही वर्ण गुणकर्मांप्रमाणें निर्माण झाले हें म्हणणेंच जास्त सयुक्तिक दिसतें. शूद्रवर्ण मात्र आरंभीं निराळा समाज असावा, कारण त्याला वेदाधिकार नाही व त्याच्याकडे फक्त सेवेचें काम दिलें आहे. ब्राह्मणक्षत्रियांनी या वर्णांतील स्त्रियांशीं विवाह करूं नये अशी बंदीही

पुढें करण्यांत आली. वर्ण हे गुणकर्मांनी उत्पन्न झाले असें म्हणण्याचें कारण आणखी एक असें आहे कीं, कनिष्ठ वर्णाचें कुल चांगल्या गुणांनी वरिष्ठ वर्णाचें, आरंभीं तरी होत असावें.

**" अधर्मचर्यया पूर्वो वर्णो**
**जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ "**
**" धर्मचर्यया जघन्यो वर्णो**
**पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ "**

असें आपस्तंब सूत्रांत सांगितलें आहे.कांहीं पिढ्यांनी का होईना कनिष्ठ वर्ण जर उच्च वर्णाचा होऊं शकतो तर वर्णव्यवस्था गुणकर्मावरच अवलंबून नाही काय ? अशा रीतीने उच्च वर्ण मिळविल्याचीं उदाहरणें भारतांतील वनपर्वांत अनेक आहेत.

**" जातो व्यासस्तु कैवर्त्याः श्वपाक्यास्तु पराशरः ।**
**बहवोऽन्येऽपि विप्रत्वं प्राप्तायेपूर्वमाद्विजाः ॥**

महामुनि वसिष्ठ हाही पूर्वी ब्राह्मण नव्हता परंतुः—

**तपसा ब्राह्मणो जातः संस्कारस्तत्र कारणम् ॥**
**ततो ब्राह्मणतां जातो विश्वामित्रो महातपाः ।**
**क्षत्रियः सोप्यथ तथा ब्रह्मवंशस्य कारकः "**

वायुपुराणांत, वेदाच्या मंडलाचा द्रष्टा ऋषी जो गृत्समद त्याच्या वंशांत कर्मभेदाने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र पुरुष निर्माण झाल्याचें सांगितलें आहे.

**पुत्रो गृत्समदस्यच सुनको यस्य सौनकः ।**
**ब्राह्मणाः क्षत्रियाश्चैव वैश्याः शूद्रास्तथैव च ।**
**एतस्य वंशे संभूता विचित्रा कर्मभिर्द्विजाः ॥**

तात्पर्य, वर्णसंस्था ही गुणकर्मभेदाने अस्तित्वांत आली. जन्मभेदाने नाही. जाति मात्र जन्माने प्राप्त होते. वर्णसंकर अनिष्ट आहे असें आढळून आल्यामुळें वर्णावर्णांतील विवाह बंद करण्यांत आले. आरंभीं माता कोणत्याही वर्णाची असली तरी तिच्या मुलांना पित्याचा वर्ण मिळत असे

तें बंद होऊन मातेचा मिळूं लागला. पुढें तोही बंद होऊन भिन्न वर्णांपासून झालेल्या प्रजेच्या वेगळ्याच जाति झाल्या. धंद्यामुळेंही हजारों जाति बनल्या. तथापि बीजशुद्धीच्या दृष्टीने वर्णसंस्थेनंतर जातिसंस्था अस्तित्वांत आली असली तरी वैदिक धर्म वर्णाश्रमात्मक आहे, जात्यात्मक नाही ही गोष्ट नेहमी लक्षांत ठेविली पाहिजे.

चातुर्वर्ण्यांतील चार वर्ण हे एकाच समाजांतून परिणत होवोत किंवा मूळचेच भिन्न भिन्न असोत, वर्णांनंतर जाति अस्तित्वांत आल्या असोत किंवा अलिकडे कित्येक म्हणतात त्याप्रमाणें जातीनंतर वर्ण अस्तित्वांत आले असोत, चातुर्वर्ण्य ही धर्मानें मान्यता दिलेली एक महत्वाची व उपकारक संस्था आहे याबद्दल कोणाचेंही दुमत होईल असें वाटत नाही. त्यागाच्या थोर तत्त्वावर या संस्थेची उभारणी करण्यांत आली आहे. आयुष्य म्हणजे चैन नसून विशिष्ट कर्तव्यें पार पाडण्याकरितां आहे, प्रत्येक व्यक्तीला समाजविषयक कांही कर्तव्यें आहेत ही भावना या संस्थेच्या मुळाशीं आहे ही गोष्ट प्रत्येक वर्णाचीं कर्तव्यें पाहिलीं असतां लक्षांत येईल:—

**इज्याध्ययनदानानि वैश्यस्य क्षत्रियस्यच ।**
**प्रतिग्रहोऽधिको विप्रे याजनाध्यापने तथा ॥**

या० स्मृति ५–११८

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिघांनाही यजन करणें, अध्ययन करणें व दान करणें हीं तीन कर्तव्यें सांगितलीं आहेत; पण ब्राह्मणाचें विशेष कर्तव्य दान घेणें, यजन करविणें व अध्यापन करणें म्हणजे शिकविणें हें आहे. मनुस्मृतीमध्येंही हींच कर्तव्यें सांगितलीं आहेत पण त्याच्याही पूर्वी झालेल्या गीतेंत यांच्या जोडीला

**शमो दमस्तपःशौचं क्षान्तिरार्जवमेवच ।**
**ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्मस्वभावजम् ॥**

या गोष्टी अधिक सांगितल्या आहेत. ब्राह्मण म्हटला म्हणजे तो शांत व गंभीर असला पाहिजे. तो तपस्वी असला पाहिजे. त्याचें मन व शरीर नेहमीं शुद्ध असलें पाहिजे. तो क्षमाशील आणि सरळ वागणारा असला

पाहिजे. स्वतः अध्ययन करून राष्ट्रांतीलं विद्या जिवंत राहील व वाढेल अशी त्याने काळजी घेतली पाहिजे. स्वतः आस्तिक बनून इतरांनाही आस्तिक बनविलें पाहिजे. नास्तिक वादाने ज्या ध्येयाकडे मनुष्य जातीला जावयाचें आहे तें ध्येय डोळ्यासमोरून नाहींसें होतें आणि व्यक्तीची व समाजाची प्रगति कुंठित होते; एवढेंच नव्हे तर असे नास्तिक लोक सामाजिक बंधनें झुगारून देऊन स्वतःचा व राष्ट्राचाही अधःपात करितात. म्हणून समाज नास्तिक होणार नाही अशी काळजी ब्राह्मणांनी घेतली पाहिजे. लोकांसमोर आध्यात्मिक आणि आधिभौतिक ध्येयें नेहमीं जागृत ठेविलीं पाहिजेत व त्यांना निःश्रेयस् व अभ्युदय मिळवून देण्याचें धर्माचें जें प्रमुख कार्य तें ब्राह्मणांनी घडवून आणलें पाहिजे. हें महत्त्वाचें कार्य घडवून आणणारे ब्राह्मण अर्थातच शांत, निग्रही, क्षमाशील, ऋजु आणि त्यागी असले पाहिजेत. अशा ब्राह्मणांच्या संरक्षणाची व पोषणाची जबाबदारी व त्यांचें कार्य अनिर्बंध चालेल अशी खबरदारी क्षत्रियांनी घेतली पाहिजे. जन्मभर दारिद्र्य पत्करून लोकांचीं मनें व बुद्धि सुसंस्कृत करण्याचें व त्यांना मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे नेण्याचें महत्त्वाचें कार्य ब्राह्मण करीत असल्यामुळें त्यांचें व प्रजेचें संरक्षण करणें हें क्षत्रियांचें कर्तव्यच आहे. "प्रधानं क्षत्रिये कर्म प्रजानां परिपालनम्' असें याज्ञवल्क्य म्हणतो व हें कर्तव्य पार पाडण्याकरितां क्षत्रियाच्या आंगीं,

**शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धेचाप्यपलायनम् ।**
**दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्मस्वभावजम् ॥**

हे गुण असले पाहिजेत. क्षत्रिय शूर, तेजस्वी, धैर्यवान् आणि दक्ष पाहिजे. युद्धामध्यें शत्रूला त्याने केव्हांही पाठ दाखवितां कामा नये. शिक्षणकार्य करणाऱ्या ब्राह्मणांना, राष्ट्राचें स्वामित्व पत्करून, त्याने साहाय्य केलें पाहिजे. धार्मिक नियम प्रजा नीट पाळीत आहे कीं नाही तें लक्षपूर्वक पाहिलें पाहिजे व पाळीत नसेल तर ते नियम सक्तीने पाळावयास लावणें हें क्षत्रिय राजाचें कर्तव्य आहे. धार्मिक नियमांत कांही बदल पाहिजे असल्यास तो करण्याचा विद्वान् लोकांना अधिकार आहे; पण अमुक एका रीतीने वागणें हें व्यक्तीच्या व समाजाच्या उद्धाराला आव-

श्यक आहे असें ठरल्यानंतर त्या हितकारक बंधनांच्या पलीकडे जाण्याचें स्वातंत्र्य वर्णाश्रमधर्मांत कोणत्याही व्यक्तीला दिलेलें नाही. माझा नाश झाला तर तुमचें काय जातें ? असें कोणालाही म्हणतां येत नाही. कारण व्यक्ति ही समाजाचा घटक आहे. तिच्यावर समाजाचा अधिकार आहे व प्रत्येक व्यक्तीला कांही सामाजिक कर्तव्यें आहेत. त्यामुळें व्यक्तीचा नाश होऊं देणें म्हणजे समाजाच्या शक्तीचा अल्पांशानें क्षय करण्यासारखेंच आहे. असा क्षय होऊं नये म्हणून प्रत्येक व्यक्ति धार्मिक अनुशासनाप्रमाणें चालेल अशी काळजी क्षत्रियांच्या शासनसंस्थेने घेतली पाहिजे. धार्मिक अनुशासनाप्रमाणें चालणाऱ्या प्रजेचें अंतर्बाह्य शत्रूंपासून संरक्षण करणें हें तर क्षत्रियांचें प्रमुख कर्तव्य आहे. त्यामुळें राष्ट्राच्या आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नतीच्या आड येणाऱ्या दुष्ट लोकांशीं युद्ध करण्याकरितां नेहमींच दंड थोपटून उभा असलेला क्षत्रियवर्ण, राष्ट्राचा केवळ जीव कीं प्राण झाला तर त्यांत आश्चर्य नाही. क्षत्रियाची नेहमीं युद्धाला तयारी असावी म्हणून मनूनें त्याच्या कर्तव्यांत "विषयेषु अप्रसक्तिश्च" विषयांच्या ठिकाणीं आसक्ति नसणें हें एक कर्तव्य घातलें आहे. विषयरत झाल्यामुळेंच राष्ट्रांत क्षत्रियांचें कर्तव्य करण्याला फार थोडे लोक पुढें येतात. युद्धांत प्राण जाईल आणि येथील सुखांना आपण मुकूं अशी लोभमूलक भीति राष्ट्रांत उत्पन्न झाली व क्षात्रवृत्तीचे कर्तव्यदक्ष पुरुष उत्पन्न होतनासे झाले म्हणजे त्या राष्ट्राची मोठी शोचनीय स्थिति होते व शतकेंच्या शतकें त्याला पारतंत्र्यांत खितपत पडावें लागतें. जुलमानें त्रस्त झालेल्या लोकांचा आर्तनाद जेथून जेथून ऐकूं येईल तेथें तेथें त्या आर्तांच्या संरक्षणार्थ धावून जाणें हा क्षत्रियाचा धर्म आहे. हें धार्मिक कर्तव्य करीत असतां प्रत्येक क्षणाला त्याचा जीव धोक्यांत असतो व प्रसंगीं त्याला मरणही पत्करावें लागतें. असें निष्ठुर कर्तव्य ज्यांनी स्वीकारिलें त्या क्षत्रियांना राष्ट्राचें स्वामित्व व वैभव दिलें गेलें ही गोष्ट योग्यच झाली. त्यांच्या क्षणभंगुर अशा जीवनांत स्वस्थतेचे जे क्षण सांपडतील ते त्यांना सुखांत घालवितां यावे अशी व्यवस्था समाजानें करणें अवश्यच होतें. जन्मभर दारिद्र्य पत्करून अध्ययन अध्यापन करणाऱ्या ब्राह्मणाला त्याच्या विद्वत्तेमुळें व त्यागामुळें लोकांत सन्माननीय स्थान सहजच मिळालें. वैश्याचीं

ग्रंथालय ठाणे ४४६८

कर्तव्यकर्मेः—"कुसीदकृषिवाणिज्यपाशुपाल्यं विशः स्मृतम्" अशी याज्ञवल्क्याने सांगितलीं आहेत. मनूही हींच कर्तव्यें सांगतो. सावकारी, शेती, व्यापार व पशुपालन करून समाजाला आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या या वैश्याला, क्षत्रियांप्रमाणें अधिकार किंवा ब्राह्मणाप्रमाणें सन्मान मिळाला नाहीं तरी त्याला समाजाकरितां संपत्तीचा संग्रह व उपभोग घेण्याची सवड देण्यांत आली. शूद्राने सेवेचें उपयुक्त, अवघड व सकृद्दर्शनीं कमीपणाचें वाटणारें काम पत्करिलें तर त्याच्या मोबदल्यांत त्याला त्रैवर्णिक आर्यांच्या समाजव्यवस्थेंत स्थान देण्यांत आलें. अशा रीतीने प्रत्येक वर्णाला दुसऱ्या वर्णाकरितां कांहीतरी त्याग करावयास लावून या त्यागाच्या भक्कम पायावर प्रत्येक वर्णाच्या सामाजिक कर्तव्याची उभारणी करण्यांत आली. व त्याच्या मोबदल्यांत त्याला कांहीतरी देऊन चातुर्वर्ण्याची ही कल्याणकारिणी समाजसंस्था उत्पन्न करण्यांत आली. ज्या देशांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अध्यापन, संरक्षण, व्यापार, व सेवा करून परस्परांच्या उपयोगीं पडणें हें आपलें धार्मिक कर्तव्य आहे असें समजत होते त्या देशांत वैभवाचें व शांततेचें साम्राज्य नांदल्यास काय नवल ! हजारों वर्षें झालीं तरी वर्णाश्रम धर्माला लोक बिलगून बसले त्याचें कारण ही संस्था व्यवस्थित चालली असतांना लोकांनी भोगलेलें वैभव हेंच होय.

मनूने सांगितलेलें शूद्राचें कर्म आणि याज्ञवल्क्याने सांगितलेलें शूद्रकर्म यांत बराच फरक दिसून येतो. "एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् । एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया" त्रैवर्णिकांची सेवा करणें एवढें एकच कर्म ईश्वराने शूद्राला सांगितलें आहे. (१–९१) असें मनू म्हणतो. याच्या उलट "शूद्रस्य द्विजशुश्रूषा तयाजीवन् वणिग्भवेत् । शिल्पैर्वाविविधैर्जीवेत् द्विजातिहितमाचरन्" असें याज्ञवल्क्याने (५-१२०) सांगितलें आहे. शूद्राने द्विजांची शुश्रूषा करावी पण तिच्यावर निर्वाह होईनासा झाल्यास वाण्याचें काम करावें किंवा नानाप्रकारच्या कलाकौशल्यावर निर्वाह चालवावा. चित्रें काढणें, गायन, नृत्य, वाद्यें वाजविणें, कारागिरी करणें इत्यादि शुद्ध कौशल्यें होत. कातडीं कमावणें, जोडे शिवणें इत्यादि निंद्य अथवा अमंगल कर्में शूद्रानेही आपत्कालीं करूं नयेत असें मिताक्षराकाराने सांगितलें आहे. यावरून शूद्राचा दर्जा त्रैवर्णिकांच्या

संगतीने याज्ञवल्क्याच्या काळीं मनूच्या काळापेक्षां पुष्कळच वाढला होता असें दिसतें. लौकिक व्यवहारांत वैश्याचीं कृत्यें तर तो करूं लागलाच पण त्याला कित्येक धार्मिक अधिकारही मिळाले होते असें खालील श्लोकावरून दिसतें:—

**भार्यारतिः शुचिर्भृत्यभर्ता श्राद्धक्रियापरः**
**नमस्कारेण मंत्रेण पंचयज्ञान् न हापयेत्॥** –(या.स्मृ. ५–१२१)

यावरून शूद्राला श्राद्धें करण्याची आणि नमः या मंत्राने पंचमहायज्ञ करण्याची मोकळीक मिळाली होती असें दिसतें. मात्र त्याला अग्निहोत्र घेतां येत नसल्यामुळें वैश्वदेवकर्म त्याने लौकिक अग्नीवरतीच करावें असें विज्ञानेश्वराने सांगितलें आहे.

वेद ऐकण्याचा प्रतिबंध सूत्रकालाच्या पूर्वीं शूद्राला होता वा नाही याचा संशय आहे. कारण " यथेमां वाचं कल्याणीमावदानिजनेभ्यः ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्याय स्वायचारणाय " ( यजु० २६–२ ) या मंत्रांत " मी ही पवित्र वेदवाणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि स्वतःचे सेवक यांच्या कल्याणाकरितां उच्चारितों असें म्हटलें आहे; असो. चातुर्वर्ण्याचीं चार प्रकारचीं कामें करणारे लोक जेथें व्यवस्थित राज्यघटना आहे, तेथें असतातच. पण आमच्या धर्मांत त्यांचें व्यवस्थित वर्गीकरण करून व त्यांचीं कर्तव्यें ठरवून देऊन त्यांना जसें धार्मिक अधिष्ठान देण्यांत आलें आहे तसें दुसरीकडे कोठें नसल्यामुळें चातुर्वण्याची संस्था हा आमच्या धर्माचा विशेष आहे. स्वतःच्या या समाजव्यवस्थेबद्दल आर्यांना इतका अभिमान असे कीं " एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः। स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वं मानवाः " पृथ्वींतील सर्व लोकांनी आपण कसें वागावें हें या देशांतील ब्राह्मणांपासून शिकावें असें मनूने ( २–२० ) म्हटलें आहे.

वर्णविशिष्ट कर्तव्यें सांगितल्यानंतर सर्व वर्णांना सामान्य असे

**अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः**
**दानं दमो दया क्षांतिः सर्वेषां धर्मसाधनम्॥**

–या. स्मृ. ५–११२.

हे धर्म याज्ञवल्क्याने सांगितले आहेत. प्राण्यास पीडा न देणें, दुसऱ्याला पीडा न होईल असें यथार्थ भाषण करणें, दिल्यावांचून दुसऱ्याची वस्तु न घेणें, बाह्य व अभ्यंतर शुद्धता, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांची नियमित किंवा अनिषिद्ध विषयामध्येंच प्रवृत्ति होणें, यथाशक्ति अन्न, जल इ. देऊन प्राण्यांची पीडा कमी करणें, निषिद्ध विषयांपासून इंद्रियांस परत फिरविणें, जे आपत्तींत पडलेले असतील त्यांचें रक्षण करणें, आणि चित्तक्षुब्ध न होऊं देणें हीं ब्राह्मणापासून चांडालापर्यंत सर्वांचीं धर्मसाधनें आहेत, असें वरील श्लोकांत सांगितलें आहे. ज्या समाजांतले सर्व लोक वरील नियम पाळीत असतील त्या समाजांत शांतता नांदावी व त्याची प्रगति व्हावी हें अगदीं साहजिक आहे. समाजांतील वयांत आलेल्या व लग्न करून गृहस्थ झालेल्या प्रत्येक व्यक्तीला वर्णव्यवस्थेप्रमाणें प्राप्त झालेली सामाजिक जबाबदारी पत्करावी लागे. गृहस्थाश्रमांतील ही जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडतां यावी म्हणून ब्रह्मचर्याश्रमाची योजना करण्यांत आली. आर्यांच्या वर्णसंस्थेप्रमाणेंच त्यांची आश्रमसंस्थाही अद्वितीय आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य या तीनही वर्णांतील मुलांना उपनयन हा संस्कार अगदी आवश्यक असे. ब्राह्मणाच्या मुलाचें आठव्या वर्षी, क्षत्रियाच्या मुलाचें अकराव्या आणि वैश्याच्या मुलाचें बाराव्ये वर्षी उपनयन करावें असें याज्ञवल्क्याने सांगितलें आहे.

**उपनीय गुरुः शिष्यं महाव्याहृतिपूर्वकम् ।**
**वेदमध्यापयेदेनं शौचाचारांश्च शिक्षयेत् ॥**

(या. स्मृ. २–१५)

गुरूने शिष्याचें उपनयन करून त्याला वेदाध्ययन आणि शुद्ध आचार शिकवावे. गुरूच्या घरीं वेदाध्ययन पूर्ण होईपर्यंत या मुलांनी राहावयाचें असे. आणि स्मृतिकालीं मुलींचें उपनयन जरी बंद झालें असलें तरी प्राचीनकाळीं त्यांचेंही उपनयन करीत असत असें दिसतें. उपनयन हा अध्ययन सुरू करण्याच्या पूर्वी करण्याचा संस्कार आहे आणि त्रैवर्णिकांना उपनयन आवश्यक आहे असें म्हणणें म्हणजे प्रत्येक मुलाने शिक्षण घेणें हें त्या वेळीं आवश्यक होतें असा त्याचा अर्थ होतो. अध्यापनाप्रीत्यर्थ विद्या-

र्थ्यांने गुरूला कांही दिलेंच पाहिजे अशीही सक्ति नव्हती. अध्ययन समाप्त झाल्यानंतर ज्याची जशी शक्ति असेल त्याप्रमाणें गुरूला कांही तरी देऊन गुरुगृह सोडावें असा नियम असे. ब्राह्मणानें गाय, क्षत्रियानें गांव, व वैश्यानें घोडा द्यावा, असें कात्यायनानें सांगितलें आहे. हें देण्याची ज्यास शक्ति नसेल त्यानें, मनूनें सांगितल्याप्रमाणें धान्य, वस्त्रें किंवा भाजी द्यावी ( २–२४६ ). पण तेवढेंही सामर्थ्य नसल्यास कांही एक न देतां त्यांची आज्ञा घेऊन स्नान करावें, असें विज्ञानेश्वरानें सांगितलें आहे. याचा अर्थ असा होतो कीं, आमच्या धर्माप्रमाणें शिक्षण हें सर्वांना आवश्यक असूनही विनामूल्य मिळत असे आणि हें शिक्षण ज्या ठिकाणीं मिळत असे तीं गुरुकुलें नगरांतील गोंगाटापासून दूर परंतु नगरापासून फार लांब नाहीं अशा ठिकाणीं एखाद्या नदीच्या कांठीं, गर्द झाडीमध्यें वसलेलीं असत. तेथील सर्वच वातावरण अत्यंत शांत, पवित्र आणि रमणीय असें असे आणि तें तसेंच राहील अशी काळजी स्वतः राजासुद्धां घेत असे. गुरुकुलाच्या मर्यादेंत असलेल्या मृगादिकांची शिकार राजा स्वतःसुद्धां करीत नसे आणि गुरुकुलांतील लोकांच्या स्वास्थ्याची काळजी राजा नेहमी वाही. तेथील विद्यार्थी पहांटेस उठून स्नान करून संध्या व अग्निकार्यें करीत. संध्या नदीच्या कांठीं करणें फारच प्रशस्त होय. द्विजास व त्यांतूनही ब्राह्मणास ही उपासना अतिशय आवश्यक आहे असें विज्ञानेश्वर म्हणतो. संध्योपासना ही सूर्याची उपासना आहे. सूर्याला अर्घ्य देणें, गायत्री मंत्र म्हणून सवित्याच्या श्रेष्ठ अशा तेजाचें ध्यान करणें, त्या तेजाप्रमाणेंच तेजस्वी अशी बुद्धि सवित्यापासून आपल्याला मिळते अशी श्रद्धा ठेवणें व अशी बुद्धि देणाऱ्या सूर्याची प्रार्थना करणें ह्या संध्येंतील प्रमुख गोष्टी आहेत. प्रातःकाळीं उठून नदीवर स्नान करून सूर्याची उपासना करणाऱ्या आणि नंतर अग्निकार्य करून वडील माणसांना नमस्कार करणाऱ्या ब्रह्मचाऱ्याचें शरीर, मन, आणि बुद्धि हीं तेजस्वी व्हावीं यांत काय नवल ? हीं कृत्यें संपल्यानंतर विद्यार्थी अध्ययनाला प्रारंभ करीत. आणि तो करतांना गुरु आणि विद्यार्थी जो मंत्र म्हणत त्यावरून त्यांच्या अध्ययनाच्या ध्येयाची कल्पना येते. सहनौ अवतु । सहनौ भुनक्तु । सहवीर्यं करवावहै । तेजस्विनौ अधीतमस्तु । मा विद्विषावहै । शांतिः शांतिः शांतिः।

या मंत्राने अध्ययनाला प्रारंभ करण्यांत येत असे. प्रथमतःच परमेश्वर आमचें दोघांचेंही रक्षण करो असें म्हणून ईश्वराविषयींची आस्तिक्य बुद्धि प्रकट केली आहे. ईश्वराची कृपा नसेलें तर मनुष्याच्या प्रयत्नांना यश येत नाही. म्हणून त्याची आपल्यावर कृपा असावी अशी प्रार्थना केल्यानंतर त्याने आम्हां दोघांकडून सेवा घ्यावी अशी इच्छा व्यक्त केली आहे. ईश्वराने आपलें रक्षण करावें, आपल्यावर कृपा करावी अशी जर इच्छा असेल तर उलट ईश्वराचीही आपण सेवा केली पाहिजे. आणि ईश्वराला जें कार्य प्रिय आहे तें कार्य यथाशक्ति करूनच सेवा होण्यासारखी आहे. ईश्वराचें कार्य " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय " असें त्रिविध आहे. आणि या त्रिविध कार्यांत सहाय्यभूत होऊन ईश्वराची सेवा करावयाची असेल, तर त्याला पराक्रमाची आवश्यकता आहे. म्हणून " सहवीर्यं करवावहै " या चरणांत आमच्याकडून पराक्रमांची कृत्यें घडोत अशी इच्छा व्यक्त केली आहे. पण ही धाडसाचीं आणि पराक्रमी कृत्यें करण्याची स्फूर्ति तरुणामध्यें निर्माण होणें हें त्यांना मिळत असलेल्या शिक्षणावर अवलंबून असल्यामुळें आमचें शिक्षण तेजस्वी असो अशी इच्छा " तेजस्वी नौ अधीतमस्तु " या चरणांत व्यक्त केली आहे. सर्वांत पराक्रम यशस्वी होण्याला जर कोणती आवश्यक गोष्ट असेल तर परस्परांतील द्वेषाचा अभाव ही होय. द्वेषाचा आणि मत्सराचा ज्या लोकांच्या मनांत बुजबुजाट झाला आहे त्यांच्या हातून पराक्रम होणें कधींही शक्य नसल्यामुळें ' मा विद्विषावहै ' या चरणामध्यें आम्ही परस्परांचा कधींही द्वेष करूं नये अशी मागणी मागितली आहे. तात्पर्य, ईश्वराच्या ठिकाणी निष्ठा, त्याची सेवा करण्याची इच्छा, पराक्रमाची हौस, तेजस्वी अध्ययनाची गोडी, आणि परस्परांचा द्वेष न करतां सर्वांनी मिळून काम करण्याची प्रवृत्ति ह्या सर्व गोष्टी या मंत्रांत प्रतिबिंबित झाल्या आहेत. अशा तऱ्हेचीं थोर ध्येयें डोळ्यापुढें ठेवून अध्ययन, अध्यापन करणाऱ्या गुरुशिष्यांनी वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय शांति प्रस्थापित करावी यांत कांही आश्चर्य नाही.

वेदाध्ययन संपून विद्यार्थी घरीं जाण्यास निघाला म्हणजे गुरु त्याला जो उपदेश करीत तोही महत्त्वाचा आहे. " सत्यंवद । धर्मंचर । स्वाध्या-

यान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् । देवपितृकार्यान्न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यानि अनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि । यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि ।" (तै. उ. १–११) या मंत्रांतील सत्य बोलण्याविषयीं आणि सत्यापासून केव्हांही न ढळण्याविषयीं केलेला उपदेश, तसेंच गुरु आणि पिता यांच्याही वरती मातेला दिलेलें स्थान आणि आमचीं जीं चांगलीं कर्में असतील तेवढींच तुम्ही घ्या, इतर घेऊं नका असें सांगण्यांतील प्रांजलपणा महत्त्वाचा आहे. मनूप्रमाणेंच याज्ञवल्क्यानेही "मधुमांसांजनोच्छिष्टशुक्तस्त्रीप्राणिहिंसनम् । भास्करालोकनाश्लीलपरिवादादि वर्जयेत्" २–३३ असा नियम ब्रह्मचाऱ्याकरितां केला आहे. मद्य, बकऱ्याचें वगैरे मांस, आपलें किंवा दुसऱ्याचें उष्टें, निष्ठुर भाषण, उपभोगार्थ स्त्री, जीवांचा वध, उदय व अस्तसमयीं सूर्याचें अवलोकन, अश्लील व असत्य भाषण, दुसऱ्यामध्यें विद्यमान किंवा अविद्यमान दोषांचें कथन, अंगास उटी लावणें, गळ्यांत माळा घालणें, दिवसा निजणें, पायांत जोडा घालणें, छत्री घेणें, काम, क्रोध, लोभ, मोह, वाद्यें वाजविणें, अंगास उटणें लावून उष्णोदकानें स्नान करणें, अति हर्ष, नृत्य, गीत इत्यादि गोष्टी ब्रह्मचाऱ्यानें वर्ज कराव्या. उदयास्तसमयीं सूर्याचें अवलोकन वर्ज करण्यास सांगितलें आहे. त्याचें कारण कळत नाहीं. पण एकंदर नियम हे ब्रह्मचर्यपालनाला अत्यंत आवश्यक आहेत. ज्या रीतीचें खाणें आपण खावें त्या रीतीचीं द्रव्यें शरीरांत उत्पन्न होतात. तामस खाण्यानें तमोविकार उत्पन्न होतात. राजस खाण्यानें वृत्ति रजोगुणी बनते व सात्त्विक खाण्यानें वृत्ति सात्त्विक बनते. हे तीनही प्रकारचे आहार कसे असतात ते गीतेंत सांगितलें आहे:—

**आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ।**
**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।**

**आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥**
**यातयामं गतरसं पूतिपर्युषितं च यत् ।**
**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥**

१७–८, ९, १० ॥

आयुष्य, सात्त्विकवृत्ति, बल, आरोग्य, सुख आणि प्रीति हीं वाढविणारे, रसयुक्त, स्निग्ध, शरीरांत मुरून चिरकाल राहाणारे आणि मनाला आनंद-दायक आहार सात्त्विक मनुष्याला आवडतात. तिखट, आंबट, खारट, अति उष्ण, झणझणीत, रूक्ष, दाहकारक, आणि दुःख, शोक व रोग उत्पन्न करणारे आहार राजस पुरुषाला आवडतात. निवालेलें, नीरस, दुर्गंधी, शिळें झालेलें, उष्टें आणि अपवित्र अन्न तामसी माणसांना आवडतें. आपला मेंदु हें बुद्धीचें स्थान आहे. हा मेंदू जड आहे. आपण लहानपणापासून जें अन्न खातों त्याने तो बनत असतो. हें अन्न जर जड खाल्लें तर बुद्धीही जड होते. २०-२२ वर्षांपर्यंत मनुष्याचें शरीर व तदंतर्गत सर्व अवयव बनत व वाढत असतात. अशा वेळीं ब्रह्मचर्याने राहून शुद्ध व सात्त्विक आहार प्रत्येक मुलाने केला तर त्याची बुद्धीही अत्यंत तीव्र होईल. मनुष्याची सर्वांगीण वाढ व्हावयाची असेल तर तो २०–२२ वर्षांचा होईपर्यंत त्याच्या आहार-विहारांचें नियमन करणें किती अवश्य आहे हें यावरून लक्षांत येईल. ब्रह्मचर्याश्रमांत पूर्वीच्या काळीं मुलांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक वाढी-कडे पूर्ण लक्ष दिलें जाई. त्यांचे आहारविहार व आचारविचार यांवर कडक निर्बंध घातलेले असत व सर्व तऱ्हेचे कष्ट सोसण्याची या आश्रमांत त्यांची तयारी केली जाई. त्यामुळें तेजस्वी बुद्धीच्या आणि बलिष्ठ शरी-राच्या तरुणांची अखंड परंपरा, वर्ण व्यवस्थेप्रमाणें आपआपलें कार्य कर-ण्याकरितां पुढें येत राही. विद्वान् व वीर पुरुषांची वाण त्याकाळीं राष्ट्राला कधींही पडली नाहीं. दुर्दैवाने हा आश्रम योग्य रीतीने पाळण्याकडे हळुहळु दुर्लक्ष होऊं लागलें असें दिसतें. कमींतकमी १२ वर्षें तरी उपनयनापासून गुरुगृहीं राहिलें पाहिजे असा मनुस्मृतीच्या पूर्वी नियम असे. मनूच्या काळीं ही मर्यादा ९ वर्षांवर आली ( ३–१ ). आणि याज्ञवल्क्याच्या काळीं तर ती पांच वर्षांवर येऊन पोंचली ( २–३६ ). बारा वर्षें मर्यादा

जेव्हां होती तेव्हां वीस वर्षांपूर्वी मुलांचें लग्न होऊंच शकत नसे. ही मर्यादा जसजशी कमी होत गेली तसतसे बालविवाह रूढ होत गेले असावेत.

अध्ययन संपल्यानंतर, " अविप्लुतब्रह्मचर्यो लक्षण्यांस्त्रियमुद्वहेत् । अनन्यपूर्विकाम् कान्ताम् असपिंडाम् यवीयसीम् ॥ या. स्मृति ३–१. ज्याच्या ब्रह्मचर्याचें स्खलन झालें नसेल, त्याने बाह्य व आंतर लक्षणांनी युक्त, वाग्दानाने किंवा उपभोगाच्या द्वारा पूर्वी दुसऱ्या कोणाची न झालेली, वराच्या मनास आनंद देणारी, असपिंड व वयाने आणि अंगाने ( वरापेक्षां ) लहान अशा स्त्रीशीं विवाह करावा. अंगावर केस नसणें, कोणतेंही अंग व्यंग नसणें, मंजुळ भाषण इत्यादि बाह्य लक्षणें होत. वधूचीं हीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांत ती मोठ्या कुलांतली असावी व पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या कुष्ठ अपस्मारादि रोगांनी ग्रस्त नसावी या गोष्टीचाही समावेश केला पाहिजे. वरही मोठ्या कुलांतला असावा व वरील रोगांनी ग्रस्त नसावा. एतैरेव गुणैर्युक्तः सवर्णः श्रोत्रियो वरः । यत्नात्परीक्षितः पुंस्त्वे युवा धीमान् जनप्रियः ॥ या.स्मृ. ३–५५.दोषरहित, कन्येच्या समान वर्णाचा किंवा तिच्यापेक्षां उच्च वर्णाचा, स्वतः वेदाध्ययनसंपन्न, पुरुषत्वाविषयीं मोठ्या प्रयत्नाने ज्याची परीक्षा करविली आहे असा, तरुण, लौकिक व वैदिक व्यवहारामध्यें निपुण व मृदु आणि हंसत हंसत भाषण केल्यामुळें लोकांस प्रिय होणारा असा वर असावा.

त्रैवर्णिकांना शूद्र स्त्री पूर्वी पत्नी करतां येत असे. पण याज्ञवल्क्याला ती गोष्ट अगदीं नापसंत आहे. " यदुच्यते द्विजातीनाम् शूद्राद्दारोपसंग्रहः । नैतन्मममतं यस्मात्तत्रायं जायते स्वयम्" ३–५५. कारण त्या स्त्रीचे ठायीं हा द्विज पुत्ररूपाने उत्पन्न होतो. अर्थात् ब्राह्मणाने ब्राह्मणादि तीन, क्षत्रियाने क्षत्रियादि दोन व वैश्याने वैश्य वर्णांतील स्त्रीशीं विवाह करावा असें ठरतें. पण विज्ञानेश्वर म्हणतो कीं, असवर्ण कन्येशीं कलियुगांत विवाह होत नाहीत.

**सुरापी व्याधिता धूर्ता वन्ध्यार्थघ्न्यप्रियंवदा ।**
**स्त्रीप्रसूश्चाधिवेत्तव्या पुरुषद्वेषिणी तथा ॥**

या. स्मृ. ३–७३

सुरापान करणारी, दीर्घ रोगाने ग्रस्त, लबाड, वांझ, द्रव्यादिकांचा नाश करणारी, अप्रिय भाषण करणारी व जिला कन्याच होतात अशी स्त्री टाकून दुसरी करावी. मात्र टाकलेल्या स्त्रीला अन्नवस्त्र देऊन पोषण करावें. ह्याच्या उलट, आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या, गृहकृत्यांत दक्ष असणाऱ्या, पुत्रवती व प्रिय भाषण करणाऱ्या पत्नीचा त्याग करणाऱ्या पुरुषास राजाने त्याच्या धनाचा तिसरा भाग दंड करावा ( ३–७६ ). " संयतोपस्करा दक्षा हृष्टा व्ययपराङ्‌मुखी । कुर्यात् श्वशुरयोः पादवंदनं भर्तृतत्परा ॥"–पत्नीने गृहांतील सर्व उपकरणें व्यवस्थित ठेवावीं, गृहकृत्यांत दक्ष असावें, सदा हसतमुख राहावें, फार खर्च करूं नये, सासूसासऱ्यांना वंदन करावें आणि पतीच्या आधीन राहावें ( ३–८३). " भर्तृभ्रातृपितृज्ञातिःश्वश्रुश्वशुरदेवरैः । बन्धुभिश्चस्त्रियः पूज्या भूषणाच्छादनाशनैः " पति, भ्राता, पिता, आप्त, सासू, सासरा, दीर व इतर बंधु यांनी यथाशक्ति भूषणें, वस्त्रें व अन्न यांच्या योगाने स्त्रियांचा सत्कार करावा. कारण त्या प्रसन्न झाल्या असतां धर्मार्थकामांची वृद्धि करतात असें याज्ञवल्क्याने ( ३–८२ ) म्हटलें आहे. पुनर्विवाह प्रचारांतून जात चालला होता असें दिसतें. नियोगाची चाल कायम होती. व्यभिचाराबद्दल स्त्रियांना कमी प्रायश्चित्त होतें असें दिसतें. " व्यभिचारादृतौ शुद्धिः गर्भे त्यागो विधीयते " रजोदर्शन झालें असता व्यभिचाराचें पातक नष्ट होतें. मात्र त्यामुळें गर्भ राहिला असल्यास स्त्रीचा त्याग करावा असें सांगितलें आहे ( ३-७३ ). याज्ञवल्क्याच्या काळीं बालविवाह रूढ झाला होता असें दिसतें. कारण विवाहापूर्वीच कन्या ऋतुमती झाली तर योग्य काळीं तिचा विवाह न करणाऱ्याला प्रत्येक ऋतुसमयीं भ्रूणहत्या लागते असें याज्ञवल्क्याने म्हटलें आहे. प्राचीनकाळीं स्त्रियांचें उपनयन करून त्यांना शिक्षण देत असत. ही पद्धति पुढें बंद कां करण्यांत आली ? तसेंच त्यानंतर प्रौढ विवाहाची रूढि बदलून बालविवाहाची प्रथा कां पाडण्यांत आली याचीं स्पष्ट कारणें कोठें दिलेलीं आढळत नाहीत. तथापि स्त्रियांनी बौद्धिक श्रम केल्यामुळें आणि त्यांचीं लग्नें बरींच उशिरां केल्यामुळें त्यांच्या संततीवर कांही वाईट परिणाम झालेला तत्कालीन लोकांच्या लक्षांत आला असावा असा तर्क करतां येतो. बालविवाहावर आजकाल जे आक्षेप घेण्यांत

येतात ते बालविवाह आणि बालसंभोग या दोन्ही गोष्टी एकच आहेत असें समजून घेतल्यासारखे दिसतात. विवाहसंस्थेची घटना बनवणाऱ्या पूर्वीच्या लोकांचें लक्ष वधूवरांची कामलालसा तृप्त करण्यापेक्षां त्यांना होणारी संतति सुदृढ कशी होईल याकडे जास्त असे. बालविवाहामध्यें तरुणतरुणींना लग्नापूर्वी अनेक तरुणतरुणींशीं प्रेमचेष्टा करण्याची सवड नाहीं ही गोष्ट खरी. पण प्राचीन ऋषींच्या पुढें अशा रीतीचें ध्येयच कधीं नव्हतें. सूर्यवंशांतील राजे "प्रजायै गृहमेधिनाम्" असे असत. शिवाय बालविवाहानें एके ठिकाणीं आलेल्या वधूवरांमध्यें प्रेमाचा सर्वत्र अभाव असतो असें कोणाला म्हणतां येईल काय? आणि प्रौढविवाहामध्यें सर्वत्र प्रेमच नांदत असतें असें सांगतां येईल काय? याच्या उलट वधूवरांच्या स्वतंत्र अभिरुचि बनण्याच्यापूर्वी तीं एके ठिकाणीं आल्यामुळें परस्परांच्या सहवासानें आपल्या अभिरुचींना इष्ट तें वळण लावण्याची संधि त्यांना मिळते. त्यामुळें त्यांच्यामध्येंच चिरकाल प्रेमभाव टिकण्याचा संभव अधिक असतो. कारण या प्रेमाच्या मुळाशीं तारुण्यांतील वैषयिक वासनाच नसून, आदर आणि धार्मिक बुद्धीही असते. बालविवाहामुळें प्रजा कुचकामी होते या आक्षेपाला ज्ञानेश्वर एकनाथ, तुकाराम, रामदास व शिवाजी ह्या पुरुषांची कर्तबगारी हेंच चांगलें उत्तर आहे. प्रौढपणीं विवाह झालेल्या पतिपत्नींची प्रजा कशा रीतीची असते हें आज प्रत्यक्षच दिसत आहे. वंशवृद्धि कार्याशीं संबंध असणाऱ्या इंद्रियांचा शारीरशास्त्रदृष्ट्या विचार करून डॉ. अराबेला केनेली म्हणते कीं, "आधुनिक परिस्थितींत नवीन विचारांनी बहकलेल्या मुलींच्या स्तनप्रदेशाचा विकास खुरटला जात असून वंशवृद्धीस पोषक असणारे मातृत्वाचे पाझर त्यांच्यांत असूं शकत नाहीत. त्यांचें कटिर अरुंद व खुरटें राहात असल्यामुळें सशक्त प्रजेचें स्वाभाविक गर्भवासाचें स्थान या दृष्टीनें तें निरुपयोगी असतें. (हिंदुलग्नसंस्था पा. १५०) या बाबतींत लग्नाच्या अक्षता वधूवरांच्या डोक्यावर लहानपणीं पडल्या कीं मोठेपणीं पडल्या हा प्रश्न खरोखर महत्त्वाचा नाही. लग्नापूर्वी आणि लग्नानंतर ब्रह्मचर्याश्रमांत आणि गृहस्थाश्रमांत जे नियम वधूवरांनी पाळावयाचे असतात ते नियम दोघांनी जर योग्य रीतीनें पाळले असतील तर त्यांची प्रजा सशक्त झालीच पाहिजे; मग त्यांचा विवाह लहानपणीं झालेला असो

किंवा मोठेपणीं होवो. बालविवाहितांची प्रजा सशक्त झालेली आढळते आणि प्रौढ विवाहितांची प्रजा पुष्कळ वेळेला अशक्त दिसते याचें कारण लौकर लग्न होऊनही बालविवाहितांनी अवश्य ते नियम पाळलेले असतात आणि उशीरां लग्न झालें तरी लग्नापूर्वी व लग्नानंतर अवश्य ते नियम प्रौढ विवाहितांनी मोडलेले असतात. एकत्र कुटुंबपद्धतीमध्यें लहानपणीं लग्न झालेल्या वधूवरांकडून या नियमांचें पालन होणें सुलभ असे. आजच्या परिस्थितींत तें तितकें सुलभ राहिलेलें नाही, कारण एकत्र कुटुंब-पद्धति मोडली आहे. म्हणून परिस्थितीच्या अपेक्षेने बालविवाह करूं नयेत असें कोणी म्हणेल, तर तें चालण्यासारखें आहे. पण या प्रश्नाचा विचार परिस्थितिनिरपेक्ष जर केला तर विवाहाच्या प्रत्यक्ष काळा-पेक्षां वधूवरांच्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर आचरणालाच जास्त महत्त्व द्यावें लागतें. मुलामुलींच्या आचारविचारांना अनिष्ट वळण लागूं नये म्हणून त्यांचीं लग्नें लवकर न करितां प्रौढपणीं करावीं असा उपाय आजचे लोक सुचवितात पण हा उपाय निरुपयोगी आहे व विवाह उशिरां केल्यामुळेंच उलट त्यांच्या आचारविचारांना जास्त अनिष्ट वळण लागतें असें आढळून आल्यामुळें त्यांचीं लग्नें लवकर करणें व विशेषतः कन्येचें लग्न ऋतुप्राप्तीपूर्वी करणें हा उपाय सूत्रकालापासून या देशांतील पुढाऱ्यांना पटून, लोकांनी तो कृतींत आणावा म्हणून धर्मसूत्रांत व स्मृतींत त्यानीं तो सांगून ठेविला आहे. आतां त्याचा अतिरेक होऊन पाळण्याला बाशिंगें बांधण्यापर्यंत पाळी आली ही गोष्ट वेगळी.

याज्ञवल्क्याच्या काळीं वर्णावर्णांमधील विवाहही होत असत पण त्यांना बापाचा किंवा आईचा वर्ण न मिळतां त्यांची स्वतंत्र जात होत असे. मूर्धावसिक्त, अंबष्ठ, निषाद, पारशव, माहिष्य, उग्र, सूत, वैदेहिक इत्यादि अनेक जाती याज्ञवल्क्याने सांगितल्या आहेत पण या जाति खालील रीतीने पांचव्या किंवा सातव्या पिढीला वरिष्ठ वर्णांत जाऊं शकत. जात्युत्कर्षो युगे ज्ञेयः पंचमे सप्तमेऽपिवा । व्यत्यये कर्मणां साम्यं पूर्ववच्चाधरोत्तरम् ॥ ४–९६ ॥ ब्राह्मणाने शूद्रस्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न केलेली जी निषादी तिलाही ब्राह्मणानेच वरिलें व तिलाही जी कन्या झाली तिला ब्राह्मणानेच वरिलें तर अशाप्रकारें सहाव्या कन्येपासून उत्पन्न झालेली प्रजा ब्राह्मण वर्णाची

होते. याच्या उलट आपत्ती संपली असतांही ब्राह्मण जर खालच्या वर्णांचें काम करीत राहिला तर पांचव्या, सहाव्या आणि सातव्या पिढीस तो क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र होतो.

गृहस्थाने, विवाहाच्या वेळीं जो अग्नि प्रज्वलित केला जातो त्यावर सर्व स्मार्त कर्मं करावी. सकाळीं मंत्रजप व अग्नींत होम झाल्यानंतर त्याने वेद वेदार्थ व निरनिराळीं शास्त्रें वाचावी व पूर्वीच्या अध्ययनाची उजळणी करावी. नंतर एखाद्या राजाकडे किंवा आचारसंपन्न श्रीमंताकडे जाऊन योगक्षेमाला आवश्यक असलेलें द्रव्य आणावें. यावरून हा गृहस्थधर्म विशेषतः ब्राह्मणाला सांगितलेला दिसतो. नंतर स्नान करून भूतयज्ञ, पितृ-यज्ञ, देवयज्ञ, ब्रह्मयज्ञ व मनुष्ययज्ञ करावेत व बालक, विवाहानंतर पित्याच्या घरीं राहिलेली कन्या, वृद्ध, गर्भिणी, रोगी, कुमारिका, अतिथि व सेवक यांस आधीं भोजन घालून राहिलेलें अन्न, गृहस्थ व त्याची पत्नी यांनी खावें. श्रोत्रिय अतिथि प्राप्त झाला असतां त्याच्याकरितां मोठा बैल किंवा बकरा मारावा. येथें विज्ञानेश्वर व अपरार्क यांचा मतभेद आहे. विज्ञानेश्वराच्या मतें बकरा किंवा बैल मारण्याची आवश्यकता नाही. तो नुसता अतिथीपुढें आणून उभा करावा व तुमच्याकरितां हा तयार केला आहे असें सांगावें. कारण प्रत्येक श्रोत्रिय आला असतां त्याला बैल देणें किंवा त्याच्याकरितां बैलास मारणें संभवनीय दिसत नाही. याच्या उलट अपरार्क म्हणतात कीं, " मधुपर्क विधीने श्रोत्रियाकरितां बैलाचें हनन करणें हें श्रुतिप्राप्त असल्यामुळें येथें हननाकरितांच त्याची उपकल्पना करावी. " अतिथीला सीमेपर्यंत पोंचवावा व दिवसाचा राहिलेला भाग शास्त्रचर्चेंत घालवावा. दिवसाचा आठवा भाग निर्वाहाचें साधन मिळ-विण्यांत खर्चावा असें शंखस्मृतींत सांगितलें आहे. संध्याकाळीं पुनः सायं-संध्या व अग्नींत होम करावा व मिताहार करून निजावें. पहाटेस ब्राह्म-मुहूर्तावर उठून आत्मचिंतन करावें.

गृहस्थाने प्रतिवर्षी सोमयाग करावा. दक्षिणायनांत व उत्तरायणांत तें लागण्याच्या वेळेला पशुयाग करावा. त्याचप्रमाणें यथासंभव चातुर्मास्य-याग, दर्शपूर्णमास, निरूढ पशुबंध वगैरे याग करावे. सत्पात्रीं दान करावें. जे थकले असतील त्यांस आसन, शयन इत्यादि देऊन त्यांचे श्रम दूर

करणें, रोग्यांस यथाशक्ति औषधादि देऊन त्यांची परिचर्या करणें मोठमोठ्या आरोग्यशाला तयार करून त्यांत सर्व प्रकारच्या रोग्यांची चिकित्सा करविणें, अनेक औषधांचा व वैद्यांचा संग्रह करणें आणि रोग्यांस राहण्याकरितां जागा, त्यांच्या अन्नवस्त्राकरितां द्रव्य व शुश्रूषेकरितां मनुष्यें यांची व्यवस्था करणें हें एक उत्कृष्ट पुण्यकर्म आहे. कारण आरोग्य हें सर्व पुरुषार्थांचें मूळ आहे. शिवाय उपचारांच्या योगाने प्राण्यांच्या पीडेचा नाश कसा होतो हें प्रत्यक्ष अनुभवास येतें. तहानेल्यास पाणी व भीतास अभय दिलें असतां जितका आनंद होतो तितकाच आनंद आरोग्यदानाने रोग्यास होतो असें व्याख्यान विज्ञानेश्वरांनी याज्ञवल्क्य स्मृतींतील " रोगि-परिचर्या " या शब्दावर केलें आहे.

ब्राह्मण सर्व श्रेष्ठ असल्यामुळें त्यांना दान द्यावें; कारण धर्मरक्षणाकरितां त्यांना देवाने उत्पन्न केलें आहे. (८-१९८) तथापि सत्पात्र कोण याची व्याख्या खालीलप्रमाणें केली आहे. " न विद्यया केवलया तपसा वापि पात्रता। यत्र वृत्तमिमेचोभे तद्धि पात्रं प्रकीर्तितम्। या. स्मृ. (८-२००) केवल श्रुताध्ययनाच्या योगाने किंवा तपश्चर्येच्या योगाने संपूर्ण पात्रता येत नाही. तर ज्या पुरुषाच्या ठायीं वृत्त म्हणजे शील व विद्या आणि तप हीं असतात तोच सत्पात्र होय. केवळ जाती किंवा केवळ अनुष्ठान यांनी संपूर्ण पात्रता येत नाही असें मन्वादिकांनी सांगितल्याचा उल्लेख वरील श्लोकावरील टीकेंत विज्ञानेश्वरांनी केला आहे.

गृहस्थाने पितरांना उद्देशून नित्य नैमित्तिक श्राद्धें करावीं. सतत वेदाध्ययन करणारे ब्राह्मण श्राद्धाला बोलवावेत. तिल, व्रीहि, यव, माष, जल, मूल, फल इत्यादि हविष्यान्नाने पितर एक महिनाभर तृप्त होतात. गाईच्या दुधाच्या पायसाने त्यांची एक वर्षभर तृप्ति होते. मासे, निरनिराळ्या जातींचीं हरिणें, मेंढा, काळवीट, सांबर, रानडुकर व ससे यांचें मांस ब्राह्मणांस दिलें असतां पितर अधिक अधिक तृप्त होतात. वसु, रुद्र, आदित्य देवतांचा समावेशही पितरांमध्येंच होतो. या देवता पितरांना व श्राद्ध करणाऱ्या त्यांच्या प्रजेला संतुष्ट करितात.

गृहस्थाने आपलीं कर्तव्यें केल्यानंतर योग्यकालीं पत्नीला पुत्राच्या स्वाधीन

करून वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. एक महिन्यापासून एक वर्षपर्यंत पुरेल इतकाच धनधान्यसंचय या आश्रमांत करावा आणि तपाने विषयवासना नष्ट झाली म्हणजे संन्यासाश्रम घ्यावा. " अधीतवेदो जपकृत् पुत्रवान् अन्नदोऽग्निमान् । शक्त्या च यज्ञकृन्मोक्षे मनः कुर्यात्तु नान्यथा ॥४–५७॥ वेदाध्ययन करून गृहस्थाश्रम योग्य रीतीनें ज्याने पाळला असेल त्यानेंच मोक्षाकरितां खटपट करावी. इतरांनी करूं नये. तथापि हा आश्रम एकदम ब्रह्मचर्याश्रमांतूनही घेतां येत असे. शिवाय संन्यास हा फक्त ब्राह्मणानाच विहित आहे कीं त्रैवर्णिकांना विहित आहे याबद्दलही स्पष्ट निर्देश नसल्यामुळें दुमत आहे. मनूच्या लिहिण्याच्या रोखावरून संन्यास फक्त ब्राह्मणानाच विहित आहे असें दिसतें व एकनाथकालींही तशीच समजूत होती हें पुढें दाखवूं. सर्वभूतहितः शांतः त्रिदंडी सकमंडलुः । एकारामः परिव्रज्य भिक्षार्थी ग्राममाश्रयेत् ॥ या. स्मृ. ४–५८ ॥ सर्व भूतहितः याचें सर्व भूताविषयीं उदासीन असें भाषांतर विज्ञानेश्वराने केलें आहे. तें अर्थातच बरोबर नाही. सर्व भूतांचें हित करणारा, शांत, त्रिदंडी, कमंडलु हातांत घेणारा, एकटा रहाणारा व भिक्षेपुरता गांवाचा आश्रय करणारा असा संन्यासी असावा. संन्याशाने एकटें राहावें, यावर मनु व याज्ञवल्क्य यांचा फार कटाक्ष दिसतो. एकाराम म्हणजे दुसरे संन्यासी व संन्यासिनी स्त्रिया यांनी रहित. कारण " स्त्रीणां चैके " असें म्हणून बौधायनाने स्त्रियांनाही संन्यासाचा अधिकार सांगितला आहे. संन्यासी व संन्यासिनी स्त्रिया यांनी एके ठिकाणीं राहूं नये असा नियम, बौद्ध भिक्षु व भिक्षुणी यांच्या अनुभवावरून स्मृतिकारांनी घातला असावा. "वर सांगितल्या प्रकारचा एकच यति हा भिक्षु होय. तेच दोघे झाले कीं त्यांचें जोडपें होतें. तीन भिक्षु म्हणजे तो ग्राम बनतो आणि त्यापुढें म्हणजे चार-पांच भिक्षूंनी एकत्र रहाणें म्हणजे तें नगरच होय. कारण त्यांच्यामध्यें परस्पर राजवार्ता, भिक्षावार्ता, चहाड्या, मात्सर्य इत्यादि होणें अपरिहार्य आहे. म्हणून यतीने एकटेंच राहिलें पाहिजे असें दक्षस्मृतींतही सांगितलें आहे. संन्याशानें वेदान्ताचा व योगाचा अभ्यास करावा व मुक्ति मिळवावी. मात्र मुक्तीकरितां संन्यास घेतलाच पाहिजे असें नाही. कारण स्वार्थत्यागपूर्वक चालविलेला गृहस्थाश्रम संन्यासाश्रमाइतकाच श्रेष्ठ आहे.

**न्यायागतधनस्तत्त्वज्ञाननिष्ठोऽतिथिप्रियः ।**
**श्राद्धकृत्सत्यवादीच गृहस्थोऽपिहि मुच्यते ॥**

न्यायाने ज्याने धन मिळविलें आहे, तत्त्वज्ञानाच्या ठिकाणीं ज्याची निष्ठा आहे, जो अतिथीच्या पूजनांत तत्पर आहे, जो नित्यनैमित्तिक श्राद्धें करितो व नेहमीं सत्य बोलतो तो गृहस्थ जरी असला तरी तो सुद्धां मुक्त होतो असें सांगण्यास याज्ञवल्क्य ( ४–२०५ ) विसरले नाहीत.

राजा कसा असावा यासंबंधानें याज्ञवल्क्यांची कल्पना फार मोठी आहे. विनीत, सत्यसंपन्न, उत्साही, वडिलांची सेवा करणारा, स्मृतिमान्, झटपट कामें उरकणारा, उदार, दयाळू, वर्णाश्रमधर्मयुक्त, निर्व्यसनी, बुद्धिमान् शूर व राजनीतीमध्यें निपुण असा राजा असावा. वंशपरंपरेने चालणारे बुद्धिमान् असे मंत्री नेमून त्यांच्या साहाय्याने त्याने राज्यकारभार करावा. पुरोहित नेमून, राजसूयादि यज्ञ करून पुष्कळ दक्षिणा द्यावी. ब्राह्मणांना भूमिदान केलें तर पुढील राजांना समजण्याकरितां त्याबद्दल ताम्रपट करून द्यावा. स्वसंरक्षणार्थ दुर्ग करून त्यांत राहावें. त्याचे अधिकारी प्रामाणिक असावे. राजाने पित्याप्रमाणें प्रजेचें पालन करावें. ब्राह्मणेषु क्षमी स्निग्धेष्वजिह्मः क्रोधनोऽरिपु । स्याद्राजा भृत्यवर्गेषु प्रजासु च यथा पिता(१३-३३४) अशी राजासंबंधीं कल्पना त्यावेळीं होती. राष्ट्रांत जे अधिकारी असतील त्यांच्याही वर्तनावर राजाने लक्ष ठेवावें.

**अन्यायेन नृपो राष्ट्रात् स्वकोशं योऽभिवर्धयेत् ।**
**सोऽचिरात् विगतश्रीको नाशमेति सबांधवः ॥ १३–३४०॥**
**प्रजापीडनसंतापात् समुद्भूतो हुताशनः**
**राज्ञः कुलं श्रियं प्राणाश्चादग्ध्वा न निवर्तते ॥ १३–३४१ ॥**

जो राजा लोकांकडून अन्यायाने पैसा उकळून आपल्या खजिन्याची भर करतो, तो लवकरच वैभवशून्य होऊन बांधवांसहित नाश पावतो. प्रजेला पीडल्यामुळें उत्पन्न झालेला अग्नि राजाचें कुल, वैभव व प्राण घेतल्याबाचून कधींही शांत होत नाही अशा तऱ्हेचा हा महासिद्धांत याज्ञवल्क्याने तत्कालीन व त्यानंतर होणाऱ्या राजाकरितां कायमचा सांगून ठेविला आहे. जे निर्दोषी नाहीत त्यांना दंड करूं नये व जे दोषी आहेत ते मग बंधु किंवा पुत्र जरी असले तरी त्यांना राजाने शिक्षा केली पाहिजे.

कुलानि जातिः श्रेणीश्च गणान् जानपदानपि ।
स्वधर्माच्चलितान्राजा विनीय स्थापयेत्पथि ॥

लोक आपल्या धर्मापासून च्युत झाले तर त्यांना दंड करून योग्य मार्गाला लावावें; विद्वान्, धर्मज्ञ, सत्यवादी व शत्रुमित्रांना सारखा न्याय देणाऱ्या निःपक्षपाती ब्राह्मणांच्या सहित राजाने न्यायदानाचें कार्य करावें व निर-निराळ्या व्यवहारांचा निर्णय करावा. अग्नि, जल इत्यादि दिव्यांचाही उपयोग न्यायदानाच्या कामांत याज्ञवल्क्याच्या पूर्वीपासून शिवकालापर्यंत करीत. मात्र इतर साधनांच्या अभावीं हें साधन स्वीकारावें असें सांगितलें आहे. याज्ञवल्क्याने, न्यायालयांत येणारे एकंदर १८ प्रकारचे व्यवहार सांगितले आहेत. कर्ज घेणें, ठेव ठेवणें, स्वतःची नसलेली वस्तु विकणें, अनेकांनी केलेला व्यापार, दिलेलें धन परत घेणें, वेतन न देणें, ठराव मोडणें, विकत दिलेल्या किंवा घेतलेल्या वस्तूबद्दल वाद, गुराढोरांबद्दल वाद, शिव्यागाळी, मारामारी, चोरी, दरोडे, व्यभिचार, दायभाग, वगैरे गोष्टींचा निर्णय न्यायालयांत होत असे. त्याकरितां साक्षी कसे असावे, एकंदर प्रमाणें किती आहेत यांच्या सविस्तर वर्णनाने व प्रायश्चित्तांनी याज्ञवल्क्य स्मृति बहुतेक भरलेली आहे.

विटाळ व शुद्धाशुद्धता यासंबंधीं खालील विवेचन आहेः—

कारुहस्तः शुचिः पण्यं भैक्ष्यं योषिन्मुखं तथा ॥ (या. स्मृ. ८-१८७)
रंगारी, शिंपी, धोबी, इत्यादिकांचे हात सदा पवित्र असतात. म्हणजे त्यांस सुतक आलें तरी त्यांचे धंदे त्यांना करितां येतात. बाजारांत विकण्या-करितां मांडलेले पदार्थ, भिक्षान्न व स्त्रीचें मुख हीं नेहमीं शुद्धच असतात. देवकर्मांत व पितृकर्मांत नेहमीं धुतलेलें वस्त्रच नेसावें. मूल्यवान् लोकरीचीं वस्त्रें, वायु, सूर्य, चंद्र, किरण यांनी शुद्ध होतात. दुसऱ्याची शय्या, आसन, वस्त्र इत्यादि वस्तु अशुद्ध समजाव्या. रोग्याच्या वस्तूंशीं निरोग्याने संबंध ठेवूं नये.

कोणतें अन्न, पशु व पक्षी, खावे यांचें विस्तृत विवेचन या स्मृतींत आहे. कांदा, लसूण, ग्रामडुक्कर, लाल गाजर, गांवांतलें कोंबडें खाऊं नये. घोरपड, कासव, ससा, हे खाण्यास हरकत नाहीं. सिंह, उंट, मासेही भक्ष्य आहेत. " प्राणात्यये तथा श्राद्धे प्रोक्षितं द्विजकाम्यया । देवान् पितॄन्

समभ्यर्च्य खादन मांसं न दोषभाक् ॥ ७–१७९ ॥ प्राण जात असला तर किंवा श्राद्धांत देवपितरांना अर्पण करून मांस भक्षण केल्यास दोष नाही. दानप्रकरणांत खालील श्लोक आहे. " कुशाः शाकं पयो मत्स्याः गंधाः पुष्पं दधिक्षितिः । मांसं शय्यासनं धानाः प्रत्याख्येयं न वारि च ॥ २१४ ॥ दर्भ, भाजी, दूध, मासे, फुलें, दहीं, मांस, जल हे पदार्थ कोणी दिल्यास स्वीकार करावा. यावरून शाकाहाराबरोबरच मांसाहार व मत्स्याहार त्या वेळचे लोक करीत असत हें उघड दिसतें. कोणाचें अन्न खावें व कोणाचें खाऊं नये याविषयींचे नियमही पाहण्यासारखे आहेत.

कंजूष, वद्ध, चोर, नपुंसक, रंगस्थानी जाणारा, बुरूड, पापी, भलतेंच व्याज घेणारा, वेश्या, अनेकाचे यज्ञ करणारा, निर्दय राजा, राजाचा पुरोहित, रंगारी, कृतघ्न, खाटिक, परीट, कलाल, खोटें बोलणारा, तेली, भाट, व सोम विकणारा यांचें अन्न घेऊं नये. तसेंच वैद्य, महारोगी, कोपिष्ट, व्यभिचारिणी, गर्विष्ठ, शत्रु, स्वतंत्र स्त्री, सोनार, स्त्रीलंपट, ग्रामजोशी, शस्त्रें विकणारा, लोहार, सुतार, शिंपी यांचेंही अन्न भक्षू नये. मात्र

**शूद्रेषु दासगोपालकुलमित्रार्धसीरिणः ।**
**भोज्यान्ना नापिताश्चैव यश्चात्मानं निवेदयेत् ॥**

या. स्मृ. ६–१६६

दासीच्या उदरीं जन्मलेला, गायी राखणारा, कुलपरंपरेने मित्र असलेला, उत्पन्नाचा भागीदार, घरांतील कामें करणारा, न्हावी आणि मी तुमचाच आहें असें म्हणणारा, इतके लोक शूद्रांमध्यें भोज्यान्न आहेत. म्हणजे हे लोक शूद्र असले तरी त्यांचें अन्न खाल्लेलें त्या वेळीं चालत असे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या त्रैवर्णिकांमध्यें खाण्याचा व्यवहार निष्प्रतिबंध सुरूच असे. पण शूद्रामध्येंही वरील लोकांचें अन्न स्नातकांनी खाल्लेलें चालत असे. ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत सर्वच लोक मांसमत्स्याहार करीत असल्यामुळें खाण्याचा निर्बंध जातीवर न ठेवितां गुण व धंदे यावर ठेविलेला आहे. निर्दय राजा, त्याचा पुरोहित, ग्रामजोशी, महारोगी, व्यभिचारिणी, भलतेंच व्याज घेणारा सावकार यांजकडचें अन्न धार्मिकांनी वर्ज केलें पाहिजे असेंही वर सांगितलें आहे.

## प्रकरण सहावें.

# महाराष्ट्रांतील जुन्या राजवटी.

मनु आणि याज्ञवल्क्यस्मृतीच्या आधारें इ. स. पूर्व दोन शतकापासून इ. स. नंतर पांच शतकेंपर्यंत लोकांचे आचारविचार कसे होते ते आतांपर्यंत पाहिले. त्यावरून असें दिसतें कीं, त्रैवर्णिकांतील शरीरसंबंध अजिबात बंद झाले नसले तरी त्यांवर थोडें थोडें नियंत्रण बसत चाललें होतें. त्रैवर्णिकांतील अन्नव्यवहारावर अजून निर्बंध नव्हते; एवढेंच नव्हे तर कांही शूद्रांच्या घरींही त्रवैर्णिकांनी अन्न खाल्लें तरी चालत असे. श्रौत यज्ञयाग एकंदरीत कमी झालेले दिसले तरी गृह्यसंस्कार प्रचलित होते. मूर्तिपूजा अस्तित्वांत आली होती व अशारीतीने बौद्ध क्रांतीच्या वादळांतून वैदिक संस्कृतीची नाव सुरक्षितपणें बचावून नेण्याचें कार्य तत्कालीन पुढारी करीत होते. त्यामुळें पूर्वीच्या केवळ श्रुत्यक्त धर्मांना आतां श्रुतिस्मृत्युक्त स्वरूप प्राप्त झालें होतें.

मनुस्मृति झाली त्या काळांत महाराष्ट्रांत शातवाहन किंवा आंध्रभृत्य यांचें राज्य होतें. इ. स. पूर्वीच्या पहिल्या शतकापासून तो इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत या शातवाहनांचें कोंकण, महाराष्ट्र, कुंतल या सर्व भागांमिळून बनलेल्या प्रदेशावरच नव्हे तर खालीं दक्षिणेकडील प्रदेशावरही अधिराज्य स्थापन झालें होतें. यांची राजधानी पैठण ही होती. हे मूळचे नागवंशी असावे. आरंभीं आंध्र राजांच्या पदरीं असल्यामुळें हे आपणांस आंध्रभृत्यही म्हणवीत. इ. स. पूर्वी पहिल्या शतकांत पाटलिपुत्राचें राज्य जिंकून महाराष्ट्रही त्यांनी जिंकिलें. त्यामुळें या अफाट साम्राज्याची राजधानी म्हणून पैठणला फार महत्त्व आलें. अशोकाच्या वेळींही पैठणची प्रसिद्धि होती. पण त्या वेळीं तेथें कोण राज्य करीत होते तें नक्की समजत नाही. पैठणचीं उंची रेशमी व जरीकांठी वस्त्रें प्रसिद्ध आहेत. स्त्रियांच्या उंची वस्त्राला पैठणी असें अद्यापि म्हणतात. तेथील विद्वान् लोकांपुढें तंटे तोडावयास मुसलमानांच्या कारकीर्दींतही जात असत. महाराष्ट्राच्या पुढील कोणत्याही राजधानीला पैठणची सर आली

नाही. या शातवाहन राजांनी पुढें क्षत्रियांच्या मुलींशीं लग्नें केलीं. यामुळें त्यांचे पुत्र आपल्या मातांचा आपल्या नांवांत बहुमानपूर्वक उल्लेख करीत. गौतमीपुत्र, वासिष्ठीपुत्र असें आपल्या नांवामागें विशेषण यांपैकीं कित्येक राजांनी लाविलें आहे. सिमुख, कृष्ण, शातकर्णी, पुलुमायी, व यज्ञश्री हे प्रसिद्ध राजे या वंशांत होऊन गेले. यांच्याच कारकीर्दीत "कातंत्र" व्याकरण आणि महाराष्ट्री प्राकृतांतील "सप्तशती" रचिली गेलीं. कार्ल्यांचीं आणि भाजें येथील लेणीं यांच्याच कारकीर्दींत खोदलीं गेलीं. यांच्या राज्यांत बौद्ध आणि वैदिक धर्म गुण्यागोविंदाने नांदत. एकंदर प्रजा जरी बौद्धधर्मी नव्हती तरी बौद्ध यतींबद्दल लोकांत आदर असल्यामुळें राजे आणि श्रीमान् लोक त्यांच्याकरितां लेणीं खोदीत व त्यांच्या चरितार्थाकरितां गांवें इनाम देत. हे यति वर्षभर प्रवास करून पावसाळ्यांत या लेण्यांमध्यें राहात. श्रावण महिन्यांत नवीन वस्त्रें धारण करण्याचा विधि ते करीत असत. हे यति समुद्र आणि खाड्यांमधूनही प्रवास करीत असल्यामुळें त्यांच्याकरितां किनाऱ्यावरील डोंगरांत लेणी खोदलेलीं असत. कान्हेरी, चिपळूण, महाड, खेड येथील लेणी यांपैकींच होत. बौद्ध यतींप्रमाणेंच ब्राह्मणांचाही समाचार घेतला जात असे. उषवदत्ताने ब्राह्मणांना दानधर्म केल्याचें नासिकजवळील लेण्यांत खोदलें आहे. गौतमीपुत्र हा ब्राह्मणांचा रक्षणकर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. लक्षब्राह्मणभोजन घालणें, स्वतःच्या खर्चानें ब्राह्मणाचें लग्न लावणें वगैरे प्रकारांनी हे राजे ब्राह्मणांना आश्रय देत असत. व्यापार जोरांत असे. "निगमसभा" नांवाची ग्रामपंचायतीसारखी संस्था असे. तिच्याद्वारें गांवातील कारभार चाले. लोकांची बोलण्याची भाषा महाराष्ट्री प्राकृत असे.

शातवाहनानंतर चालुक्य येईपर्यंतचा महाराष्ट्राचा तीन शतकांचा इतिहास नीट सांपडत नाही. या काळांत लहान लहान राज्यें महाराष्ट्रांत अस्तित्वांत असावींत. राष्ट्रकूटांचें राज्यही या काळांत महाराष्ट्रांत असावें असा डॉ. भांडारकर यांचा तर्क आहे. या काळांत मध्यप्रांतांतील वाकाटकांचें महाराष्ट्रावर राज्य असावें असा रा. वैद्य यांचा तर्क आहे. या वंशांत विंध्यशक्ति व प्रवरसेन हे दोन प्रसिद्ध राजे झाले व त्यांचा उल्लेख अजिंठा येथील लेण्यांतील शिलालेखांत आहे.

यानंतर महाराष्ट्रांत चालुक्यांचें राज्य इ. स. च्या ६ व्या शतकांत स्थापन झालें. हे अयोध्येकडून आले. त्यांनी गोविंद राष्ट्रकूटाचा पराभव करून महाराष्ट्रांत राज्य स्थापिलें. यांच्या बरोबरच कदाचित् याज्ञवल्क्य स्मृति महाराष्ट्रांत आली असावी. यांची राजधानी बदामी ही होती. या घराण्यांतील जयसिंह नांवाच्या पुरुषानें राष्ट्रकूटांचा पराभव केला. त्याचा पुत्र रणराग व त्याचा पुत्र पहिला पुलकेशी याने महाराष्ट्र व इतर अनेक प्रांत जिंकून दक्षिणेकडे साम्राज्य स्थापलें व अश्वमेध यज्ञ केला. यावरून बौद्ध धर्माचा यावेळीं पाडाव होऊन वैदिक धर्माचा ऊर्जित काल आला असें दिसतें. चालुक्य राजांच्या अमदानींत महाराष्ट्रांतील विद्वान् ब्राह्मणांनी श्रौत विद्येचा अभ्यास करून तींत प्राविण्य मिळविलें. सगळ्या हिंदुस्थानांतच वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन होऊन यज्ञविधींचा अभ्यास सुरू झाला होता. उत्तरेकडे मगध देशांत बौद्धांचा पाडाव करून तेथें प्राचीन वैदिक धर्म पुनः स्थापन झाल्याची खूण म्हणून समुद्रगुप्तानेही अश्वमेध केला होता. तसाच महाराष्ट्रांत पुलकेशीनेही केला. तथापि या वंशांतील कांही राजांवर जैन धर्माची छाप होती असें दिसतें. दुसऱ्या विक्रमादित्याने एका जैनमंदिराचा जीर्णोद्धार करून एका जैन पंडिताला देणगी दिल्याचा उल्लेख आहे. चालुक्याच्या वेळेस पौराणिक धर्मालाही चालना मिळाली. ब्रह्मा, विष्णु, महेश, देवी, कार्तिकेय यांच्या उपासनेचा प्रचार सुरू झाला व मोठमोठीं मंदिरें बांधलीं गेलीं. बदामी येथील लेण्यांत पौराणिक देवतांच्या मूर्ति खोदल्या आहेत. चालुक्यांच्या वंशांत दुसरा पुलकेशी मोठा पराक्रमी निघाला. त्याने कांचीच्या पल्लवांस जिंकिल्यामुळें नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व प्रदेशाचा तो सम्राट् झाला. उत्तरेचा सम्राट् हर्षवर्धन याचा त्यानें पराभव केला. याने इराणच्या राजाकडे वकील पाठविले. इ. स. ६४० मध्यें ह्युएनत्संगाने त्याला भेट दिली. त्या वेळीं तो नासिक येथें होता. ह्युएनत्संगाने मराठ्यांचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे. "महाराष्ट्रांतील लोक प्रामाणिक, करारी पण कोणी अपमान केला तर त्याचा सूड घेणारे आहेत. उपकारकर्त्याबद्दल ते कृतज्ञ असतात पण शत्रूला ते कर्दनकाळ वाटतात. त्यांचा कोणी अपमान केला तर स्वतःचा जीव धोक्यांत घालूनही ते त्याचा सूड घेतील. दुसरा अडचणींत

सांपडला तर त्याला जीवापलीकडे ते मदत करतील. शत्रूवर सूड घ्यावयाचा असतांही ते त्याला प्रथम सूचना देतात व तो सशस्त्र झाला म्हणजे भाल्यांनी लढतात. येथील राजा पुलकेशी नांवाचा क्षत्रिय आहे. त्याच्या योजना आणि कर्तृत्व फार मोठें आहे आणि त्याच्या औदार्यावद्दल सर्वत्र प्रसिद्धि आहे. उत्तरेकडच्या शिलादित्य राजानें सर्व उत्तर हिंदुस्थान जिंकला पण पुलकेशीला अद्याप जिंकलें नाही. ह्युएनत्संगाने सांगितलेली ही हकीगत देऊन रमेशचंद्र दत्त म्हणतातः—

Nor was Shiladitya destined to conquer Pulkeshi who defeated him in battle and maintained the independence of the proud Maharattas even as a successor of Pulkeshi, a thousand years later defied Aurangzeb, Emperor of Northern India and restored to the Mahrattas their lost independence and greatness. And when Mogal and Rajput had alike declined in power it was the countrymen of Pulkeshi who struggled with the English for the mastery of India.

Ancient India. P. 535.

शिलादित्यानें पुलकेशीला जिंकिलें नाही; उलट पुलकेशीनेच त्याचा पराभव केला आणि मानी मराठ्यांचें स्वातंत्र्य त्याने कायम राखलें. यानंतर एक हजार वर्षांनी पुलकेशीच्याच परंपरेतील राजाने उत्तर हिंदुस्थानचा बादशहा औरंगझेब याला महाराष्ट्रांत जर्जर करून सोडलें आणि मराठ्यांचा मोठेपणा आणि स्वातंत्र्य परत मिळविलें. त्यानंतर मोगली आणि रजपुत सत्ता जेव्हां निर्बल झाल्या तेव्हां पुलकेशीच्याच देशबांधवांनी हिंदुस्थानच्या स्वामित्वाकरितां इंग्रजांशीं लढाया दिल्या." रमेशचंद्र दत्त यांच्या या उद्गारांनी कोणत्या मराठ्याचें हृदय अभिमानाने फुगून जाणार नाही ?

ह्युएनत्संगानें या देशाला शिंतु, अथवा हिंतु हें नांव आहे असें सांगून निरनिराळ्या वर्णासंबंधाने पुढीलप्रमाणें विधानें केली आहेत. " या देशांत आढळून येणाऱ्या नानाविध लोकांत व जातींत ब्राह्मण हे अतिशुद्ध व सर्वांना मान्य आहेत; इतके कीं त्यांच्या निष्कलंक कीर्तीमुळेंच त्या सर्व देशाला ब्रह्मावर्त किंवा ब्राह्मणांचा देश असें लोकसंमत नांव पडलें होतें.

क्षत्रिय आणि ब्राह्मण यांचें वर्तन निष्कलंक आणि अगदी साधें असून त्यांच्यांत डामडौल फारसा नसतो व त्यांची राहणी काटकसरीची असते. या देशांत आनुवंशिक अशा चार जाति असून त्या आपआपल्या तत्त्वाला न सोडतां समाधान वृत्तीने राहतात. या जातींत क्षत्रियांचा क्रम वरून दुसरा असून त्यांत राजे लोकांचा अंतर्भाव होतो. त्यांचें राज्य येथें पिढ्यान्पिढ्या चाललें असून परोपकार व भूतदया हीं त्यांच्या राज्यपद्धतीचीं मुख्य तत्त्वें आहेत. या लोकांत विवाह फक्त जातीजातींतच होतात व स्त्रिया पुनर्विवाह कधींच करीत नाहीत.'' तथापि भिन्न वर्णांत विवाह होणें अगदीच बंद झालें नव्हतें व स्मृतिकारांचे नियम पूर्णपणें अंमलांत आले नव्हते. हर्षाची कन्या वल्लभीच्या ध्रुवभटाला दिली होती. हा वैश्य-क्षत्रिय विवाह होता. हर्षाची बहीणही क्षत्रियाला दिली होती. मंदसोर येथील शिलालेखांत रविकीर्ति नांवाच्या ब्राह्मणाने भानुगुप्ता नांवाच्या वैश्य स्त्रीशीं विवाह केल्याचा उल्लेख आहे. तात्पर्य, अनुलोमविवाह अगदीच बंद झाले नव्हते. ब्राह्मणवर्णांत पोटभेद पडले नव्हते, तीच गोष्ट क्षत्रिय वर्णाची. वैश्यांचीही एकच जात होती. पण या चार वर्णांशिवाय इतर धंदे करणारे लोक अनेक होते. कपडे शिवण्याची कला तेव्हां अस्तित्वांत आली नसावी. एकच वस्त्र कमरेभोंवती गुंडाळून तेंच एका खाकेघालून दुसऱ्या खांद्यावर पुरुष घेत. रेशमी, तागाचीं व लोकरीचीं वस्त्रें विणीत असत. डोक्यांत लोक माळा घालीत. पुढें उष्णीष म्हणजे पागोट्यासारखें शिरस्त्राण घालण्याचीही पद्धत पडली असावी. पुरुष शुभ्रवस्त्रें वापरीत. वायकांचीं वस्त्रें चित्रविचित्र रंगांचीं असत. विधवा स्त्रिया शुभ्रवस्त्रें वापरीत. पुरुष व स्त्रिया दागिने वापरीत. कानांना भोकें पाडीत. प्रौढविवाह अगदीच बंद झाले नव्हते. स्त्रियांत पडद्याची पद्धति असे.

बौद्ध, जैन व हिंदु सर्वच मूर्तिपूजक बनले होते. शिवपूजा व शाक्तपंथ अस्तित्वांत आले होते. ब्राह्मण लोक अग्निहोत्र पाळीत. राजे अश्वमेध यज्ञ क्वचित् करीत पण पुढें हर्षाने ही पशुहत्या बंद केली असावी. दक्षिणेंत बदामीच्या चालुक्यांनी अग्निष्टोम, वाजपेय, पौंडरीक, अश्वमेध इत्यादि यज्ञ केले. राजा राज्यकारभार स्मृतीप्रमाणें करी व सैन्याची व्यवस्था हत्ती, घोडे, रथ व पायदळ अशी चतुरंग असे. हर्षकालीन लोकस्थिति वरील-

प्रमाणें असल्याचें रा. वैद्य यांनी वर्णिलें आहे. चालुक्यांचें राज्य महाराष्ट्रावर इ. स. ५५० ते ७५३ पर्यंत होतें. नंतर तें राष्ट्रकूटांकडे गेलें. इ.स. ७५३ ते ९७३ पर्यंत त्यांनी मालखेड येथें राज्य केलें. गोविंद हा या वंशांतला पहिला मोठा राजा झाला. कृष्णराज नांवाच्या राजाने वेरूळ येथील प्रसिद्ध कैलास लेणें खोदवलें. या वंशांतील अमोघवर्ष राजाची जैन धर्मावर फार भक्ति असे. कदाचित् तो जैनही झाला असावा. या काळजे राजे राण्या, आपल्या उपास्य देवतांचीं मंदिरें बांधण्यांत फार खर्च करीत. या देवालयांत विपुल संपत्ति असे व मुसलमानांनी पुढें या देवळांची लूट केली. चालुक्यांच्या कारकीर्दींत यज्ञयाग जोरांत आले होते. कारण मीमांसक कुमारिलभट्ट त्याच कारकीर्दींत आपल्या मताचा प्रसार करीत होते. ते संन्यास मानीत नसत. त्यांचा निधनकाल इ. स. ७०० असावा व ते उत्तरेकडील रहिवासी असावे असें रा. वैद्य यांचें मत आहे. ते द्राविड होते असेंही कित्येक म्हणतात. त्यांच्यानंतर एक शतकाने राष्ट्रकूटांची कारकीर्द सुरू असतां प्रसिद्ध शंकराचार्य जन्माला आले व त्यांनी बौद्धांच्या संन्यासाला विरोध न करितां बौद्धांच्या अनात्मवादाचें खंडन करून बौद्धधर्माच्या पाडावाचें कुमारिलभट्टांनी सुरू केलेलें कार्य पूर्ण केलें. मात्र हिंसाप्रधान यज्ञयागांना त्यांनी उचलून धरिलें नाही. ब्रह्मसूत्रांवर, उपनिषदांवर व गीतेवर भाष्यें लिहून, त्यांनी आपल्या अद्वैत मताचा व मायावादाचा प्रसार सर्व हिंदुस्थानांत केला. त्यांचा जन्म मलबारांत कालदी नगरींत इ. स. ७८८ मध्यें झाला व ३२ व्या वर्षी ते समाधिस्थ झाले. कोणी म्हणतात त्यावेळेस त्यांनी संन्यास घेतला तर कोणी म्हणतात ते यावेळीं हिमालयांत निघून गेले. पण या ३२ वर्षांपैकीं पहिलीं कांही वर्षें अध्ययनांत घालवून व नंतर वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रसार सर्व हिंदुस्थानांत करून चार टोंकाला चार मठ स्थापून त्यांनी जी मोठी कामगिरी केली त्यावरून ते एक लोकोत्तर पुरुष होते असें वाटल्यावांचून रहात नाही. या काळामध्यें ब्राह्मणक्षत्रियांनी शेतीचा धंदा करण्यास सुरवात केली. याच्या उलट ब्राह्मण व वैश्यांना क्षत्रिय कर्म करण्याची मोकळीक विशिष्ट कारणाकरितां, वसिष्ठस्मृतीने दिली. " आत्मत्राणे वर्णसंकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीताम् । क्षत्रियस्यतु तन्नित्यमेव रक्षणाधिकारात् ". मनुस्मृतींत

'शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते' असे सांगितलें होतें, त्यापेक्षां वरील नियम जरा व्यापक झाला आहे. याकाळीं सुद्धां त्रैवर्णिक लोक प्रसंगविशेषीं एकत्र भोजन करीत. ब्राह्मणाप्रमाणेंच कित्येक क्षत्रियही शास्त्राध्ययनांत प्रवीण असत. त्याकाळीं हिंदुस्थानांत सर्वत्र लहान लहान राज्यें असून ते राजे आपआपसांत लढत. शिपायांमध्यें राष्ट्रभक्तीची कल्पना नसे. ते स्वामिभक्त असत त्यामुळें राजा पडला कीं ते लढाईतून पळून जात. राष्ट्र ही भावना विद्वान् लोकांत असली तरी सर्वसामान्य लोकांत पसरली नसल्यामुळें परक्यांना यशस्वीपणाने तोंड देतां आलें पाहिजे तितकें पुढें देतां आलें नाही. तथापि हिंदुस्थानाच्या इतिहासांतील इ. स. ८०० ते १००० हा काल अत्यंत भाग्याचा होता. या कालांत परक्यांच्या स्वाऱ्या झाल्या नाहींत. सर्वत्र बौद्ध धर्माचा पाडाव होऊन वैदिक धर्माच्या छत्राखालीं हिंदुस्थानांतील चातुर्वर्ण्य सुखाने नांदत होतें.

यानंतर महाराष्ट्रावर पुनः चालुक्यांचें राज्य इ. स. ९७३ ते ११८९ पर्यंत झालें. सोमेश्वर आणि विक्रमादित्य हे पराक्रमी राजे या वंशांत झाले. त्यांनी बेदरजवळ कल्याण नगराची स्थापना करून तेथें आपली राजधानी केली. विक्रमादित्याने १०७६ ते ११२६ पर्यंत ५० वर्षें राज्य केलें व याच्याच पदरच्या विज्ञानेश्वर या पंडिताने याज्ञवल्क्य स्मृतीवर 'मिताक्षरा' नांवाची टीका लिहिली. याने आपल्या टीकेच्या शेवटीं "कल्याण सारखें नगर, विक्रमादित्यासारखा राजा व विज्ञानेश्वरासारखा पंडित या पृथ्वीवर कधीं झाला नाही व पुढेंही कधीं होणार नाही" असे उद्गार काढले आहेत. त्यांत अतिशयोक्ति असली तरी थोडा तथ्यांशही आहे. विक्रमादित्याचा मुलगा सोमेश्वर हाही विद्वान् होता. त्याने अभिलषितार्थचिंतामणि नांवाचा ग्रंथ रचिला. यानंतरचे कांही राजे दुर्बल निघाले. त्यामुळें कलचुरी घराण्यांतील, चालुक्यांच्या पदरीं असलेल्या एका बिज्जल नांवाच्या सेनापतीने राजाला पदच्युत करून सत्ता आपल्या हातांत घेतली. याचा मुख्यप्रधान बलदेव नांवाचा होता. त्याचा भाचा बसव हा होता. मामा मरण पावल्यावर भाचा प्रधान झाला व याने आपला भाचा चेन्नबसव यास हाताशीं धरून, शंकराचें लिंग व नंदी यांच्या उपासनेचा लिंगायत पंथ काढला. हा जैनधर्माला विरोधी म्हणून काढण्यांत आला.

या पंथाला बसवाने राजाश्रय देऊन भरभराटीला आणलें. पुढें राजाचें व बसवाचें वितुष्ट आलें व बसवाला पकडण्याची खटपट त्याने केली. बसव पळून गेला. शेवटीं दोघांचें युद्ध होऊन विज्जलाचा पराभव झाला व बसवाने राजसत्ता बळकावून विज्जलाला ठार मारलें. त्यामुळें राजधानींत बंड झालें तेव्हां बसवानें पळून जाऊन मलप्रभा नदींत जीव दिला असें म्हणतात. चेन्नबसवाने हा पंथ पुढें वाढविला. वैश्यवर्णांत त्याला पुष्कळच अनुयायी मिळाले कारण याच वर्णाचे बरेच लोक जैन झाले होते. हा पंथ महाराष्ट्रांत अद्यापीहि आहे. हा पंथ बसवेश्वरापासून सुरू झाला नसून त्याची बीजें वेद कालांतही सापडतात. वेदांत रुद्र व शिव ह्या देवता आहेत व पाशुपत संप्रदायाचा उल्लेख महाभारतांतही आहे. बसवेश्वरापूर्वी वीरशैवांचे पांच मुख्य आचार्य होऊन गेले. त्यांचे प्रसिद्ध पांच मठ असून ते अद्यापि चालू आहेत. त्यापैकीं एक बद्रीकेदारला व एक काशी येथें असून तीन दक्षिण हिंदुस्थानांत आहेत. वीरशैव हे वेदांतील कर्मकांड मानीत नाहीत. आगमांना ते वेदांपेक्षां अधिक महत्त्व देतात. त्यांच्यामध्यें दीक्षाग्रहण, विवाह व उत्तरक्रिया एवढे तीनच संस्कार आहेत. वैदिक संस्कारांप्रमाणें यांच्यांत अग्नीची उपासना नाही. त्याऐवजीं त्यांच्यांत कलश मुख्य आहे. संस्काराचे मंत्र वैदिक नसून आगमोक्त आहेत आणि उपाध्यायही ब्राह्मण नसून त्यांच्याच जातीचे असतात. १२ व्या शतकापासून वीरशैव विद्वानांनी अनेक ग्रंथ केले आहेत. त्यांना वचनशास्त्र म्हणतात. हे वचनकार दोनशेंहून अधिक असून त्यांत कित्येक स्त्रियाही आहेत. वीरशैव तत्त्वज्ञानांत २९तत्त्वें सांगितलीं आहेत पण तीं सांख्यांहून भिन्न आहेत. बसवेश्वर हा मोठा समाजसुधारक होता. त्याने जातिभेद मोडून सर्व लिंगधारी समान दर्जाचे आहेत असें ठरविलें. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचें स्थान समाजांत दिलें. विधवाविवाहाला परवानगी दिली व प्रथमविवाहित व पुनर्विवाहित स्त्रियांची योग्यताही सारखी ठरविली. अस्पृश्यता काढून टाकली. कर्म व तपश्चर्या यापेक्षां अंतःशुद्धीवर अधिक भर दिला. भिक्षा मागण्याचा निषेध केला व साध्या रहाणीचा उपदेश केला. आणि स्वतःच्या श्रमांवर उपजीविका करणारांची योग्यता अधिक ठरविली. आत्मशुद्धीने सर्व पातकांची शुद्धि या जन्मांतच करितां येते, त्याकरितां पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. अशा

तऱ्हेचें वीरशैव लिंगायतांचें तत्त्वज्ञान व संस्कृति आहे असें या पंथांतील विद्वान् डॉ. नंदीमठ यांनी वर्णिलें आहे.

बसवानंतर चालुक्यांनी कांहीं दिवस राज्य केलें पण यादवांनी त्यांना जिंकिल्यामुळें ११९० त चालुक्यांचें राज्य संपलें. त्यांच्या अमदानीत बौद्ध धर्म महाराष्ट्रांतून बहुतेक नाहीसा झाला. जैन धर्माची भरभराट थांबली व लिंगायत पंथ पुढें सरसावला. चालुक्य आणि याचवेळीं ठाण्यास राज्य करीत असलेले शिलाहार यांच्या आश्रयाने पुष्कळ ब्राह्मण पंडित निर्माण झाले व त्यांनी स्मृतिग्रंथांवर टीका लिहून धर्मशास्त्राला व्यवस्थितपणा आणला. शिलाहार वंशांतील महाराजाधिराज कोंकण चक्रवर्ती दुसरा अपरादित्य याने याज्ञवल्क्यस्मृतीवर अपरार्क नांवाची टीका लिहिली. काश्मीर-सारख्या दूर देशांतही या ग्रंथाचा आधार घेतात यावरून कोंकण व काश्मीर यांच्यात दळणवळण असावें असें दिसतें. काश्मीरांत भरलेल्या पंडितसभेला पहिल्या अपरादित्यातर्फे तेजःकंठ नावाचा पंडित गेला होता. त्या वेळचे क्षत्रियसुद्धां संस्कृत चांगलें जाणत असें दिसतें. चालुक्य आणि शिलाहार यांचे वंशज चाळके व शेलार नांवाने अजूनही महाराष्ट्रांत आहेत.

याच काळांत प्रसिद्ध रामानुजाचार्यांचा जन्म इ. स. १०१७त झाला. त्यांनी विशिष्टाद्वैतमताचा पुरस्कार करून, शंकराचार्यांप्रमाणेंच उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व गीता यावर भाष्यें लिहून व मायावादाचें खंडन करून आपल्या मताचा प्रचार केला आणि पूर्वीपासून अस्तित्वांत असलेल्या भक्तिपंथाला जोराची चालना दिली.

पाणिनीच्या कालापूर्वीपासून वासुदेवभक्ति हिंदुस्थानांत सुरू होती. या एका वासुदेवाचीच वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध हीं स्वरूपें आहेत या कल्पनेला 'चतुर्व्यूह' असें नांव आहे. पांचरात्र ग्रंथांत या कल्पनेचा पुरस्कार केला असल्यामुळें या जुन्या वैष्णव मताला 'पांचरात्र' सिद्धान्त म्हणत असत. रामानुजाचा वैष्णव सिद्धान्त, जुना पांचरात्रसिद्धांतच असून त्यांत नारायण आणि विष्णु ह्या दोन तत्त्वांचा आणखी समावेश आहे. त्याच्या मतें ईश्वराचें अत्यंत पूज्य नांव नारायण आहे. भगद्गीतेचा भक्तियोग त्याने घेतला आहे. भक्तीचें स्वरूप त्याच्या मतें परमेश्वराचें सतत ध्यान हें आहे. अहिंसा तत्त्वाला वैष्णव आणि लिंगायत या दोन्ही

पंथांनी मान्यता दिलेली आहे. या दोन पंथांत पुनः अनेक उपपंथ होते व पुढें झाले. शाक्त आणि गाणपत्य पंथ बहुधा याच काळांत निर्माण झाले असावे. या पंथांत हळूहळू आग्रहमूलक भांडणें सुरू झालीं व मोक्षप्राप्ती-च्या साधनांसंबंधाने सामान्य लोकांना निर्णय करणें अत्यंत कठिण झालें. याच कालांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्यामध्यें शेंकडों पोटजाति निर्माण झाल्या. वर्णावर्णांतील, जातीजातींतील विवाह बंद झाले व बाल-विवाह रूढ झाले. पुनर्विवाह बंद झाले. सतीची चाल सुरू होती. वृद्ध-पणीं गंगेत किंवा इतर पवित्र नदींत प्राण देण्याची चाल या वेळीं होती. या काळांत अहिंसेची लाट सर्वत्र पसरली होती. जैन, वैष्णव, शैव व ब्राह्मण यांनी मांसाहार वर्ज केला व त्यामुळें अन्नव्यवहारावरही आपो-आपच नियंत्रण आलें. पूर्वी त्रैवर्णिकांचें व कित्येक शूद्रांचेंही अन्न सर्वांना चालत असे. आतां ती स्थिति राहिली नाही. हिंदूंत शेंकडों धर्मपंथ व शेंकडों जाति झाल्यामुळें परस्परांतील रोटीबेटीव्यवहार बंद होऊन समाजांतील संघटितपणा नाहीसा झाला व विस्कळितपणा आला. मूळ वैदिक धर्म मागें पडून निरनिराळ्या पंथाचे आगम व तंत्रें यांनाच महत्त्व आलें. अग्निपूजा बाजूला राहून मूर्तिपूजा पुढें आली व निरनिराळ्या देव-तांच्या भक्तीचे निरनिराळे विधि व पंथ प्रचारांत आले. शिव, विष्णु देवी आणि गणपति यांच्या अनेक मान्य मूर्तीसंबंधानें सबंध हिंदुस्थानांत प्रसिद्ध असलेलीं क्षेत्रें पुराणांत वर्णिलीं असून त्यांचीं माहात्म्यें सांगितलीं आहेत. स्कंद पुराणांत हिंदुस्थानांतील चौऱ्याशीं प्रसिद्ध शिवलिंगें सांगितलीं असून त्यांच्या थोरपणासंबंधीं पौराणिक गोष्टी दिल्या आहेत. उपस्मृत्या व उपपुराणें याच कालाच्या सुमाराला निर्माण झालीं. कलियुगामध्यें, "समु-द्रयान, संन्यास, असवर्णविवाह, दिरापासून नियोगविधीने प्रजा उत्पन्न करणें, श्राद्धात मांसाचें दान देणें, वानप्रस्थाश्रम, पुनर्विवाह, दीर्घकाल ब्रह्मचर्य, नरमेध, अश्वमेध, गोमेध, इत्यादि गोष्टी वर्ज आहेत" असें सांगणारीं शास्त्रें याच काळांत निर्माण झालीं.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी कीं उत्तर हिंदुस्थानांत वैदिक संस्कृतीवर इस्लामी संस्कृतीने हल्ला चढवून वैदिक संस्कृतीच्या वंशजांमधील दुर्गुण जगाच्या निदर्शनास आणले. हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें पुष्कळ असत

व साम्राज्याच्या महात्त्वाकांक्षेने आपसांत लढून हे सर्वच दुर्बल व विभक्त होत. त्यामुळें इस्लामी हल्ल्यांना त्यांना तोंड देतां आलें नाहीं. इ. स. ७१२ मध्यें अरबांनी सिंध घेतलाच होता. नंतर गझनीच्या महंमदाने पंजाबचा उच्छेद करून सोमनाथ, मथुरा व इतर अनेक ठिकाणच्या मूर्ति फोडून अगणित लूट नेली. महंमद घोरीने पृथ्वीराजास मारून ११९२ मध्यें बहुतेक उत्तर हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आणिला आणि नंतर जयचंदाला मारून कनोज व काशी शहरांचा विध्वंस केला. अशा रीतीने वेदांची जन्मभूमि परक्यांच्या ताब्यांत गेली.

उत्तरेकडे वैदिक धर्मावर प्राणसंकट ओढवलें असतांना इकडे महाराष्ट्रांत चालुक्य व यादव यांच्यांत लढाया चालल्या होता. या यादवांच्याच कारकीर्दींत महाराष्ट्र मुसलमानांच्या ताब्यांत गेला. यादवांची सत्ता चार-पांच शतकें महाराष्ट्रावर कमीजास्त प्रमाणांत होती. चालुक्यांच्या राजवटींत आरंभीं यादव हे मांडलिक असावे. यांचें राज्य स्यून अथवा सेउण देशावर होतें. नाशिक-खानदेशच्या प्रदेशाला पूर्वीं सेउण देश म्हणत असत. त्याची राजधानी श्रीनगर म्हणजे हल्लीचें सिन्नर ही होती. दृढप्रहार नांवाच्या एका यादव राजपुत्राने उत्तरेकडून येऊन हें राज्य स्थापन केलें. पुढें राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार इत्यादि महाराष्ट्रांतील क्षत्रिय घराण्यांशीं यांचे शरीरसंबंध झाले. या घराण्यांतील भिल्लम नांवाच्या राजाने सोमेश्वर चालुक्याला जिंकून, देवगिरी येथें यादवांच्या सर्वप्रसिद्ध राज्याची स्थापना केली. इ. स. ७९५ पासून ११९०पर्यंत जे यादव मांडलिक होते ते आतां संपूर्ण महाराष्ट्राचे अधिपति झाले. यादववंशाचीच एक शाखा कृष्णेच्या दक्षिणेकडे राज्य करीत होती. त्यांना होयसल यादव असें म्हणत. यांच्यापैकीं एका राजाने ११९१ मध्यें भिल्लमाला ठार मारिलें. याचा मुलगा जैत्रपाळ नांवाचा होता. याच्या कारकीर्दींत विद्येला पुष्कळच उत्तेजन मिळालें. याचा मुलगा सिंघण यादव याने यादवांची सत्ता कुंतल, माळवा, गुजराथ, छत्तिसगड इत्यादि प्रदेशांवर बसविली. पन्हाळ्याच्या शिलाहारांचें राज्य आपल्या राज्याला जोडलें. याचा सेनापति वऱ्हाडांतील खोलेश्वर हा होता. खोलेश्वराचें घराणें मूळचें राणी उमरावती येथील असावें असें रा. देशपांडे यांचें म्हणणें आहे. हा पुढें जोगाईच्या आंब्यास राहूं लागला.

हा मुद्गल गोत्री ब्राह्मण असून याने व याच्या मुलाने अनेक लढाया जिंकून यादवांची सत्ता वाढविली. याचा मुलगा राम हा गुजराथचा राजकुमार वीसलदेव याच्याशीं लढत असतांना मारला गेला. सिंघण यादवाचा दुसरा सेनापति त्रिचण म्हणून होता. हाही खोलेश्वराचाच मुलगा होता असें म्हणतात. त्याने दक्षिण कोंकण व दक्षिण महाराष्ट्र हे देश जिंकले व कदंब आणि पांडव राजांना जिंकून "कावेरी"च्या कांठी जयस्तंभ उभारला. यावरून पराक्रमी आणि क्षात्र वृत्तीच्या ब्राह्मणांची परंपरा महाराष्ट्रांत अनेक शतकांपासून चालत आली आहे हें लक्षांत येईल. या खोलेश्वराने वरदा-तटावर अनेक मंदिरें बांधलीं, ब्राह्मणांना अग्रहार दिले. पाणपोया व विहिरी बांधल्या. सिंघण राजाच्या या स्वामिनिष्ठ सेनापतीने अनेक पराक्रम करून व त्याचा मुलगा राम याने लढाईंत प्राणही अर्पण करून बहुतेक सर्व महाराष्ट्र यादवांच्या आधिपत्याखालीं आणला याबद्दल या पराक्रमी ब्राह्मण सेनापतीची महाराष्ट्राला सदैव आठवण राहिली पाहिजे. क्षत्रिय राजा आणि त्याचे ब्राह्मण सेनापति ही परंपरा महाराष्ट्रांत यानंतरही आढळून येते. शिवाजीमहाराज आणि त्यांचे सेनापती मोरोपंत पिंगळे, शाहूमहाराज आणि त्यांचे सेनापति पहिले बाजीराव, रघोजीराव भोंसले आणि त्यांचे सेनापति कोल्हटकर या जोड्या महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. सिंघण राजा आपल्यास "पृथ्वीवल्लभ" म्हणवी आणि त्याचें निशाण सुवर्णगरुडांकित असे. त्याचा नातु कृष्ण याने पुष्कळ यज्ञ केले व पटवर्धन, घैसास, पाठक इत्यादि कोंकणस्थ, देशस्थ ब्राह्मणांस गांवें इनाम दिलीं. "क्षीणः कालवशात् पुनस्तरुणतां धर्मोऽपि संप्रापितः" असें याविषयीं हेमाद्रीने म्हटलें आहे. त्याचा भाऊ महादेव याने, तेलंगण, गुजराथ, कोंकण प्रांतावर स्वाऱ्या केल्या व ठाण्याचा शिलाहारवंशी राजा सोमेश्वर यावर समुद्रांतून हल्ला करून त्याला ठार मारिलें व अशा रीतीने उत्तर कोंकणही आपल्या राज्याला जोडलें. केशव ब्राह्मणाकडून याने "आप्तोर्याम" नांवाचा यज्ञ केला होता. कृष्णदेवाचा मुलगा रामदेवराव हाच या घराण्यांतील शेवटचा राजा झाला. याने दानधर्म बराच केला. परंतु

याच्या पराक्रमासंबंधी फारशी माहिती नाही. याच्याच कारकीर्दींत महाराष्ट्रांत हिंदु आणि यावनी संस्कृतींची गांठ पडली.

यादव राजे हे वैदिक संस्कृतीचे व विद्यांचे भोक्ते होते. त्यांनी यज्ञयाग केले व विद्यांना उत्तेजन दिलें. त्यांच्या कारकीर्दींत, ज्योतिष, संगीत वेदान्त, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक इत्यादि शास्त्रांवर अनेक ग्रंथ झाले. व मराठी भाषेंत ग्रंथरचनेला सुरवात याच काळांत झाली. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य यांच्याच कारकीर्दींत उदय पावले. यांनी सिद्धांतशिरोमणी, करणकुतूहल, व लीलावती हे ग्रंथ केले. यांचा मुलगा लक्ष्मीधर हा जैत्रपाळ यादवाच्या सभेंत मुख्य पंडित होता. आद्यकवि मुकुंदराज हे जैत्रपाळाचे गुरु होते असें म्हणतात. यांनी "विश्व सुज्ञात होऊनि सुखी व्हावें" म्हणून "उपनिषदांचें मंथन करून एक ग्रंथ निर्माण केला" त्याचें नांव विवेकसिंधु असें आहे. हा ग्रंथ वैनगंगेच्या तीरीं भंडाऱ्याजवळ अंभोरें म्हणून गांव आहे तेथें मुकुंदराजांच्या आजेगुरूंच्या समाधीजवळ लिहिला. या ग्रंथाच्या शेवटीं "नृसिंहाचा बल्लाळ, त्याचा कुमार जैत्रपाळ, तेणें करविला हा खेळ, ग्रंथरचनेचा" असें मुकुंदराजांनीं लिहिलें आहे. मुकुंदराज हे आंबे जोगाईलाही रहात असत. त्यांची समाधि बैतुलजवळ खेडले गांवीं आहे. त्यांच्या ग्रंथाची भाषा अर्वाचीन दिसत असल्यामुळें ते आद्यकवि नसावे असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण ज्ञानेश्वरींत विवेकसिंधु, विवेकामृत असे दोन शब्द सहजासहजी आलेले आहेत त्यावरून मुकुंदराज ज्ञानेश्वराच्या समकालीन किंवा किंचित् अगोदर झाला असावा असा राजवाड्यांचा तर्क आहे. विवेकसिंधूची हल्लींची प्रत जोगाईच्या आंब्यास असणाऱ्या दुर्बोध मूळ प्रतीवरून साक्षात् केली नसून विवेकसिंधूची वाचतां येण्यासारखी व अर्थात् अर्वाचीन लोकांस समजण्यासारखी दुसरी एक प्रत आंब्यास आहे तीवरून केलेली असावी या प्रवादाचाही त्यांनी उल्लेख केला आहे. सिंघणाच्या पदरीं भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा होता. त्याने खानदेशांत पाटण येथें जोतिषविद्यालय काढलें होतें. याच कारकीर्दींत शार्ङ्गधराने "संगीत रत्नाकर" हा ग्रंथ लिहिला. कृष्णदेवाचे कारकीर्दींत जल्हणाने "सूक्तिमुक्तावली" नांवाचा सुभाषित ग्रंथ लिहिला. पण या सर्वांपेक्षां महादेव व रामदेव या शेवटल्या दोन राजांचा मुख्य प्रधान

हेमाद्रि वा हेमाडपंत व त्याचा मित्र बोपदेव यांनी ग्रंथरचना करून व करवून विद्येला पुष्कळच उत्तेजन दिलें. हेमाद्रि हा माध्यंदिन शाखेचा, वत्सगोत्री ब्राह्मण होता. याने धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ केले असून त्यांत "चतुर्वर्गचिंतामणि" हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. या ग्रंथाचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड व परिशेषखंड असे पांच भाग आहेत. याने आयुर्वेदरसायन नांवाचा वैद्यकावरही एक ग्रंथ लिहिला आहे. "राज प्रशस्ति" नांवाच्या ग्रंथांत यादव घराण्याचा इतिहास दिला आहे. मोडी लिपी हेमाद्रीनेच प्रचारांत आणली. राज्यकारभाराच्या व आयव्ययाच्या पद्धति याने ठरवून टाकल्या. घरें बांधण्याची नवी तऱ्हा काढली. त्यांना हेमाडपंती घरें म्हणतात. देवळें, तलाव वगैरे लोकोपयोगी कार्यें याने केली व एकंदर राज्यकारभाराला व्यवस्थित वळण देण्याचा प्रयत्न केला. पण खोलेश्वरासारखा सेनापति त्यावेळीं नसल्यामुळें, यादवांचें राज्य टिकलें नाही.

हेमाद्रीचा मित्र बोपदेव हा वऱ्हाडांतील वरदा नदीच्या काठच्या वेदपद नांवाच्या गांवचा होता. याचा आजा महादेव व बाप केशव होता. केशवाचा "सिद्धमंत्र" नावाचा वैद्यकावर ग्रथ असून त्यावर बोपदेवाने "सिद्धमंत्रप्रकाश" नांवाची टीकाही लिहिली आहे. केशवाने आपला जन्म महादेवापासून झाला असें वरील ग्रंथांत म्हटलें आहे. त्यावर टीका करतांना बोपदेवानें, "महादेवो वेदपदाभिधानमहाराष्ट्रनिवासी विप्रः" महादेव हा वेदपद नांवाच्या गावीं रहाणारा महाराष्ट्रीय ब्राह्मण होता असें म्हटलें आहे. बोपदेवानें व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन व भागवतावर तीन असे सव्वीस प्रबंध लिहिल्याचें हेमाद्रीने म्हटलें आहे. मुक्ताफल, हरिलीला व परमहंसप्रिया असे तीन ग्रंथ बोपदेवाने भागवतावर लिहिले. पैकीं पहिले दोन भागवताचें तात्पर्य सांगणारे असून तिसरा भागवतावरील टीका आहे. विद्वान् लोकांमध्यें भागवत धर्माची आवड त्यावेळीं उत्पन्न झाली होती असें यावरून दिसतें. भागवत पुराणाचा काल निश्चित नाही. कोणीं तें बोपदेवाने केलें असें म्हणतात. पण तें तत्पूर्वी बराच काल झालें असलें पाहिजे.

भागवतधर्माचे आणि द्वैतमताचे प्रसिद्ध पुरस्कर्ते श्रीमध्वाचार्य यांचा जन्म यादवांच्याच कारकीर्दीत १२व्या शतकाच्या अखेरीस झाला.

श्रीशंकराचार्यांनी वेद हे अद्वैतप्रतिपादक आहेत असें सांगितलें. श्रीरामानुजांना ते विशिष्टाद्वैतप्रतिपादक आहेत असें वाटलें तर श्रीमध्वाचार्यांनी ते द्वैतच सांगत आहेत असें प्रतिपादिलें. याशिवाय निंबारक नावाचे आचार्य ११६२ इसवीमध्यें बेल्लारी प्रांतीं जन्मले. त्यांच्या मतें द्वैतही खरें व अद्वैतही खरें असल्यामुळें त्यांनी भेदाभेद वादाचा पुरस्कार केला. पण यांच्या मताचे अनुयायी महाराष्ट्रांत नाहीत. शंकराचार्य आणि मध्वाचार्य यांचे अनुयायी महाराष्ट्रांत आहेत. श्रीरामानुजाचार्यांच्या भक्तिमार्गाचाही महाराष्ट्रांतील भक्तिमार्गावर बराच परिणाम झाला असावा म्हणून या तीनही आचार्यांचें तत्त्वज्ञान कसें आहे तें कालानुक्रमाने थोडक्यांत पाहूं.

श्रीशंकराचार्यांच्या मतें सर्व चराचराला व्यापून राहिलेलें निर्गुण, निराकार असें एक परमात्मतत्त्व तेवढें नित्य व सत्य असून नामरूपात्मक सृष्टीचा सर्व पसारा त्यावर भासमान होणारा व विनाशी असल्यामुळें मिथ्या आहे. जीव आणि परमात्मतत्त्व यांत भेद नाही. बुद्धीच्या उपाधींत सांपडलेल्या परमात्म्यालाच जीवात्मा असें आपण म्हणतों. जीवाने हें ज्ञान करून घेऊन आपण परमात्मस्वरूपच आहोंत असें ओळखणें म्हणजेच मोक्ष मिळविणें आहे. असा मोक्ष मिळाला म्हणजे जन्ममृत्युपरंपरेंतून तो मुक्त होतो. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः" असा हा अद्वैत्यांचा सिद्धांत आहे.

श्रीरामानुजाचार्य हे विशिष्टाचें अद्वैत मानणारे आहेत. चेतन जीव आणि अचेतन जगत् यांनी युक्त असा परमात्मा एक आहे असें त्यांचें मत आहे. डाळिंबांत अनेक दाणे असूनही आपण डाळिंबाला एकच म्हणतों तशा प्रकारचें हें अद्वैत आहे. परमात्मा सर्वज्ञ व अनंत कल्याणगुणयुक्त आहे. जीववर्ग आणि जडवर्ग त्याचीं शरीरें असून त्यापेक्षां भिन्न आहेत. त्रिगुणात्मक प्रधान, जगाचें मूलकारण आहे. त्यापासून परिणत होणारें जग हें सत्य आहे. जीव हा अणुरूप आहे व ते अनेक आहेत. जीवाला जरी मुक्ति मिळाली तरी जीव आणि ब्रह्म यांत भेदच असतो. मात्र जीवाला त्याचें लौकिक शरीर पडल्यानंतर दिव्य देह मिळतो व परमात्म्याबरोबर परम साम्य त्याला प्राप्त होतें. हीच त्यांच्या मतें मुक्ति आहे. शंकराचार्यांनी जीव हा व्यापक मानिला असून

मोक्षावस्थेंत परमात्मा व जवितात्मा यांत त्यांच्या मतें कांहींच भेद नसतो. अशा तऱ्हेच्या अभेदाला सायुज्यता असें म्हणतात. जीवात्मैक्याचें ज्ञान होऊन अविद्येचा आणि अहंकाराचा नाश झाला म्हणजे मनुष्य जिवंत असला तरी तो मुक्तच होतो. याला जीवन्मुक्ति असें म्हणतात. रामानुजांच्या मतें जीवन्मुक्ति नाहीं. मनुष्य मृत झाल्यावर त्याला सरूपता मुक्ति मिळते. तसेंच मोक्षाच्या साधनांच्या बाबतींतही या दोन मतांत भिन्नत्व आहे. शंकराचार्यांच्या मतें मनुष्याची वर्णाश्रमाप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्में करून चित्तशुद्धि झाली पाहिजे. नित्य व अनित्य वस्तूंमधील भेद त्याला कळला पाहिजे. ऐहिक आणि पारलौकिक वैभवाविषयीं त्याच्या ठिकाणीं विरक्ति उत्पन्न झाली पाहिजे. मनाचा व बाह्येंद्रियांचा निग्रह, तपश्चर्या, शीतोष्णादिकांविषयीं सहिष्णुत्व, गुरुवेदान्तवाक्याविषयीं श्रद्धा आणि समाधान त्याला असलें पाहिजे. तसेंच मुक्त होण्याची तळमळ त्याला लागली पाहिजे; तरच ब्रह्मज्ञान करून घेण्याला तो योग्य अधिकारी होतो. नंतर त्यानें ब्रह्मनिष्ठ गुरूला शरण जावें व त्याने 'तत्त्वमसि' असा उपदेश केल्यानंतर श्रवण, मनन, निदिध्यासनाने हा उपदेश ठसवून घेऊन संन्यासग्रहणपूर्वक हें ज्ञान सुस्थिर करावें म्हणजे तो मुक्त होतो. रामानुजमतीं ब्रह्मज्ञानाला अधिकारी होण्याकरितां वर्णाश्रमोचित कर्म तेवढें आवश्यक आहे. भक्ति आणि प्रपत्ति हीं दोन मोक्षाचीं साधनें आहेत. भक्ति म्हणजे ईश्वराचें भजन आणि प्रपत्ति म्हणजे परमेश्वराला अनन्यभावाने शरण जाणें होय. कर्म आणि ज्ञान यांच्या योगाने भक्ति उत्पन्न होते व भक्तीमुळें मनुष्य प्रपन्न होतो. हा प्रपन्न मनुष्य देहपातानंतर मुक्त होतो. रामानुजांना शंकराचार्यांचा विवर्तवाद मान्य नाहीं. मूलप्रकृतीपासून जग हें परिणत झालें आहे असें तें मानीत असल्यामुळें त्यांना परिणामवादी म्हणतात. जगांतील सर्व वस्तु सत्य आहेत, मिथ्या नाहीत; पण विनाशी आहेत असें त्यांचें मत आहे.

श्रीमध्वाचार्यांच्या तत्त्वज्ञानाचें स्वरूप खालील श्लोकांत सांगितलें आहेः—

**श्रीमन्मध्वमते हरिः परतरः सत्यं जगत्तत्वतः ।**
**भेदो जीवगणा हरेरनुचरा नीचोच्चभावं गताः ।**

मुक्तिर्नैजसुखानुभूतिरतुला भक्तिस्तु तत्साधनम् ।
अक्षादित्रितयं प्रमाणमखिलाम्नायैकवेद्यो हरिः ॥

यांच्या मताप्रमाणें जगांत दोन तत्त्वें आहेत. १ स्वतंत्र व २ अस्वतंत्र. पैकीं विष्णु स्वतंत्र असून विष्णुभिन्न सर्व अस्वतंत्र आहे. विष्णूपासून सर्व जग निर्माण झालें आहे. हरि, विष्णु म्हणजेच ब्रह्म होय. हें ब्रह्म व जीव भिन्न आहेत. एकंदर पांच प्रकारचा भेद त्यांनी मानला आहे. १ जीवेश्वर भेद, २ जडेश्वर भेद, ३ जीवजडभेद, ४ जीवजीवभेद व ५ जडजड भेद. जीवाला मोक्ष मिळाला तरी तो परमेश्वरापेक्षां भिन्नच असतो आणि मुक्तावस्थेंतही तो स्वतंत्र नसून ईश्वराधीन असतो. जीव अणुरूप आहे, व्यापक नाही असें रामानुजांप्रमाणें यांचेंही मत आहे. मोक्षप्राप्तीकरितां जीवाने भक्ति करावी. अंकन, नामकरण, भजन अशी त्रिविध सेवा आहे. जग मिथ्या नसून सत्य आहे व नित्य परमाणूंपासून त्याची उत्पत्ति होते.

यादवकालीं या निरनिराळ्या संप्रदायांचे अनुयायी गीता, ब्रह्मसूत्रें व उपनिषदें या प्रस्थानत्रयीवर आपआपलीं मतें प्रतिपादणारीं भाष्यें व त्यावर टीका आणि प्रतिटीका करण्यांत गढून गेले होते व परस्परांच्या खंडनाकरितां कडाक्याचे वादविवाद करीत होते. पण वेदान्त काय किंवा इतर शास्त्रें काय त्यांवरील ग्रंथरचना व वादविवाद संस्कृतमध्यें चालत असल्यामुळें थोड्याशा सुशिक्षितांपलिकडे जी अफाट जनता महाराष्ट्रांत पसरली होती तिला या गोष्टींचा कोणत्याही रीतीचा फायदा होत नव्हता.

यादवांच्या राजवटींत स्वास्थ्य लाभल्यामुळें शूद्र म्हणून उपेक्षिलेला अफाट समाजही पुष्कळच सुधारला होता. त्याची आर्थिक स्थिति जशी सुधारली होती तशीच बौद्धिक व मानसिक स्थितीही सुधारली होती.पण संस्कृत येत नसल्यामुळें व त्रैवर्णिकांचे अधिकार नसल्यामुळें या प्रचंड लोकसमूहाच्या बुद्धीची व मनाची उपासमार चालली होती. शिवाय संस्कृतमध्यें चाललेले तात्त्विक वादविवाद कोणी पुराणिकाने त्यांच्या कानावर घातलेच तर त्यामुळें त्यांना समाधान वाटण्याऐवजीं उलट त्यांच्या मनाचा गोंधळ उडून जाई. निरनिराळे उपासनापंथ, आणि भिन्नभिन्न तत्त्वज्ञानें आपलाच मार्ग वेदप्रतिपादित आहे असें सांगूं लागलीं म्हणजे या भोळ्या परंतु श्रद्धाळु

जनतेला त्यांतला कोणता मार्ग पत्करावा याचा उलगडा करितां येईना. या परिस्थितीचा फायदा घेऊन मानभावांसारखीं वेदविरोधी पाखंडें याच काळांत जन्मास आलीं. श्रीचक्रधर नांवाच्या एका गृहस्थाने महाराष्ट्रांत या पंथाची स्थापना केली. हा वेदविरोधी संप्रदाय असल्यामुळें, वर्णाश्रम-संस्थाही त्याला मान्य नव्हती. हा पंथ ईश्वर मानतो पण स्वतः पंथ-संस्थापक चक्रधर हाच ईश्वर आहे असें वर्णन चक्रधरसूत्रांत आढळतें. भक्तीही या पंथाला मान्य आहे पण स्त्रीपुरुषांना संन्यास देणें, संघ करून राहाणें, वेद व चातुर्वण्य न मानणें इत्यादि बौद्धधर्मांतील गोष्टींचाही समावेश या पंथांत करण्यांत आला होता. त्यामुळें वैदिकधर्माभिमानी लोकांना या पंथाविषयीं कधींच आदर वाटला नाही. एकनाथांनी या पंथाविषयीं पुढील तिरस्काराचे उद्गार काढले आहेतः—

**होऊनि मानभाव । अवघा बुडविला ठाव ॥**
**नाहीं चित्तशुद्धिगति । द्वेष देवाचा करिती ॥**
**धरिती उफराटी काठी । रांडापोरें भोंदावती ॥**
**नेसूनिया काळेंपण । अंगा लाविती दूषण ॥**
**एका जनार्दनी देवा । जळो जळो त्यांची सेवा ॥**

ह्या पंथाची उत्पत्ति कशी झाली हें एक गूढच आहे. प्रचलित भागवत धर्म सोडून देऊन, वेद आणि चातुर्वर्ण्य न मानतां स्त्रीपुरुषांना सन्यास देऊन व काळें वस्त्र नेसण्याची नवीनच टूम काढून हा नवीन संप्रदाय चक्रधराने कां स्थापावा हें कळणें कठिण आहे. कदाचित् कांही कारणामुळें यांना चातुर्वर्ण्यांतून बहिष्कृत व्हावें लागून काळें वस्त्र नेसणें भाग पडलें असण्याचाही संभव आहे. कारण भक्तीचाच जर यांना पुरस्कार करावयाचा होता तर भागवत धर्म सोडण्याचें यांना कांहीही प्रयोजन नव्हतें. आरंभीं या पंथातले लोक मूर्तिपूजा मानीत नसावे असें दिसतें. तसेंच भागवत धर्मांत जो परमेश्वर सांगितला आहे त्याला कनिष्ठ ठरवून त्यापेक्षांही आमचा देव वरतीं असून श्रेष्ठ आहे असें आरंभीं हें लोक सांगत असावे असें एकनाथांच्या पुढील उद्गारांवरून दिसतें:—

महादेवाच्या सात पिढी सांगोनिया देऊं।
सोन्या रुप्याचे देव आम्ही ठेवोनिया खाऊं।
भाव आणि भक्तीचा गडवडगुंडा केला।
एका जनार्दन पायीं मानभाव झाला॥ गा. पं. ३७७६
सोन्या रुप्याचे देव आम्ही मोडोनिया खाऊं।
शेंद्राचे देव आम्ही दृष्टी न पाहूं।
एका जनार्दनी मानभाव झाला।
झोळीवरती झोळी ठेवुनि गडबडगुंडा केला॥ ३७३७

या शेवटल्या गडबडगुंड्याचें स्वरूप काय आहे तें कळत नाही पण या पंथाविषयीं तिरस्कार तुकारामापर्यंत लोकांना वाटत असावा असें तुकोबांच्या खालील उद्गारांवरून लक्षांत येतें:--

दाढी डोई मुंडी मुंडूनिया सर्व। पांघुरती बरवीं वस्त्रें काळीं।
चाळवुनी रांडा देऊनियां भेष। तुका म्हणे त्यास यम दंडी॥

गा. पं. २५६०

"ऋद्धिपूर वर्णन" या महानुभावी काव्यांत "आतां अहिंसे निस्संगु। निवृत्ति भक्तियोगु। तो नमस्कार परमार्गु। दातारांचा॥ या ओवींत व तीवरील टीकेंत "हिंसारहित, संगरहित व प्रवृत्ति-धर्मकर्मरहित" असा हा मानभावी पंथ असल्याचें लिहिलें आहे. या प्रवृत्तिधर्मकर्मरहित पंथा-बद्दल विचारी लोकांना केव्हांही आदर वाटला नाही हें अगदीं साहजिक आहे. तथापि आरंभीं या पंथाच्या नादीं राजानक, राणे, राउल, पाइक मानकरी इत्यादि राजसभेचे लोक लागले होते असा उल्लेख "लीला-संवाद" ग्रंथांत आहे. खुद्द राजाच्या अंतःपुरांत 'कामाइसा' राणीपर्यंत या पंथाचे हात पोंचले होते असेंही म्हणतात. अशा रीतीने वैदिक धर्मां-तील मतामतांच्या गलबल्यामुळें, महानुभावादि वेदविरोधी पाखंडें जन्मास येत असतां त्रैवर्णिकांची स्थिति पाहिली तर ते व्रतें उद्यापनें करण्यांत गर्क झाले होते. खरा धर्म बाजूला राहून आचारांना बेसुमार महत्त्व प्राप्त झालें होतें व ऐश्वर्यप्राप्तीमुळें लोक विलासी बनले होते. यादवांच्या या उत्कर्ष-कालांतच पुढील अपकर्षाचीं बीजें कशीं रोविलीं गेलीं याचें वर्णन राज-

वाड्यांनी ८ व्या खंडांत पुढीलप्रमाणें केलें आहे. " यादवांच्या अमदानींत म्हणजे इ. स. च्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठ्यांचें सर्व लक्ष परमार्थाच्या नांवावर ऐहिक उपभोग घेण्याकडे लागलें होतें. तेराव्या शतकांतील अत्यंत मोठा असा मानलेला ग्रंथ म्हटला म्हणजे हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि हा होय. ह्या ग्रंथांत दर दिवसाला व दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें सांगितलीं आहेत व त्या त्या व्रताला कोणत्या देवाची कोणतीं पक्वान्नें करून व किती ब्राह्मण घालून प्रीति संपादन करावी ह्याचा श्रुति, स्मृति व पुराणें ह्यांतून उतारे देऊन गंभीरपणें निर्णय केला आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडावरून पाहातां वर्षाच्या ३६५ दिवसांचीं एकंदर २०००व्रतें व्हावीं असा अंदाज होतो. लोकांचीं व्रतें करण्याकडे, ब्राह्मण भोजनें घालण्याकडे, पक्वान्नें खाण्याकडे व तद्वारा मोक्ष मिळतो अशा मतांकडे अतोनात प्रवृत्ति असल्याविना हेमाद्रीनें हीं व्रतें, केवळ पांडित्य दाखविण्याकरितां किंवा करमणूक करण्याकरितां सांगितलीं असतील हें संभवत नाही. तेव्हां व्रतें करणें व पक्वान्नें खाणें ह्या दोन गोष्टी लोकांच्या अंगवळणीं त्याकाळीं फार पडल्या होत्या हें निश्चित आहे. पक्वान्न आणि व्रत यांची फारकत हेमाद्रीने एकही ठिकाणीं केली नाही. एवढीं दोन हजार व्रतें ज्या ग्रंथांत सांगितलीं आहेत असा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही भाषेंत, कोणत्याही काळीं एकही ग्रंथ अद्यापि निर्माण झाला नाही. व्रतें करण्याकडे ज्याअर्थीं महाराष्ट्रांतील लोकांची तेराव्या शतकांत एवढी बेसुमार प्रवृत्ति झाली होती त्याअर्थीं त्यापासून दोनच अनुमानें स्थूलमानाने करणें रास्त आहे. एक लोकांजवळ पैसा अतोनात झाला होता, व दुसरें व्रतांप्रीत्यर्थ खर्च करण्यास लोकांजवळ मुबलक वेळ होता. ह्या दुसऱ्या अनुमानाचा अर्थ असा होतो कीं, राष्ट्रांतील सुखवस्तु लोकांना व त्यांचें लहान प्रमाणावर अनुकरण करणाऱ्यांना कष्टप्रचुर असे मर्दुमकीचे, यातायातीचे, मेहनतीचे, लष्करी व इतर धंदे करण्यास फुरसत नव्हती. अशी वस्तुस्थिति असल्यावर म्हणजे परशत्रूपासून व अंतःशत्रूपासून संरक्षण होण्यास कराव्या लागणाऱ्या मेहनतीपासून लोक परावृत्त झाल्यावर आणि व्रतैकदृष्टि किंवा सुखैकदृष्टि लोकांच्या हातीं मुबलक पैसा असल्यावर, त्यांच्याकडे बुभुक्षु, मेहनती, साहसी व निर्धन अशा

लोकांचें लक्ष जावें यांत अजब असें कांहीच नाही. सिंघणादि वीरांच्या विजयाने लोक अत्यंत धनसंपन्न होऊन व्रतें, उद्यापने करण्याच्या मिषाने सुखैकपरायण व विलासनिमग्न झाले व त्याचा फायदा परक्यांनी घेतला.”

वरील विवेचनावरून लक्षांत येईल कीं, यादवांच्या राजवटीच्या अखेर महाराष्ट्रांतील शिष्ट व संपन्न लोक वर्णधर्माप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्तव्यें विसरून केवळ चैन करूं लागले. ब्राह्मणांनी निरनिराळीं व्रतें तयार करून पक्वाने झोडण्याकडे आपलें लक्ष देऊन राष्ट्राच्या समोर त्याचीं खरीं कर्तव्यें जागृत ठेवण्याच्या आपल्या खऱ्या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळें, राष्ट्राच्या संरक्षणाला आवश्यक असा क्षत्रियवर्णही कर्तव्यच्युत झाला व पुढील आपत्तीचे ढग हळूहळू जमूं लागले. राष्ट्रांतील विद्वान् लोकांत विलक्षण मतभेद माजले; त्यांचें सर्व पांडित्य संस्कृतमध्येंच होऊं लागलें. त्यामुळें वैदिक धर्म झुगारून देणारीं पाखंडें जन्मास येऊं लागलीं. राष्ट्रांतील बहुजनसमाजाची धार्मिक भूक ब्राह्मणांनी न भागविल्यामुळें, तो असंतुष्ट झाला व मतामतांच्या गलबल्यामुळें, श्रद्धाळू लोक गोंधळून गेले. नामदेव म्हणतातः––

**तत्व पुसावया गेलों वेदज्ञासी । तंव भरले त्यापासीं विधिनिषेध ॥**
**तया समाधान नुमजे कोणे काळीं । अहंकार बळी झाला तेथें ॥**
**स्वरूप पुसावया गेलों शास्त्रज्ञासी । तंव भरले तयापासीं भेदाभेद ॥**
**एक एकाच्या न मिळती मतासी । भ्रांत गर्वराशी भुलले सदा ॥**

या मतामतांच्या गलबल्यांतून मार्ग काढणारा, धर्माचें खरें स्वरूप महाराष्ट्रांतील लक्षावधि जनतेला स्पष्ट करून सांगणारा, त्यांची धार्मिक भूक भागविणारा व खरा धर्म विसरून, केवळ बाह्य आचारांनाच धर्म म्हणून कवटाळणाऱ्या लोकांच्या डोळ्यांत अंजन घालणारा कोणीतरी थोर पुरुष यावेळीं पाहिजे होता. सुदैवाची गोष्ट अशी कीं, हें कार्य करणारा ज्ञानेश्वरांसारखा थोर पुरुष याच वेळीं जन्माला आला.

## प्रकरण सातवें

# ज्ञानेश्वर

गोदावरीच्या उत्तर तीरावर, पैठणापासून चार कोसांवर आपेगांव म्हणून एक गांव आहे. तेथें ज्ञानेश्वरांचे पूर्वज हे कुळकर्णी होते. यादवांच्या राज्यांत त्यांच्या पूर्वजांनीं देशाधिकाऱ्यापासून तों सेनापतीपर्यंत सर्व अधिकाराचीं कामें केलीं होतीं. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे मात्र विरक्त निघाले व अध्ययन संपल्यानंतर तीर्थयात्रा करीत करीत ते पुण्याजवळ आळंदीस आले. तेथील कुळकर्णी सिधोपंत यांनी आपली मुलगी त्यांस दिली. विठ्ठलपंत विरक्त असल्यामुळें कांहीं कालानंतर काशीस जाऊन त्यांनी संन्यास घेतला. त्यांचे गुरु रामानंद हे काशीहून आळंदीस आले असतां त्यांना विठ्ठलपंत हे विवाहित आहेत असें कळलें तेव्हां परत काशीस जाऊन विठ्ठलपंताला त्यांनी पुनः गृहस्थाश्रमी बनविलें व विठ्ठलपंत परत महाराष्ट्रांत येऊन संसार करूं लागले. त्यांना निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, व मुक्ताबाई अशीं चार मुलें झालीं. ज्ञानेश्वरांचा जन्म शके ११९७ मध्यें झाला. कोणी तो चार वर्षें पूर्वी झाला असें ह्मणतात. त्यांचा जन्म आळंदीस झाला कीं आपेगांवास झाला तें निश्चित कळत नाहीं. विठ्ठलपंतांनी संन्यासाश्रमांतून पुनः गृहस्थाश्रम घेतल्यामुळें लोकांनी त्यांना वाळींत टाकलें होतें. त्यामुळें संन्याशाचीं मुलें म्हणून मुलांच्या मुंजीही होईनात. तेव्हां विठ्ठलपंतानीं ब्राह्मणांना विनंति केली कीं, आह्माला प्रायश्चित देऊन पावन करून घ्या व मुलांच्या मुंजी होऊं द्या. पण त्या वेळच्या ब्राह्मणांत पांडित्य असलें तरी हृदय नव्हतें. खरें धर्मतत्त्व विसरून बाहेरील नियमांचें व आचारांचेंच स्तोम माजवून ते बसले होते. त्यांनी विठ्ठलपंतास देहांत प्रायश्चित सांगितलें व त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांच्या मातापित्यांनी प्रयागला जाऊन हें प्रायश्चित घेतलें.

इकडे हीं लहान भावंडें पोरकीं झालीं व भिक्षा मागून उदरनिर्वाह करूं लागलीं. आळंदीच्या ब्राह्मणांनी त्यांना सांगितलें कीं तुम्ही पैठणास जाऊन शुद्धिपत्र घेऊन या म्हणजे व्रतबंध करूं. निवृत्तिनाथांना वाटलें

कीं, आम्ही आधींच शुद्ध आहोंत तेव्हां आणखी शुद्धिपत्र कशाला ? पण ज्ञानेश्वरमहाराजांचें जीवितकार्य वर्णाश्रमधर्माचें खरें स्वरूप सांगण्याचें असल्यामुळें त्यांनी निवृत्तिनाथांना शुद्धिपत्र मिळविण्यासाठीं पैठणास चलण्याचा आग्रह केला. ते म्हणाले:—

**अविधि आचरण परम दूषण । वेदो नारायण बोलियला ॥**
**स्वधर्म अधिकार जातिपरत्व भेद । उचित तें शुद्ध ज्याचें तया ॥**
**म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें । जना दाखवावें वर्तोनियां ॥**

ज्ञानेश्वरांच्या आग्रहामुळें निवृत्तिनाथ आपल्या सर्व भावंडांसहित पैठणला आले. तेथील ब्राह्मणांनी त्यांना प्रायश्चित्त नाही असें सांगितलें. पुढें ज्ञानेश्वरांची योग्यता लक्षांत आल्यावर त्या ब्राह्मणांनी शुद्धिपत्र दिलें. वस्तुतः ज्ञानेश्वर हे एवढ्या योग्यतेचे पुरुष होते कीं, ज्यांच्याजवळ ते शुद्धिपत्र मागावयास आले त्या पंडितांना त्यांच्या नखाचीही सर नव्हती. पण त्यांचा निर्णय ज्ञानेश्वरांनी मान्य केला व पैठणास अध्ययन करीत कांही दिवस राहिले. नंतर तेथून निघून नगरप्रांतीं प्रवरा नदीच्या तीरावर नेवासें म्हणून गांव आहे तेथें ही सर्व मंडळी आली. नेवासें येथें मोहिनीराजाचें देवालय आहे व हें क्षेत्र म्हणून त्याकाळीं प्रसिद्ध असे. या क्षेत्रांत राहून ज्ञानेश्वरांनी गीतेवर "भावार्थदीपिका" नांवाची मराठी टीका लिहिली व अशा रीतीने मराठींतील ज्येष्ठ व श्रेष्ठ ग्रंथाचा उदय झाला.

महाराष्ट्राच्या तत्कालीन परिस्थितीचें ज्ञानेश्वरांनी नीट अवलोकन केलें तेव्हां त्यांच्या लक्षांत आलें कीं, धर्मनिष्ठ म्हणविणारे लोक स्वतःच धर्मतत्त्व न कळल्यामुळें धर्मभ्रष्ट झाले आहेत. व्रतें उद्यापनें यांनाच धर्म समजून वर्णाश्रमधर्माला पारखे झाले आहेत. स्वतःच प्रायश्चित्तार्ह झालेले असतांना इतरांना प्रायश्चित्तें देऊन शुद्ध करण्याच्या खटपटींत हे गुंतले आहेत. ही सर्व स्थिति सुधारावी म्हणून ज्ञानेश्वर उद्योगाला लागले. गीतेवर संस्कृत टीका करण्याचा पंडितांचा मार्ग सोडून देऊन त्यांनी लोकांच्या भाषेंत—मराठींत—गीतेवर विस्तृत टीका लिहिली व महाराष्ट्रांतील लक्षावधि जनतेची धार्मिक भूक शांत करून त्यांना त्यांच्या आयुष्याचें ध्येय दाखवून दिलें. आयुष्याची सार्थकता पटवून दिली. प्रचलित परिस्थितींत सुधा-

रणा करणारे ज्ञानेश्वर हे महान् सुधारक होते. आणि खऱ्या सुधारकाच्या अंगीं असणारे सर्व गुण त्यांमध्यें होते. खरें पाहिलें तर पंडितांकडून त्यांच्या मातापित्यांना, त्यांच्या भावंडांना व स्वतः त्यांना इतका त्रास झाला होता कीं, त्यांनी पंडितांना व प्रचलित धर्माला कितीही शिव्या दिल्या असत्या तरी तें क्षम्यच ठरलें असतें. पण ते पंडितांवर रागावले नाहीत. कारण त्यांच्याबद्दल त्यांना प्रेम होतें व पंडितांच्या धर्माला ते खरा धर्म समजत नव्हते. त्यामुळें जो खरा धर्म नव्हे त्यालाच धर्म समजून शिव्या देण्याचा वेडे-पणा त्यांनी साहजिकच केला नाही आणि पंडितांना सुधारण्याची इच्छा अस-ल्यामुळें, त्यांनी त्यांना शिव्याही दिल्या नाहीत. सुधारकाच्या मनांत, ज्यांना सुधारावयाचें असेल त्यांच्याबद्दल गाढ प्रेम पाहिजे व त्यांच्या अज्ञानाची त्याने कींव केली पाहिजे. त्याचें स्वतःचें वर्तन अत्यंत शुद्ध व वृत्ति अत्यंत शांत पाहिजे व आपण जी सुधारणा करीत आहों ती धर्म्य असून लोकोन्नतीला आव-श्यक आहे असा आत्मविश्वास पाहिजे. ज्ञानेश्वर व त्यांच्या पाठीमागून त्यांची परंपरा चालविणारे संत यांच्यामध्यें या सर्व गोष्टी होत्या. त्यामुळें त्यांनी वेगळा पंथ न काढतां, धर्माचें खरें स्वरूप आह्मीच सांगत आहों अशी आत्मविश्वासाची भूमिका स्वीकारली. जे खरे धार्मिक नव्हते, परंतु आम्हीच खरे धार्मिक आहों असें म्हणत होते अशा पंडितमंन्यांना फारसें महत्त्व त्यांनी दिलें नाही. भलत्याच गोष्टींना धर्म समजणारे, धर्मत्याग करून पाखंड मतें काढणारे, खराधर्म काय आहे तें न कळल्यामुळें गोंधळून गेलेले आणि स्वतः-ची आध्यात्मिक प्रगति व्हावी म्हणून तळमळ लागलेले, असे नानाप्रकारचे लोक ज्ञानेश्वरांनी आपल्या भोवती पाहिले आणि त्यांना उद्देशून शांतपणें धर्मविवेचन करण्यास सुरवात केली. हें धर्मविवेचन त्यांनी भगवान् श्रीकृष्णाचा आधार घेऊन केलें. कारण वर्णाश्रमधर्माचें खरें स्वरूप लोकांना समजावून सांगून भ्रान्त लोकांना शुद्धीवर आणणें व भक्तिमार्गाचा प्रसार करून सर्व जनतेला आध्यात्मिक प्रगतीचे मार्ग मोकळे करणें ही दोन प्रमुख कार्यें त्यांना करावयाचीं होतीं व त्याकरितां भगवद्गीतेसारखा उपयुक्त ग्रंथ संस्कृत वाङ्मयांत दुसरा कोणता आढळणार ? चातुर्वर्ण्याचें सशास्त्र विवेचन कर-णाऱ्या या ग्रंथाचा भावार्थ ज्ञानेश्वरांनी आपल्या भावार्थदीपिकेच्या द्वारें सुबोध करून सांगितला. मराठ्यांची संस्कृति ज्यांत साठविली आहे

असा " भावार्थदीपिका " हा जुन्या मराठी वाङ्मयांतील पहिला ग्रंथ असून दासबोध हा शेवटचा ग्रंथ आहे. गीतेच्या आधारें अद्वैत्यांचें अद्वैत आणि द्वैत्यांची भक्ति यांचा समुच्चय करून द्वैताद्वैताचा वाद मिटविण्याचा, ज्ञानेश्वर-प्रमुख संतांनी, प्रयत्न केलेला दिसतो; मराठी संतांच्या ग्रंथांचा विशेष असा आहे कीं, तुझें मत खोटें व माझें खरें अशा तऱ्हेचे संस्कृत ग्रंथांतील वादविवाद त्यांत कोठेंच आढळून येत नाहीत कारण या वादविवादांचा त्यांना व सामान्य जनतेला आतां अगदीं कंटाळा आला होता. त्यामुळें जें जें चांगलें असें पूर्वीच्या ग्रंथांत आढळलें तें कोणत्या मताचें किंवा पंथाचें आहे हें न पाहतां त्याचा त्यांनी आपल्या ग्रंथांत समावेश केला. ज्ञानेश्वर हे विशिष्टाद्वैत मताचे पुरस्कर्ते होते असें कित्येकांचें म्हणणें आहे. पण निदान ज्ञानेश्वरीमध्यें तरी त्याला आधार सापडत नाहीत. उलट मायावाद सिद्ध करण्याकरितां संस्कृत ग्रंथांत घेतलेले सर्व दृष्टांत ज्ञानेश्वरींत आढळून येतात.

गीतेवरच टीका करण्याचें आणखी एक कारण ज्ञानेश्वरांनी असें दिलें आहे कीं, वेद आणि वैदिक तत्त्वज्ञान यांचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांनाच असल्यामुळें, बहुजन समाजाला त्यापासून कांहीही लाभ होत नव्हता. ही उणीव भरून काढण्याकरितांच गीतेचा जन्म झाला. अठराव्या अध्यायांत ज्ञानेश्वर म्हणतातः—

**वेदु संपन्न होय ठायीं । परी ऐसा कृपणु आन नाहीं ॥**
**जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याची ॥ १४५७ ॥**
**येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिक प्राणियां ॥**
**अनवसरू मांडूनियां । राहिला आहे ॥ १४५८ ॥**
**तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें ॥**
**वेदु वेठला भलतेणें सेव्य । होआवया ॥ १४५९ ॥**

मूळ गीतेचा उपदेश वेद न जाणणाऱ्या बहुजन समाजाकरितां केला गेला. पण नंतर कांही शतकांनी गीता ज्या भाषेंत लिहिली गेली ती संस्कृत भाषाही लोकांना कळेनाशी झाल्यामुळें गीतेवर मराठी टीका करून ज्ञानेश्वरांनी ही अडचण दूर केली.

मराठी भाषा ज्ञानेश्वरकाळींच सर्वार्थक्षम झाली होती व तिच्या द्वारें आपण संस्कृतमधील कोणतीही कठिण गोष्ट संस्कृत भाषेपेक्षांही जास्त चांगल्या रीतीने व्यक्त करूं शकूं असा ज्ञानेश्वरांना आत्मविश्वास होताः—

**माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके ।**
**ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ ६-१४ ॥**

**मूळ ग्रंथींचिया संस्कृता-। वरि मऱ्हाठी नीट पहातां ॥**
**अभिप्राय मानलिया चित्ता । कवण भूमि हें न चोजवे ॥६-४३॥**

मराठी इतकें सुंदर लिहीन कीं, मूळ कोणतें व भाषांतर कोणतें याची वाचकांना भ्रांति पडेल असें ज्ञानेश्वरांना वाटे. शांत रसाचेंही वर्णन केलें तरी तें श्रृंगार रसाच्या डोक्यावर पाय देईल इतकें चांगलें करीन अशा आत्मप्रत्ययाने ज्ञानेश्वरांनी आपला ग्रंथ लिहिला व या ग्रंथाचा श्रेष्ठत्वाचा मान अद्यापीहि कोणाला काढून घेतां आला नाही.

राष्ट्रांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे आपआपलीं कर्तव्यें विसरले कीं, राष्ट्राच्या अधःपाताला सुरवात होते. आणि त्यांतूनही राष्ट्रांतील क्षत्रियवर्ण विलासी बनला व स्वकर्तव्याकडे त्याचें दुर्लक्ष झालें कीं, राष्ट्रीय आपत्ति जवळ आली असें खुशाल समजावें. क्षत्रियवर्ण हा अशा रीतीने महत्त्वाचा असल्यामुळें गीतेच्या आरंभींच क्षत्रिय वर्णाचें कर्तव्य काय आहे व तें किती महत्त्वाचें आहे हें श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितलें आहे. ज्ञानेश्वरांच्या कालींही महाराष्ट्रांतील ब्राह्मणक्षत्रियांना असाच उपदेश करणें आवश्यक झालें होतें व तो गीतेच्या आधारें ज्ञानेश्वरांनी केला. फरक एवढाच कीं, महाराष्ट्रांतील क्षत्रिय विलासी बनल्यामुळें कर्तव्यपराङ्मुख झाले होते तर गीतेंतील अर्जुनाला लढणें हें पापकर्म नाही ना अशी शंका आल्यामुळें तो कर्तव्यपराङ्मुख झाला होता. क्षत्रियांचें कर्तव्यच असें निष्ठुर आहे कीं, त्यापासून परावृत्त होण्याचा मोह त्यांना पडणें अगदीं साहजिक आहे. ज्यांना श्रेष्ठ ध्येयाची जाणीव नाही, कत्तली व मारामाऱ्या करून पोट भरण्याचा ज्यांचा धंदाच आहे अशा जंगली लोकांना लढाई करण्याचें कांही वाटत नाही. पण सुसंस्कृत, सुविद्य व बुद्धिमान् क्षत्रियांना वर्णधर्माप्रमाणें कर्तव्य म्हणून हिंसात्मक युद्धें करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां आपण

पाप करीत आहों कीं काय अशी शंका त्यांना आल्यावांचून राहत नाही. किंबहुना अशा तऱ्हेच्या साशंक मनःस्थितीचा फायदा घेऊनच बुद्धापासून मानभावापर्यंतचे अहिंसावादी पंथ पुढें आले. ज्ञानेश्वरकालीं या मानभाव-पंथाचा, राजघराण्यांत व राणे, राउल, मानकरी इत्यादि लोकांत प्रवेश झाल्याचें मागें सांगितलेंच आहे. या सर्व लोकांना गीतेच्या द्वारें क्षत्रिय-वर्णाची महती ज्ञानेश्वरांनी सांगितली. अर्जुनाला जेव्हां त्याच्या प्रतिपक्षाची दया आली व शस्त्र सोडून देऊन तो खालीं बसला त्या वेळचें वर्णन ज्ञाने-श्वरांनी खालील शब्दांत केलें आहे:--

**तेथ मनीं गजबज जाहाली । आणि आपैसी कृपा आली ॥**
**तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ॥ १-१८५ ॥**
**जिया उत्तम कुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथी ॥**
**तिया आणिकींतें न सहाती । सुतेजपणें ॥ १८६ ॥**

क्षत्रियांच्या ठिकाणीं असलेली जी वीरवृत्ति तिची उत्तम कुळांतल्या लावण्यसंपन्न पत्नीशीं तुलना करून, ही वृत्ति सोडून कारुण्य जर क्षत्रिया-च्या मनांत उत्पन्न झालें तर या मानी पत्नीला अपमान झालासें वाटतें असें दाखवून वीरवृत्तीचें महत्त्व या ठिकाणीं प्रतिपादिलें आहे. अंतःकरण कारुण्यपूर्ण झाल्यामुळें अर्जुनाच्या ठिकाणचें पौरुष पार नाहीसें झालें (१-१९०) आणि कौरवांनी वाटेल तें केलें तरी आपण त्यांचा मनाने सुद्धां घात चिंतणार नाही; कारण या युद्धांत हातीं शस्त्र धरणें हें 'बहुतापरी किडाळ' आहे, निंद्य कर्म आहे (१-२३३), त्यापेक्षां स्वतः शस्त्र टाकून देऊन प्रतिपक्षाच्या बाणांनी मृत्यु आला तरी चालेल;

**आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें बरवें ॥**
**जें शस्त्रें सांडूनि सहावे । बाण यांचे ॥ १-२६५ ॥**
**तयावरी होय जितुकें । तें मरणही वरी निकें ॥ १-२६६ ॥**

असा निश्चय करून अर्जुन जेव्हां बसला तेव्हां क्षत्रिय धर्माला हें आच-रण किती विसंगत आहे व यामुळें स्वधर्मभ्रष्टता कशी होणार आहे तें श्रीकृष्णाने सांगितलें.

**हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां ॥**
**सांगे झुंजावेळे सदयता । उचितु काई ॥ २-१९ ॥**

सर्व उपाय खुंटून युद्ध करण्याची जेथें वेळ आली तेथें सदयता आणि कारुण्य यांचा काय उपयोग ? क्षत्रियांना धर्मयुद्धावांचून दुसरी कोणतीही गोष्ट उचित नाही. मात्र हें युद्ध कर्तव्य म्हणून केलें पाहिजे. त्यांत स्वार्थ, किंवा मत्सर असतां कामा नये. "निष्कपट होआवें। उसिणा घाई झुंजावें" मन शुद्ध ठेवून झुंज केलें तर क्षत्रियाला त्यांत पाप नाही एवढेंच नव्हे तर पुण्य आहे. कारण ज्यांना अंतःकरण नाही, न्यायनीतीची चाड नाही अशा लोकांना सुधारण्याचे इतर सर्व उपाय थकल्यानंतर त्यांना शिक्षा करून ताळ्यावर आणणें हेंच क्षत्रियांचें कर्तव्य आहे. अर्जुनाच्या मनांत कौरवांबद्दल कितीही कारुण्य किंवा सदयता उत्पन्न झाली तरी त्याचें त्या कौरवांना काय होय ? (२-२०७)

**तूं निर्मत्सर सदयता । येथूनि निघशील कीर मागौता ॥**
**परी ते गती समस्तां । न मनेल ययां ॥ २-२०३ ॥**
**हे चहूंकडूनि वेढितील । बाणवरी घेतील ॥**
**तेथ पार्था न सुटिजेल । कृपाळूपणें ॥ २-२०४ ॥**

तूं स्वतः कौरवांना न मारण्याचें ठरविलेंस तरी कौरव तुला सोडणार आहेत काय ? ते तुझ्या अंतःकरणाची सदय स्थिति ओळखण्याला असमर्थ आहेत. ते तुला वेढून तुझ्यावर बाणांचा वर्षाव करितील. कृपाळू होऊन यांतून सुटण्याची आशा करणें व्यर्थ आहे. तेव्हां भलत्या ठिकाणीं सदयता दाखवून कोणताही फायदा नाही. उलट स्वतःचा आणि स्वशरीराचा दुष्टांच्या हातून अपमान करून घेऊन त्यांना सर्व दिशा मोकळ्या सोडल्या-मुळें, अन्यायाला उत्तेजन दिल्याचें व क्षत्रियकर्म सोडल्याचें पाप मात्र माथीं येईल. क्षत्रिय कर्म करण्यांत कांहीच पाप नाहीं–

**म्हणोनियां पार्था । हेतु सांडोनि सर्वथा ॥**
**तुज क्षात्रवृत्ति झुंजतां । पाप नाही ॥ २-२२५ ॥**

अशा रीतीचे अनेक युक्तिवाद करून, क्षत्रियवर्ण व त्याचें कर्तव्य यांचें

महत्त्व ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिकेच्या दुसऱ्या अध्यायांत वर्णन केलें आहे. आपण सदय झालों म्हणून शत्रु सदय होतातच असें नाही. उलट आपल्या या चांगुलपणाचा फायदा घेऊन आपल्यालाच ठोकण्याला ते मागेंपुढें पहात नाहीत. हा युक्तिवाद गीतेंत केलेला नाही. तो ज्ञानेश्वरांचा स्वतःचा आहे व त्यावरून त्यांचें व्यवहाराचें सूक्ष्म निरीक्षण दिसून येतें.

पण ज्ञानेश्वरकालीं केवळ क्षत्रिय वर्णच कर्तव्यपराङ्मुख झाला होता असें नाही. तर सर्वच वर्ण आपलीं वर्णप्राप्त कर्तव्यें सोडून मोक्षप्राप्तीच्या इतर साधनांच्या नादीं लागले होते. ज्ञानेश्वरांना त्या वेळेस मुख्यतः जो संदेश लोकांना द्यावयाचा होता तो असा कीं, तुम्हांला जर मोक्ष पाहिजे असेल, जर परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावयाची असेल आणि ऐहिक ऐश्वर्यही पाहिजे असेल तर व्रतें, उद्यापनें करून पक्वान्नें झोडणें हा त्याला खरा उपाय नसून स्ववर्णाप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्मेंच निष्काम-बुद्धीने आचरणें हाच त्याचा खरा उपाय होय.

**देखे अनुक्रमाधारें । स्वधर्मु जो आचरे ॥**
**तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ३-८० ॥**
**म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञयाजन ॥**
**जो करी तया बंधन । कांहीच न घडे ॥ ३-८३ ॥**
**तुम्ही व्रतनियमु न करावे । शरीरातें न पीडावें ॥**
**दुरिकेंहि न वचावें । तीर्थासि गा ॥ ३-८९ ॥**
**देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांही न करावें ॥**
**तुम्ही स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ ३-९१ ॥**

वरील ओव्या ज्ञानेश्वरकालीन परिस्थितीवर चांगल्याच प्रकाश पाडणाऱ्या आहेत. लोक वर्णधर्म सोडून देऊन वैयक्तिक हित साधण्याच्या मार्गाला त्यावेळीं लागले होते हें उघड दिसतें. स्वर्ग मिळविण्याकरितां यज्ञयाग करावे, व्रतेंउद्यापनें करावीं, तीर्थयात्रा कराव्या, आणि वर्णधर्माप्रमाणें प्राप्त झालेल्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष करावें अशी प्रवृत्ति लोकांत उत्पन्न झाली होता. वर्णधर्म हा सामाजिक धर्म आहे. एका वर्णाने इतर तीन वर्णांकरितां, त्या धर्माप्रमाणें कांहीतरी करावयाचें असतें. ब्राह्मणाने

इतर तीन वर्णांना शिकविलें पाहिजे व धर्माचें खरें स्वरूप लोकांना नेहमीं सांगितलें पाहिजे. क्षत्रियांनी नेहमीं लढाईला सज्ज असलें पाहिजे व राष्ट्राचें परक्यांपासून नेहमीं रक्षण केलें पाहिजे. दुर्ग बांधून, व सर्वत्र हेर पाठवून आपल्या राष्ट्रावर कोणी चढाई करण्याच्या विचारांत आहे कीं काय तेंहीं क्षत्रिय राजाने पाहिलें पाहिजे. महाराष्ट्रांतील ब्राह्मणक्षत्रियांचें या वर्णप्राप्त कर्तव्याकडे, या सामुदायिक धर्माकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्यामुळेंच ज्ञानेश्वरांनी त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. मोक्षाकरितां व्रतेंउद्यापनें, तीर्थयात्रा किंवा यज्ञ करीत बसण्यापेक्षां वर्णधर्माचें अनुष्ठान करणें हा जो अखंड यज्ञ आहे या यज्ञानेच परमेश्वराला संतुष्ट करा म्हणजे स्वतःचें व त्यावरोवर इतरांचेंही कल्याण होईल. यज्ञाच्या मुळाशीं जी त्यागाची कल्पना आहे त्याच त्यागाच्या कल्पनेवर वर्णधर्माची उभारणी केलेली असल्यामुळें, स्वार्थत्यागपूर्वक आपलें कर्तव्य करणें हा यज्ञच आहे,ही यज्ञाची व्याख्या ज्ञानेश्वरांनी लोकांना समजावून सांगितली.

या स्वधर्माप्रमाणें आचरण कराल तर हा तुम्हांला कामधेनूसारखा होईल. ( ३–९४ ) आणि तुम्ही जें जें करूं म्हणाल तें आपोआप सिद्धीला जाईल. मूर्तिमंत दैव सर्व सुखासहित तुम्हाला शोधीत येईल. (३–१०१) असें या धर्माचें महत्त्व आहे. पण याच्या उलट हा धर्म जर तुम्ही पाळला नाहीत तर मात्र तुमच्या दुर्दशेला पारावार नाहीः—

**तैसा स्वधर्मु जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला ।**
**जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ३-११० ॥**
**तैसीं त्रिभुवनींचीं दुःखें । आणि नानाविधें पातकें ॥**
**दैन्यजात तितुकें तेथेंचि वसे ॥ ३-११४ ॥**

सामाजिक कर्तव्यांचें पालन राष्ट्राकडून झालें नाही म्हणजे त्यावर मोठाल्या आपत्ति येतात म्हणून तुम्ही सर्वांनी आपआपल्या कार्यांत निरत असावें (११८). हें कर्तव्य करीत असतांना सर्वस्वाचा जरी त्याग करावा लागला तरी तो करण्यास मागेंपुढें पाहूं नका. कारण हाच खरा यज्ञ आहे.

**हें संपत्तिजात आघवें । हवन द्रव्य मानावें ॥**
**मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥ ३-१२० ॥**

**देखे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था ॥**
**रक्षणीय सर्वथा । म्हणऊनियां ॥ ३-१७० ॥**

हा स्वधर्मयज्ञ कशाकरितां करावयाचा असतो याचें ज्ञानेश्वरांनी वर दिलेलें उत्तर अत्यंत महत्त्वाचें आहे. ही सगळी लोकसंस्था सुरक्षित रहावी म्हणन सर्वांनी हा यज्ञ करावयाचा असतो. लोकसंस्थेच्या रक्षणाचा आणि वर्णधर्मांचा असा जिव्हाळ्याचा संबंध असल्यामुळेंच ज्ञानेश्वरांच्या पूर्वीपासून आतांपर्यंत महाराष्ट्रांतील विचारी पुरुषांनी या वर्णधर्मांचा पुरस्कार केला आहे.

कर्मत्यागाच्या आणि संन्यासाच्या भ्रांत कल्पनेने जे कर्तव्यच्युत झाले होते त्यांनाही ज्ञानेश्वरांनी चरचरित अंजन घातलें आहे. अठराव्या अध्यायांत अनेक दृष्टांत देऊन कर्मत्यागाचा फोलपणा त्यांनी दाखविला आहे. हा देह प्राप्त झाल्यानतर कर्मं करण्याचा ज्यांना कंटाळा येतो ते मूर्ख आहेत. ( २१८ ) घटाने मातीचा कंटाळा करावा किंवा वस्त्राने तंतूंचा त्याग करावा, दीपाने प्रभेचा द्वेष करावा किंवा पाण्याने द्रवत्वाला कंटाळावें अशापैकींच देहधारी मनुष्याने कर्माला कंटाळण्याचा प्रकार आहे. कर्मत्याग करण्याचा फक्त एकच प्रकार आहे तो असा कीं:——

**यया कर्मा सांडिती परी । एकीचि ते अवधारी ॥**
**जे करितां न जाइजे हारी । फळाशेचिये ॥ १८-२२७ ॥**
**कर्मफळ ईश्वरीं अर्पे । तत्प्रसादें बोधु उद्दीपे ॥**
**तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्याळशंका ॥ २२८ ॥**

कर्में करून त्यांच्या फळाविषयीं आसक्ति न धरणें एवढा एकच प्रकार कर्मत्यागाचा संभवतो. आणि याप्रमाणें जो कर्मत्याग करतो तोच खरोखर महात्यागी होय ( २३० ). तेराव्या अध्यायांतील 'इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च' या श्लोकावर टीका करितांना वर्णाश्रमपोषक कर्तव्यें करूनही जो हें मीं केलें किंवा माझ्यामुळें सिद्धीस गेलें असें समजत नाही तो निरहंकारी होय असें ज्ञानेश्वरांनी सांगितलें आहे.

ज्ञानेश्वरांनी याप्रमाणें वर्णधर्मांचें महत्त्व सांगून कर्मयोगाचें जसें सविस्तर विवेचन केलें तसें किंवा त्याहूनिया जास्त विस्ताराने भक्तियोगाचें

विवेचन केलें. कारण यज्ञयागादि कर्मकांड, किंवा पातंजल योग हे सर्वांनाच सुलभ नसल्यामुळें, महाराष्ट्रांतील असंख्य जनतेला ईश्वरप्राप्तीचें भक्तीसारखें सुलभ साधन समजावून देणें त्या वेळीं अवश्य झालें होतें. ज्ञानेश्वरांनी आपल्या रसाळ वाणीने भक्तिमार्गाचीं तत्त्वें लोकांना सुलभ करून सांगितलीं. आणि त्याचबरोबर कर्मयोगाची भक्तियोगाशीं बेमालूम सांगड घातली. भक्ति म्हणजे देवघरांत नाक धरून बसणें किंवा टाळ वाजवीत नाचणें एवढाच अर्थ ज्ञानेश्वरांना अभिप्रेत नव्हता. तर वर्णप्राप्त कर्में ईश्वरार्पण बुद्धीने करणें हीच खरी भक्ति आहे असें त्यांचें मत होतें:—

**हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य ओलावा ॥**
**आणि हेचि परमसेवा । मज सर्वात्मकाची ॥ १८–९०६ ॥**
**तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा ॥**
**पूजा केली होय अपारा । तोषालागीं ॥ १८–९१७ ॥**

सर्व जनतेच्या हृदयांत वास्तव्य करणाऱ्या परमेश्वराची, वर्णप्राप्त अशा कर्मांचीं कुसुमें वाहून पूजा केली तर ती त्याला अपार तोषदायक होते. ही त्याची परमश्रेष्ठ अशी सेवा आहे. कारण विहितकर्म परश्वेराला अत्यंत प्रिय असून तें केलें म्हणजे त्याची निभ्रांत प्राप्ति होते ( ९११ ). असें असल्यामुळें भक्ताने विहितकर्में करणें हीच खरी भक्ति आहे व त्यानेच परमेश्वरप्राप्ति होते. कर्म आणि भक्ति यांची ही जोडी अशी अभेद्य आहे. ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिलेल्या या भक्तिमार्गाला, आज महाराष्ट्रांत जें कोणतें स्वरूप आलें आहे तें सर्वांच्या परिचयाचें आहे.

भक्तियोगाच्या साहाय्याने जनतेंत सर्वत्र समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला. आतांपर्यंत ब्राह्मण श्रेष्ठ, क्षत्रिय त्याहून कनिष्ठ व त्याहूनही वैश्य व शूद्र कनिष्ठ समजले जात होते आणि ही श्रेष्ठ–कनिष्ठता केवळ जन्माने आली होती. वर्णसंस्थेकडे लोकांचें दुर्लक्ष होऊन जातिसंस्थेचें प्रस्थ फार माजल्यामुळें ही असमानता उत्पन्न झाली होती. वर्णांमध्यें, त्या वर्णाला उपयुक्त असे गुण त्या व्यक्तीच्या अंगीं आहेत कीं नाहीत हें प्रामुख्याने पाहिलें जात असे. उलट जातिसंस्थेंत ब्राह्मण व क्षत्रियांच्या पोटीं जन्माला आलेला मनुष्य केवळ तेवढ्याचमुळें श्रेष्ठ समजला

जाई व त्याच्यामध्यें त्या वर्णाला आवश्यक असे गुण आहेत कीं नाहीं इकडे दुर्लक्ष होई. त्यामुळें समाजांत साहजिकच या अन्यायाविरुद्ध असंतोष उत्पन्न झाला असला पाहिजे. ज्ञानेश्वरांनी ही असमता घालविण्याचा प्रयत्न केला. ब्राह्मण हे ज्ञाते असल्यामुळें समाजाचे पुढारी आहेत पण तेवढ्यामुळें त्यांना इतरांपेक्षां श्रेष्ठता येत नाही. इतर वर्णांचीं कर्तव्यें समाजाला तितकींच उपयुक्त असल्यामुळें व तीनही वर्णांना वेदांचा अधिकार असल्यामुळें ब्राह्मणांच्याच योग्यतेचे क्षत्रिय व वैश्यही आहेत असें त्यांनी सांगितलें:—

**तेचि चारी वर्ण । पुससी जरी कोण ॥**
**तरी जयां मुख्य ब्राह्मण । धुरेचे कां ॥ १८-८१८ ॥**
**येर क्षत्रिय वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानी ॥**
**जे ते वैदिक विधानीं । योग्य म्हणौनि ॥ ८१९ ॥**

त्रैवर्णिकांसंबंधाने ज्ञानेश्वरांना हें जसें स्पष्ट सांगतां आलें तसें शूद्र वर्णासंबंधाने सांगतां आलें नाही हें खरें; पण एक समर्पक दृष्टांत देऊन शूद्रांचाही श्रुतीशीं संबंध कसा पोंचतो तें त्यांनी सांगितलें आहे. शूद्राला जरी वेदाचा अधिकार नाही तरी त्याची वृत्ति वर्णत्रयाधीन आहे (८२०). या वृत्तीमुळें हा चौथा वर्ण ब्राह्मणादिकांच्या जवळ येऊन चातुर्वर्ण्य निर्माण झालें. एखादा श्रीमंत मनुष्य फुलाबरोबर त्यामधील तंतूचाही स्वीकार करतो त्याप्रमाणें वेद हे त्रैवर्णिकांबरोबर, त्यांच्या आधीन असलेल्या शूद्र वर्णाचाही स्वीकार करतात (८२१). अशा युक्तिवादाने चारी वर्णांची कालोचित समता ज्ञानेश्वरांनी दाखवून दिली आणि वरती असें सांगितलें कीं,तुम्ही समाजांत सकारण किंवा अकारण श्रेष्ठ व कनिष्ठ असे भेद कितीही करा, परमेश्वराच्या दरबारांत या तुमच्या मनुष्यकृत भेदांना जागा नाही. परमेश्वर फक्त मनुष्याचें अंतःकरण कसें आहे तें पहातो. तो श्रीमंत असो, दरिद्री असो, तो ब्राह्मण असो वा चांडाल असो, त्याचें अंतःकरण जर भक्तिपूर्ण असेल, सर्वात्मक परमेश्वराची पूजा करून सर्वांच्या उपयोगी जर तो पडत असेल, कामक्रोधमत्सरादि हीन भावना जर त्याच्या अंतःकरणांतून नाहीशा झाल्या असतील व सर्व भूतजातींविषयीं प्रेम जर त्याच्या

अंतःकरणांत असेल तर त्याची जाति कोणतीही असली तरी परमेश्वर त्याला श्रेष्ठ भक्त समजून आलिंगन देतो. तेव्हां तुम्ही केलेल्या कृत्रिम भेदांना परमेश्वरी राज्यांत यत्किंचितही किंमत नाही.

**ते पापयोनीहि होतु कां । ते श्रुताधीतही न होतु कां ॥**
**परि मजसीं तुकितां तुकां । तुटी नाहीं ॥ ९-४४९ ॥**
**म्हणोनि जाति कुळवर्ण । हें आघवेंचि गा अकारण ॥**
**एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ४५६ ॥**
**तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया ॥**
**जाति तवचि वेगळालिया । जव न पवती मातें ॥ ४६० ॥**

समाजाच्या दृष्टीने ते अत्यंत हीन योनीत जन्मले असले, त्यांनी जरी वेदाध्ययन केलें नसलें तरी या गोष्टींना माझ्याजवळ महत्त्व नाही. क्षत्रिय वैश्य, शूद्र, अंत्यज किंवा स्त्री हे भेद जोंपर्यंत लोक मला शरण आले नाहीत तोंपर्यंतच आहेत. माझ्याजवळ आले कीं, हे भेद नष्ट होतात असा श्रीकृष्णाचा संदेश ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाला त्यांच्या भाषेंत जेव्हां सांगितला तेव्हां आनंदाची मोठी लाट सर्व महाराष्ट्रभर उसळून गेली आणि सर्व जातींचे व सर्व धंद्यांचे लोक ज्ञानेश्वरांच्या निशाणाखालीं गोळा झाले. नामदेवशिंपी, सावतामाळी, गोराकुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखामेळा महार इत्यादि सर्व जातींच्या पुढाऱ्यांनी ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखालीं, ज्ञानेश्वरांनी उपदेशिलेला भागवत धर्म सर्व महाराष्ट्रांत पसरविण्याचें कार्य जोराने सुरू केलें व "या लागीं पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना । माझिया येती" हा ईश्वरी संदेश महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून पोंचविला.

ज्ञानेश्वरांच्या या कार्याबद्दल तत्कालीन लोकांमध्यें केवढा आदर वसत होता हें पुढील उद्गारावरून लक्षांत येईल. नामदेव हे ज्ञानेश्वराच्या समकालीन होते व ज्ञानेश्वरांच्या मागेंही पुष्कळ वर्षें जगले. त्यांचा जन्म वऱ्हाडांतील नरसी-ब्रामणी या गांवीं झाला असें आतां सिद्ध झालें आहे. ज्ञानेश्वरांचे हे अनुयायी असून ज्ञानेश्वरांच्या मागें त्यांच्या उपदेशाचा प्रसार करण्याचें महत्त्वाचें कार्य त्यांनी केलें. ते म्हणतातः—

**आम्हां सांपडलें कर्म । करूं भागवत धर्म ॥**
**काय करूनि तीर्थाटनें । मन भरलें अवगुणें ॥**

अशाच तऱ्हेचे कृतज्ञतेचे उद्गार सेना न्हावी यांनी काढले आहेत:—

"श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला । उदार तुम्ही संत । माय बाप कृपावंत । केवढा केला उपकार । काय वानूं मी पामर ॥ जडजीवा उद्धार केला । मार्ग सुपंथ दाविला । सेना म्हणे उतराई । होतां न दिसे कांहीं ॥" ईश्वर सर्वत्र भरला आहे; आत्मा आहे हा भूतांत । भूतें आहेति आत्म्यांत ॥ अशी भावना सर्वत्र पसरल्यामुळें व्यवहाराला एक प्रकारचा जिवंतपणा व पवित्रपणा आला. आपआपला धंदा कनिष्ठ नसून तो प्रामाणिकपणें करणें हें आपलें कर्तव्य आहे असें लोकांना वाटूं लागलें व त्यामुळें पूर्वींचें असमाधान नाहीसें झालें. सांवता माळी म्हणतात—"कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥" लसुण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥ सेना न्हावी यांनाही त्यांच्या धंद्यांत परमार्थ दिसून ते म्हणाले:—"आम्ही वारीक वारीक । करूं हजामत वारीक ॥ विवेक दर्पण दाऊं । वैराग्य चिमटा हलवूं ॥ उदकशांति डोई घोळूं । अहंकाराची शेंडी पिळूं ॥ भावार्थाच्या बगला झाडूं । कामक्रोध नखें काढूं ॥"

लोकांना कृतज्ञता वाटावी असेंच ज्ञानेश्वरांच्या उपदेशाचें स्वरूप होतें. सर्व दृष्टीने परिपूर्ण असा ईश्वर चराचराला व्यापून उरला आहे असा आस्तिक्याचा उपदेश करूनच ते थांबले नाहीत तर या परिपूर्ण ईश्वराची प्राप्ति करून घेण्याचा अधिकार अखिल मानव जातीला आहे अशीही त्यांनी घोषणा केली. परमेश्वराच्या मार्गांत आतांपर्यंत विधिनिषेधांचे आणि कृत्रिम निर्बंधांचे पर्वत पडले होते आणि वाटा अडून गेल्या होत्या. ज्ञानेश्वरांनी या वाटा सर्वांना मोकळ्या आहेत हा भगवंतांचा संदेश मराठी भाषेंत लोकांना समजून सांगितला. त्यामुळें आजपर्यंत ध्येयशून्य असलेल्या अफाट जनसमुदायाला ध्येय मिळालें. ज्यामुळें जगण्याला सार्थकता येईल, पवित्रता येईल व अंतःकरणाला समाधान वाटेल अशी वस्तु ज्ञानेश्वरांनी त्यांच्यासमोर उभी केली. जी कोट्यवधि अज्ञ जनता ध्येयशून्यतेमुळें किंवा चुकीचें ध्येय पुढें ठेवल्यामुळें आतांपर्यंत अंधारांत वावरत होती तिच्यापुढें परमेश्वरप्राप्तीचें श्रेष्ठ ध्येय ठेवून त्यांच्या संपूर्ण जीवनाला, ज्ञानेश्वरांनी

सुंदर वळण लावून दिलें व अशा रीतीने बौद्धमानभावांसारखा वेगळा पंथ न काढतां किंवा प्रतिपक्षी पंडितांशी भांडत न बसतां, किंवा प्रचलित धर्मालाच धर्म समजून शिव्या न देतां, खऱ्या धर्माचा निर्भय रीतीने उपदेश करून ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रांत प्रचंड सामाजिक क्रांति अगदीं गाजावजा न करितां, घडवून आणली. आजपर्यंत तुच्छ आणि हीन समजल्या गेलेल्या प्रचंड जनसमुदायाला त्यांच्या ध्येयाचें आणि अधिकाराचें ज्ञान करून देऊन श्रेष्ठ वर्णांच्या बरोबरीला आणून बसविलें. अहिंसेच्या तत्त्वाच्या मर्यादा स्पष्ट करून क्षत्रिय वर्णाच्या कर्तव्याचें स्पष्टीकरण केलें. तसेंच संन्यासाच्या तत्त्वाला कोणत्या मर्यादा आहेत तें सांगून वर्णप्राप्त कर्में केलींच पाहिजेत असें सांगितलें. या कर्मांना यज्ञाची योग्यता आणून दिली, भक्तीशीं कर्मांची सांगड घातली आणि त्रैवर्णिकांना बजावलें कीं धर्म हा देवघरांतच फक्त रहात नसून त्याची व्याप्ति तुमच्या सर्व आचारविचारांवर आहे आणि तुमच्या व्यवहारांत व आचारविचारांत जोंपर्यंत हा धर्म अभिव्यक्त झाला नाही, चातुर्वर्ण्यप्राप्त सामाजिक कर्तव्यें जोंपर्यंत स्वार्थत्यागपूर्वक तुम्ही आचरूं लागणार नाही तोंपर्यंत तुम्हांला खरे धार्मिक म्हणतां येणार नाही. यादवकालीन परिस्थिति पाहिली आणि ज्ञानेश्वर व त्यांचे अनुयायी यांनी त्यावेळेला केलेला हा उपदेश पाहिला म्हणजे संत हे परिस्थितिपराङ्मुख होते या आक्षेपाला जागाच उरत नाही. उलट ते अत्यंत जागृत होते. परिस्थितीचें त्यांनी सूक्ष्म निरीक्षण केलें होतें व लोकांच्या आकांक्षांशीं ते समरस झाले होते असेंच आढळून येईल. लोकांच्या कल्याणाची तळमळ लागलेला कोणताही थोर पुरुष परिस्थितिपराङ्मुख असूं शकत नाही ही गोष्ट नेहमी ध्यानांत बाळगिली पाहिजे. बिकट झालेली परिस्थिति सावरण्याचा ज्ञानेश्वरांनी पुष्कळ प्रयत्न केला पण त्यावेळच्या ब्राह्मण–क्षत्रियांनी त्यांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केलें असें दिसतें. ऐश्वर्याची धुंदी त्यांच्या डोळ्यावर आली होती. यादवांच्या कारकीर्दीत महाराष्ट्र उत्कर्षाच्या शिखरावर पोंचला होता. सोन्याचा भाव १५–१६ रुपये तोळा होता. " त्रिमाळिकें धवळारें " म्हणजे तीन तीन मजली चुनेगच्ची वाड्यांनी नगरें भरलीं होतीं. व्यापार इतका वाढला होता कीं, त्याकरितां कातड्यांच्या नोटा काढल्या होत्या. मंदिरें आणि मठ

तशींच वेश्यागारेंही नगरांत होतीं. अशा विलासांत निमग्न झालेल्या संपन्न व श्रेष्ठ वर्गांतल्या लोकांनी ज्ञानेश्वरांचा उपदेश मानला नाही. अनेक शतकें वैभवाचा उपभोग घेतल्यामुळें महाराष्ट्र जणूं काय निष्क्रिय व निर्वीर्य बनला होता. चक्रनेमिक्रमाप्रमाणें आतां कांही शतकें त्यानें अवनतींत काढणें अपरिहार्य झालें होतें. त्यामुळें मुसलमानांच्या हल्ल्यापुढें टिकाव न लागून यादवांचें राज्य लवकरच नामशेष झालें. हा राष्ट्रीय अधःपात पहाण्यास ज्ञानेश्वर जगले नाहीत. या अधःपातांतून डोकें वर काढण्याला साधन म्हणून आपला ग्रंथ आपल्या अनुयायांच्या स्वाधीन करून ते आधीच समाधिस्थ झाले. ज्ञानेश्वरांच्या अनुयायांनी ज्ञानदेवीला आपली आई मानलें व या आईनें, महाराष्ट्र जरी स्वराज्यभ्रष्ट झाला तरी पुढें त्याला संस्कृतिभ्रष्ट होऊं दिलें नाही.

यज्ञप्रधान वैदिक संस्कृतीला, आतां जरा देशकालानुरूप निराळें स्वरूप आल्यामुळें, हिंदु संस्कृति असें म्हणण्याचा कित्येकांचा परिपाठ आहे. या हिंदु संस्कृतीशीं इस्लामी संस्कृतीचा लढा उत्तर हिंदुस्थानांत ज्ञानेश्वरांच्या पूर्वीच सुरू झाला होता. या इस्लामी संस्कृतीचा संस्थापक महंमद पैगंबर हा असून इ. स. च्या सातव्या शतकांत अरबस्तानांत त्याने आपल्या धर्माची स्थापना केली व तरवारीच्या जोरावर धर्मप्रसार करण्याची आपल्या अनुयायांना आज्ञा दिली. धर्माप्रमाणें वागण्याचें समाधान आणि त्याबरोबरच ऐहिक ऐश्वर्य, कीर्ति व नतर स्वर्ग या सर्व गोष्टी एकदम मिळण्याचा संभव दिसल्यामुळें, महमदाच्या अनुयायांनी सर्व जगभर धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. ईश्वर एक आहे, मनुष्यास पुनर्जन्म नाही. आणि प्रलयकाल झाला म्हणजे तोंपर्यंत मेलेल्या सर्वच माणसांना ईश्वर एकदम न्याय देतो असें या धर्माचें तत्वज्ञान आहे व सर्वसामान्य नीतिनियमहि त्यांत सांगितले आहेत. मूर्तिपूजा, मद्यपान यांचा या धर्मांत निषेध केला आहे. आठव्या शतकाच्या आरंभी महंमद कासमने सिंधवर स्वारी केली तेव्हांपासून निरनिराळ्या मार्गांनी मुसलमानांचे हल्ले हिंदुस्थानवर होऊं लागले. तथापि हिंदुमुसलमानांच्या खऱ्या झगड्याला महंमद गझनीच्या स्वाऱ्यांनी इ. स. च्या ११ व्या शतकाच्या आरंभीं सुरवात झाली व हा लढा जवळ जवळ तीनशें वर्षे चालून उत्तर हिंदुस्थान पूर्णपणें मुस-

लमानांच्या कबजांत गेल्यानंतर, त्यांची दृष्टि दक्षिणेकडे वळली. दिल्लीला जलालुद्दिन खिलजी हा बादशहा असतांना त्याचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी यानें इ. स. १२९३ मध्यें देवगिरीवर स्वारी केली. रामदेवराव त्यावेळीं तेथें राज्य करीत होता. मी चुलत्याशीं भांडून तेलंगणांत चाललों अशा थापा मारीत मारीत अल्लाउद्दीन जेव्हां देवगिरीच्या तटाखालीं येऊन थडकला तेव्हां हिंदु लोक जागे झाले. राजा देवदर्शनास जात असतां त्याला अल्लाउद्दिन आल्याचें समजलें. तोंपर्यंत आपल्या राज्यांतून, आठ हजार स्वार घेऊन एक मुसलमान सेनापति देवगिरीकडे येत आहे या गोष्टीची राजाला वार्ताही नव्हती. अशा गाफील राजाचा मुसलमानांनी पराभव करून शेवटीं त्याचें राज्य खालसा केलें यांत कांहीच आश्चर्य नाही. अल्लाउद्दिनाने लोकांवर लुटीकरितां अनन्वित जुलूम केले. आणखी फौज मागून येत आहे अशा थापा मारल्या. किल्ल्यांत फितुरी करून धान्याच्या ऐवजीं मिठाचीं पोतीं भरविलीं व अशा रीतीने रामदेवरावास तह करावयास लावलें. रामदेवाचा मुलगा शंकरदेव कांही वेळ लढला पण त्याचेही लोक भेदरून पळून गेले. लढाईतून पळून जाणें पाप आहे हा धर्मच क्षत्रिय लोक विसरून गेले होते. अल्लाउद्दिन परत गेल्यावर रामदेवराव खंडणी पाठवितनासा झाला तेव्हां अल्लाउद्दिन दिल्लीचा बादशहा झाला होता. त्यानें मलिक काफुर यास इ. स. १३०६ त पुनः देवगिरीवर पाठविलें. त्याच्याशीं लढण्याची छाती नसल्यामुळें रामदेवराव त्याच्याबरोबर दिल्लीस गेला व मांडलिकत्व कबूल करून परत आला. तो १३०९ मध्यें वारला. त्याचा मुलगा शंकरदेव याने खंडणी पाठविण्याचें बंद केल्यामुळें १३१३ त मलिक काफूरनें पुनः स्वारी केली व शंकरदेवाला ठार मारिलें. त्यानंतर दिल्लींत बंडाळी झाली. त्यावेळीं रामदेवाचा जावई हरपालदेव यानें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा प्रयत्न केला तेव्हां मुबारिक खिलजीने पुनः स्वारी करून हरपालदेवास कातडी सोलून ठार मारिलें व अशा रीतीने १३१८ मध्यें महाराष्ट्र पूर्ण परतंत्र झाला. खिलजींच्या मागून तकलख घराणें दिल्लीस राज्यारूढ झालें. त्यावेळीं महंमद तकलख याच्या हसन गंगू ब्राह्मणी नावाच्या एका सरदाराने दक्षिणेंत १३४७ मध्यें स्वतंत्र राज्य स्थापलें. या बहामनी राज्याच्या

सुलतानांनी इ. स. १५२४ पर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें. पुढे या राज्याचे बेरीदशाही, इमादशाही, निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही असे पांच विभाग झाले. त्यापैकीं इमादशाही व निजामशाही यांचे संस्थापक हे बाटलेले ब्राह्मण होते. पुढें लवकरच इमादशाही निजामशाहीने गिळली. निजामशाही शहाजहानने बुडविली व त्याचा पुत्र औरंगजेब याने बेरीद-शाही, आदिलशाही व कुतुबशाही बुडवून टाकिली आणि या औरंगजेबाला शेवटीं महाराष्ट्रांतील मराठ्यांनी गिळून टाकलें.

इ. स. १३१८ त मुसलमानांनी देवगिरीचें राज्य घेतलें व आणखी दक्षिणेकडे जाऊन वरंगळचें व होयसळ बल्लाळांचें राज्यही बुडविलें. त्यामुळें जवळ जवळ सर्व हिंदुस्थानांत मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाली. असंख्य देवळें जमीनदोस्त झाली व अपार लूट दक्षिणेंतून उत्तरेकडे गेली. वैदिक संस्कृतीवर अशा रीतीचें घोर संकट आलें असतां तिचें संरक्षण करण्याच्या हेतूने तुंगभद्रेच्या काठीं विजयानगर येथें श्रीमाधवाचार्यांच्या साहाय्याने इ. स. १३३५ त हरिहर आणि बुक्क यांनी एक स्वतंत्र राज्य स्थापलें व दोन शतकेंपर्यंत या राज्यांत वैदिक संस्कृतीचें संरक्षण करण्यांत आलें. माधवा-चार्यांनी अनेक विषयांवर संस्कृतांत ग्रंथरचना केली व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सायणाचार्यांनी याच राजवटींत वेदावर सुलभ संस्कृत टीका लिहिली. अप्पय दीक्षित यांच्याच पदरीं होते. अनेक प्रवाशांनी विजयान-गरच्या ऐश्वर्याचीं आश्चर्यचकित करणारीं वर्णनें केलीं आहेत. हे राजे शूरही कांही कमी नव्हते. सन १५०९ मध्यें गादीवर आलेल्या कृष्णदेवरायाने आदिलशहाचा १५२० मध्यें मोठा पराभव केला. त्यामुळें मुसलमानांना भीति वाटून दक्षिणेंतील चारी शाह्या विजयानगरच्या हिंदु राजाशीं लढण्या-करितां एकत्र झाल्या व इ. स. १५६५ मध्यें तालिकोटच्या प्रसिद्ध लढाईंत त्यावेळचा राजा रामराय याचा वध झाला. त्यामुळें हिंदू सैन्य पळूं लागलें. मुसलमानांनी त्यांना कापून काढलें व पुढें विजयानगरला जाऊन पांच महिनेपर्यंत त्या शहराची लूट केली. देवळें व वाडे पाडून टाकले. आणि सर्व कलाकुसरीच्या कामाचा नाश करून टाकला. लोकांवर अनन्वित जुलूम केले व सर्व देश बेचिराख करून टाकला. ज्या शहराच्या ऐश्वर्याचीं

विलक्षण वर्णनें प्रवाशांनी केलीं आहेत त्या शहराची आजची स्थिति पाहिली म्हणजे अत्यंत खेद वाटतो.

इकडे महाराष्ट्रांत स्वराज्य जाऊन मुसलमानांचें राज्य झाल्यामुळें, हिंदु-संस्कृतीवर भयंकर संकट आलें व त्यांतून ती आतां जगते कीं मरते असा संशय वाटूं लागला. इस्लामी संस्कृतीला राजाश्रय असल्यामुळें हिंदु लोकांच्या आचारविचारांवर आणि भाषेवर व वेशावर या परकी संस्कृतीचे विलक्षण परिणाम झाले. बहामनी राज्याच्या ज्या पांच शाखा पुढें झाल्या त्यापैकीं दोन शाखा बाटलेल्या ब्राह्मणांनी स्थापिल्या होत्या हें लक्षांत घेतलें म्हणजे या संकटाची पूर्ण कल्पना येते. इमादशाहीचा संस्थापक फत्तेउल्ला हा मूळचा तेलंगी ब्राह्मण होता. आणि निजामशाहीचा संस्थापक हा तिमाण्णा बहिरव नांवाच्या ब्राह्मणाच्या बाटलेल्या मुलाचा मुलगा होता. ब्राह्मणांत बाटण्याची प्रवृत्ति ज्याअर्थी होती त्याअर्थी ती अज्ञसमाजांत केवढी असेल ! दक्षिणेंत मुसलमान आरंभीं अगदी थोडे होते. वैभवाच्या आमिषानें किंवा जुलमानें बाटलेल्या हिंदूंच्या आधारावरच त्यांनी आपलीं राज्यें सुस्थित केलीं. रा. भावे यांनी त्यावेळच्या स्थितीचें वर्णन फार चांगलें केलें आहेः—" असें दिसतें कीं, मुसलमानांची सत्ता इकडे सुरू झाल्यानंतर त्यांचा धर्म, त्यांची भाषा व त्यांचे रीतीरिवाज हे सर्व ते इकडे जबरीनें पसरवूं लागले. ते जिकडे गेले तिकडे त्यांनी दांडगाईच केलेली आढळते. केवळ लीलेसाठीं म्हणून हजारों ग्रंथांचा त्यांनी नाश केला आहे. नुसतें जानवें पाहिलें कीं शरीर उभें दुभंगावें, देवालय मग तें कसेंहि व केवढेंहि असो; तें जाळून पाडून फस्त करावें व त्या ठिकाणीं श्वेत वर्णाची मशीद उभारावी. परधर्मी लोकांना हाल हाल करून त्रास द्यावा व गांवचे गांव बायकापोरांसुद्धा बाटवून टाकावे अशी त्यांची रीत होती. राजसत्ता मुसलमानी असल्यामुळें सरकारदरबारांत फारशी भाषा सुरू झाली. 'अर्ज' दारांच्या 'फिर्यादी' 'काजी' पुढें जाऊन त्यांचा 'फैसला' किंवा 'इन्साफ' होऊं लागला. गडकऱ्यांचे 'नाईक' 'पायीक' 'पाटील' हे जाऊन त्यांच्याऐवजी 'किल्लेदार' व 'हवलदार' आपल्या 'शिलेदार' 'जमादारां'सह 'फौजे'चा 'अमल' करूं लागले. एकदां स्वातंत्र्य जाऊन परतंत्रता आली म्हणजे जिंकलेल्यांना आपलें सर्व कमी दर्जाचें

वाटून जेत्यांचें सर्व उच्च दर्जाचें व चांगलें असें वाटूं लागावें हा केवळ मनुष्यस्वभावाचा धर्म आहे. त्यामुळें राजकर्त्यांची भाषा सफाईने लिहिणें व बोलणें ही एक थोरपणाची व अभिमानाची गोष्ट वाटूं लागून वरच्या दर्जाचे लोक मुसलमानी भाषेचा अभ्यास जारीने करूं लागले. त्यांच्या खाजगी व्यवहारांत व घरांतल्या बोलण्यांत देखील हळुहळु मुसलमानी शब्दांचा शिरकाव जास्त जास्त होऊं लागला. " ( महाराष्ट्र सारस्वत ९२–९३ ) अशा रीतीने मराठ्यांचा देश, धर्म व भाषा यांवर विलक्षण संकट येऊन यांतून आपली संस्कृति वाचते कशी अशी शंका उत्पन्न झाली व दीड दोन शतकें महाराष्ट्र अगदीं सुन्न होऊन बसला. ज्ञानेश्वरांचे अनुयायी, संस्कृति भ्रष्ट होऊं नये म्हणून आपल्याकडून खूप धडपड करीत होते पण त्यांना कोणी तरी मोठा पुढारी त्यावेळीं पाहिजे होता. महाराष्ट्राच्या सुदैवाने पैठणच्या संत भानुदासांच्या वंशांत प्रसिद्ध संतशिरोमणि एकनाथ हे यावेळीं जन्माला आले व धर्म आणि भाषा यांवर जें विलक्षण प्राणसंकट आलें होतें त्याच्या निराकरणाला त्यांनी जोराने सुरुवात केली.

---

## प्रकरण आठवें

# एकनाथ आणि तुकाराम

एकनाथ हे महाराष्ट्रांतील एक सर्वश्रेष्ठ पुरुष होऊन गेले. त्यांचें विशुद्ध आचरण, त्यांची भूतदया व त्यांचा निर्भयपणा पाहिला म्हणजे त्यांच्या-विषयींच्या आदराने मन भरून जातें. परिस्थितिपराङ्मुख पंडितांनी भर-लेल्या पैठण नगरांत त्यांचा जन्म झाला. त्यांचे पणजे भानुदास हे महारा-ष्ट्रांत प्रसिद्ध होते. पंढरपुरच्या विठोबाची उपासना पूर्वीपासून लोक करी-तच होते पण ज्ञानेश्वरानंतर महाराष्ट्रांत ती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली व वारकरी संप्रदायातले लक्षावधि लोक दरवर्षी तेथें यात्रेकरितां जमूं लागले. विजयानगरच्या राजाने हा विठोबा पंढरपुराहून विजयानगरला नेला होता. महाराष्ट्रांत मुसलमानी अंमल सुरू झाल्यामुळें, हें सर्व प्रसिद्ध देवस्थान सुरक्षित नाही असें वाटूनही कदाचित् विठ्ठलाची मूर्ति विजयानगरच्या हिंदु राज्यांत लोकांनी पाठविली असण्याचा संभव आहे. पुढें भानुदासांनी विजयानगरला जाऊन ही मूर्ति परत पंढरपुरास आणली. अशा प्रसिद्ध पुरुषाच्या कुलांत एकनाथांचा जन्म शके १४५५ मध्यें झाला. कोणी तो १५ वर्षें पुढें नेतात. देवगिरीच्या किल्ल्यावरील अधिकारी जनार्दनपंत यांच्याजवळ नाथांचें अध्ययन झालें व नंतर तीर्थयात्रा करून नाथ पैठणला आले. गुरूच्या आज्ञेवरून गृहस्थाश्रम स्वीकारून लोकोद्धा-राला नाथांनी सुरवात केली. भागवत धर्माचें लोकांना यथार्थ ज्ञान करून द्यावें म्हणून भागवताच्या एकादश स्कंधावर पैठण व काशी येथें राहून त्यांनी विस्तृत टीका लिहिली व रामायणांतील आदर्श स्त्रीपुरुषांचीं चरित्रें भावार्थरामायण रचून लोकांना सांगितलीं.

नामदेवांच्याच वेळीं 'दैत्यांचेनी भारें दाटली अवनी' अशी स्थिति झाली होती. एकनाथांच्या वेळीं विजयानगरचें हिंदुराज्य नष्ट होऊन ही स्थिति अधिकच भयावह झाली. एकनाथी भागवताच्या चौथ्या अध्यायांत एकनाथ म्हणतात "ते कर्म निंदिती सकळ । त्यागिती केवळ जाड्य म्हणौनि ॥ ७५ ॥ ऐशिये वर्ततां मोहस्थिति । पूर्ण कळीची होय प्रवृत्ति ।

तेव्हां नीच ते राजे होती । प्रजा नागविती चोरप्राय ॥ ७६ ॥ शूद्राहूनि अति कनिष्ठ । ते राजे होती परमश्रेष्ठ । वर्णावर्ण करिती भ्रष्ट । अति पापिष्ठ अधर्मी ॥ अपराधेवीण ते वितंड । भले त्यांसी करिती दंड । मार्गस्थां करिती कोंड । करिती उदंड सर्वापहरण ॥ अशी राजकीय परिस्थिति असतां ‘ स्वमुखें ब्राह्मण न करिती अध्ययन । होती भ्रष्ट जाण मद्यपी ते । नीचाचें सेवन करिती घरोघरीं । श्वानाचिये परी पोट भरिती ॥ ( गाथापंचक २५७८ ) अशी ब्राह्मणांची स्थिति होती. व ‘ दावलमलकाची पूजिती गदा । वर्षांतून फकीर होती एकदां । मग डोला होतां थंडा । खाती मलिदा हिंदु तुर्काचें खरकटें ( गा. पं. ३८९२ ) अशी एकंदर हिंदूंची स्थिति होती. ही सर्व परिस्थिति वर सांगितल्याप्रमाणें स्वधर्म कर्में सोडल्यामुळें उत्पन्न झाली होती म्हणून एकनाथांनी ज्ञानेश्वरांप्रमाणेंच पुनः एकदां चारी वर्णांची व आश्रमांचीं कर्तव्यें आणि भागवत धर्माचें स्वरूप लोकांना स्पष्ट करून सांगितलें. संस्कृताप्रमाणेंच मराठी भाषाही थोर असल्यामुळें त्याच भाषेच्या द्वारें एकनाथांनी आपला उपदेश केला. आजूबाजूला फारशी भाषेचा हैदोस सुरू असतां एकनाथांनी आपले ग्रंथ शक्य तितके शुद्ध मराठी भाषेंत लिहिले व भाषा जिवंत ठेविली. ‘संस्कृत वाणी देवें केली । प्राकृत तरी चोरापासूनि झाली । असोतु या अभिमान भुली । वृथा बोली काय काज ॥ ए. भा. १-१२९. संस्कृत भाषा निंदा केली । तरी ते काय पावन जहाली । प्राकृत भाषा हरिकथा केली । ते वृथा गेली म्हणवेना ।(ए.भा. २३-१०३१) अशी त्यांची समजूत होती.

पूर्वील कृतयुगीचें लक्षण । तैं नव्हते गा चारी वर्ण । बहुशाखा वेद पठण । कर्माचरण तैं नाही ( १७-६३ ) अशी पूर्वीची स्थिति सांगून चारी वर्णांचीं कर्तव्यें व गुण एकनाथांनी भागवताच्या आधारें सविस्तर सांगितले. शम, दम, तप, शौच, क्षान्ति, आर्जव हे ब्राह्मणाला अवश्य असणारे गुण गीतेप्रमाणेंच भागवतांतही सांगितले आहेत. पण गीतेंतील ज्ञान, विज्ञान आस्तिक्य या गुणांच्या ऐवजीं भागवतांत ‘ मद्भक्तिश्च दया सत्यं ’ हे गुण ब्राह्मणाला आवश्यक सांगितले आहेत. ब्राह्मणाने अपकाऱ्यावरही उपकार करावा तसेंच ‘ बाळक देखोनि संकटीं । जेवीं न सावरत माय उठी । तेवीं दीन देखोनि दृष्टी । ज्याचे पोटीं दया द्रवे ।१७ १२३।

तो खरा ब्राह्मण होय. क्षत्रियानें 'वेचूनियां निजप्राण । गोब्राह्मणांचें संरक्षण । स्वधर्में प्रजापालन । पृथ्वीरक्षण निरुपद्रवें ।१७–११६। करावें. 'शस्त्रांचे घाय वाजतां माथा । कां सपिच्छ बाण खडतरतां । रणांगणीं न सरे मागुता । हे सहिष्णुता क्षत्रियाची ॥१७-१५१॥ अशा रीतीने ब्राह्मणाच्या व क्षत्रियाच्या सहिष्णुतेचें स्वरूप वेगळें आहे. वैश्याने अर्थसंग्रह करण्यांत व दान करण्यांत दक्ष असावें व शूद्राने देव, गाई व ब्राह्मण यांची सेवा करावी. 'तरी देह गेह वर्णाश्रमें । स्वभागा आलीं जीं कर्में । तीं तीं आचरोनि निजधर्में । पूर्वानुक्रमें अनहंकृती ॥२-४४०॥ **जें जें कर्म स्वाभाविक । तें तें ब्रह्मार्पण अहेतुक । या नांव भजन निर्दोष । भागवत धर्म या नांव शुद्ध** ॥ २-४५१ ॥ अशी भजनाची व भागवत धर्मांची स्पष्ट व्याख्या करून वर्णाश्रमधर्मप्राप्त कर्में भक्तानेही सोडतां कामा नये असा स्पष्ट उपदेश एकनाथांनी केला. मात्र मी अमक्या वर्णाचा आहें असा अहंकार कोणीही धरूं नये असेंही त्यांनी बजाविलें ( २-७१५ ) केवळ जन्माने मोठेपणा येत नाही. हो कां वर्णामाजी अग्रणी । जो विमुख हरिचरणीं । त्याहूनि श्वपच श्रेष्ठ मानी । जो भगद्भजनीं प्रेमळु ॥५-६०॥ अठराव्या अध्यायांत एकट्या ब्राह्मणामध्येंच कलियुगांत चार वर्ण कसे उत्पन्न झाले आहेत ते १०५ ते ११० ओव्यांत एकनाथांनी सांगितलें आहे. 'ज्यासी जीविका जेणें जाण । त्या ब्राह्मणाचा तोचि वर्ण' ( १८–१०६ ) असा एकनाथांचा वर्ण ठरविण्याचा दंडक आहे. तेव्हां जाति जन्मावरून व वर्ण गुणकर्मावरून प्राप्त होतो हें तत्त्व एकनाथानाही मान्य होतें असें स्पष्ट दिसतें.

आश्रमांची व्यवस्था सांगतांना एकनाथांनी म्हटलें आहे कीं, संन्यास हा ब्राह्मणालाच विहित आहे. क्षत्रियवैश्यांना नाही ( १७–३७८ ). ब्रह्मचर्याश्रमांत ज्याला विरक्ति उत्पन्न होणार नाही त्याने गृहस्थाश्रम स्वीकारावा. असगोत्र पण सवर्ण, वरापेक्षां सात पांच वर्षांनी लहान (३९७) वयाने आठ ते दहा वर्षांची अशी वधू पत्नी करावी. यावरून एकनाथांच्या कालीं बालविवाह सर्रास सुरू होते असा तर्क होतो. 'इतर स्त्रिया माते समान मानण्याकरितां 'स्वदारागमन नेमिलें वेदे' ( ५–२२६ )

असें त्यांनी बजाविलें आहे. विवाह किंवा यज्ञ करण्याची वेदाची आज्ञा, लोकांनी विषयसुख आणि मांसाशन यांत जास्त प्रवृत्त व्हावें म्हणून केलेली नसून या वासनांचें नियमन करण्याकरितां केली आहे, म्हणून यज्ञामध्यें पशूंचें हनन करूं नये असें एकनाथांनी सांगितलें आहे. तसेंच अहिंसा हा संन्याशाचा धर्म आहे. गृहस्थानें अग्निहोत्र बाळगून संन्यासी व ब्रह्मचारी यांस अन्न द्यावें आणि भूतसंरक्षण करावें. संन्याशानें गृहस्थाचे धर्म पाळणें किंवा गृहस्थानें संन्याशाचे धर्म पाळणें हा अधर्म आहे (१८–३२७). अशा रीतीनें वर्ण आणि आश्रम यांचीं कर्तव्यें स्पष्ट करून त्यांनीच परमेश्वरप्राप्ति होते असें ‘ माझिये प्राप्तिलागीं स्वकर्म । नैराश्यें आचरावा स्वधर्म । हें ज्यासी कळे वर्म । तया पुरुषोत्तम सदा वश्य (१८–३८०) या ओवींत एकनाथांनी सांगितलें. याच्या उलट ‘ जे कां स्वधर्मी विमुख । त्यांसी माझी प्राप्ती नाही देख ’ (३८४) हें ईश्वराचें वचनही लोकांच्या निदर्शनास त्यांनी आणलें व भागवत धर्माचें खरें स्वरूप, स्वधर्मयुक्त भक्तीचें आहे असें स्पष्ट केलें.

एकनाथांचें भागवत, रामायण, अभंग व भारूड यांवरून तत्कालीन सामाजिक स्थितीवर पुष्कळच प्रकाश पडतो. बालविवाह प्रचारांत होते हें वर लिहिलेंच आहे. व्याह्याव्याह्यांचीं भांडणें व रुसवे फुगवेही होत असत असें “ व्याही रुसलिया पायां पडती (ए. भा. ४–१०५). व्याही रुसलिया कन्या न धाडी (४–१०६). ” वगैरे वर्णनावरून दिसतें. रामायणांत भरताबरोबर रामाकडे चाललेले निरनिराळे धंदेवाले व सैन्याच्या निरनिराळ्या विभागांतील लोक यांचें वर्णन आहे. एकनाथांच्या वेळीं क्षुद्र देवतांची उपासना फार वाढली होती. “कलिमाजीं दैवतें उघड दिसती फार। नारळ आणि शेंदूर यांचा भडिमार ॥ (गा. पं. २५८४). म्हणून मेसाबाईपुढें मेंढरें, बोकड मारण्याऐवजीं विठाबाईला भजा असा उपदेश एकनाथांनी केला आहे (गा. पं. ३५८७). शिमगा आतांप्रमाणेंच त्या वेळींही साजरा करीत असें ‘भूतसभेचीं कारटीं । विषय गोवऱ्या चोरटीं । जागोजागीं थांबा। अवघे मिळोनि मारा बोंबा ॥ ’ वगैरे उल्लेखांवरून दिसतें. एकनाथांच्या काळीं लोकांच्या दानधर्मावर जगणारे पुष्कळ प्रकारचे लोक होते. ब्राह्मण, वेदपाठक, पुराणिक, संन्यासी, जपीतपी, योगी, तीर्थी, महंत, मुक्त, वैरागी,

गोसावी, गुरु, मानभाव, फकीर, पुजारी, कथेकरी, वाळसंतोष, वासुदेव, सरोदा, दिवटा, कैकाडी, जंगम, भुत्या, वाघ्या, कंजारीण, शंखीण, डंखीण, इत्यादि ब्राह्मणापासून तो शूद्रापर्यंत सर्व वर्णांच्या परोपजीवी स्त्रीपुरुषांची यादी भारुडांत आली आहे. ठाणेदार, पाटील, चौगुला, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौधरी, शेटे, महाजन, बारावलुते, माळी, तेली, लोहार, सुतार, महार, मांग, वेसकर, जागल्या, इत्यादि अनेक लहानमोठीं कामें करणाऱ्या ग्रामसंस्थेंतील लोकांचा उल्लेख भारुडांत आला आहे. गांवच्या महाराकडे त्या वेळी वरींच कामें असावीं असें दिसतें. एकनाथ एका महाराच्या रूपकांत म्हणतातः—कामाधामाचा उल्लंघ करितों । आल्यागेल्यासी जबाब देतों । साऱ्या रयतेचीं घरें राखीतों । हें कष्ट सान कीजी मायबाप ॥ कितिकांची लांकडे द्यावीं । शिंग शिंगुटी म्याच पुरवावी । फजिती रावणुकीची सोसावी । हें दुःख सान कीजी मायबाप ॥ मेखा पायबंद तोबरे माथा । जीव कष्टला बिगारी वहातां । चौऱ्याशीं लक्ष गांवें हिंडतां । हें दुःख सान की जी मायबाप ॥ एके ठिकाणीं हिंदु-तुर्क संवाद वर्णिला आहे. त्यांत तुमचा धर्म तुम्हांला नीट कळत नाही असें हिंदु तुर्काला सांगत आहे तर तुर्क हिंदूला अक्कलगधडा म्हणत आहे. पण शेवटीं "खुदा माना पश्चिमेकडे । येर अवघें कां ओस पडे" "पांच वख्त खुदाचे झाले बाकी वख्त काय चोरी नेले" "आम्हांसी म्हणतां पूजितां फत्तरे । तुम्ही कां मुडद्यावर ठेवितां चिरे" "हिंदुमुसलमान दोई । खुदाने पैदा किया भाई ॥ तुर्ककी निष्ठा पाई । हिंदूकू पकडकर मुसलमान करो ॥ हिंदुकरितां खुदा चुकला । त्याहुनि थोर तुमच्या अकला ॥ हिंदूस मुसलमान केला । गुन्हा लाविला देवासी ॥ असा युक्तिवाद करून हिंदूने तुर्काला वादांत जिंकल्याचें या संवादांत दाखविलें आहे. हिंदूंना बाटविण्याचें काम त्या वेळीं कसें जोरांत असेल याची यावरून कल्पना येते. या बाटविण्याच्याविरुद्ध चळवळ करावी म्हणून हा संवाद रचिलेला दिसतो.

अशा उपदेशाने व स्वतःच्या आचरणाने खरा धर्म कसा असतो हें एकनाथांनी लोकांना सांगितलें. परमात्मा सर्वांभूतीं असल्यामुळें, भूतदया सर्वश्रेष्ठ आहे हें दाखविण्याकरितां, त्यांनी एकदां श्राद्धाचें अन्न अस्पृश्यांना खाऊं घातलें, वाळवंटांत चुकलेलें अस्पृश्याचें मूल स्वतः घेऊन म्हार-

वाड्यांत पोंचविलें, एवढेंच नव्हे तर एकदां एका सच्छील अस्पृश्याच्या येथें जेवावयासही गेले व या रीतीने कृत्रिम भेदांचा फोलपणा त्यांनी लोकांच्या नजरेस आणला. अस्पृश्योद्धाराचे महाराष्ट्रांतील पहिले पुरस्कर्ते एकनाथ होते. आपल्या आचरणाच्या शुद्धतेबद्दल त्यांना यत्किंचितही संशय नसल्यामुळें ते कधींच कोणाला भ्याले नाहीत. याबद्दल जुन्या मताच्या लोकांकडून कांही काळ त्यांना छळही सोसावा लागला. स्वतः ते अहिंसेचे व शांतीचे मोठे पुरस्कर्ते होते. अंगावर यवन थुंकला असतांही त्याचा प्रतिकार न करितां तें त्यांनी सोसलें व तो जितका वेळ थुंकला तितका वेळ पुनः स्नान करून त्यालाच त्यांनी दमविलें. स्वतः ब्राह्मण वर्णाचे असल्यामुळें त्यांनी हा शांतीचा मार्ग पत्करला असावा. क्षत्रियांनीहि असेंच वागावें असें त्यांनी कोठेंच सांगितलें नाही. उलट महालक्ष्मीला केलेल्या प्रार्थनेंत ते म्हणतातः–दुर्योधन हा लक्ष्मी तुझा रेडा। शेवटीं आहुती घेसी तयाची॥ बया दार उघड ॥ घेऊनि दहा अवतार। करिसी दुष्टांचा संहार। आकार सारुनि निराकार। काय बैसलीस बया॥ म्लेंच्छे गांजिलें देवभक्तां। महिमा उच्छेदिला सर्वथा। न चले जप तप तत्त्वता॥ एकरूप सर्व झाले बया। बया दार उघड दार उघड॥ एकनाथांची यावनी सत्तेविपर्यींची मनोवृत्ति यावरून कळून येते. एकनाथांच्या वेळेलाच दासोपंतानी गीतेवर अनेक टीका लिहिल्या त्यांपैकीं एका टीकेची ग्रंथसंख्या सव्वा लाख आहे. पण एकनाथांच्यापुढें दासोपंत चमकूं शकले नाहीत. कारण एकनाथांच्या मध्यें उदात्त विचार व निर्भय आचार यांचा जसा संगम झाला होता तसा दासोपंतांत नव्हता. दासोपंत केवळ ग्रंथकार होते. एकनाथ ग्रंथकार व तत्कालीन समाजाचे पुढारी होते. त्यांनी ज्ञानेश्वरी शुद्ध केली. स्वतः भागवत–रामायणावर ग्रंथरचना केली व या ग्रंथांचें अध्ययन करून तुकोबारायांनी ही परंपरा पुढें चालवून भक्तिमंदिरावर कळस चढविला. "राहिले वर्णाश्रम धर्म। अन्योन्य विचरती कर्म" असा खेद तुकोबांनी प्रकट केला आहे. समाजाला संस्कृतीपासून भ्रष्ट न होऊं देण्याचें ज्यांचें कर्तव्य ते ब्राह्मणच 'वेदाचे पाठक सेविताती मद्य' 'सोडिले आचार। द्विज चहाड झाले चोर।' 'थोर या युगाचें आश्चर्य। ब्रह्मकर्म उत्तम सार। सोडूनियां द्विजवर। दावल पीर स्मरताती" असे भ्रष्ट झाले होते.

तुकोबा म्हणतात, ब्राह्मणानीच असें केलें म्हणजे " वैश्य शूद्रादिक हे तों सहजच नीच लोक " असल्यामुळें ते संस्कृतिभ्रष्ट झाले तर यांत काय नवल ? क्षत्रियही कर्तव्यभ्रष्ट झाले होते पण ब्राह्मणांवर जास्त जबाबदारी असल्यामुळें तुकोबांनी त्यांच्यावर अगदीं झोड उठविली व तत्कालीन नीतिभ्रष्ट समाजाला नीतीचा उपदेश केला. " शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत । पराविया नारी माऊली समान । मानलिया धन काय वेचे ॥ न करितां परनिंदा द्रव्याभिलाप । काय तुमचें यास वेचे सांगा ॥ खरें बोलतां कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसें सांगा ॥ तुका म्हणे देव जोडे याच साठीं । आणिक ते आटी नलगे कांही ॥ या अभंगांत त्यांच्या उपदेशाचें सार आलें आहे. ' धर्म रक्षायासाठीं । करणे आटी आम्हांसी ' असें तुकोबांनी सांगितलें आहे. ' उंच नीच कांही नेणे हा भगवंत । तिष्ठे भाव भक्त देखोनियां ॥ असें सांगून समतेचा व भक्तीचा त्यांनीं महाराष्ट्रांत सर्वत्र प्रसार केला. विठ्ठल नामाच्या गर्जनेने सर्व महाराष्ट्र हलवून सोडलें. आषाढी कार्तिकीला महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख लोक पंढरपुरला जमूं लागले. तेथून देवधर्मभक्तीचा संदेश आपआपल्या गांवीं परत नेऊं लागले व अशा रीतीने संतांनी महाराष्ट्रावर आलेलें संस्कृतिनाशाचें मोठें संकट टाळलें.

संताचें वाङ्मय पारमार्थिक हा त्याचा कित्येक म्हणतात त्याप्रमाणें दोष नसून उलट मोठा गुण आहे. परम–अर्थ म्हणजे श्रेष्ठ गोष्ट, किंवा उच्च ध्येय होय आणि संतांच्या समोर जी जनता होती तिच्यापुढें उच्च ध्येय ठेवण्याचीच त्यावेळीं अत्यंत आवश्यकता होती. परमेश्वर प्राप्ति, परमेश्वराप्रमाणें परिपूर्ण होणें हें श्रेष्ठ ध्येय, हा परम अर्थ संतांनी लोकांपुढें ठेविला, त्यामुळेंच लोकांच्या जीवनाला सार्थकता आली. हा परम अर्थ साध्य करण्याचा आपल्याला अधिकार आहे व त्याकरितां धर्म न सोडतां उलट धर्मांप्रमाणेंच वागणें अवश्य आहे अशी सर्व जनतेची संतांनी खात्री केल्यामुळेंच ते संस्कृतीचें संरक्षण करूं शकले. परमार्थामध्यें परिपूर्ण परमात्म्याचें स्वरूप सांगितलेलें असतें व हा परिपूर्ण परमात्मा प्राप्त करून घ्या म्हणजे स्वतः परिपूर्ण बना असा उपदेश केलेला असतो, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे मनुष्याने परिपूर्ण होण्याच्या या ध्येयाचा उपदेश

करणारा परमार्थ प्रत्येक राष्ट्राला किती आवश्यक आहे तें कळून येतें. संताळ्यांनी राष्ट्राला पंगू बनविलें असें एका काळीं म्हणणाऱ्या राजवाड्यांनीच पुढें संतांच्या कामगिरीचें वर्णन केलें आहे:—

" अठरापगड जातींचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्वधर्मभ्रष्ट झाले असतां ते बहुतेक मुसलमान बनल्यासारखेच झाले. इतकेंच कीं, त्यांनी सुंतेची दीक्षा मात्र घेतली नाहीं. तीहि त्यांनी घेतली असती, परंतु त्यांच्या आड एक मोठी धोंड आली. ती धोंड महाराष्ट्रांतील साधुसंत होत. भांडणें, तंटे, अपेयपान, अभक्ष्यभक्षण यांचें साम्राज्य सर्वत्र मातलेलें पाहून ही बजबजपुरी ताळ्यावर यावी या सद्धेतूने, साधुसंतांनी सर्वांना सहजगम्य व सुलभ असा भक्तिमार्ग सुरू केला. प्रजा आर्यधर्माला, सनातन संस्कृतीला सोडून जावयाच्या पंथास लागली होती, बरेच लोक सोडूनहि गेले होते. बाकी राहिलेल्या लोकांचा मगदूर पाहून साधुसंतांनी परमकारुणिक बुद्धीने, भक्तिमार्ग सुरू केला. अशा सद्धेतूने कीं, कसेंहि करून हे लोक हिंदुत्वांत राहावे. आणि अशा सदाशेने कीं, पुढेमागे लोकोत्तर अवतारी पुरुष निपजलाच तर त्याच्या द्वारा हे लोक पुनः धर्मकर्मनिष्ठ बनण्याचा संभव राहावा. 'अज्ञं छंदानुवृत्तेन' असा प्रकार साधुसंतांनी केला. स्नान, संध्या, जपजाप्य, दंडप्रायश्चित्त, धर्माधर्म यांचा द्वेष अज्ञ लोकांच्या ठायीं होताच. त्या द्वेषाला साधुसंतांनी गुणांचें स्वरूप दिलें. ' स्नानसंध्या टिळेमाळा ' या ढोंगाची आमच्या या भक्तिमार्गांत जरुरी नाही असा पुकारा त्यांनी केला आणि भगवन्नामस्मरणाचा साधा मंत्र जो भेटेल त्याला देण्याचा सपाटा चालविला. मुमुक्षु नामस्मरणाने आकृष्ट झाला म्हणजे, त्याला ते नवविधा भक्तीची माहिती देत. त्यांत शुचिर्भूतपणें कसें रहावें, सत्य, अहिंसा इत्यादि धर्म कसे पाळावे वगैरे हिंदुधर्मांतील विधिनिषेधांची ओळख करून दिली जाई. वर्णाश्रमधर्माचें फारसें नांव काढीत नसत. फक्त कुलधर्म, जातिधर्म, पितृधर्म पाळण्यांत पुण्य आहे एवढेंच सांगितलें जाई. अशा रीतीनें, साधुसंतांनी, या भक्तिमार्गाच्या द्वारा, वर्णाश्रमधर्मलोपप्रधान अशी ही महाराष्ट्रांतील दुर्दैवी प्रजा, दोन अडीचशें वर्षे आर्यसमाजांत मोठ्या शिताफीने थोपवून धरिली आणि आर्यसंस्कृतीचें संरक्षण केलें. तेव्हां आपल्या या देशावर त्यांचे उपकार

बिनमोल झाले ह्यांत काडीचाही संशय नाही. जर भरतखंडांत व महाराष्ट्रांत त्या कालीं भक्तिमार्ग नसता तर अफगाणिस्थान, इराण वगैरे देशांतल्याप्रमाणें ह्या देशांतील सर्व प्रजा एकवर्णी मुसलमान झाली असती; आणि आर्यसंस्कृति, आर्यसारस्वत, आर्यसमाज, आर्यचातुर्वर्ण्य, आर्यशील ह्या जगांतून समूळ उच्छिन्न झालें असतें." साधुसंतांच्या कामगिरीचें राजवाड्यांनी केलेलें हें वर्णन, यापेक्षां सुंदर रीतीने क्वचितच करितां येईल.

पण या भक्तिमार्गावरच जोर देण्याचा परिणाम पुढें असा होऊं लागला कीं, मूळ भागवतधर्मांत भक्तीबरोबरच कर्माला जें महत्त्व होतें तें नाहीसें होऊन केवळ भक्तीलाच महत्त्व येऊं लागलें. चोवीस तास परमेश्वराचें भजन, पूजन करण्यांतच वेळ घालविणें व व्यवहाराकडे आणि प्रपंचाकडे दुर्लक्ष करणें हें मोठेपणाचें लक्षण समजूं लागले व भक्तीला निष्ठेचें म्हणजे इतिकर्तव्यतेचें स्वरूप आलें. खुद्द एकनाथांनी या संबंधांत परस्परविरुद्ध विधानें एक दोन ठिकाणीं केलीं आहेत. एकनाथी भागवताच्या बाराव्या अध्यायांत 'जंव नव्हे ब्रह्मज्ञान। तंव स्वधर्माचरण करावें ॥२८५॥ पावलिया परब्रह्म। मिथ्या वेदोक्त सकळकर्म। मिथ्या आश्रमादि वर्ण धर्म। हें त्यागितें वर्म कर्माचें ॥ ५९२ ॥ असें सांगितलें असून अठराव्या अध्यायांत 'गृहस्थाश्रमीं जो धर्म आहे। तो इतर आश्रमीं करूं नये। इतर आश्रमींचा धर्म पाहे। गृहस्थाश्रमीं होये करणीय ॥११७॥असें म्हणून गृहस्थाला संन्याशाचे अहिंसा, शांति, विरक्ति इत्यादि नियम पाळण्यास मोकळीक दिली आहे. ब्रह्मज्ञानोत्तर कर्में करूं नये असें शंकराचार्यांनीच सांगितलें आहे. तेव्हां त्याबद्दल केवळ एकनाथांनाच दोष देतां येणार नाही व गृहस्थाला इतर आश्रमांचे नियम पाळण्यास मोकळीक देणाऱ्या ओवीचा पाठही चुकीचा असण्याचा संभव आहे हें येथें सांगितलें पाहिजे. पण एकनाथांच्या मागून आलेल्या तुकोबांनी "प्रपंच परमार्थ संपादीन दोन्ही। एकही निदानीं नव्हे त्यासी। तुका म्हणे तया दोन्हीकडे धका। शेवटीं तो नरकामाजी पडे ॥ (गा. पं. ३०७१) असें स्पष्ट सांगितलें. रामदासांनी पुढें बरोबर याच्या उलट उपदेश केला. वामनपंडितांनी "वेदोक्त कर्म लौकिक कर्म। भगवदर्पणी भागवत धर्म ॥ अशी भागवत धर्माची व्याख्या करून भक्तीचें व कर्माचें महत्त्व यथार्थदीपिकेंत जागोजाग

सांगितलें आहे. पण शेवटीं " सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् " ( गीता १२–११ ) या श्लोकावर टीका करितांना " म्हणोनि सर्व कर्म त्याग। त्याकारणें करी म्हणे श्रीरंग " असा चुकीचा अर्थ करून भक्तीला कर्मापेक्षां श्रेष्ठ स्थान दिलें आहे. रामदासांच्या नगाऱ्यांत वामनपंडितांची ही टिमकी कोणाला ऐकूं गेली नाही ही गोष्ट वेगळी. भागवत धर्माचा याप्रमाणें प्रथमपासूनच कर्मापेक्षां भक्तीकडे जास्त कल असल्यामुळें,ज्याच्या मध्यें भक्तीपेक्षां वर्णधर्माला जास्त महत्त्व दिलें आहे असा ' महाराष्ट्र धर्म ' हा शब्द प्रचारांत आला. मराठे आणि त्यांचा महाराष्ट्र वर्णाश्रमधर्माचा पहिल्यापासून अभिमानी आहे हें दर्शविण्याकरितां त्याला महाराष्ट्र धर्म असें नांव दिलें. एकनाथांच्या थोडा काल आधीं झालेल्या सरस्वती गंगाधराच्या गुरुचरित्रांत हा 'महाराष्ट्र-धर्म' शब्द आढळतो. एकनाथांच्या आधीं शके १३७० च्या सुमाराला हा महाराष्ट्र–धर्म क्षत्रियांना सांगण्याचा प्रयत्न महाराष्ट्रांत झाला असें महिकावतीच्या बखरीवरून दिसतें.

" याउपर देशामध्यें तेही बहुत यवन झाले. राज्य अभिमान सोडला शस्त्रें सोडिलीं. कृषि धरिली...बहुत आचारहीन झाले. बहुत गोत्र, प्रवर, कुळस्वामीण, कुळगुरु, ठिकाणें सांगतां विसरूं लागले. जाणोन देवीने, **धर्म माराष्ट्र** रक्षाया कारणें राजश्री नायकोरावास स्वप्न दिल्हें, जर हा जातिमेळवा करावा, श्रीदेवी आद्यशक्ति जगदंबिका **महाराष्ट्रधर्मरक्षिका** तुम्हांस प्रसन्न असो. " असा दृष्टांत झाल्यावर मालाडचा देसाई नायकोराव याने आसपासचे ३–३॥ हजार क्षत्रिय व ४–५ शें ब्राह्मण एकेठिकाणीं जमविले व वर सांगितल्याप्रमाणें केशवाचार्याकडून महाराष्ट्र-धर्म म्हणजे काय तें समजून घेतलें. त्या ठिकाणीं क्षत्रिय वर्ग विशेषतः जमला असल्यामुळें, " मराठा क्षत्रिय जो आहे त्याने कुक्कुट शब्दापासून उठावें. शौचस्नान संपादावें. देवपूजन, नित्यकर्म आचार्ययुक्त करावें. शास्त्र-वचनाधारें न्याय निवडावा, पुराणेतिहास प्रत्यहीं ऐकावा. शस्त्र कमरेस बांधून भोजन करावें. गाफील कदापि न राहावें; असें शास्त्रोक्त, धर्मचोदित आचरण जो करील तो क्षत्रिय, गर्भादान, चौल, व्रतबंध, विवाह, महोत्सव, विद्यारंभ इत्यादि कर्में वेदोक्त करण्यास योग्य आहे " अशा आशयाचा क्षत्रियधर्म केशवाचार्यानें त्यांना सांगितला. पण क्षत्रिय आपला धर्म

ऐकण्याच्या मनःस्थितींत त्या वेळीं नव्हते. स्वतःचें राज्य स्थापावयाचें बाजूलाच राहिलें, पण उलट आपआपसांत भांडून, मुसलमानांच्या पदरीं त्यांचेंच राज्य वाढविण्याकरितां त्यांनी सेवा पत्करिली होती ! अशी स्थिति असल्यामुळें एकनाथांनी रामायण रचिलें व त्यांचा नातू मुक्तेश्वर याने भारताची कथा लोकांना सांगण्यास आरंभ केला. शांति आणि क्षमा यांच्या मर्यादा काय आहेत, परमार्थाचे गुण प्रपंचांत आणल्याने व संन्यासाश्रमांतील धर्म गृहस्थाश्रमी पाळूं लागल्याने कसा गोंधळ होतो; 'स्वराज्य' मिळविल्यापासून कसे फायदे होतात तें मुक्तेश्वराने सांगून रामदासी उपदेशाची प्रस्तावना केली. वनपर्वांतील चौथ्या अध्यायांत द्रौपदीचें धर्मराजाशी झालेलें संभाषण असें आहे:—

"साधलिया स्वराज्य संपत्ति । यज्ञीं देव तृप्त होती । श्राद्धीं पितृगण अतिथी । अन्नदाने तोपती ॥ ३९ ॥ हरेल दारिद्र्याचें दुःख । मित्र बंधु पावती सुख । अनित्य संसारीं कौतुक । करूनि जाती दादले ॥४०॥ जेणें पाविजे परम दुःख । काय तें साधुवृत्तीचें सुख । धैर्य उपहासिती लोक । म्हणती दीनें अशक्तें ॥४१॥ टाकिशी रायाचे धर्म । तोचि रायातें अधर्म । शांतीनें क्लेश परम । कुटुंबेसी भोगिसी ॥४२॥ **व्यवहारीं शांति नये कामा । परमार्थ क्रोध नाशी धर्मा । जेथें ज्याचाचि महिमा । तें तेथेंची योजावें** ॥ ४५ ॥ प्रपंचीं अवलंबिल्या शांति । जोडिली ते जाय वृत्ती । आपुल्या दारातें संपत्ति । प्राप्त नव्हे आपणिया ॥ ४६ ॥ प्रपंचीं धरितां सात्त्विकता। तैं आपण केलें आपल्या घाता । सत्त्वगुण तो परमार्था । शोभा आणी सर्वस्वें ॥५१॥ खळाकुटिलाचे ठायीं । शांति धरितां पडणें अपायीं । जैसे कंटक मर्दावे पायीं । तेवीं दुर्जन दंडावे ॥ ५४ ॥ देखोनियां साधुसंता । भावें चरणीं ठेविजे माथा । तेथ दावितां क्रूरता । अधःपाता जाईजे ॥५५॥

धर्मराजाने द्रौपदीला दिलेल्या उत्तरांतहि वरील युक्तिवादाचें खंडन केलेलें नाही. आपल्याला सध्या काळ अनुकूल नसल्यामुळें शांति धरिली पाहिजे असें धर्मराजाने सांगितलें आहे.

आपल्या देशांत, गो-ब्राह्मण-प्रतिपालक असा क्षत्रिय राजा उत्पन्न व्हावा व त्याने सर्व परकी लोकांचा पराजय करावा अशी इच्छा शिवकालापूर्वीच विचारी लोकांच्या मनांत उत्पन्न झाली होती. मुक्तेश्वराने शके १५४० ते

५० च्या दरम्यान रचिलेल्या भारतांत, आदिपर्व अध्याय १९ मध्यें दुष्यंताने सर्व राजे जिंकिल्याचें वर्णन केलें आहे. त्यांत "जावी, जंगी, फिरंगी, क्रूर । नायी, इंग्रजी, मल्लोवार । कावे, कवठे, कंक, मखर । जळतस्कर मांसाशी ॥ रूमशाम, खोरासान । मुलतान, हवशान, अर्वस्तान । उजवेख, पठाण, तुर्कमान ॥ वदकशान, मेवार ॥" हे सर्व जिंकिल्याचें वर्णन कालविपर्यासाचा दोष पत्करूनहि केलें आहे. पांडवांनी दिग्विजय केला तेव्हां त्यांनीहि मुसलमान, इंग्रज यांना जिंकिल्याचा उल्लेख आहे. यावरून त्या वेळच्या ग्रंथकारांच्या मनांत कोणते विचार घोळत होते तें दिसून येतें. नारदनीती सांगत असतां, उत्तम राजा कसा असावा याचें मुक्तेश्वराने केलेलें वर्णन पहाण्यासारखें आहे:--

"आज्ञा कीर्ति द्विजपालन । दान भोग मित्रसंरक्षण । साही गुणीं तव प्रधान । सालंकार असती कीं ॥ सांगावया क्लेश गोष्टी । दुर्बळ येऊं इच्छिती भेटी । तयां येतयां आठकाठी । तुझ्या दारीं नाहीं कीं ॥ श्रोत्रिय कुटुंबी निर्धन । साधु सात्त्विक वृत्ती क्षीण । त्यांचें परिहरूनि दैन्य । सदा पाळण करिसी कीं ॥ नापेक्षितां मेघजळें । सर्वदा पिकें पिकती सकळें । अभंग तडागें पाटस्थळें । पैं निर्मिलीं असतीं कीं ॥ कृषीवळें खंगली भणंगें । धनधान्य वोपूनि अंगें । शेताचेनि राजभागें । पाळिसी कीं नरेंद्रा ॥" विचारी लोकांच्या आकांक्षा अशा असतांना महाराष्ट्रांतील स्थिति मात्र अगदीं उलट होती. रामीरामदास यांनी म्हटलें आहे 'अति तीव्र शासन यावनी । अब्रह्मण्य झाली कितीक अवनी । वर्ण चतुष्टय नारीनर । सर्व धर्म पराङ्मुख । क्षत्रिय वैश्य स्वधर्मभ्रष्ट । शूद्र झाले सेवा नष्ट । किती हेंचि बोलावें स्पष्ट । शीण वाटे वाचेसी ॥ दुष्ट सेवा दुष्ट प्रतिग्रह । दुराचारी दुराग्रह । गोब्राह्मणा अतिनिग्रह । तेथें कैचा प्रतिपाळ ॥ असूया तिरस्कार वैर । अधर्मनिरत वृथा अहंकार । परस्परें आक्षेप साक्षेप घोर । मीच अधिक हा कळहो ॥ महाराष्ट्रांतील चातुर्वर्ण्य कसें स्वधर्मच्युत झालें होतें व यावनी अंमल किती तीव्र होता याचें हें यथार्थ चित्र आहे. असूया, मत्सर, तिरस्कार, निष्कारण वैर आणि मीच थोर असा शुष्क अहंकार इत्यादि पारतंत्र्यांत जोराने वाढणाऱ्या दुर्गुणांनी समाज अगदीं नासून गेला होता. परतंत्र लोकांचीं मनें किती क्षुद्र होतात याचें हें उत्तम चित्र आहे. धार्मिक

स्वातंत्र्य तर अगदीं संपुष्टांत आलें होतें. देवांच्या मूर्ती फोडणें हें काजीचें एक कामच होतें. 'सनदापत्रां'त ८२ पानावर मुल्लामहमद शरीफ यास जी सनद दिली आहे तींत "देवाच्या मूर्ति दगडाच्या वगैरे आकारी बिनआकारी मोडून टाकणें" असें म्हटलें आहे. मुसलमानांनी वाटेल तो अन्याय केला तरी त्याबद्दल त्याला शिक्षा होण्याची भीति नसे. म. इ. सा. च्या १५ व्या खंडांत पैठणच्या ब्राह्मणांचा शके १५३२ चा एक निर्णय छापला आहे तो वाचनीय आहे. मसूरच्या जगदळ्यांचा एक पूर्वज मुसलमान झाला व मेल्यावर आपली कबर करून एका बाजूला मुसलमानांनी कंदुरी करावी व दुसऱ्या बाजूला हिंदूंनी खैरात करावी, अशी त्याने इच्छा दर्शविल्यावरून तशी व्यवस्था करण्यांत आली. पूर्वीच्या या मराठा जगदळ्याला पीर जलालुद्दीन अशी संज्ञा मिळाली व मुसलमान आणि हिंदु दोन्ही त्याच्या कबरीची पूजा करीत असल्यामुळें, त्याला 'मुसलमानांचा पीर व हिंदूंचा वीर' असें म्हणूं लागले. पुढें मुसलमान मुजावरांनी, त्यांच्या पद्धतीप्रमाणें हिंदु पूजाऱ्यांच्या हक्कावर अतिक्रमण केलें. तेव्हां प्रस्तुत खटल्यांतील, नरसोजी जगदळा याच्या आजाने तक्रार केली. त्याचा आकस मनांत धरून, मुसलमान मुजावरांनी, नरसोजीच्या आजाला व चुलत्याला ठार मारिलें. नरसोजीचा बाप लहान होता. तो जेव्हां मोठा झाला तेव्हां तीन मुजावरांचा खून करून त्याने आपल्या बापाच्या व भावाच्या खुनाचा सूड घेतला. पुढें त्याला पकडण्यांत आलें व वृद्ध होऊन तो मरण पावला. मुजावराने त्याचा मुलगा नरसोजी यास त्रास देण्यास सुरवात केली व पैठणच्या ब्राह्मणापुढें तक्रार सांगितली. त्यांनी खालील निर्णय दिला. "मुजावरांनीं जगदळे याचे निरपराधे दोन्ही खून केले. एका एका खुनास अकरा अकरा खून घ्यावे तेहि न करितां जगदळे यांनीं तीन खून घेतले ऐसे धर्माधिकारी बोलले. कागदपत्र असतां गळां पडोन तुवांच नरसोजी जगदळे याचा बाप धरून नेऊन नागवण बांधली आणि वतनास भ्रष्ट केला. आणि आतां नरसोजी जगदळे याचे गळां पडोन त्यास कष्टी केलें. वतनास विक्षेप केला. ऐसा तूं गुन्हेगार. तुज देहांत प्रायश्चित द्यावें; परतुं मुसलमानांची पादशाही आणि तूंहि मुसलमान याकारितां क्षमा केली."

देहांतप्रायश्चिताला योग्य असलेले मुसलमान कसे सुटत असत व न्याय देणाऱ्या ब्राह्मणांतील निस्पृहपणा व निर्भयपणा किती कमी झाला होता, हें या उदाहरणांवरून स्पष्ट दिसतें. ब्राह्मणाकडे असें वादाच्या निर्णयाचें काम क्वचितच येत असलें पाहिजे. काजीकडेच न्यायाचें काम असे. आणि जेथें ब्राह्मण अशा रीतीनें निर्णय देत तेथें काजींच्या न्यायालयांत न्यायाचें काम कसें होत असेल तें सहज समजण्यासारखें आहे. इ. स. १६२३ ते २६ च्या दरम्यान हिंदुस्थानांत प्रवास करणारा पोर्तुगीज प्रवासी डेला-व्हॅले याने मुसलमानांच्या अमलाविषयीं खालील उद्गार काढले आहेत. " And it is that indeed which is the worst of all Governments, called by Aristotle, arbitrary, illimited, tyrannical such as a most severe master useth to his servants not that which a Good King administreth to subjects. There are no laws for Government." ते यथार्थ आहेत. अशी स्थिति असल्या-मुळें जुलूमजबरदस्तीला नुसता ऊत आला होता. मंदिरांतील देवतांप्रमाणें गृहदेवताहि सुरक्षित नव्हत्या. अशा परिस्थितींत शांतीने आणि सहिष्णुतेने काम भागण्यासारखें नव्हतें. शांतीच्याऐवजीं शक्तीचा उपदेश करणाऱ्या थोरपुरुषाची यावेळीं आवश्यकता होती. हें कार्य करण्याकरितां रामदासांचा अवतार झाला.

## प्रकरण नववें

# समर्थ रामदास

रामदासांचा जन्म शके १५३० चैत्र शु॥ ९ ला झाला व त्यांचा व्रतबंध पांचव्या वर्षी होऊन ते सात वर्षांचे असतांना त्यांचे वडील निवर्तले. बाराव्या वर्षी लग्नाला उभे राहिले असतां ते 'सावधान' शब्द ऐकिल्याबरोबर लग्नांतून पळाले. समर्थांचें स्वभाववैशिष्ट्य दिसून येण्याला याच वेळेपासून खरी सुरुवात झाली. पुढील आयुष्यांत मोठी कामगिरी त्यांना करावयाची होती. त्या कामगिरीच्या जाणिवेने ते पळाले असें वाटत नाही. पण अनुष्ठानाचें व तपश्चर्येचें वेड त्यांच्या घराण्यांत परंपरागत होतें असें त्यांचे वडील व बंधु यांच्या हकीकतीवरून दिसतें. हेंच वेड, हेंच महनीय 'पिसें' समर्थांनाहि लागलें होतें. त्यांच्या घराण्यांतील तपश्चर्येची प्रवृत्ति समर्थांमध्यें उत्कटतेला गेली होती. तपश्चर्या करावी व श्रीरामचंद्राचें दर्शन घ्यावें अशी उत्कट आवड पोटीं असल्यामुळें समर्थ लग्नांतून पळाले व तपश्चर्या करून 'ब्रह्मपिसे' बनले. टाकळीस जाऊन बारा वर्षांचा हा मुलगा तपश्चर्या करूं लागला. दुपारपर्यंत गोदावरींत उभें राहून जप करावा, नंतर पंचवटींत जाऊन मधुकरी मागावी व भोजनोत्तर रामाच्या देवळांतील पुराण श्रवण करून टाकळीत परत यावें असा त्यांचा क्रम असे. हा क्रम सतत बारा वर्षें चालला होता व याच कालांत समर्थांचें अध्ययन झालें असलें पाहिजे. समर्थांची तपश्चर्या पुरी झाली. त्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक शक्ति पूर्ण विकसित होऊन ईश्वरी सामर्थ्याचा त्यांना साक्षात्कार झाला; व धर्मस्थापना करून जगदुद्धार करण्याची आज्ञा-स्फूर्ति हृदयस्थ नारायणाकडून त्यांना मिळाली. प्रत्यक्ष कार्याला लागण्यापूर्वी हिंदुस्थानांत बारा वर्षें पायीं प्रवास करून त्यांनी एकंदर परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें. समर्थांच्या जीवनक्रमांत त्यांचें लग्नांतून पळून जाणें,त्यांची बारा वर्षांची तपश्चर्या व बारा वर्षांचें पर्यटन या गोष्टी वैशिष्ट्यनिदर्शक व महत्त्वाच्या आहेत. या पर्यटनांत त्यांनी हिंदुस्थानांतील सर्व प्रमुख ठिकाणें पाहिलीं. भीमाशंकर, कोल्हापुर, तुळजापुर, पंढरपुर इत्यादि महाराष्ट्रांतील

व काशी, जगन्नाथ, रामेश्वर, गिरी, सोरटी सोमनाथ, द्वारका इत्यादि महाराष्ट्राबाहेरील क्षेत्रें पाहून ते हिमालयांत गेले. हिंदुस्थानांतील हिंदु धर्माची व तीर्थक्षेत्रांची त्यावेळीं अत्यंत वाईट स्थिति झाली होती. त्यांतच दुष्काळाच्या दैवी आपत्तीने लोक त्रस्त झाले होते. " कांहींच पाहतां धड नाही । विचार सुचेना कांहीं । अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडले लोक ॥ प्राणीमात्र जाले दुःखी । पाहतां कोणी नाही सुखी । कठिण काळ वोळखी । धरीनात कोणी ॥ " ( परचक्रनिरूपण ) असें त्यावेळचें वर्णन समर्थांनी केलें आहे. समर्थांनी ज्यांना शके १५७६ मध्यें अनुग्रह दिला त्या दिनकरांनी त्या काळाचें यथार्थ वर्णन केलें आहे—

" बोलतां कलीचें महिमान । धर्म झाला कंपायमान । जे युगीं राजा यवन । तेथें अन्य वार्ता कायसी ॥ जे युगीं देवधर्म वुडाले । अवघे येकंकार झाले । सत्य जातीनिशीं हरपलें । स्वधर्मासकट ॥ ब्राह्मण कर्मभष्ट जाले । स्वाहा स्वधाकार राहिले । वर्णाश्रमधर्म वुडाले । जाती कुळेसी ॥ राजा देवद्रोही जाला । देवस्थळांचा उच्छेद केला । तीर्थमहिमा सकळ बुडाला । ठाईं ठाईंचा ॥ कुळस्त्रिया भ्रष्टविल्या यवनीं । ब्राह्मण जाले दासीगमनी । अंत्यजाचे गृहीं उत्तमवर्णी । बलात्कारें भ्रष्टविती ॥ राज्याची अनेक बंडें जालीं । गोब्राह्मणावरी पालाणें पडलीं । पृथ्वी हलकल्लोळ जाली । कोणी नव्हे कवणाचें ॥ पर्जन्याचें अवर्षण अखंड । राजा प्रजा लोक दुखंड । पृथ्वी जाली शतसहस्रखंड । सौख्यवार्ता न दिसे ॥ कुळवधू निर्लज्जा जाल्या । त्या हीन यातीसी रतल्या । लोकापवादें भ्रष्टल्या । देशोदेशी फिरती ॥ तीर्थें क्षेत्रें व्रतें उद्यापनें । सकळही उच्छेदिलीं यवनें । धर्मचर्चा पुराणश्रवणें । कथाकीर्तन राहिलें ॥"

(**स्वानुभवदिनकर** पृ. २३१-३२)

तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं । सकळ पृथ्वी आंदोळली धर्म गेला ॥" हें रामदासाचें वचन प्रसिद्धच आहे. ही सर्व स्थिति पाहून " उदास वाटतें जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥" अशी त्यांच्या अन्तःकरणावर उद्विग्नतेची छाया पडली व जिव नको असें क्षणभर वाटलें. पण पुनः त्यांच्या प्रकृतीने जोर केला; व धर्मस्थापनेचा बारा वर्षांपूर्वी केलेला निश्चय त्यांनी जास्त दृढ केला. हिमालयांत असतां अशाच एका उद्विग्न-

तेच्या प्रसंगीं, " तुम्हासी जगोद्धार करणें आहे । तुमची तनू ते आमची तनू पाहे । दोनी तपें तुमची रक्षिली काया हे । धर्मस्थापनेकारणें " ( स. प्र. पृ. १८ ) असा ईश्वरी आदेश त्यांना मिळाला; " राघवाचा वर पावलों सत्वर । जनाचा उद्धार करावया " असा आत्मविश्वास त्यांना वाटूं लागला; व "राघवाचीं पदें मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें" असा निश्चय करून शके १५६६ मध्यें ते महाराष्ट्रांत परत आले. टाकळीला जाऊन नंतर ते महाबळेश्वराच्या निसर्गरमणीय प्रदेशांत रहावयास आले. समर्थांना निबिड अरण्यें, दऱ्या, खोरीं, गुहा, घळी इत्यादि ठिकाणें फार आवडत असत व तीर्थक्षेत्रें करीत असतां महाबळेश्वर क्षेत्रीं जेव्हां ते आले तेव्हां त्यांनीं हें ठिकाण लक्षांत ठेविलें असावें.

ज्या धर्माच्या उद्धाराकरितां आयुष्य वाहण्याचें ठरवून रामदास महाराष्ट्रांत परत आले, त्या धर्मासंबंधाने रामदासांची व रामदासकालीन हिंदूंची कल्पना काय होती तें स्पष्ट केलें पाहिजे. स्वकीय संस्कृतीचें व धर्मग्रंथांचें यत्किंचितहि अध्ययन न केलेले व चार इंग्रजी शब्दांचें ज्ञान झालेले, कित्येक आधुनिक सुशिक्षित ' धर्म ' शब्दाचा जो अर्थ करितात त्यापेक्षां फारच व्यापक अर्थ रामदासकालापर्यंत धर्म शब्दाला होता. लोकांची सर्व तऱ्हेची धारणा व्हावी म्हणून धर्म ही संस्था अस्तित्वांत आली आहे. " धारणात् धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः " असें महाभारतांत सांगितलें आहे. प्रजांचा ( लोकांचा ) अधःपात न होतां सर्व शक्ति विकासित होतील व मनुष्य शेवटीं प्रकृतीच्या बंधांतून मुक्त होऊन नराचा नारायण होईल अशी धर्माची योजना आहे. प्रजा उत्सन्न झाल्या, सामाजिक जीवनाचा जर उच्छेद करण्यांत आला, तर त्यांना आपला विकास करतां येणें अशक्य असल्यामुळें, तशी आपत्ति त्यांजवर येऊं नये म्हणून वर्णाश्रमाची सुंदर संस्था आमच्या धर्माने निर्माण केली आहे; किंबहुना या संस्थेच्या द्वारेंच धर्म आपलें ध्येय गांठीत असल्यामुळें, आमच्या धर्माला ' वर्णाश्रमधर्म ' अशी संज्ञा आहे. ब्रह्मचर्याश्रमांत वर्णधर्माप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्तव्यें पार पाडण्याची तयारी करावी. गृहस्थाश्रमांत वर्णाप्रमाणें प्राप्त झालेलें कर्तव्य स्वार्थत्यागपूर्वक समाजाच्या हितावर नजर देऊन बजावावें, आपलें काम करण्याकरितां आपले पुत्र तयार झाले कीं, वान-

प्रस्थाश्रम स्वीकारावा व अध्यात्मचिंतन करावें आणि शेवटीं वृद्धपणीं सर्व व्यवहारांचा संन्यास करावा, अशी आश्रमांची योजना आहे. समर्थांनी ही आश्रमसंस्था पुनरुज्जीवित करण्याचा अल्पसा प्रयत्न आपल्या संप्रदायाच्या द्वारें केला होता; कारण संप्रदायांतले कित्येक मठ विद्यापीठेंच बनले होते व तेजस्वी ब्रह्मचारी तेथें पुढील कार्याकरितां लागणारी तयारी करीत होते. ब्राह्मणाने अध्ययन, अध्यापन करून लोकांना स्वधर्माचें ज्ञान करून देऊन सन्मार्गाला लावावें, क्षत्रियांनी दुष्टांना शासन करावें, वैश्यांनी व्यापार करावा, शूद्रांनी सेवा करावी, हे चातुर्वर्णिक ज्या प्रदेशांत रहात असतील तो प्रदेश स्वधर्मीय क्षत्रिय राजाच्या ताब्यांत असावा, त्या राजाने सर्व लोक आपापलीं कर्तव्यें नीट पार पाडीत आहेत कीं नाहीत तें पाहावें व क्षत्रियांचें पुढारीपण स्वीकारून धर्मरक्षणाकरितां, सदैव सज्ज असावें, अशी वर्ण-संस्थेची योजना होती. वर्णधर्मांप्रमाणें वागून आपलें ऐहिक व पारलौकिक कल्याण प्रजांनी साधावें अशी ज्या धर्माची योजना आहे, त्या धर्माचा उद्धार करण्याकरितां, रामदास आले व शेवटपर्यंत हेंच ध्येय पुढें ठेवून त्यांनी उपदेश केला. दिनकरांनीं रामदासांच्या उपदेशाचें सार दोन ओव्यांत चांगल्या रीतीने सांगितलें आहेः—" परंतु हो प्रपंची अथवा निस्पृह । तेणें वैराग्ययुक्त असावें निःसंदेह । वर्णाश्रमधर्मकर्मसमूह । प्राणांतीही न सोडिजे ॥ अहर्निश करावी रामभक्ती । वर्णाश्रमधर्माचिया युक्ती । श्रीराम-उपासनेची अभिव्यक्ती । केलीच करावी निःशंक ॥" ( **स्वा. दि. पृ. ४८७** ) ब्राह्मणक्षत्रिय कर्तव्यभ्रष्ट झाले असल्यामुळें देशाची दुःस्थिति झाली आहे ही गोष्ट स्पष्टपणे रामदासांना आढळून आली. ते म्हणतातः— आलें भगवंताच्या मना । तेथें कोणाचें चालेना । विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं सोडिला विचार । नीति मर्यादा उडाली । भक्ति देवाची बुडाली ॥ जनी दोप झाले फार । तेणें होतसे संहार । पुण्यक्षेत्रें तीं मोडावीं । आणि ब्राह्मण्यें पीडावीं । पुण्यवंत ते मरावे । पापी चिरंजीव व्हावे । लोक भेणेचि चालती । त्यांस होताती विपत्ती । धर्मवृत्ति हे बुडावी । शास्त्रमर्यादा सांडावी । रामदास म्हणे देवें । बौध्य होऊनि बैसावें ॥ ही स्थिति पालटण्याकरितां त्यांनी धर्मोद्धार करण्याचें ठरविलें. समर्थांच्या ग्रंथांत देशभक्ति नाहीं, धर्मभक्ति व देवभक्ति आहे,

असें म्हणणाऱ्यांनी धर्म शब्दाच्या अर्थाचा नीट विचारच केलेला नाही. शिवाजी महाराजांनी राजकारण करून स्वराज्यस्थापना केली; पण त्यांच्या चरित्रविषयक ग्रंथांत तरी देशभक्ति हा शब्द सांपडतो काय ? शिवाजी महाराजांनी जी स्वराज्यस्थापना केली तीहि धर्मोद्धाराकारितां, धर्मभक्तीकारितां केली. 'धर्मरक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षावा' ( सप्तप्रकरणात्मक चरित्र ) हीच त्यांची महत्त्वाकांक्षा होती व 'सिंहासनारूढ होऊन छत्र करून छत्रपति म्हणविलें. धर्मोद्धार करून देवब्राह्मण संस्थानी स्थापून यजनयाजनादि षट्कर्में वर्णविभागें चालविलीं.' असेंच त्यांच्या कामगिरीचें वर्णन अमात्यांनी आपल्या 'राजनीती' मध्यें केलें आहे. परंतु यावरून शिवाजीमहाराज देशभक्त नव्हते असें ठरवितां येईल काय ? तात्पर्य, देशभक्तीची कल्पना अलीकडची असून धर्मभक्तीच्या भव्य भावनेचा ती एक अंशमात्र आहे. ज्याकाळीं स्वतःचा धर्म व संस्कृति घेऊन जेथें जागा सांपडेल तेथें वसाहती करीत आर्य लोक चालले होते, त्याकाळीं देशभक्तीच्या कल्पनेपेक्षां धर्मभक्तीची कल्पनाच अस्तित्वांत असणें साहजिक होतें. धर्मोद्धार करावयाचा असेल तर आपल्या देशावर आपल्या धर्माच्या क्षात्रिय राजाचें स्वामित्व संपादणें ही गोष्ट तर त्यांत येतेच; पण त्यापेक्षां संस्कृतिविषयक किती तरी जास्त गोष्टींचा त्यांत अंतर्भाव होतो ही गोष्ट स्वतःच्या डोळ्यांनी धर्मस्वरूपाकडे पाहणाऱ्या विचारी लोकांच्या सहज लक्षांत येईल. आजकालच्या संघटना व चळवळी 'देश' या कल्पनेच्या भोंवतीं होत असतील तर शिवकालीन संघटना व चळवळी 'देव आणि धर्म' या कल्पनेभोंवतीं झाल्या होत्या हें खालील उताऱ्यावरून लक्षांत येईल. "देवमात्र उच्छेदिला । जित्या परीस मृत्यू आला । आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारून घालावे परौते । देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्होळ करावा । मुलुख बुडवावा कीं बडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥" देशाकारितां ज्या गोष्टी करा म्हणून उघडपणें सांगण्यास आजचे राजकारणीसुद्धां भितील त्याच गोष्टी देवाकरितां व धर्माकरितां करा असें वरील उताऱ्यांत समर्थांनी सांगितलें आहे. लोकहितकारक चळवळी व त्याकरितां संघटना

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या अलीकडच्या लोकानांच करितां येतात व पूर्वीच्या लोकांना करतां येत नसत असें मुळींच नाहीं; उलट पाश्चात्य शिक्षणामुळें अशा चळवळींचें 'देवधर्म' हें उदात्त अधिष्ठान टाकून 'देश' हें कमी व्यापक अधिष्ठान मात्र आम्हीं घेतलें आहे. समर्थ आणि शिवाजी यांची दृष्टि देवधार्मिक होती असें सांगण्यांत त्यांचा कमीपणा नसून उलट गौरवच आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

धर्मोद्धार करण्याचें ध्येय रामदासांनी आपल्यापुढें ठेविल्यानंतर सहजच संघटनेची जरुरी लागली; व ही संघटना कशाभोंवतीं करावी याचा ते विचार करूं लागले. धर्म ही एक अव्यक्त भावना असल्यामुळें एखादी व्यक्त व प्रत्यक्ष कल्पना लोकांपुढें ठेवून तिच्या आधारावर संघटना करण्याचें त्यांनी ठरविलें आणि ज्या धर्माचा त्यांना उद्धार करावयाचा होता त्याच धर्माचें संरक्षण व पालन करणाऱ्या तेजस्वी आणि आदर्शभूत क्षत्रियोत्तमाची—श्रीरामचंद्राची उपासना सर्वत्र प्रसृत करण्याचें त्यांनी निश्चित केलें. समर्थांनी रामोपासना नवीन सुरू केली, याचा अर्थ रामाला त्यांनी नवीन जन्माला आणिलें किंवा तत्पूर्वी तो कोणाला माहीत नव्हता असें नव्हे! भरतखंडांत त्याची उपासना सुरू होतीच. पण महाराष्ट्रांत पंढरपूरच्या विठ्ठलाची उपासना प्रामुख्यानें चालली असतांना समर्थांनी स्वतःचा नवीन संप्रदाय स्थापून रामचंद्र हे त्याचें दैवत केलें व त्याची उपासना महाराष्ट्रांत प्रसृत केली, हेंच त्यांतील नाविन्य होय. हिंदुस्थानांतील परिस्थिति पाहून 'पूर्वी जे मारिले होते। तेचि आतां बळावले' अशी समर्थांची कल्पना झाली. दैत्य म्हणजे कोण तें सांगतांना रामदास म्हणतात 'दैत्य ते पीडिती लोकां। तदांश जाणिजे तया। कोपी ते दैत्य जाणावे। निष्ठुर परम घातकी ॥' (समर्थांची कविता पृ. ३८९). हिंदुस्थानांत सर्वत्र थैमान घालणाऱ्या या दैत्यांचा विनाश करण्याकरितां, त्यांचा संहार करणाऱ्या रामचंद्राची उपासना सर्वत्र सुरू केली पाहिजे असें त्यांना वाटलें. ज्या गुणांचा प्रसार महाराष्ट्रांत व्हावा व ज्या गोष्टी घडून याव्या म्हणून त्यांची आत्यंतिक इच्छा होती ते गुण व त्या गोष्टी श्रीरामचंद्रांत त्यांना दिसल्या व म्हणूनच प्रभु रामचंद्राचा आदर्श लोकांपुढें त्यांनी ठेविला. उपास्याचे गुण आपल्या अंगीं यावे

म्हणून उपासना करावयाची असते ही गोष्ट ज्यांना माहीत आहे, त्यांना समर्थांच्या रामोपासनेचें औचित्य तेव्हांच लक्षांत येईल. खुद्द रामदासांनी रामाच्या गुणाचा विचार लहानपणापासून केला होता. ' लघुरामायणांत ' ते म्हणतातः—

' समस्तही मनीं धरा । कथा करीनसें करा । लहानसा कवी नवा । रघोत्तमासी वीनवा ।। ( रावण ) तया वरेंचि मातला । अधर्म कर्म रातला । भुमंडळीं नव्हे भला । बहुत लोक पीडला ।। समस्त देव ते भले । परंतु बंद पावले ।। ' अशी स्थिति असतांना, रामचंद्रांनी ' अनेक बंद तोडिले । समस्त देव सोडिले । प्रचीतिनें पाहा पाहा । प्रभू समर्थ राम हा ।। समर्थ हे उपासना । जनांत आणिती मना । रघोत्तमा उपासिती । सखेचि तेचि वाटती ।। अशा तऱ्हेची सामर्थ्यसंपन्न उपासना लोकांत जे आणतात, तेच मला आवडतात,असें रामदासांनी म्हटलें आहे. लहान असतांना समर्थांनी हें लहानसें ' लघुरामायण ' केलें, तर मोठेपणीं रामायणांतील दोनच कांडांवर कवित्व केलें. पैकीं सुंदरकांडावर १०० श्लोक तर युद्धकांडावर १३०० श्लोक आहेत. आज ज्याप्रमाणें शिवाजीमहाराजांची वीर कृत्यें आपण लोकांना सांगतों त्याप्रमाणें तत्कालीन लोकांच्या अंगांत वीरश्री उत्पन्न व्हावी म्हणून प्रभु रामचंद्राचा जुना इतिहास रामदास लोकांपुढें ठेवीत होते. " कथा देव-इंद्रादि ब्रह्मादिकांची । समस्तामध्यें श्रेष्ठ या राघवाची " असें रामदासांना वाटत असे; व तें कां तर "जेणें फोडिला पांग ब्रह्मादिकांचा । बळें तोडिला बंद त्या तीदशांचा ।। म्हणोनी कथा थोर या राघवाची ।। जनीं ऐकितां शांत होते भवाची ।।" (स.क.पृ. ११). त्यांनीं आपल्या अभंगांतहि रामचंद्राचें श्रेष्ठत्व उत्तम रीतीने वर्णिलें आहे— " दुष्टांचा संहार धर्माची स्थापना । जानकीजीवना राघवासी । रामचंद्रें सर्व दैत्य निर्दाळिले । पूर तुंबळले शोणितांचे ।। शोणिताचे पूर वाहती खळाळा । रामें बंदीशाळा फोडियेल्या ।। फोडियेल्या रामे सर्व बंदीशाळा । आपुलाल्या स्थळा देव गेले । देव गेले सर्व मारिला रावण । लंके बिभीषण स्थापियेला ।।" ( स.क.पृ. १३-१४) असे अनेक उतारे देतां येतील. समर्थांची कविता सूक्ष्मपणें व सहृदयतेने वाचणाराला रा. भट यांची रामरावणयुगाची कल्पना पटल्यावांचून रहात नाहीं. " पूर्वी जे मारिले होते । तेचि

आतां वळावले," "कल्पांत मांडिला मोठा म्लेच्छदैत्य बुडावया," "मार्दिलें पूर्वीचे पापी आनंदवनभुवनीं " इत्यादि स्पष्ट उल्लेख वांचून सुद्धां समर्थांच्या रामचंद्रविषयक काव्यांतील ध्वनि ज्यांच्या लक्षांत येत नाहीं तें ते लोक समर्थांच्या काव्यांचें हृद्गत समजण्यास अनधिकारी होत. रामायणकालीन परिस्थिति सभोंवार पसरलेली पाहून समर्थ आपल्या करुणाष्टकांत म्हणतातः—" मदें मातला रावणु क्रूरबुद्धी । तेणें घातलें सर्वही देव बंदी। स्वधर्मु बुडाला भूमीभार झाला । अनाथा दिना धावण्या राम आला ॥ " (स. क. पृ. ३९-४०).

अशा रीतीने रामोपासनेच्या द्वारें धर्मस्थापना करण्याचें समर्थांनी निश्चित केल्यावर, रामजन्माचे उत्सव करून रामोपासनेचा व रामचरित्राचा सर्वत्र प्रसार करण्याचें काम त्यांनी हातीं घेतलें. महाबळेश्वर व वाई येथें त्यांनी प्रथमतः मारुतीची स्थापना केली. असें करण्यांत समर्थांचे अनेक हेतु होते. एक तर मारुतिराय हे रामचंद्राच्या कार्यांतील प्रमुख साहाय्यक असल्यामुळें अशा आदर्श साहाय्यकाचें चरित्र लोकांपुढें ठेवणें हें रामोपासनेचेंच एक प्रमुख अंग होतें. कोणतेंही कार्य एकट्याच्या हातून होत नाही. रामचद्रासारख्या नेत्याला हनुमंतासारखे बलिष्ठ व एकनिष्ठ साहाय्यक लागतात. ही गोष्ट मारुतीच्या उपासनेच्या द्वारें समर्थांना लोकांच्या मनावर ठसवावयाची होती. शिवाय रामचंद्र निजधामाला गेल्यानंतर आपलें कार्य त्यांनी हनुमंताकडे सोंपविलें होतें अशी समर्थांची समजूत होती. शारीरिक शक्तीचें महत्त्वही या उपासनेच्या द्वारें लोकांच्या मनावर बिंबविण्याचा त्यांचा हेतु होता. तसें नसतें तर उपासनेकरितां मारुतीची निवड त्यांनी केली नसती. " काय सांगों मी या मारुतीचें बळ । गिळिलें मंडळ मार्तंडाचें ॥ मार्तंड गिळिला येणें बाळपणीं । देवादिकां रणीं पीटियेलें ॥ पीटिले राक्षस विध्वंसिलें वन । लंकेचें दहन क्षणमात्रें । क्षणमात्रें आला जानकी शोधूनी । सिंधु ओलांडुनी अवलीला ॥ (समर्थांचा गाथा, पृ० १८). असें मारुतीचें वर्णन रामदासांनी केलें आहे. शके १५५६ मध्यें समर्थ महाबळेश्वरीं आले व शके १५६७ चा रामनवमीचा सार्वजनिक उत्सव मसूरला त्यांनी प्रथमच साजरा केला. मठस्थापना करणें, मंदिर बांधणें, त्यांत मूर्ति बसविणें व तिचा उत्सव करणें या गोष्टी मुसलमानी अंमलांत करणें कठिण

झालें होतें असें सांगणाऱ्या कथा 'दासविश्रामधामांत' आहेत म्हणून समर्थांनी हा प्रघात मुद्दाम सुरू केला व पुढें तो सालोसाल होत राहिला.

संप्रदाय स्थापून रामोपासनेच्या द्वारें धर्मस्थापना करण्याचें निश्चित केल्यावर त्याकरितां साहाय्यकांची जरुरी समर्थांना सहजच भासली; कारण हें काम एकट्याने होण्यासारखें नव्हतें; म्हणून त्यांनी शिष्यमंडळी जमविण्यास सुरुवात केली. समर्थांच्या शिष्यांचे दोन प्रकार असत. एक प्रपंची व दुसरा निःस्पृही. प्रपंची अर्थात् गृहस्थ असत; पण सर्वत्र फिरून समर्थांच्या शिकवणीचा प्रचार करण्याकरितां निःस्पृही शिष्यांचीच जरुरी होती. टाकळीला असल्यापासूनच अशा रीतीची निःस्पृही शिष्यमंडळी करण्यास त्यांनी सुरुवात केली होती. सोयऱ्याधायऱ्यांचीं तीक्ष्ण बुद्धीचीं मुलें आपल्याकडे घेऊन यावींत अशी समर्थांची शिष्यांना आज्ञा असे. आपल्या विश्वासाच्या चांगल्या शिष्यांना ते दूरदूरच्या ठिकाणीं मठस्थापना करून ठेवीत असत असें भीमस्वामी तंजावरकर, दिनकरस्वामी प्रभृतींच्या उदाहरणांवरून दिसतें. 'समर्थप्रतापा'च्या दहाव्या समासांत महंतांची यादी त्यांच्या निवासस्थानांसह दिली आहे तीवरून हिंदुस्थानांतील कर्नाटक, कोंकण, गुजराथ, नागपूर, गोमंतक, तेलंगण, अंतर्वेदी, मल्याळ इत्यादि प्रांतांत व ओढा, उज्जयिनी, सोरटी सोमनाथ, रामेश्वर, बद्रीकेदार, द्वारका, काशी, मथुरा, अयोध्या, गोकर्ण इत्यादि क्षेत्रांत समर्थांचे निःस्पृह शिष्य वसती करून होते असें स्पष्ट दिसतें. कांहीं शिष्य नित्य फिरतीवर असत असा उल्लेख 'समर्थप्रतापां'त आहे. समर्थांनी पुरुषांप्रमाणें स्त्रीशिष्यहि केले, कारण स्त्रियांमध्यें रामोपासनेचा प्रचार करण्याला अशा शिष्यिणींचा चांगलाच उपयोग होत असला पाहिजे. स्त्रियांचाहि दर्जा पुरुषांइतकाच आहे व पुरुषांप्रमाणें त्यांनाहि आपली आध्यात्मिक उन्नति करून घेण्याचा अधिकार आहे अशी समर्थांची समजूत असल्यामुळें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियाही सुशिक्षित होऊन परमार्थग्रंथांचें वाचन करीत आहेत, त्यांपैकीं कांही कीर्तन करीत आहेत तर कांही पुराणें सांगत आहेत, अशा तऱ्हेचा देखावा समर्थांनी त्यावेळीं महाराष्ट्रांत उत्पन्न केला. आणि महाराष्ट्रांत अलीकडे स्त्रियांना शिक्षण देण्याचा जेव्हां आरंभ केला तेव्हां हें शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया व तें देणारे पुरुष यांच्या संबंधाने निंदकांनी जसे अपवाद उत्पन्न केले तसे समर्थांसंबंधानेहि त्यावेळीं कोणीं कदा-

चित् केले असतील. पण असे अपवाद पचवून समर्थांची श्रेष्ठता आज कायमच राहिली आहे. त्याअर्थी हे अपवाद निराधार व कुचकिंमतीचे होते हें उघडच दिसतें. कारण ते खरे असते तर इतर अनेक बुवांप्रमाणें समर्थ ही नामशेष झाले असते. समर्थांचा आत्मविश्वास इतका दांडगा होता व प्रगतिप्रियता इतकी तीव्र होती कीं, त्यांनी या अपवादांची कधींच पर्वा केली नाही. मूर्तिपूजा, भुतेंखेतें, ज्योतिष, नवससायास, उपासतपास, स्वप्नें, चमत्कार, श्राद्धें, तीर्थयात्रा वगैरे संबंधाने प्रचलित लोकसमजुतीच्या विरुद्ध असलेले आपले विचार कोणालाही न भितां त्यांनी जसे प्रकट केले त्याप्रमाणें स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणें अनुग्रह देऊन परमार्थप्राप्तीचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिला. खरें पाहिलें तर समर्थांच्या या धैर्याबद्दल त्यांची प्रशंसा केली पाहिजे.

शिष्यशिष्यिणी गोळा करून, जागोजाग मठस्थापना करून व स्वतः नित्य नूतन हिंडून समर्थांनी ज्या शिकवणीचा प्रसार केला तिचें स्वरूप आतां पाहावयाचें आहे. लोकांना अध्यात्मज्ञान सांगण्याचा समर्थांचा मुख्य हेतु होता व त्याकरितांच त्यांनी मुख्यतः ‘ दासबोध ’ लिहिला. वेदान्तावरील जुन्या संस्कृत व मराठी ग्रंथांत अध्यात्माचीं जीं तत्त्वें आहेत तींच समर्थांनी आपल्या सुबोध भाषेंत सविस्तर विवेचून सुगम केलीं आहेत. त्यांच्या संप्रदायाचा ‘ पहिलें तें हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण । तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ॥ असा दंडक आहे. त्यांपैकीं हरिकथा व निरूपण यांत अध्यात्मज्ञान व तें संपादण्याच्या साधनांचा समावेश समर्थांनी केला आहे. निरूपणांत तत्त्वज्ञान व हरिकथेंत नवविधाभक्तीचा समावेश होतो. समर्थांनी अद्वैततत्त्वज्ञानच स्वीकारिलें होतें. ‘ अद्वैत म्हणजे निरूपण ’ ( दा. बो. ४$\frac{२}{३}$ ) असें त्यांनी स्वतःच सांगितलें आहे. अर्थात् परब्रह्म सर्व विश्वांत व्यापून राहिलें असून जीवाचें स्वरूपही तेंच आहे. परब्रह्माशिवाय भासमान होणारीं नामरूपें म्हणजे माया होय. व या मायेच्या तडाख्यांतून सुटून जीवाने आपलें मूळरूप जें परब्रह्म तें ओळखून तद्रूप होणें हें त्याचें परमसाध्य--हीं अद्वैत वेदान्ताचीं सर्व तत्त्वें समर्थांना मान्य आहेत व तीं त्यांनी खालील शब्दांत व्यक्त केलीं आहेतः—“ एक परब्रह्म संचलें । कदापि नाही विकारलें ।

त्याचें बळें जें भासलें । तें ब्रह्मरूप १० $\frac{६}{९}$ ॥ मीतूंपण हा भ्रम । उपासना हाही भ्रम । ईश्वरभाव हा भ्रम । निश्चयेसी ॥ १० $\frac{६}{११}$ ॥ या कारणें सृष्टी भासत । परंतु हा भ्रमचि समस्त । यामध्यें जो विचारवंत । तोचि धन्य ॥ १२ ॥ द्रष्टा साक्षी अंतरात्मा । जीवात्मा तोचि शिवात्मा ॥ २० $\frac{२}{१५}$ ॥ नर तोचि नारायण । जरी प्रत्यक्षें करी श्रवण॥२० $\frac{५}{२८}$॥" जीव हा वस्तुतः शिव असतां त्याला मायेमुळें,अज्ञानामुळें,स्वस्वरूपाचें ज्ञान होत नाही. त्याकरितां श्रवण-मनन-निदिध्यासन म्हणजे उपासना करून जीवाने शिवत्व संपादिलें पाहिजे. कारण " श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ॥ १७ $\frac{३}{३}$ ॥ " अशी स्थिती आहे. मूळ मायेचे शेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी । उपासना योगें मिठी । तेथें घातली पाहिजे ॥ १७ $\frac{३}{२५}$ ॥". ही उपासना किंवा भक्ति नऊ प्रकारची आहे व तिचें सविस्तर वर्णन करून भक्तीच्या या साधनावर, तें सुलभ असल्यामुळें, रामदासांनीही इतर संतांप्रमाणेंच जोर दिला आहे. तात्पर्य, दासबोध हा ग्रंथ त्रिकालाबाधित अशीं अध्यात्मतत्त्वें व उपासनामार्ग सांगण्याकरितांच लिहिला असून जीव, ब्रह्म, माया, श्रवण, मनन, निदिध्यासन, नवविधा-भक्ति या सर्वांचें विवेचन त्यांत आहे. तथापि रामदासांचें वैशिष्ट्य त्यांत नसल्यामुळें, रामदासांच्या शिकवणीसंबंधाने लिहिणारे लोक या अध्यात्माच्या भागासंबंधाने विशेष लिहीत नाहीत. त्याचा अर्थ असा नव्हे कीं, रामदासांनी अध्यात्म सांगितलें नाहीं. इतर संतांनी जें सांगितलें तेंच सांगून रामदासांनी परमार्थाला प्राधान्य देण्याची आमची पूर्वपरंपरा पुढें चालविली. पण इतर संतांनी जी गोष्ट ठळकपणें केली नाहीं ती रामदासांनी केली. रामदासांचें वैशिष्ट्य त्यांच्या प्रपंचविषयक धोरणांत आहे. प्रपंचाकडे पाहण्याच्या त्यांच्या विशिष्ट धोरणांतूनच त्यांचें राजकारण, आशावाद, प्रयत्नवाद, शक्तिवाद हे उत्पन्न झाले असल्यामुळें या धोरणाचें जरा सूक्ष्म परीक्षण करणें अवश्य आहे.

रामदासांच्या ग्रंथांत प्रपंचासंबंधीं सकृद्दर्शनीं परस्परविरुद्ध वाटणारीं विधानें आढळून येतात; व ग्रंथाची संगति कशी लावावी हें ज्यांना समजत नाही असे लोक त्यामुळें गोंधळांत पडतात. रामदासांनी पूर्वीच्या संतांप्रमाणेंच प्रपंचाची निःसारता अनेक ठिकाणीं सांगितली आहे. किंबहुना मनुष्याला

गर्भवासांत, बालपणांत व पुढील आयुष्यांत होणाऱ्या त्रासाचें सविस्तर वर्णन दासबोधांत केलें आहे; एवढेंच नव्हे, तर खालील ओवींत प्रपंच-त्यागहि उपदेशिला आहे. " वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थ योग । प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ १२$\frac{७}{९}$ ॥ " पण याच्याच पुढल्या समासांत ते म्हणतात " प्रपंचीं असोनी परमार्थ पाहे । तोही या स्थितीतें लाहे । प्रारब्धयोगें करून राहे । लोकांमध्यें ॥ १२$\frac{७}{३}$ ॥ " तेव्हां प्रपंचाची निंदा करण्याचा अर्थ इतकाच कीं, खरें सुख प्रपंचांत सांपडणार नाहीं. त्याकरितां परमार्थाकडेच वळलें पाहिजे. प्रपंच करूं नये असें नाहीं; पण त्यांत आसक्त होऊं नये. कारणः—" संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती । जाणोनि डोळे झांकिती । ते पढतमूर्ख ॥ ५-३-१०२ ॥ " " प्रपंच सुखें करावा । परी कांही परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाच बुडवावा हें विहित नव्हे ॥ ५-३-१०३ ॥ " असें रामदासांचें प्रपंचविषयक धोरण आहे. प्रपंचांत सुख नसल्यामुळें जे लोक प्रपंच करणार नाहीत किंवा सोडून देतील अशा विरक्तांनाही समर्थांनी रिकामे सोडलें नाहीं. लहान प्रपंच सोडला तर मोठा प्रपंच त्यांच्यामागें लावला जाई. "विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीती अवलंबावी ॥ २$\frac{१}{२}$ ॥ निःस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न सांपडावें ॥ १४$\frac{१}{९}$ ॥ उपाधीस विस्तारावें । उपाधींत न सांपडावें ॥ ११$\frac{५}{६}$ ॥" अशा तऱ्हेचा उपदेश विरक्तांना त्यांनी केला आहे. किंबहुना आपली प्रपंच-परमार्थविषयक शिकवण याच विरक्तांच्या द्वारा त्यांनी सर्वत्र पसरविली.

ज्यांना प्रपंच करावयाचा असेल त्यांनी तो खुशाल करावा; पण त्यांत गुंतून पडूं नये हा समर्थांच्या म्हणण्याचा इत्यर्थ खालील ओव्यांवरून लक्षांत येईल:—

" प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थविवेक । जेणें करितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ १३$\frac{३}{२}$ ॥" ज्यांत देव नाही, धर्म नाही, असा प्रपंच मात्र करूं नका; कारण त्याने आयुष्य व्यर्थ जाईल:—" प्रपंचें भुलला प्राणी । वेर्थ आयुष्य वेंचलें । देव ना धर्म ना कांही । ऐसा हा सहावा रिपु ॥ " ( स. क. ३१५–१६ ) " प्रपंचीं असोनि परमार्थ करावा । बरा विवरावा निरंजन । करुनि आकर्ते होऊनियां गेले । तेणें पंथें चाले

तोचि धन्य ॥ " ( स. क. २५९ ). असा उपदेश आपल्या इतर कवितें-तही त्यांनी केला आहे. प्रपंच करावयाचा असेल तर तो मात्र रडका व दुबळा असतां कामा नये. अशा प्रपंचाची समर्थांना फार चीड असे. कोण-तीही गोष्ट करावयाची ठरली म्हणजे ती इरेने केली पाहिजे अशी त्यांची प्रवृत्ति असे. "वडिलें लग्न केलें। तेणें पोर भुललें। दिसेंदिस दरिद्र आलें। खाया नाहिसें झालें ॥ अखंड कष्टी राणी। च्यारी अंगळें वेणी ॥ आंगीं तोंडीं सुटे घाणी। नेणों आली कैकाडणी ॥ दोघेंही चिंतातुरें। कृश झालीं शरीरें ॥ हांसती रांडा पोरें। अवघें केलें अविचारें ॥ " ( समर्थकृत पदें १३७ ). अशा तऱ्हेचा रडका संसार करण्यापेक्षां समर्थ म्हणतात "प्रपंचा लाथाळावें। आधीं विद्यावंत व्हावें॥ उदंडाचि मेळवावें।मग सुखें भोगावें ॥ आधीं कष्ट मग फळ। ऐसें बोलती सकळ। इहलोक परलोक। सर्व करावें सार्थक ॥ विचाराची शुद्धि ऐसी। सुखी करावें सर्वांसी ॥ स्त्रीपुरुष दास-दासी। अवघी करावी विलासी ॥ दास म्हणे ऐसा व्हावा। सुखें ससार करावा ॥ कांहीच नाही गोवा। पंथ देवाचा धरावा ॥" (स. पदें १३९). इरेस पडल्याशिवाय सुखाचा संसार होणें शक्य नाही. " ईरेचे दूरी जाती। नाना विद्या सीकती। विद्येने वाढताती। भाग्यवंत मानिती ॥ १३६ ॥ ईरेचें काम आहे। ईरेवीण तो राहे। साकडीचीं दुःखें साहे। दास म्हणे रे पाहे ॥ १३५ ॥ " अशा तऱ्हेच्या प्रपंचविषयक धोरणामुळेंच चौदाव्या दशकाच्या सातव्या समासांत गृहस्थाश्रमाची समर्थांनी स्तुति केली असून बाराव्या दशकाच्या पहिल्या समासांतः—" आधीं प्रपंच करावा। मग घ्यावें परमार्थविवेका। तेथें आळस करूं नका। विवेकी हो ॥ प्रपंच सोडून परमार्थ कराल। तेणें तुम्ही कष्टी व्हाल। प्रपंच परमार्थ चालवाल। तरी तुम्ही विवेकी ॥ प्रपंच सोडून परमार्थ केला। तरी अन्न मिळेना खायाला मग तया करंट्याला। परमार्थ कैचा ॥ परमार्थ सोडून प्रपंच करिसी। तरी तूं यमयातना भोगिसी। अंतीं परम कष्टी होसी। यमयातना भोगतां ॥ म्हणोन सावधपणें। प्रपंच परमार्थ चालवणें। ऐसें न करितां भोगणें।नाना दुःखें ॥ " असा या बाबतींतला शेवटला सिद्धान्त समर्थांनी केला आहे. समर्थकालीन परिस्थितिच अशी होती कीं, लोकांच्या प्रपंचाकडे दुर्लक्ष करणें त्या वेळीं अशक्य होतें. लोकांचे प्रपंच नीट नसतील तर त्यांना पर-

मार्थ सुचणें अशक्य आहे, ही गोष्ट समर्थांच्या लक्षांत आली होती. " देशकालवर्तमाने । आपण चिंताग्रस्त होती मने । म्हणती कैसी वांचतील जने । कैसीं ब्राह्मण्यें राहतील ॥ कैसी क्षेम राहील जगती । कैसी देवदेवाल्यें तगती । कैसे कुटुंबवत्सल लोक जगती । कोणीकडे जातील हे ॥"(स. प्र. २०–६०). अशा तऱ्हेची चिंता समर्थांना लागली होती. कुटुंबवत्सल लोक जगावयास पाहिजे असतील तर त्यांच्या प्रपंचाकडे लक्ष दिलें पाहिजे व प्रपंच नीट चालून त्यांच्या पारमार्थिक उन्नतीला साधनीभूत होणारीं देवदेवालयें तगावयास पाहिजे असतील तर राजकारणाकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही असें समर्थांनी विचारांतीं ठरविलें; आणि हरिकथानिरुपणाबरोबर राजकारणालाही त्यांनी आपल्या उपदेशांत स्थान दिलें. समर्थांच्या शिकवणींत राजकारणाचा प्रवेश अशा सरळ मार्गानें झाला.

परमार्थ आणि हरिकथा यांना जोडून प्रपंच व राजकारण यांचा उपदेश समर्थांनी सुरू केल्यानंतर प्रपंच व परमार्थ या दोन्हींकडे उपयोगी पडणाऱ्या आशावादाचा व प्रयत्नवादाचा त्यांनी पुरस्कार केला. " लोक भेणेंची चालती । तेणें होताती विपत्ति " असें समर्थांना आढळून आल्यामुळें " भिऊं नका, धीर धरा, निराश होऊं नका " असें त्यांना सांगणें अवश्यच होतें:— " धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ॥ काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटिंचें ॥ धरावा धीर तो मोठा । विचारें पाहतां बरें ॥ अधीर माणसें खोटीं । काम कांही कळेचिना ॥. " भिक्षामिषें लहानथोर परीक्षून सोडण्याची आज्ञा असलेले समर्थांचे शिष्य भिक्षेला निघत तेव्हां त्यांना म्हणण्याकरितां समर्थांनी कांही श्लोक करून दिले होते. त्यांत उपासनेच्या उपदेशाबरोबर लोकांना धीर येईल असेही श्लोक आहेत. उदाहरणार्थ:—

" भवाचे भयें काय भीतोसि लंडी । धरी रे मना धीर धाकासि सांडी ॥ रघूनायकासारखा स्वामि शीरीं । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥ १ ॥ समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥ जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ २ ॥ महासंकटीं सोडिले देव जेणें । प्रतापें बळें आगळा कोटिगूणें । जयातें स्मरे शैलजा शूलपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ३ ॥ सदा सर्वदा देव

सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥ सुखानंद आनंद कैवल्य-धामी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ४ ॥" अशा तऱ्हेचे श्लोक म्हणत समर्थांचे शिष्य जेव्हां सर्वत्र हिंडत, तेव्हां यावनी अधिकाऱ्यांकडून जरी त्यांना त्रास झाला तरी लोकांना केवढा धीर येत असेल याची कल्पना तत्कालीन परिस्थितीची जाणीव ज्यांना असेल त्यांना झाल्यावांचून रहाणार नाही. देव सर्वदा जवळ आहे, पण लोकांच्या धारिष्टाची तो परीक्षा पाहत आहे. कांही तरी धारिष्ट दाखविल्यावांचून, कांही तरी प्रयत्न केल्यावांचून तो पावणार नाही असें समर्थांनी लोकांना सांगितलें.

"यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता ॥ (स. क. ३५७). भाग्यासी काय उणे रे । यत्नावांचूनि राहिलें ॥ (३५९). वन्ही तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो ॥ केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥ यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ (३८९)" अशा रीतीने यत्नाला प्रत्यक्ष देवाच्या पदवीला नेऊन समर्थांनी बसविलें. यत्नाने काय होणार आहे ? प्रारब्धांत असेल तेंच होणार असें म्हणणाऱ्या दैववाद्यांना त्यानीं दिलेलें उत्तर जुन्या मराठी वाङ्मयांत केवळ अपूर्व आहे. समर्थ म्हणतात, "हें प्रारब्ध तरी कांही यत्न केल्याशिवाय आपोआप उत्पन्न झालें नाही. प्रारब्धाने सर्व कांही जर होणार असेल तर "खातो जेवतोसि कासयाला"–खाण्याजेवणाचे श्रम तरी कशाला करितोस ? खाणेंपिणेंही कपाळीं जशी रेषा असेल तसें होतें असें म्हटलें तर समर्थ विचारतातः–"पूर्वरेखा कोणी लिहिली अदृष्टीं । हेचि येक गोष्टी बरी पाहें ॥" ही पूर्वरेखा तरी मनुष्याने कांही तरी प्रयत्नपूर्वक कर्म केल्या-शिवाय लिहिली गेली नाही. कारण "जीवसृष्टी झाली उत्पत्तिसंहार । प्रारब्ध वेव्हार ऐलीकडे । ऐलीकडे कर्म मुळींचा तो प्रेत्न । श्रोतीं सावधान विवरावें ॥ (स. क. १८१)." आधीं यत्न आणि प्रारब्ध मग अशी स्थिति आहे. किंबहुना संपूर्ण जीवसृष्टीच्या उत्पत्तीच्या आधींचा प्रयत्न आहे. तेव्हां प्रयत्नाने कपाळाची रेषाही तुम्ही बदलून टाकाल, आशावादी होऊन जर प्रयत्न कराल तर प्रपंच यशस्वी करून परमार्थहि साधाल, असा समर्थांचा उपदेश आहे. प्रयत्नाबरोबर शक्तीचेंही महत्त्व त्यांनी लोकांना पटवून दिलें. समर्थांनी उपासनेकरितां घेतलेलीं दैवतेंच शक्तिमान होतीं. रावणाला

लोळविणारा राम, त्याचा साहाय्यक बलभीम व रामाला वर देणारी भवानी हीं तीनही दैवतें पुढें ठेवून शक्तीचे पाठ लोकांना समर्थांनी दिले. शक्तिरूपी देवीची प्रार्थना करितांना ते म्हणतातः—" शक्तीने पावती सुखें। शक्ती नसतां विटंबना ॥ शक्तीने नेटका प्राणी । विभवें भोगितां दिसे ॥ कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे ॥ कळा नाही कान्ति नाही । युक्तिबुद्धि दुरावली ॥ साजिरी शक्ति तों काया । काया मायाचि वाढवी॥ शक्ती तों सर्वही सुखें । शक्ती आनंद वाढवी ॥ सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ति भोगिजे ॥ शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ॥ शक्तीने मिळती राज्यें । युक्तीने यत्न होतसे ॥ शक्ति युक्ति जयें ठायीं । तेथें श्रीमंत धावती ॥" (स. क. ४३६). शक्तीने राज्यें मिळतात असें नुसतें सांगूनच ते थांबले नाहीत, तर या शक्तीचा उपयोग देवद्रोही कुत्त्यांना मारून घालवून देण्याकडे करा असेंही त्यांनी सांगितलें. याच दृष्टीने समर्थवाङ्मयांतील 'क्षात्रधर्म' प्रकरण अत्यंत महत्त्वाचें व स्फूर्तिदायक असें आहे:—

"मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें । फिरोनि येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ऐसे अवघेचि उठतां । परदळाची कोण चिंता । हरणें लोळवी चित्ता । देखतदेखतां ॥ देवमात्र उच्छेदिला । जित्यापरिस मृत्यू आला । आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ मराठा तेतुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा । येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्होळ करावा । मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परौते । देवदास पावती फत्ते । येदर्थी संशय नाही ॥ अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी। रामदास ध्यातो मनीं। इदंनिमित्य॥" शक्तिरूपिणी तुळजाभवानीची उपासना स्वतः करून महाराष्ट्रालाहि शिकविण्याचा आपला उद्देश रामदासांनी शेवटल्या ओवींत असंदिग्धपणें सांगितला आहे. महाबळेश्वरीं असतांना "रामवरदायिनी देवी । दासें धुंडून काढिली ॥," प्रतापगडावर महाराजांकडून तिची स्थापना करविली, व या देवीने वर दिल्यामुळें रामाला जसा रावण मारतां आला, त्याचप्रमाणें याच देवीच्या प्रसादाने, "देवदास पावती फत्ते" अशी माझी अगदीं

खात्री आहे, असें लोकांना समर्थांनी आश्वासन दिलें. जें देवीच्या उपासनेचें ध्येय तेंच रामचंद्राच्या व मारुतीच्याही उपासनेचें होतें हें अगदीं उघड आहे. तात्पर्य, रामदासांनीं राष्ट्रांतील क्षात्रवृत्ति जागृत होईल व स्वधर्मप्रीति वाढेल असे प्रयत्न केले. त्यामुळें त्यांचे शिष्य शिवाजीमहाराज यांचें स्वराज्यस्थापनेचें काम बरेंच सुलभ झालें असलें पाहिजे.

तात्पर्य समर्थांनी बदललेला काळ ओळखला. केवळ संतपणानें काम भागत नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलें व काळाबरोबर तेही पुढें गेले. आजूबाजूच्या परिस्थितीकडे सूक्ष्मपणें त्यांनी पाहिलें व अध्यात्माच्या आणि हरिभक्तीच्या दर्जाला राजकारण चढविल्याशिवाय ही परिस्थिति बदलणार नाहीं हें त्यांनी ओळखलें. तोंपर्यंतच्या कवितेंत राजकारणाला इतकें वरिष्ठच काय, पण कनिष्ठही स्थान मिळालें नव्हतें. स्वधर्माकरितां राजकीय उलाढाली करण्याची वेळच तेव्हां कदाचित् आली नसेल. समर्थांना तें आवश्यक वाटलें. सर्व गोष्टींविषयीं सावध राहण्याचें त्यांनी ठरविलें. हरिभक्तीच्या, अध्यात्माच्या, राजकारणाच्या उपदेशाकरितां मोठी संघटना निर्माण केली. शेंकडों महंत तयार केले. हिंदुस्थानांतलि मोठमोठ्या शहरी मठस्थापना करून तेथें हे महंत पाठविले. देव बौध्य होऊन बसला आहे हें न आवडल्यामुळें, धनुर्धारी रामाची उपासना प्रसृत केली. देवांना बंदींतून सोडविणाऱ्या, धर्मस्थापना व धर्मसंरक्षण करणाऱ्या, एकपत्नी, एकवचनी अशा क्षत्रियोत्तमाचा आदर्श लोकापुढें ठेविला. त्याच्या पराक्रमाचें नाना रीतींनी वर्णन केलें. त्याच्या सारखाच पराक्रमी असा त्याचा साहाय्यक जो मारुति त्याच्या मूर्ति सर्वत्र स्थापन केल्या. नुसत्या भक्तीने आतां भागणार नाहीं हें ओळखून भक्तीला शक्तीची जोड दिली. या शक्तीची कृपा असल्याशिवाय यश मिळत नाहीं, शक्तीनेच राज्यें मिळतात व रामालासुद्धां या शक्तिदेवतेच्या वरदानानेच यश मिळालें, असें लोकांना त्यांनी सांगितलें. तुळजापूरची भवानी हें समर्थांचें व शिवाजीचें कुलदैवत होतें. प्रतापगडावर या देवीची स्थापना करून " तुझा तूं वाढवी राजा । शीघ्र आम्हाचि देखतां " अशी तिची प्रार्थना समर्थांनी केली. " दुष्ट संहारिलें मागें । ऐसे उदंड ऐकितों । परंतु रोकडें कांही । मूळ सामर्थ्य दाखवी ॥ " पूर्वी तूं दुष्टसंहार केलास याची प्रत्यक्ष प्रचीति

आम्हांला येऊं दे. आमच्या देखत दुष्टांचा नाश केलास तरच पूर्वीही तूं तो केला होतास असें आम्ही मानूं, असेंही देवीला क्षमापूर्वक बजावण्यास त्यांनी कमी केलें नाही. " उदंड खस्तीचीं कामें । मर्द मारूनि जातसे ॥ नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चित लालसी ॥ " असें सांगून लोकांना शक्ति कमाविण्यास उत्तेजन दिलें. प्रारब्धवाद खोडून टाकून " केल्याने होत आहे रे । आधीं केलेंचि पाहिजे ॥ " असें म्हणून प्रयत्नवादाला जोराचा पाठिंबा दिला आणि अशा रीतीने रामोपासनेबरोबर राजकारणाचा, परमार्थाबरोबर प्रपंचाचा व भक्तीबरोबर शक्तीचा सर्वांना उपदेश करून शेवटीं आपल्या अनन्यसाधारण,ओजस्वी व प्रभावी वाणीने "मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ॥ " असें गर्जून त्यांनी जेव्हां महाराष्ट्रांतील क्षत्रियांना धर्मस्थापनेसाठीं लढण्याला प्रवृत्त केलें, तेव्हांच "खौळले लोक देवाचे । मुख्य देवचि ऊठला । कळेना कायरे होतें । आनंदवनभूवनीं ॥ त्रैलोक्य चालल्या फौजा । सौख्यबंदविमोचने । मोहीम मांडिली मोठी । आनंदवनभूवनीं ॥ कल्पांत मांडिला मोठा । म्लेच्छदैत्य बुडावया । कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं ॥ बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें । अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवनभूवनीं ॥ पूर्वी जे मारिले होते । तेचि आतां बळावले । कोपला देवदेवांचा । आनंदवनभूवनीं ॥ येथून वाढला धर्मू । रमाधर्मसमागमें । संतोष मांडला मोठा । आनंदवनभूवनीं ॥ बुडाला औरंग्या पापी । म्लेच्छसंहार जाहला । मोडलीं मांडलीं क्षेत्रें । आनंदवनभूवनी ॥ बुडाले भेदवादी ते । नष्ट चांडाळ पातकी । ताडिले पाडिले देवें । आनंदवनभूवनी ॥ गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें । निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभूवनी ॥ उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया । जपतप अनुष्ठानें । आनंदवनभूवनीं ॥ रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि ऊठली । मारिले पूर्वीचे पापी । आनंदवनभूवनीं ॥ प्रतेक्ष चालली राया--। मूळमाया--समागमें । नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभूवनी ॥ सामर्थ्यें येश कीर्तीची । प्रतापें सांडिली सीमा। ब्रीदेंचि दीधलीं सर्वें । आनंदवनभूवनी ॥" असे समाधानाचे व कृतकृत्यतेचे उद्गार त्यांस काढतां आले.

हजारों वर्षे महाराष्ट्रांतील लोकांनी ज्या संस्कृतीचें पालन केलें त्या

वैदिक किंवा हिंदु संस्कृतीच्या संरक्षणार्थ, समर्थांनीं वर म्हटल्याप्रमाणें आनंदवनभुवनांतले देवाचे लोक कसे खौळले, त्रैलोक्य फौजा कशा चालल्या, म्लेंच्छ दैत्य बुडविण्याकरितां त्यांनी मोठा कल्पांत कसा मांडिला, म्लेंच्छसंहार करून आणि शेवटीं औरंग्या बुडवून मोडलेलीं क्षेत्रें कशीं मांडली हा सर्व इतिहास अत्यंत स्फूर्तिदायक आहे. स्वसंस्कृतीच्या संरक्षणार्थ प्रतापगडापासून पानिपतापर्यंत शेकडों रणांगणांवर मराठ्यांनी जें अपूर्व बलिदान केलें तें महाराष्ट्राच्या इतिहासांत अजरामर होऊन राहील. ऋषिमुनींनी आणि साधुसंतांनी उपदेशिलेली ही देवधार्मिक संस्कृति समजून घेऊन मराठ्यांनी देवाच्याकारितां प्रतापगडापासून पानिपतापर्यंत शतवार्षिक यज्ञ कसा केला, त्यांत आपल्या प्राणांच्या आहुति कशा दिल्या व अशा रीतीने देवऋण व ऋषिऋण कसें फेडलें याचें सविस्तर वर्णन या ग्रंथांत येऊं शकत नाहीं. तें पुढें केव्हां तरी करूं. पण या अपूर्व रणयज्ञाची श्रेष्ठता लक्षांत येण्यास तो ज्या संस्कृतीकरितां केला गेला, त्या संस्कृतीचें यथार्थ स्वरूप कळणें अवश्य असल्यामुळें, तें थोडक्यांत आतांपर्यंत सांगून पुढील यज्ञवर्णनाची पूर्व तयारी येथें करून ठेविली आहे.

---

**प्रस्तुत लेखकाचें पुढील पुस्तक**

## " प्रतापगड ते पानिपत "

विजिगीषु मराठ्यांनीं प्रतापगडापासून पानिपत-पर्यंत केलेल्या अपूर्व रणयज्ञाचें वर्णन यांत येईल.

## प्रकरण दहावें.

# उपसंहार.

आतांपर्यंत पाहिलेल्या इतिहासावरून असें लक्षांत येईल कीं, महाराष्ट्रांतील संस्कृति ही धर्मप्रधान आहे. हा धर्म वैदिक आणि वर्णाश्रमात्मक असून तो सर्व मनुष्यजातीकरितां प्रवृत्त झाला आहे. कारण धर्म हा एकच असूं शकतो, अनेक असूं शकत नाहीत. त्यांत पंथ अनेक असतील, पण ते एकाच जागतिक धर्माचीं अंगें म्हणून ओळखले पाहिजेत. अशा रीतीने मूळ वैदिक धर्म हा अखिल मानव जातीकरितां प्रवृत्त झाला आहे. हा धर्म पाळणाऱ्या लोकांना आरंभीं आर्य म्हणत व सर्व विश्व आर्य करण्याची तत्कालीन लोकांची आकांक्षा असे हें लक्षांत घेतलें म्हणजे वैदिक धर्मीयांची इतर लोकांना वैदिक धर्मांत न घेण्याची आजची वृत्ति अधार्मिक आहे हें स्पष्ट दिसतें. या वैदिक धर्माला त्याचें पालन प्रामुख्याने हिंदुस्थानांतील लोक करीत असल्यामुळें व त्यांची प्रगमनशीलता कमी झाल्यामुळें हिंदुधर्म असें पुढें म्हणूं लागलें. वस्तुतः हिंदु लोकांचा वैदिक धर्म हा सर्व जगाचा धर्म आहे व पृथ्वींतील सर्व मनुष्यांनी तो येथून शिकून जावा असें मनूनेही म्हटलें आहे.

वैदिक धर्म आरंभी केवळ तेजस्वी देवतांच्या प्रार्थनांनी बनला असावा. नंतर या प्रार्थनांबरोबर त्या देवतेला उद्देशून हवन करण्याची चाल ऋग्मंत्रकालापूर्वी पडली आणि हा धर्म यज्ञप्रधान झाला. यज्ञांचा अतिरेक झाल्यावर उपनिषदांतील तत्त्वज्ञान जन्माला आलें व वर्णाश्रमोचित कर्में करणें हाच एक मोठा आयुष्यभर चालणारा यज्ञ आहे अशी कल्पना रूढ होऊन यज्ञांचें बंड कमी करण्यांत आलें व वर्णाश्रमांच्या सामाजिक संस्थेचें महत्त्व वाढलें. अगदीं आरंभीं वर्णविभाग नव्हता. पण क्षत्रिय हे राष्ट्र व धर्मरक्षणाला आवश्यक आहेत ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें, आर्यांत प्रथम ब्राह्मण, क्षत्रिय असे भेद पडले व या दोन वर्णांच्या कर्तव्याशिवाय इतर कामें करणारी प्रजा म्हणजे विश् ही वैश्य झाली. नंतर येथील अनार्यांना आरंभीं शूद्र म्हणून चौथा वर्ण करून त्रैवर्णिकांनी आपल्यांत घेतलें. ही

चातुर्वर्ण्यसंस्था अत्यंत उपयुक्त आहे असें आढळून आल्यामुळें, वेदकालापासून रामदासांपर्यंत हजारों वर्षें महाराष्ट्रांत तिचा पुरस्कार केला गेला. आरंभीं तीनही आणि नंतर चारही वर्णांत अन्न आणि लग्नव्यवहार मोकळेपणाने होत असत. पुढें शूद्र वर्णाशीं लग्नव्यवहार बंद केले गेले तरी अन्नव्यवहार होतच असे. त्यानंतर त्रैवर्णिकांतील विवाहव्यवहार बंद होऊन सवर्णांतच विवाह करावे असा नियम झाला. तथापि त्रैवर्णिकांत अन्नव्यवहार होतच असे. आरंभीं जातिसंस्था नव्हती. पुढें एकाच वर्णांत धंद्यामुळें, देशभेदामुळें, भक्ष्यभेदामुळें असंख्य जाती झाल्या आणि शेवटीं अन्न आणि लग्नव्यवहार त्या त्या जातीपुरते मर्यादित करण्यांत आले. या संकुचितपणाचा एवढा अतिरेक झाला कीं, शेवटीं भावाबहिणीमध्यें लग्न लावण्याची पाळी आली. हा जातिभेद वैदिक धर्माला मान्य नाही ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. वैदिक धर्म वर्णभेद ओळखतो, जातिभेद ओळखत नाही, वैदिक धर्म वर्णाश्रमात्मक आहे, जात्यात्मक नाही. वैदिक धर्माला वर्णसंकराची भीति वाटते, जातिसंकराची वाटत नाही. सूत्र किंवा स्मृतिकालीं जेव्हां जातिभेद उत्पन्न झाले तेव्हां त्यांची आवश्यकता असेल. आतां या भेदांचा अतिरेक होऊन समाजाचीं सहस्रशः शकलें झाल्यामुळें सर्व हिंदु एकत्र येणें मोठें कठिण झालें आहे. आतां हिंदु ही एकच जाति ठेवून त्या जातीचे सर्व लोक गुणकर्मांप्रमाणें चार वर्णांत विभागून वर्णधर्माचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे. वर्णसंस्थेप्रमाणेंच आश्रमांची संस्थाही पुनरुज्जीवित केली पाहिजे. अगदीं आरंभीं तीनही वर्णांचीं मुलें उपनयन झाल्यानंतर गुरुगृहीं बारा वर्षें रहात असत. पुढें तीं नऊ वर्षें राहूं लागलीं. नंतर हीं मुदत पांच वर्षांवर येऊन पुढें अजिबात हा आश्रमच नाहीसा झाला. समाज संपन्न झाला. शिक्षणाकडून त्याचें लक्ष उडालें, विद्येची प्रगति खुंटली आणि विद्यार्थी शिक्षण सोडून घरीं बसल्यामुळें त्यांचीं लग्नें लवकर होऊं लागून बालविवाह सुरू झाले. तत्पूर्वी प्रौढविवाहच होत असत. नंतरही बालविवाह जरी सुरू झाले तरी एकत्र कुटुंब पद्धतींत वधूवरांना स्वातंत्र्य नसल्यामुळें त्यांच्या आचारविचारविहारांवर वडील माणसांचें नियंत्रण राही व त्या-

मुळें वधुवरांनी विवाहापूर्वी व नंतर जसें वागणें आवश्यक आहे तसें त्यांना वागावें लागल्यामुळें त्यांची प्रजाही सुदृढ निपजे. आज मुलांच्या शिक्षणाची मर्यादा वाढल्यामुळें, मुलामुलींच्या विवाहांची वयोमर्यादाही वाढली आहे. बालविवाह किंवा प्रौढविवाह, एकपत्नीत्व किंवा बहुपत्नीत्व हीं देशांतील आर्थिक सामाजिक व राजकीय परिस्थितींवर अवलंबून असतात. राष्ट्र संपन्न होतें, व एकत्रकुटुंबपद्धति अस्तित्वांत होती तेव्हां बालविवाह प्रचारांत होते. आज राष्ट्राला दारिद्र्य आलें, नोकरीकरितां मुलें वाटेल तिकडे जाऊं लागलीं, पैसा मिळविल्याशिवाय लग्न करणें अशक्य झालें व एकत्र कुटुंब पद्धति मोडली तेव्हां साहजिकच लग्नाचें वय वाढून प्रौढविवाह प्रचारांत आले. धार्मिक लोकांच्या मुलीसुद्धां ' अष्टवर्षा भवेत्-कन्या ' ही मर्यादा ओलांडून त्याच्या दुप्पट वयाच्या होऊन विवाहित होऊं लागल्या. आणि बालविवाहाची निंदा करणाऱ्या प्रौढविवाहितांची प्रजाही अशक्त निपजूं लागली. याचें खरें कारण ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम हे उत्पन्न होऊन त्यांतले नियम आम्ही पाळीनासे झालों हें आहे. विवाह ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणें लवकर किंवा उशीरा केव्हांही झाला तरी वधुवरांनी ब्रह्मचर्य व गृहस्थाश्रमांतील नियम जर यथायोग्य पाळले तर त्यांची प्रजा निरोगी व सशक्त निपजेल म्हणून हे दोन्ही आश्रम पुनरुज्जीवित केले पाहिजेत. ते जसेच्या तसेच पुनः सुरू करणें अशक्य आहे हें कोणीही सांगेल. गुरुगृहीं राहून आणि समिधा आणून ब्रह्मचारी आज हवन करतीलच असें नाही किंवा प्रत्येक गृहस्थ अग्निहोत्र पाळून, सात हविःसंस्था, सात सोमसंस्था व सात पाकसंस्था आचरणार नाही हेंही खरें पण व्यक्तीचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास होण्याला आवश्यक असे जे त्रिकालाबाधित नियम या दोन्ही आश्रमांत पाळावयाचे असतात ते पाळणें आजही सर्वांना शक्य व अवश्य आहे. यज्ञ आणि अग्निहोत्रें यांचें पुनरुज्जीवन करणें अशक्य आणि अनावश्यक असलें तरी त्याच्या मुळाशीं जी प्रवृत्तिपरता आहे तिची वाढ राष्ट्रांत अवश्य केली पाहिजे. आणि वेद, यज्ञ, अग्निहोत्र यांचें पालन प्रत्येकाला करणें अशक्य असलें तरी प्राचीन संस्कृतींतील या अवशेषांचें रक्षण राष्ट्राने अवश्य केलें पाहिजे. प्रत्येक प्रांतांत सरकारी खर्चाने एक मोठी वेदशाळा, अग्निहोत्र शाळा,

व पाठशाळा बांधून, शिष्यवृत्त्या देऊन, आज हजारों वर्षें परंपरेने जिवंत ठेविलेले वेद, निरनिराळीं शास्त्रें, अग्निहोत्र व यज्ञ जिवंत ठेवणें अवश्य आहे. सगळ्यांत जुनी संस्कृति हा अभिमान बाळगावयास जर पाहिजे असेल, व तो बाळगलाच पाहिजे तर प्रत्येक प्रांताने जुने अवशेष जतन करून ठेविले पाहिजेत. संसार संपल्यावर शक्य त्याने वानप्रस्थाश्रम स्वीकारून राष्ट्राच्या संसाराची चिंता वहावी व सर्व शक्ति गलित झाल्यावर एखाद्या ब्राह्मणाने संन्यास घेतला तर त्याबद्दल समाजाने कुरकुर करूं नये.

या सर्व गोष्टी कांही नवीन आचारांत आणावयाच्या नाहीत. पूर्वीं एका काळीं त्या आपल्या समाजांत होत्याच. त्यांचें पुनरुज्जीवन करणें म्हणजेच सुधारणा होय. समाज हा चल आहे. त्यांत कोणतीही गोष्ट स्थिर नसते. बालविवाहच चांगले किंवा प्रौढविवाह चांगले हीं विधानें परिस्थितिनिरपेक्ष केव्हांही करतां येणार नाहीत. तीच गोष्ट अस्पृश्यतेची किंवा जातिभेदाची आहे. एखाद्या परिस्थितींत बालविवाहच करणें इष्ट असेल, अस्पृश्यता आणि जातिभेद पाळणें अवश्य असेल तर एखाद्या परिस्थितींत प्रौढविवाह करणें, अस्पृश्यता आणि जातिभेद मोडणें अवश्य होऊन बसेल. बालविवाहाचा अतिरेक झाला किंवा परिस्थितीशीं तो जमेनासा झाला म्हणजे प्रौढविहाहाचा पुरस्कार करणें ही सुधारणा होईल. याच्या उलट प्रौढविवाहाचा अतिरेक होऊन त्याचे अनिष्ट परिणाम दिसूं लागले म्हणजे बालविवाहाचा पुरस्कार करणे ही सुधारणा होते. अमेरिकेंत बालविवाहाची सुधारणा लोकांनी आतां हातीं घेतली आहे. राष्ट्रसंपन्न असलें व स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां जास्त असली तर बहुपत्नीकत्व ही सुधारणा होईल. समान संख्या असेल तर एकपत्नीकत्व ही सुधारणा होईल. म्हणून कोणत्याही सुधारकाने असुक एक चाल त्रिकालाबाधित चांगली आहे असें समजून मागील किंवा पुढील लोकांना शिव्या देण्याचें धाष्टर्य करूं नये व आपल्या काळाला आवश्यक असेल ती सुधारणा करण्याला कचरूं नये. सामाजिक चालीरीति या समाजाच्या सर्वांगिण विकासाचीं साधनें आहेत. ध्येयावर नजर ठेवून हीं साधनें बदलत असतात. आजपर्यंत बदललीं आहेत व बदललीं पाहिजेत. व्यक्तीची

आणि समाजाची सर्वांगांनी उन्नति होणें, त्यांचा विकास होत जाऊन त्यांना पूर्णता येणें हें ध्येय, हें साध्य सनातन आहे. या साध्याचीं साधनें मात्र सनातन नाहीत. जीवाने शिव होणें, पूर्ण अशा परमेश्वराची प्राप्ति स्वतः पूर्ण होऊन करून घेणें हें सनातन ध्येय आमच्या संस्कृतीने अखिल मानवजातीपुढें ठेविलें आहे. या ध्येयाला अनुकूल अशा तऱ्हेचीं नियंत्रणें व्यक्ती व समाज यांच्या आचारविचारांवर घातलीं पाहिजेत हें मग ओघानेच येतें. वर्ण आणि आश्रमसंस्था निर्माण करून हीं बंधनें समाज व व्यक्ति यांवर आमच्या संस्कृतींत घातलीं आहेत. मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या नैसर्गिक त्रैगुण्यावर या वर्णसंस्थेची उभारणी केली असल्यामुळें, कोणत्याही उन्नत राष्ट्रांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने ती दृष्टीस पडते. शास्त्रीय शोध लावणारे ब्राह्मण, राष्ट्रांकरितां लढणारे क्षत्रिय व राष्ट्रीय संपत्ति वाढविणारे वैश्य असल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राचा उत्कर्ष होऊं शकत नाही. या तीनही वृत्ति निरनिराळ्या माणसांच्या ठिकाणीं नैसर्गिक असल्यामुळें, "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः" 'मी हें चातुर्वर्ण्य गुणकर्मानुसार निर्माण केलें आहे' असें श्रीकृष्णाने म्हटलें आहे. मानवी विकासाचे जे नैसर्गिक नियम आहेत तेही सनातन आहेत. उदाहरणार्थ, जसें खावे तशी बुद्धि होते, किंवा ब्रह्मचर्य-पालन हें व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला आवश्यक आहे हे नियम केव्हां-ही पाळलेच पाहिजेत. कारण हे मनुष्यकृत नाहीत; पण जातिभेद किंवा अस्पृश्यता हे मनुष्यांनी विशिष्ट परिस्थितींत समाजाच्या कल्याणाकरितां घातलेले निर्बंध ती परिस्थिति नष्ट झाल्यावर काढून टाकण्याचा समाजाला निःसंशय अधिकार आहे. वर्णाश्रमसंस्थेंतील सर्व मनुष्यकृत नियम आज-पर्यंत आपण बदलीत आलों आहो. हे नियम परिस्थितीप्रमाणें, समाजाच्या कल्याणाकडे नजर देऊन बदलणे यांत अधर्म कांहीच नाही. "यतोऽभ्युदय-निःश्रेयससिद्धिः स धर्मः" अशी धर्माची व्याख्या असल्यामुळें, धर्माला समाजाच्या ऐहिक स्वास्थ्याशी कांही कर्तव्य नाही असें म्हणणाऱ्या लोकांना धर्म म्हणजे काय तें समजलें नाही असें म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें हीच गोष्ट उचित आहे. समाजाच्या प्रगतीचे दोन शत्रु असतात. एक कर्धांचे आणि कशांतच बदल करण्यास तयार नसलेले

लोक आणि दुसरे या रूढीलाच धर्म समजणाऱ्या नाफेर लोकांना धार्मिक समजून धर्माला शिव्या देणारे लोक. खरें पाहिलें तर वर्णाश्रमात्मक धर्म हा व्यक्तीच्या व समाजाच्या कल्याणाकरितां अवतरला आहे व या ध्येयाकडे नजर देऊन आवश्यक ते फेरफार वेळोवेळीं त्यांत पुढारी लोक करीत आले आहेत. असे फेरफार करण्याइतकी त्याची घटना लवचिक आहे, हें मागील इतिहासावरून सहज कळून येईल. आणि असें असल्यामुळेंच या वर्णाश्रमात्मक धर्माचा पुरस्कार आज हजारों वर्षे महाराष्ट्रांतील लोक करीत आले. ही गोष्ट लक्षांत घेऊन व आपल्या वाडवडिलांनी या सर्वश्रेष्ठ धर्माकरितां जो त्याग केला आहे त्याचें स्मरण ठेवून या धर्माबद्दल व आपल्या धर्मप्रधान संस्कृतीबद्दल कोणीही अनुदार उद्गार काढूं नये, रूढीला धर्म समजूं नये, धर्माचें खरें स्वरूप व इतिहास समजून घ्यावा आणि आपले मुसलमान व ख्रिश्चन बांधव आपआपल्या धर्माचा जसा अभिमान बाळगतात तसाच अभिमान आपणही आपला धर्म आणि धर्मप्रधान संस्कृति यांबद्दल बाळगावा म्हणून हें पुस्तक लिहिलें आहे. या संस्कृतींत चारी वर्णांना सारखेंच महत्त्व दिलें आहे. त्यापैकीं जे पुरुष श्रेष्ठ होतात ते साहजिकच सन्मान पावतात. ही नैसर्गिक श्रेष्ठ–कनिष्ठता सोडली तर भागवतधर्माने सर्वत्र समतेचा पुरस्कार करून प्रत्येक मनुष्याला नराचा नारायण बनण्याचें स्वातंत्र्य आहे असें सांगितलें आहे. क्षत्रिय वर्णाला या संस्कृतींत फार महत्त्व आहे कारण तिचें आजपर्यंत क्षत्रियांनी संरक्षण केलें आहे. समाजाच्या कल्याणाकरितां स्वार्थत्यागपूर्वक प्रत्येक व्यक्तीने आपलें कर्तव्य आजन्म केलें पाहिजे असा या संस्कृतीचा नियम आहे. ही संस्कृति जितकी स्वधर्मनिष्ठ आहे तितकीच परधर्मसहिष्णूही आहे. कारण ती एकच धर्म मानते व बाकीच्या पंथांचा आपल्यांत समावेश करण्यास तयार असते. गाई, स्त्रिया व विद्वान् यांची या संस्कृतींत फार काळजी घेतली जाते. ध्येय आणि व्यवहार, ब्राह्मण आणि क्षत्रिय अद्वैत आणि भक्ति, ज्ञान आणि कर्म या सर्वांचा समुच्चय या संस्कृतींत झाला आहे. ‘सर्वेनः सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यंतु । माकश्चिद्दुःखभाग्भवेत्” अशी या संस्कृतीची मनीषा असल्यामुळें जेथें जेथें सज्जनांचा छळ होत असेल तेथें तेथें धावून जाणें व दुष्टांचा

नाश करून सज्जनांना संकटमुक्त करणें हें या संस्कृतींत आवश्यक समजलें जातें. अशा तऱ्हेच्या या दैवी संस्कृतीचें संरक्षण करणें आपलें कर्तव्य आहे असें आज हजारों वर्षें महाराष्ट्र समजत आला आहे. महाराष्ट्राच्या या कर्तव्यालाच "महाराष्ट्र धर्म" असें समर्थांनी म्हटलें आहे. त्यांच्या-वेळीं महाराष्ट्रांतील सर्व वर्णांच्या लोकांनी, क्षात्रवृत्ति पत्करून या महाराष्ट्र धर्माचें पालन केलें व संस्कृतीचें संरक्षण केलें. ती क्षात्रवृत्ति महाराष्ट्रांतून आज नाहींशी झाल्यामुळें, व खरे ब्राह्मण व खरे क्षत्रिय महाराष्ट्रांत आज अस्तित्वांत नसल्यामुळें वर्णधर्म उत्सन्न झाले आहेत आणि त्यामुळें या संस्कृतीवर मोठें संकट आलें आहे.

लोक निर्बल झाल्यामुळें, त्यांच्या संस्कृतीचा व भाषेचा त्यांच्याच देशांत अपमान होत आहे व अज्ञानामुळें, स्वकीयांकडूनही त्यांचा उपहास होत आहे. संस्कृतीचा आणि धर्माचा उपहास करण्यापेक्षां खरे ब्राह्मण व खरे क्षत्रिय बनून या दैवी संस्कृतीचें संरक्षण करणें ही गोष्ट आज अत्यंत आवश्यक होऊन बसली आहे. अज्ञानामुळें आपण आपल्याच संस्कृतीचा जर उपहास करूं लागलो तर आपल्याजवळ आपलें असें म्हणण्यास काय राहिलें याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. संस्कृतींत दोष शिरले असतील तर ते काढून टाकण्यासाठीं आवश्यक त्या सुधारणा समाजव्यवस्थेंत घडवून आणल्या पाहिजेत. ज्यांना बुद्धि असेल त्यांनी ब्राह्मण होऊन ज्ञानसंपादन व ज्ञानप्रसार केला पाहिजे व शास्त्रीय शोध लावून ज्ञानांत भर टाकली पाहिजे आणि सामर्थ्य असेल त्यांनी क्षात्रवृत्ति स्वीकारून संस्कृतीचें संरक्षण करण्याला तयार झालें पाहिजे. "शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते" धर्मावर संकट आल्यास सर्वांनी शस्त्रधारण करावें अशी धर्माज्ञा आहे. शिवाजीमहाराजांच्या वेळीं ब्राह्मणांपासून शूद्रापर्यंत सर्वांनी क्षात्रवृत्ति स्वीकारून धर्मरक्षण केलें होतें. आजही महाराष्ट्रांतील लक्षावधि तरुणांनी क्षात्रवृत्ति स्वीकारणें अवश्य झालें आहे. धर्मनिष्ठ व्हा आणि खरे ब्राह्मण व खरे क्षत्रिय बनून, संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करण्याची तयारी करा म्हणजे ऐश्वर्य तुमचें आहे असा या पुरातन संस्कृतीचा महाराष्ट्रांतील आजच्या तरुणांना संदेश आहे.

समाप्त.

# सूचि

अगस्ति ३, ९, १०, ११, १३
अपरान्त ४, १०
अशोक ७३
आनंदवनभूवन १९०
आर्य ९, १३, १४, १५
आशावाद १८६
आश्रम ४, ५, ६, १०३
आहार १०६, १०७
ईशोपनिषत् ४१
उपनयन ५९, १०३
उषःसूक्तें १९, २०, २१
ऋग्वेद १६
ऋषींचें ऋण १, ३
एकनाथ १५९
कठोपनिषत् ४३
कल्पसूत्रें १७
केनोपनिषत् ४३
क्षत्रिय ९८, ९९
क्षात्रधर्म १८८
खोलेश्वर १२९
गीता ८०, ८१
चतुवर्गचिंतामणि १३१
चातुवर्ण्य ६४, ६५, ९४, ९५
चालुक्य ११९, १२०
छंद १८
जैन ७३
जैमिनी ७८
ज्योतिष १८
तुकोबाराय १६५
तुळजाभवानी १८८
तैत्तिरीयोपनिषत् ५०
दण्डकारण्य १४
दासोपंत १६४
देवगिरि १५५, १५६
देव आणि धर्म १७७, १७८
देवद्रोही १८८
देशभक्ति १७७
द्रविड १४, १५
धर्म १७५
धर्मभक्ति १७७
नचिकेता ४४
नामदेव १५१
नायकोराव १६८
निरुक्त १७, १८
न्यायशास्त्र ६३
पतंजलि ७८
पाणिनि ८, ६५
पुनर्विवाह २१, १०९
प्रपंचपरमार्थ १८४, १८५
प्रयत्नवाद १८७
प्रश्नोपनिषद् ४८
बादरायण व्यास ७९
बुद्ध ७०
बोपदेव १३१
ब्रह्मयज्ञ ६०
ब्राह्मण ९८, ९९

भक्तियोग १४९
भागवत धर्म १६१
भृगु १०, १३
मध्वाचार्य १३१, १३३
मनुस्मृति ८७
मराठी भाषा १४३, १५७, १६०
महम्मद पैगंबर १५४
महाराष्ट्र ३, ४, ५, ६
महाराष्ट्र धर्म १६८, १९८
महाराष्ट्रिक ६९
महावीर ७३
महंत १८१
मानभाव १३५
मारुती १८०
मुक्तेश्वर १६९
मुकुंदराज १३०
यज्ञ १, २, ३, २५, ३७, ६०, ६१, १४७
यादव १२८
राजकारण १८२, १८६
राजधर्म ११५, १७०
राज्यव्यवस्था ३३, ५६
रामदास १७३
रामानुजाचार्य १२६, १३२
रामोपासना १७९, १८०
राष्ट्रकूट १२३
लिंगायत १२५
वर्ण ५७, ९२, ९७, ९८, ९९
वसाहत ८, ९, १०
वामनपंडित १६७
विजयानगर १५६
विवाह २७, २८, ५८, ९०, १०८, १११,
विदर्भ ४, ५, १६
विज्ञानेश्वर १२४
वेद १६, १७
वैश्य १००, १०१
व्याकरण १७
व्रतें उद्यापनें १३७
शक्तिवाद १८७, १८८
शंकराचार्य १२३, १३२, १३३
शातवाहन ११८, ११९
शिक्षा १७
शूद्र १०१, १०२
शोपेनहार ५३
सत्यकामजाबाल ३५, ३६
संस्कृति ६,७,१११,१९२, १९
सांवतामाळी १५२
सांख्य ६२, ६३
सूत्रें ५५
सेना न्हावी १५२
हेमाद्रि १३१
ह्युएन्संग १२०, १२१
ज्ञानेश्वर १३९